## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ''अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९०-२०००)''

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**
**इतिहास विभाग**
**तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) या पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोध प्रबंध**

**संशोधक**
**रघुराज मुगुटराव कुरुमकर**

**मार्गदर्शक**
**प्रा. उमेश अशोक कदम**

**सप्टेंबर - २०१४**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्त्विक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी रघुराज मुगुटराव कुरुमकर यांनी "अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९०-२०००)" या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यू.जी.सी) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर प्रंबधाचे काम केलेले आहे.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१४

**मार्गदर्शक**

**प्रा. उमेश अशोक कदम**

# घोषणापत्र

**मी असे घोषित करतो की,** "अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९०-२०००)" हा माझा स्वत:चा शोधप्रबंध असून मी हा शोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोधप्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती संशोधनात्मक विधाने ही मी स्वतः अभ्यासून घेतलेली आहेत.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१४

**रघुराज मुगुटराव कुरुमकर**

**संशोधक**

# ऋणनिर्देश

'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे' विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी "अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९०-२०००)" हा शोधप्रबंध लिहिण्याकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने बहुमोल सुवर्णसंधी प्राप्त करुन दिली, त्याबद्दल मी या विद्यापीठाचा अत्यंत आभारी आहे. शोधप्रबंध परमेश्वराच्या कृपा आशीर्वादाशिवाय काहीही होत नसते, त्याची रुपेही वेगळी असतात. आमच्या गावचे ग्रामदैवत श्री. सिध्देश्वर महाराज, जिल्हयाचे श्रध्दास्थान मिरावली बाबांच्या कृपा आशिर्वादाने मी हा शोधप्रबंध पूर्ण करु शकलो. मी त्यांच्यासमोर नतमस्तक आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. यु.ए.कदम यांनी वेळोवेळी आत्मीयतेने व जिव्हाळयाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

सदरचा प्रबंध पूर्ण करण्यासाठी सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय केडगाव प्राचार्य डॉ. गोविंदराजे निंबाळकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा प्राचार्य पी.ए.लवांडे तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रा. सौ. एस.आर. जामदार, साईकृपा कला महाविद्यालय घारगांव प्राचार्य. डॉ. आर.डी. शेळके, दौंड तालुका, कला, वाणिज्य महाविद्यालय इतिहास विभाग प्रमुख डॉ. अरुणा मोरे, श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य महाविद्यालय धुळे, प्रा. एस.के. भामरे यांनी बहुमोल सहकार्य केले आहे मी त्यांचाही ऋणी आहे.

प्रबंधाच्या पुर्ततेसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथपाल, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल, कै. माणिकराव बाबुराव जगदाळे अध्यापक विद्यालय लिंपणगांव ग्रंथपाल तसेच अहमदनगर जिल्हा अर्थ व सांख्यिकी कार्यालय, संशोधन सहाय्यक एस.एन. गवारे, श्री. एस.ए. कौमार, यांनी मला विशेष सहकार्य केले मी त्यांचाही ऋणी आहे.

या प्रबंधाच्या परिशिष्टामध्ये समाविष्ट असलेली छायाचित्रे, नकाशे या सर्वांची माहिती प्रियंका कुरुमकर, प्रा. सौ. स्वाती कुरुमकर यांनी अत्यंत उत्साहाने आणि प्रयत्नपूर्वक मला मिळवून दिली. त्यांच्या मदतीनेच मी परिशिष्टाचा सहभाग या प्रबंधामध्ये सादर करु शकलो त्यांचाही मी ऋणी आहे.

संशोधनाबद्दल आदर बाळगणाऱ्या आणि संशोधकाला सर्वोतोपरी मदत करणाऱ्या, ज्यांच्या मदतीमुळे सातत्याने संशोधन करत रहावे अशी इच्छा संशोधकाच्या मनात निर्माण होत राहील असे विविध मान्यवर ज्यांनी मला आपला बहुमोल वेळ मुलाखतीसाठी देऊन मार्गदर्शन केले या सर्वांचा

मी ऋणी आहे. विशेषकरुन मा. श्री. शिवाजीराव नागवडे (बापू) चेअरमन श्रीगोंदा.स.सा.का. उपाध्याक्ष महाराष्ट्र राज्य साखर संघ मुंबई, तसेच  श्री. सुभाषराव शिंदे संचालक श्रीगोंदा.स.सा.का., श्री. पांडुरंग कृपा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग जगदाळे यांनीही मदत केली या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे.

वेळोवेळी मित्रत्वाच्या नात्याने मदत व मार्गदर्शन करणारे प्रा. नंदकुमार पवार, श्री. दत्तात्रय पवार, प्रा. नानासाहेब कुरुमकर, श्री. सुर्यकांत भोंडवे, प्रा. युवराज इथापे, प्रा. संतोष गावडे, प्रा. प्रविण पिसे,  ह.भ.प. विजयाताई पंडीत, ह.भ.प. जिजाताई महांडूळे, श्रीमती नयनतारा शिंदे अशा अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींचा तसेच मित्र परीवाराचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या मिळालेल्या सहकार्यामुळेच मी हा शोधप्रबंध पूर्ण करु शकलो त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे सोन्याचे आधारस्तंभ आजोबा कै. विनायकराव (बापू) आणि श्रीमती राधिकाबाई तसेच माझ्या पाठीशी सदैव सावली प्रमाणे उभे राहणारे प्रेरणास्थान माझे वडील मुगुटराव (आबा) आई सौ. ताराबाई, चुलते संजीवनराव (तात्या), शरदराव (आप्पा) आणि चुलती सौ. विजया, सौ. मंदाकिनी, सौ. भारती पवार (आत्या), श्री. प्रभाकर पवार (मामा) माझे संशोधन आपली जबाबदारी मानुन रात्रंदिवस सर्वतोपरी हसत खेळत मदत करणारे माझे बंधू युवराज,   ज्ञानेश्वर, प्रेमराज आणि भगिनी रुपाली, वैशाली, शितल, प्रतिभा, प्रियंका, वहिनी सौ. स्मिता आणि पत्नी प्रा. सौ. मनिषा, बाळबोध प्रश्न विचारत वेदिका, तुषार गाडेकर यांनी मला प्रबंध सादर करण्यासाठी दिलेली मोकळीक व केलेली मदत या माझ्या कुरुमकर कुटुंबियांचे मी मनःपूर्वक ऋणी आहे.

प्रबंधाचे टंकलेखन सुबकरित्या करुन देणारे, अभिनव टाईपरायटिंग इन्स्टिटयुटचे प्राचार्य आर.आर. बुनगे यांचेही, तसेच उपमुद्रित तपासून देण्याचे काम शिक्षणशास्त्र महाविद्यालय घारगांव प्रा. एम.आर. गोंटे यांनी केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

स्थळ - पुणे

दिनांक - / /२०१४

**रघुराज मुगुटराव कुरुमकर**

**संशोधक**

.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | | पृष्ठ. क्र. |
|---|---|---|---|
| **प्रकरण - १** | **अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी** | | **१** |
| | १.१ | प्रास्ताविक | २ |
| | १.२ | संशोधनाची उद्दिष्टे/गृहितके | ३-४ |
| | १.३ | संशोधनाची व्याप्ती/मर्यादा | ४-५ |
| | १.४ | संशोधन पध्दती | ६ |
| | १.५ | प्रस्तावना | ६ |
| | १.६ | अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी | ७ |
| | १.७ | अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १३ |
| | १.८ | दक्षिण नगर तालुक्यातील धार्मिक, पर्यटनस्थळे | २१ |
| | १.९ | जिल्हयातील समाजजीवन वैशिष्टे | ७२ |
| | १.१० | तळटिपा | ७८ |
| **प्रकरण - २** | **अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थिती** | | **८२** |
| | २.१ | प्रस्तावना | ८३ |
| | २.२ | नगर जिल्हयातील कम्यूनिस्ट चळवळ | ८७ |
| | २.३ | दक्षिण नगर मधिल राजकीय, सामाजिक नेते / कारकिर्द | ९३ |
| | २.४ | दक्षिण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, बँका, साखर कारखाने. | ११९ |
| | २.५ | तळटिपा | १३८ |
| **प्रकरण - ३** | **अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील सामाजिक स्थिती** | | **१४१** |
| | ३.१ | प्रस्तावना | १४२ |
| | ३.२ | शेतकरी चळवळ : पाणीप्रश्न - | १४६ |
| | ३.३ | श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याची स्थापना | १५८ |
| | ३.४ | तालुका सहकारी दुध उत्पादक संघ | १७१ |
| | ३.५ | सामाजिक अन्याय व अत्याचार | १७७ |
| | ३.६ | तळ टिपा | १८५ |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रकरण - ४** | | **अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील आर्थिक स्थिती** | **१८८** |
| | ४.१ | सहकारी चळवळ/सहकारी संस्था | १८९ |
| | ४.२ | उद्योगधंदे | २१८ |
| | ४.३ | शेती व्यवसाय | २२१ |
| | ४.४ | तळटिपा | २३२ |
| **प्रकरण - ५** | | **अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील शैक्षणिक स्थिती** | **२३४** |
| | ५.१ | प्रस्तावना | २३५ |
| | ५.२ | शैक्षणिक संस्थांची स्थापना | २४७ |
| | ५.३ | रयत शिक्षण संस्था, दक्षिणेतील शाखा,स्थापना व विस्तार | २६४ |
| | ५.४ | तळटिपा | २७३ |
| **प्रकरण - ६** | | **उपसंहार** | **२७५** |
| | ६.१ | निष्कर्ष | २८५ |
| | | • **संदर्भग्रंथ सूची** | २८७ |
| | | • **परिशिष्टे** | २९२ |
| | | **१) प्रश्नावली** | २९३ |
| | | **२) नकाशे** | ३०२ |
| | | **३) छायाचित्रे** | ३०९ |

# प्रस्तावना

"समाजाला आपल्या गतकालीन जीवनाचा व त्या काळातील घटनांचा सर्व गुणदोषांसकट परिचय घेणे यालाच रुढ भाषेत इतिहास असे म्हणता येईल." असा इतिहास स्थल, काल आणि व्यक्ती या तीन घटकांच्या संदर्भात येतो म्हणून इतिहास कोठे घडला, केंव्हा घडला आणि कोणी घडविला याला महत्त्व असते. इतिहासामध्ये अशी अनेक उदाहरणे सापडतील की सामान्य माणूस साधारणतः कायमच्या रुळलेल्या मार्गानेच जातो परंतु, काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या प्रतिभेच्या जोरावर सबंध समाजाची दिशाच बदलतात. म्हणुन अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील अशाच काही प्रतिभावंतांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात दिशा बदलण्याचे काम केले आहे. अशा बदललेल्या परिस्थितीचा म्हणजे १९९० ते २००० या दहा वर्षाच्या कालखंडातील अभ्यास केला आहे.

मानवी आयुष्यातील पूर्व घटिताचा शोध म्हणजे इतिहास, विविध साधनांच्या आधारे व विविध पध्दतींचा वापर करुन इतिहास संशोधन व लेखन केले आहे. इतिहासाची सातत्याने पुनर्मांडणी करणे अत्यंत आवश्यक असते. एखाद्या प्रदेशाचा, शैक्षणिक भागाचा अभ्यास म्हणजे केवळ त्या भागाचा अभ्यास नसतो, तर तेथील समाजजीवन, राजकीय, सामाजिक आर्थिक घडामोडी त्या समकालीन संदर्भांचा अभ्यास असतो. तेथील व्यक्ती, तिचे जीवनमान, दर्जा कालखंड आणि त्यांचे कर्तृत्व यांचे साकल्याने आकलन करुन घेण्यासाठी इतिहासकाराला संशोधनाची दृष्टी, वृत्ती असणे आवश्यक असते. त्यासाठी दैनंदिनी, आठवणी, पत्रव्यवहार, मुलाखती, आत्मचरित्रपर लेखन इत्यादी साधनांचा आधार घ्यावा लागतो.

कुठल्याही क्षेत्रातील विशिष्ट मानवी समूहाचे हित किंवा अहित अंतिमतः तेथील नेतृत्वाचे निर्णय व परिस्थितीवर अवलंबून असते. परिस्थिती आणि नेत्याचे अनुकरण करण्याचा समाजाचा मूलभूत नैसर्गिक स्वभाव आहे.

त्यामुळे "यथा राजा तथा प्रजा" किंवा "नेते तसे लोक" या उक्ती व्यवहारात जगात सर्वत्रच अनुभवास येतात विशिष्ट समुदायाच्या मानसिक जडणघडण, विचार पध्दती व प्रस्थापित नीतीमूल्यांच्या चौकटीवर परिसराचा विकास व प्रभाव अवलंबून असतो.

समुद्रात गलबतावरील शीडाचे जे महत्त्व असते तसेच जागतिक मानवी समाजात नेत्यांचे महत्त्व आढळून येते. एखादया संस्थेची विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वतः कार्यरत राहून लोकांना किंवा सहयोगी कर्मचाऱ्यांना कामाची प्रेरणा व योग्य दिशा देण्याचे कार्य नेत्यांकडून होत असते. प्राचीन काळी गुहेत वास्तव्य करणारा अप्रगत मानवी समूह असो किंवा आधुनिक पुढारलेला मानवी समूह असो नेता या वैश्विक संकल्पनेचे अस्तित्व, प्रभाव व महत्त्व सर्वत्र प्रत्ययास येते. त्यामुळे नेतृत्वविहीन समाज हा समाजच नव्हे, असे मत फ्रँकलिन दायमन यांनी व्यक्त केले. प्रत्येक मानवी समूहातच वस्तुतः नेतृत्व या सामाजिक व मानसिक प्रक्रियेचे अपरिहार्य अस्तित्व आढळते.

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात १९९० ते २००० या दहा वर्षाच्या काळात भलामोठा विशिष्ट जनसमुदाय नेत्यांच्या पाठीमागे उभा राहिला आणि त्या-त्या भगातील नेत्यांनी देखील जनतेला जी उद्दिष्टे साध्य व्हावी वाटतात ती पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. समूहाचा नेता हा जनसामान्यांपेक्षा काही विशिष्ट गुंणांनी युक्त असतो. त्यांच्याकडे दूरदृष्टी, धाडस, बुध्दिमत्ता, समूहाचा विश्वास संपादन करण्याची पात्रता, विचारक्षमता, निर्णयक्षमता इत्यादी खास गुण असतात.

सहकारी संस्था, दूधसंस्था, शिक्षणसंस्था, तंत्रशिक्षण, कृषीसंस्था, खरेदी विक्री संघ यामध्ये नेत्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. "कोणत्याही समूहात प्राणी त्यांच्यातील बलशाली आणि बुध्दीमान कळपाचा नेता बनतो. अंतर्गत कलह बाहय आक्रमणाशी मौलिक भूमिका बनवतो." नेता हा त्याच्या कळपाचा दिशादर्शक व पालनकर्ताच असतो. मानवी समूहात आपल्या जन्मजात किंवा कमवलेल्या विशेष गुणाच्या आधारे लोकोत्तर नेतृत्व निर्माण झाले. नेपोलियन बोनापार्ट, अब्राहम लिंकन, जोसेफ स्टॅलिन, व्लादीमीर लेनिन, विन्स्टन चर्चिल वगैरे पाश्चात्त्य नेतृत्वात अनेक अतिविशिष्ट गुणांचा समुच्चय होता, त्यांनी इतिहास घडविला.

भारताच्या १५० वर्षांच्या स्वातंत्र्यलढयात राष्ट्रपिता महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित नेहरु, वगैरे प्रभावी नेत्यांनी नेतृत्व दिले. आपल्याला हवी ती उद्दिष्टे, बदल घडवून आणण्याची क्षमता या नेत्यांमध्ये आहे, असा विश्वास वाटल्याने लोकांनी या नेत्यांसाठी तळहातावर शिर घेऊन आदेशाचे पालन केले. तालुक्यातील विविध नेत्यांनी अशाच राष्ट्रीय

नेत्यांच्या हाकेला साद घालत त्यांचा विचार प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक क्रांतीची चळवळ, लोकशाही सहकार चळवळ, पददलित सामान्यांच्या विकासाचे कार्य नेत्यांनी केले. जगातील अन्य महान आर्थिक, सामाजिक, राजकीय परिवर्तन तसेच क्रांत्यांमध्येही नेतृत्वांची मध्यवर्ती भूमिका बजावलेचे दिसते.

जिल्हयात राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन तसेच क्रांत्यांमध्येही विविध नेत्यांनी नेतृत्व केले आहे. बहुजनांच्या हितेषी उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी प्रोत्साहन देणे. जिल्हयाच्या दक्षिण परिसरातील मानवी समुदाय त्यांचा विकास त्यांच्या विकासासाठी घडलेल्या घडामोडी यांच्याशी निकटचा संबंध आहे. कुठल्याही प्रकारचा द्वेष, जात, धर्म, पंथ, लिंग, व्यावसायिक भिन्नत्त्व असणारा मानवी समुदाय प्रस्थापित नेतृत्वामुळे पुढे जात असतो, प्रगती किंवा अधोगती करतो. जेम्स यांच्या विचारातील हा धागा पाहिल्यानंतर या जिल्हयाच्या प्रगतीत व समाजाच्या जडणघडणीत विविध नेत्यांचा वाटा आहे.

**अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील स्थिती (१९९०-२०००) :-**

अहमदनगर हा महाराष्ट्रातील इतिहासाचा उज्ज्वल वारसा लाभलेला जिल्हा आहे. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयाला इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण झालेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या नकाशावर अहमदनगर जिल्हयाला खऱ्या अर्थाने मानाचे स्थान मिळवून दिले असेल, तर ते सहकार चळवळीने जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ पाहता १७,०४८ चौ.की.मी. इतके आहे. अशा या भौगोलिक विस्ताराने मोठया असणाऱ्या जिल्हयात अनेक ऐतिहासिक व धार्मिक वास्तू आहेत.

अहमदनगर जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा व लोकसंख्येचा विचार करता उत्तर नगर व दक्षिण नगर असे दोन भाग केलेले आहेत. अहमदनगर जिल्हयातच सहकार चळवळीचा प्रारंभ झालेला दिसून येतो. सहकार चळवळीतून मोठया प्रमाणावर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उलाढाल झाल्याचे दिसून येते. म्हणून जिल्हयाच्या पाडलेल्या दोन भागांपैकी दक्षिण नगर भागातील असणारे नगर, पाथर्डी, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड या तालुक्यांच्या १९९० ते २००० या दहा वर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला आहे.

उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिलेला जिल्हयाचे दक्षिण भागाचे योगदान प्रकाशात आणावे या हेतूने व इतिहास लेखनाची "स्थानिक इतिहास" किंवा "प्रादेशिक इतिहास" एक शाखा असल्याने संशोधनासाठी या विषयाची निवड केली आहे.

**संशोधन पध्दती :-**

अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत पुढील तंत्र वापरण्यात आले आहे. जिल्हयाच्या दक्षिण भागातील स्वातंत्र्यसैनिक, विविध संस्थातील अधिकारी, पदाधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्रश्नावली भरुन घेतली तसेच संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करुन शास्त्रीय पध्दतीने मांडणी केली आहे. याद्वारे जिल्हयाचे दक्षिण भागातील १९९० ते २००० या दहा वर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती जाणून घेतली आहे.

# प्रकरण - १

# अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

## प्रकरण - १

# अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

### १.१ प्रस्तावना

अहमदनगर हा महाराष्ट्रातील इतिहासाचा उज्ज्वल वारसा लाभलेला जिल्हा आहे. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयाला इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या नकाशावर अहमदनगर जिल्हयाला खऱ्या अर्थाने मानाचे स्थान मिळून दिले असेल तर ते सहकार चळवळीने जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची सुरुवात प्राचीन काळात अभ्यासवयास मिळते. जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ पाहता १७,०४८ चौ.कि.मी. इतके आहे. अशा या भौगोलिक विस्ताराने मोठया असणाऱ्या जिल्हयात अनेक ऐतिहासिक व धार्मिक वास्तू आहेत. या मध्ये प्रामुख्याने संत निळोबाराय, आत्मारामगिरीमहाराज, भुईकोट किल्ला, चाँदबीबीचा महाल, खडर्याचा किल्ला, बहादुरगड, अवतार मेहेरबाबा, संत शेख महंमद बाबा, गोदडमहाराज, कानिफनाथ, चौंडी आहिल्याबाई इ. ऐतिहासिक व धार्मिक वास्तूंनी हा जिल्हा संपन्न झालेला दिसून येतो.

ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी असलेल्या जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा विचार करता उत्तर नगर व दक्षिण नगर असे दोन भाग पाडलेले आहेत. अहमदनगर जिल्हयातच सहकार चळवळीला प्रारंभ झालेला दिसून येतो. सहकार चळवळीतून मोठया प्रमाणावर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उलाढाल झाल्याचे दिसून येते. म्हणून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष अहमदनगर जिल्हयावर असल्याचे दिसून येते. म्हणून जिल्हयाच्या पाडलेल्या दोन भागापैकी दक्षिण नगर भागातील असणारे नगर, पारनेर, पाथर्डी, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड या तालुक्यांच्या गेल्या दहा वर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करावयाचा आहे.

उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिलेल्या जिल्हयाचे दक्षिण भागाचे योगदान प्रकाशात आणावे या हेतूने व इतिहास लेखनाची स्थानिक इतिहास किंवा प्रादेशिक इतिहास एक शाखा असल्याने संशोधक संशोधनासाठी या विषयाकडे वळला आहे. परंतु या दक्षिण भागातील कार्य प्रस्तुत विषयाच्या संशोधनाचा निरपेक्ष मानस असून इतिहासाचा एक अभ्यासक व संशोधक या

नात्याने १९९० ते २००० या कालखंडातील अभ्यास करण्यात येणार आहे. कुठल्याही व्यक्तीनिष्ठतेला थारा न देता इतिहास लेखनशास्त्र अणि पध्दतीशास्त्र यांच्या आधारे अभ्यास केला आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात उपलब्ध साधनांच्या आधारे संशोधन केले आहे.

महाराष्ट्राचा विकास हा सहकार क्षेत्रावर आधारलेला आपणास दिसून येतो. सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयाला इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. आशिया खंडातील सहकारी कारखानदारीचा पाया अहमदनगर जिल्हयात घातला गेला. तो म्हणजे डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना इ.स. १९४९ स्थापनेपासून येथून पुढे खऱ्या अर्थाने सहकार चळवळीस प्रारंभ झाला. अहमदनगर जिल्हयाने सहकार चळवळीसाठी अनेक सहकार महर्षी देऊन सहकार चळवळीस अमूल्य असा वारसा निर्माण केला. सहकार चळवळीचे मोठे योगदान अहमदनगर जिल्हयाचेच त्यामुळे मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल व शैक्षणिक, सामाजिक, राजकीय विकास यामुळे सर्वांचे लक्ष अहमदनगर जिल्हयाकडे वेधले जाते.

**अभ्यासाचे महत्त्व :-**

भारतीय स्वातंत्र्यलढयात महाराष्ट्राचे योगदान फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये अहमदनगर जिल्हयात ज्या वेगवेगळया चळवळी झाल्या त्या चळवळीमध्ये राजकीय चळवळ, सामाजिक चळवळ, शैक्षणिक चळवळ, सहकार चळवळ या होत. या चळवळीच्या माध्यमातून जिल्हयात झालेला विकास आणि विशेषकरुन दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास समाजातील सर्व घटकांपुढे मांडणे व संशोधन रुपाने चिकित्सक अभ्यास करणे.

**१.२ संशोधनाची उद्दिष्टे :-**

प्रस्तुत संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे

१) अहमदनगर जिल्हयातील ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२) जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थितीचा १९९० ते २००० या १० वर्षातील अभ्यास करणे.

३) जिल्हयाच्या दक्षिण भागातील सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४) दक्षिण भागातील शैक्षणिक, सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.

५) शेतकरी, कामगार, मागास व उपेक्षीत यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्राने घडवून आणलेला बदल अभ्यासणे.

६) दक्षिण भागातील तालुक्यांचा विकास कामाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७) अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील इ.स. १९९० ते २००० या कालखंडातील वाटचालीची विखुरलेली माहिती एकत्रित करणे.

**गृहितके :-**

१) अहमदनगर जिल्हयाला भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

२) अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय चळवळ घडून आली.

३) दक्षिण भगात शेतकरी चळवळ झालेली आहे.

४) अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थातून विकास घडून आलेला आहे.

५) शेतकरी, कामगार, स्त्रिया, मागास व उपेक्षीत यांना विविध संस्था महत्त्वपूर्ण व दिशादर्शक आहेत.

**१.३ संशोधनाची व्याप्ती :-**

संशोधनाचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधकाने आपले लक्ष केवळ अहमदनगर जिल्हयातील दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास यावर केंद्रित असून तोच या प्रस्तुत शोधप्रबंधाचा अभ्यास आहे. यामध्ये खालील विषयांचा परामर्श घेतला आहे.

१) अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक, धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी.

२) दक्षिण भागातील राजकीय परिस्थिती.

३) सामाजिक, सांस्कृतिक विकास.

४) शेतकरी चळवळ.

५) आर्थिक विकास.

६) शैक्षणिक विकास.

वरील विषयांचा विविध पैलूमधून अभ्यास केला जाणार आहे. संशोधकाने अहमदनगर जिल्हयातील भौगोलिक, शैक्षणिक, धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि जिल्हयाच्या दक्षिण भागातील १९९० ते २००० या कालखंडातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा सखोल अभ्यास करण्याचा विचार केला आहे. तो वरील घटकांच्या आधारे केला जाईल.

एकंदरीत संशोधन विषयाची व्याप्ती ही फक्त दक्षिण भागापुरती असली तरी त्या अनुषंगाने या शोधप्रबंधात जिल्हयाच्या प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील इतिहासाचा व भौगोलिक घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

**मर्यादा :-**

महाराष्ट्रात अनेक जिल्हे आहेत. परंतु एकूणच जिल्हयाचा भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीचा अभ्यास करता संशोधनाच्या दृष्टीने विचार करता ऐतिहासिक व धार्मिक परंपरा लाभलेल्या अहमदनगर जिल्हयाची प्रस्तुत संशोधनासाठी निवड केली. सदर संशोधनात अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा १९९० ते २००० या १० वर्षातील मर्यादीत अभ्यास केला जाणार आहे.

जिल्हयाचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग करण्यात आलेले आहेत. परंतु संशोधनाची व्याप्ती लक्षात घेऊन फक्त दक्षिण भागातील ६ तालुक्यांचा अभ्यास केला जाईल. प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक स्वरुपाचे आहे. तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्राशी कार्यरत व्यक्तींकडून मुलाखतीद्वारे प्रश्नावलीद्वारे मिळणाऱ्या माहितीतून संशोधन केले आहे.

**साहाय्यभूत माहिती संकलन :-**

ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, गॅझिटर, सहकारी चळवळ, समन्वयस्क व्यक्तींची मुलाखत, प्रश्नावली, वृत्तपत्रे, संस्थांचे अहवाल, संदर्भग्रंथ.

**निरीक्षणे :-**

संकलित माहिती केवळ संख्यात्मक न राहता गुणात्मक करण्याच्या दृष्टीने निरीक्षण पध्दती वापरली जाणार आहे. तसेच दक्षिण भगातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तीरेखेचे निरीक्षण केले जाणार आहे. तसेच त्या-त्या संस्थांचे निरीक्षण करण्यात येणार आहे.

## १.४ संशोधन पध्दती :-

अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत पुढील तंत्र वापरण्यात येणार आहे. जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय नेत्यांची प्रदीर्घ प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत घेण्यात येईल. तसेच जिल्हयातील बुजूर्गनेते, स्वातंत्र्यसैनिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक संस्थातील अधिकारी, पदाधिकारी यांची मुलाखत घेणार आहोत. तसेच संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करुन शास्त्रीय पध्दतीने मांडणी केली जाणार आहे. याव्दारे जिल्हयाचे दक्षिण भागातील गेल्या १० वर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती जाणून घेणार आहोत.

संशोधनासाठी हाती घेतलेला विषय हा अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील गेल्या १० वर्षातील घडून आलेला विकास अभ्यासवयाचा आहे. विविध मुलाखतीद्वारे संग्रहित झालेली माहिती यांची पध्दतशिरपणे मांडणी केली आहे.

## १.५ प्रास्ताविक :-

इतिहास लेखनशास्त्रामध्ये विविध विषयांची भर पडत आहे. नवनवीन प्रवाहांचा त्यात समावेश होऊ लागला आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या इतिहास लेखनाबरोबरच स्थानिक पातळीवरील इतिहासाचा ज्याला आपण प्रादेशिक इतिहास म्हणतो त्याचाही समावेश आता इतिहास लेखनशास्त्रामध्ये मोठया प्रमाणावर होऊ लागला आहे. इतिहास लिहित असताना विविध प्रदेशात घडलेल्या छोटया-मोठया घडामोडींकडे किंवा घटनांकडे दुर्लक्ष केले जाते किंबहुना राष्ट्रीय इतिहासाची ती एक मर्यादाच असते. त्यामुळे विविध प्रदेशांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला असता आपणास भारताचा सखोल इतिहास लिहिणे शक्य होईल. म्हणून इतिहास संशोधन करत असताना स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना ऐतिहासिक महत्त्व व शास्त्रशुध्द इतिहास लिहिणे आवश्यक आहे. म्हणून स्थानिक लोकांना इतिहासाची माहिती करुन देणे त्याच बरोबर राष्ट्रीय पातळीवर जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीची माहिती करुन देणे व त्याचबरोबर जिल्हयाच्या दक्षिण भागातील १९९० ते २००० या दहा वर्षाच्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे हे विविध उद्देश संशोधनामध्ये आहेत.

**१.६ अहमदनगर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी :-**

**भौगोलिक स्थान :-**

"इ.स. १८१३ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर अहमदनगर जिल्हयाची निर्मिती इ.स.१८२२ मध्ये झाली, त्यावेळी या जिल्हयात नाशिकमधील वणी तर सोलापूरमधील करमाळा यांचा समावेश होता. परंतु नंतर इ.स.१८६९ मध्ये हा भाग जिल्हयातून वगळण्यात आला. "संतांची भूमी" म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्हयाचे क्षेत्रफळ १७,०४८ चौ.कि.मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.५४ टक्के आहे.'[१]

अहमदनगर जिल्हयाच्या उत्तर सीमेवर नाशिक, ईशान्येस औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असून दक्षिण सीमेवर सोलापूर, पश्चिमेस ठाणे व पुणे जिल्हे लागून आहेत.

**अक्षवृततीय, रेखावृत्तीय विस्तार :-**

"महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी उर्ध्व गोदावरी आणि भीमा या नदयांच्या खोऱ्यात वसलेल्या अहमदनगर जिल्हयाचे उत्तर अक्षांश १८°.२ ते १९°.९ आणि पूर्व रेखांश ७३°.९ ते ७५°.५ असे भौगोलिक स्थान आहे."[२]

**क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग :-**

अहमदनगर जिल्हयाचे क्षेत्रफळ १७,०४८ चौ.कि.मी. असून १८६९ मध्ये नाशिक व सोलापूर जिल्हयाची निर्मिती झाल्याने वणी व करमाळा हे अहमदनगर जिल्हयातून वगळण्यात आले. 'पुणे महसूल विभागात असलेला अहमदनगर जिल्हा फेब्रुवारी १९८१ पासून नाशिक या नवीन महसूल विभागात समाविष्ट करण्यात आला. प्रशासकीय सोयीसाठी महसूल खात्याने जिल्हयातील तालुक्यांची विभागणी चार उपविभागात केलेली आहे.'[३]

| अ.क्र. | उपविभाग | समाविष्ट केलेले तालुके |
|---|---|---|
| १. | अहमदनगर | नगर, पारनेर, पाथर्डी, शेवगाव |
| २. | कर्जत | कर्जत, श्रीगोंदा, जामखेड |
| ३. | श्रीरामपूर | श्रीरामपूर, नेवासा, राहुरी, राहता |
| ४. | संगमनेर | अकोले, संगमनेर, कोपरगाव |

**एकूण तालुके :- चौदा**

**राजकीय विभागानुसार - दोन भाग**

१) दक्षिण नगर - नगर, पारनेर, पाथर्डी, कर्जत, श्रीगोंदा, जामखेड

२) उत्तर नगर - श्रीरामपूर, अकोला, संगमनेर, नेवासा, राहुरी, राहता.

जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ - १७,०४८ चौ.कि.मी.

**"दक्षिण नगर तालुका निहाय क्षेत्रफळ (चौ.कि.मी.)"**[४]

| अ.क्र. | दक्षिण नगर तालुके | क्षेत्रफळ चौ.कि.मी. |
|---|---|---|
| १. | नगर | १६०० |
| २. | पारनेर | १९४० |
| ३. | पाथर्डी | १२१० |
| ४. | श्रीगोंदा | १६०० |
| ५. | कर्जत | १५०० |
| ६. | जामखेड | ८८० |

**हवामान व पाऊस :-**

'अहमदनगर जिल्हयाचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे असून १९९० मध्ये जिल्हयाचे कमाल तापमान ३७.२ अंश सेल्सिअस व किमान तापमान १२.० अंश सेल्सिअस होते.'[५]

'महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा प्रामुख्याने अवर्षणप्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयाचे पर्जन्यमान अनिश्चित स्वरुपाचे असून पर्जन्याची वाटणी असमान आहे. १९९० मध्ये जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान ७७० मी.मी. होते.'[६]

**प्रमुख नद्या - गोदावरी, भीमा**

'अहमदनगर जिल्हयाच्या गोदावरी व भीमा या मुख्य नद्या आहेत. पुणे जिल्हयातून वाहत येणारी भीमा नदी अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण सरहद्दीवरुन वाहते. सीना, कुकडी व घोड या भीमा नदीच्या उपनद्या पारनेर, श्रीगोंदा, कर्जत तालुक्यातून वाहतात.

गोदावरी नदीचा प्रवाह सुमारे १५० कि.मी. लांबीचा आहे. प्रवरा व ढोरा या गोदावरीच्या उपनद्या या जिल्हयातून वाहतात. जिल्हयातील प्रवरेचा प्रवाह सुमारे १७५ कि.मी. लांबीचा आहे. प्रवरेचे पाणी उंचावरुन जेथे खाली पडते ते स्थान रंधा धबधबा म्हणून प्रसिध्द आहे. सीना नदीचा जिल्हयातील प्रवाह सुमारे १०० कि.मी. लांबीचा आहे.

घोड व सीना या जिल्हयातून वाहणाऱ्या भीमेच्या उपनद्या आहेत. कुकडी ही घोडनदीची उपनदी पारनेर तालुक्यातून वाहते. पारनेर तालुक्यातच निघोज या गावाजवळ कुकडीच्या पात्रात रांजण-खळगे हे भौगोलिक अभ्यासकांचे प्रेक्षणीय स्थळ आहे.'[७]

**भूवैशिष्टये व भू-रचना :-**

'नगर जिल्हा विविध भूरुपांनी नटलेला आहे. सहयाद्री पर्वताचा बराचसा भाग डोंगराळ असून, त्याच्या अनेक रांगा व उपरांगा जिल्हयाच्या पश्चिम भागात प्रामुख्याने अकोले, संगमनेर तालुक्यात पसरलेल्या आहेत. अकोले तालुक्यातील पर्वतरांगांची उंची जास्त आहे. सहयाद्री पर्वताच्या काही रांगा जिल्हयात दक्षिणोत्तर गेल्या असून, त्यांचे काही फाटे पश्चिमेकडून पूर्वेकडे गेलेले आढळतात. उत्तरेकडे पसरलेल्या सहयाद्री पर्वताच्या रांगेत अकोले तालुक्यात कळसूबाई हे राज्यातील सर्वात उंच १६४६ मिटर उंचीचे शिखर वसलेले आहे.'[८]

'ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून संपूर्ण अहमदनगर जिल्हयाचा भूस्तर तयार झालेला असून तो "दख्खन टपू" या नावाने ओळखला जातो. जिल्हयाच्या जमिनीचे साधारणपणे तीन भाग पडतात. १) नदी काठची पोयटयाची पांढरट जमीन, २) डोंगराळ उतारावरची काळी दगड गोटे मिश्रित जमीन, ३) पांढरट चुनखडीयुक्त (बरड जमीन) भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा

यांच्या माहितीवरुन अहमदनगर जिल्हा गोदावरी, भीमा व सीना या नद्यांच्या खोऱ्यातील विविध ८०% पाणलोट क्षेत्रात विभागला आहे. प्रवरा खोऱ्यातील जमीन जास्त सुपीक आहे. पारनेर तालुक्याचा बराच भाग चुनखडीयुक्त जमिनीने व्यापलेला आहे. जिल्हयातील काही ठराविक भाग वगळता भूजल, घरगुती वापरासाठी व शेतीसाठी सामान्यपणे चांगल्या प्रतीचे आहे. काही भागातील भूजल क्षारयुक्त असून ते घरगुती वापरासाठी अयोग्य आहे.'[९]

**प्रमुख पिके :-**

अहमदनगर जिल्हयात खरीप, रब्बी आणि उन्हाळी असे तीन कृषी उत्त्पादनाचे हंगाम प्रचलित आहेत. जिल्हयातील खरीप हंगामात बाजरी, खरीप ज्वारी, तांदूळ, नाचणी, वरई ही धान्यपिके, तर कुळीथ, मठ, मूग ही कडधान्ये आणि भूईमुग व सूर्यफूल ही गळिताची पिके घेतली जातात.

**रब्बी हंगामात** - ज्वारी, गहू, हरभरा ही पिके घेतली जातात.

**उन्हाळी हंगामात** - भूईमूग, मका, सूर्यफूल, भाजीपाला व चाऱ्याची पिके घेतली जातात.

**नगदी पिके** - ऊस, फळबाग इत्यादी उत्पादन घेतले जाते.

**लोकसंख्या :-**

'१९९१ च्या जनगणनेप्रमाणे अहमदनगर जिल्हयाची एकूण लोकसंख्या ३३,७२,९३५ इतकी असून, त्यापैकी ८४.१८% लोकसंख्या ग्रामीण भागात व उर्वरित १५.८२% लोकसंख्या नागरी भागात राहते.'[१०]

| जनगणना वर्ष | जिल्हयाची एकूण लोकसंख्या | लोकसंख्या नागरी | ग्रामीण |
|---|---|---|---|
| १९९१ | ३३,७२,९३५ | ५,३३,४८१ | २८,३९,४५४ |
| २००१ | ४०,४०,६४२ | ८,०३,६९७ | ३२,३६,९४५ |

२००१ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्हयाची एकूण लोकसंख्या ४०,४०,६४२ इतकी असून, त्यापैकी ८०.११% लोकसंख्या ग्रामीण भागात व उर्वरित १९.८९% नागरी भागात राहते.

**'२००१ च्या जनगणनेनुसार दक्षिण नगरची तालुकानिहाय लोकसंख्या'**[११]

| अ.क्र. | तालुका | लोकसंख्या लक्ष |
|---|---|---|
| १ | नगर | ६,५१,५६९ |
| २ | पाथर्डी | २,१४,८१९ |
| ३ | पारनेर | २,४६,५३५ |
| ४ | श्रीगोंदा | २,७७,३९१ |
| ५ | कर्जत | २,०५,५८५ |
| ६ | जामखेड | १,३४,२६० |

**लोकसंख्येची घनता :-**

'१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील लोकसंख्येची घनता प्रतिचौरस कि.मी. ला १९८ व्यक्ती असून, महाराष्ट्र राज्याची घनता प्रति चौ.कि.मी. ला २५७ व्यक्ती आहे. जिल्हयात श्रीरामपूर तालुक्याची लोकसंख्या घनता प्रति चौ.कि.मी. ला ४२० व्यक्ती तर सर्वात कमी नगर दक्षिणमधील पारनेर तालुक्याची प्रति चौ.कि.मी. ला १९२ व्यक्ती या प्रमाणे आहे.'[१२]

'२००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची घनता प्रति चौ.कि.मी. ला २३२ असून महाराष्ट्र राज्याची घनता प्रति चौ.कि.मी. ला ३१५ व्यक्ती आहे. उत्तर नगरमधील श्रीरामपूर तालुक्याची लोकसंख्या घनता प्रति चौ.कि.मी. ला ४५० व्यक्ती तर सर्वात कमी दक्षिण नगरमधील पारनेर तालुक्याची प्रति चौ.कि.मी. ला १२८ व्यक्ती याप्रमाणे आहे.'[१३]

**स्त्री-पुरुष प्रमाण :-**

'१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाचे दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४९ इतके आहे. तर पारनेर तालुक्यात ते सर्वाधिक म्हणजे १०१९ इतके तर सर्वात कमी प्रमाण नगर तहसील मध्ये ९०९ इतके आहे.'[१४]

'२००१ जनगणनेनुसार जिल्हयाचे दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४१ इतके आहे. तर पारनेर तालुक्यात ते सर्वाधिक म्हणजे ९९० इतके आहे. तर सर्वात कमी प्रमाण नगर तालुक्यामध्ये ९०६ इतके आहे.'[१५]

**अनुसूचित जाती व जमाती :-**

'भारतीय संविधानाच्या ३४१ व ३४२ या अनुच्छेदांनुसार मागासलेले म्हणून जे वर्ग राष्ट्रपतींद्वारा जाहीर केले जातात, त्यापैकी अनु.जाती-जमाती या त्यांच्या संख्येच्या व त्यांच्या समस्यांच्या व्यापकतेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या गणल्या जातात.'[१६] अशा जातींचा अहमदनगर जिल्हयातील १९९१/२००१ च्या जनगणनेनुसार आकडेवारी

| अ.क्र. | जाती | १९९१ च्या जनगणनेनुसार | २००१ च्या जनगणनेनुसार |
|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ४,१८,४७९ | ४,८४,६८५ |
| २ | अनु. जमाती | २,४०,३४१ | ३,०३,२५५ |

'१९९१ च्या आकडेवारीनुसार एकूण लोकसंख्येशी या लोकसंख्येचे प्रमाण १२.४१% व ७.१२% इतके आहे.

२००१ च्या आकडेवारीनुसार एकूण लोकसंख्येशी या लोकसंख्येचे प्रमाण १२.००% व ७.५१% इतके आहे.'[१७]

**दळणवळण :-**

वाहतूक व दळणवळण विकासाच्या मार्गातील महत्त्वाचे टप्पे - मध्य रेल्वेचा दौंड-मनमाड हा एकेरी लोहमार्ग जिल्हयातून दक्षिणेकडून उत्तरेकडे जातो. त्याची लांबी १९७ कि.मी. आहे. या मार्गावर जिल्हयातील काष्टी, श्रीगोंदा, बेलवंडी, विसापूर, अहमदनगर, राहुरी, बेलापूर, श्रीरामपूर, पुणतांबा, कोपरगाव इत्यादी स्थानके आहेत.

अहमदनगर जिल्हयात संगमनेर तालुक्यातून पुणे-नाशिक हा राष्ट्रीय महामार्ग जातो. त्याची जिल्हयात लांबी ६० कि.मी. आहे. नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ हा विशाखापट्टणम पाथर्डी तालुक्यातून जातो.

जिल्हयात १९९१-९२ अखेर एकूण १२,८९२ कि.मी. लांबीचे रस्ते वापरात होते. पैकी १,७२७ कि.मी. लांबीचा राज्य महामार्ग व उर्वरीत १२,५८५ कि.मी. लांबीचे जिल्हा रस्ते

अस्तित्त्वात होते. एकूण रस्त्यांपैकी २१% रस्ते राज्यशासनाकडे तर उर्वरित जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत होते.

**प्रमुख रेल्वेगाडया :-**

महाराष्ट्र एक्सप्रेस - कोल्हापूर - गोंदिया

पुणे - नांदेड पॅसेंजर

गोवा - निजामुद्दीन एक्सप्रेस

ज्ञानगंगा एक्सप्रेस - पुणे- वाराणसी

सुवर्ण जयंती एक्सप्रेस म्हैसूर - दिल्ली

झेलम पुणे - जम्मुतावी

**१.७ अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

**ऐतिहासिक नगर**

इ.स. १३१३ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलीक कफूर याने रामदेवरायाचा पुत्र शंकरदेव याला ठार मारले व देवगिरीचे राज्य खालसा केले. या काळात महाराष्ट्रातील सर्व राजेमहाराजे कमकुवत होते आणि या एकाच कारणामुळे अल्लाउद्दीन खिलजी महाराष्ट्रात आपली सत्ता स्थापन करु इच्छित होता व त्यात तो सफल झाला. दिल्लीची सुलतानशाही देखील यामहाराजांच्या कमकुवतपणाचा फायदा घेत उभी होती. नंतर तुघलक सुलतानाच्या विरोधात सर्वत्र बंड माजले, त्यातूनच महाराष्ट्रात बहामनी राज्याची स्थापना झाली.

'जाफरखान उर्फ हसन गंगू या सरदाराने सजन सिंह व क्षेत्रसिंह यांच्या मदतीने इ.स.१३४७ मध्ये बहमनी राज्य स्थापन केले. त्याची राजधानी गुलबर्गा येथे होती. बहमनी सुलतानांनी काही पिढया पराक्रमाचे राज्य केले, परंतु काही सुलतान मात्र व्यसनी होते. इ.स. १४५८ ते १४८१ पर्यंत महमुद गवान या बहामनी सुलतानाने व्यवस्थित कारभार केला. नंतर त्याचा मृत्यू झाल्याने या बहमनी राज्याचे पाच तुकडे पडले.'[१८]

१) इ.स. १४८४ मध्ये वऱ्हाडात इमादशाही सुरु झाली.

२) इ.स. १४८५ मध्ये अहमदनगरात निजामशाही सुरु झाली.

३) इ.स. १४८९ मध्ये वीजापूरला आदिलशाही सुरु झाली.

४) इ.स. १४९२ मध्ये बिदरला बिदरशाही सुरु झाली.

५) इ.स. १५१२ मध्ये गोवळकोंडयाची कुतुबशाही सुरु झाली.

कालांतराने या सर्व शाहया जिंकून मोगल बादशहांनी आपल्या साम्राज्यास जोडून मोगलाई सुरु केली. बहामनी राज्यातला तमाभट उर्फ मलिक अहमद याला जुन्नर व बीड येथील जहागिरी मिळाली होती, त्याने पुढे स्वतंत्र राज्य स्थापून जुन्नर ही राजधानी १४८५ मध्ये स्थापन केली.

'इ.स. १४८९ मध्ये बिदरच्या बिदरशहाने मलिक अहमद या निजामावर स्वारी केली. ही लढाई भिंगार येथे झाली व त्यात मलिक अहमद या निजामास वीजय मिळाला. या वीजयाची आठवण म्हणून २८ मे १४९० रोजी त्यांनी सीना नदी तिरावर मोठा राजवाडा बांधला आणि हाच खऱ्या अर्थाने नगर शहराच्या स्थापनेचा श्रीगणेशा होय.

पुढे मलिक अहमद निजाम इ.स. १५०८ ला मृत्यू पावला व याच वाडयाचे रुपांतर हुसेन निजामाने १५०८ साली भव्य किल्ल्यात केले व या किल्ल्याचे नाव कोट बाग निजाम हे ठेवले. हा किल्ला २२ बुरुजांचा व खोल खंदकांचा असून, सीना नदी तिरावर आजही उभा आहे. या किल्ल्याचा परीघ १ मैल ८० यार्ड असून याच किल्ल्यात पंडित नेहरु, मौलाना आझाद असे स्वातंत्र्यसैनिक बंदिस्त होते. पंडित नेहरुंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ येथेच लिहिला. आज हा किल्ला नगरचा 'भुईकोट किल्ला' या नावाने ओळखला जातो.'[१९]

याच मलिक अहमद निजामशाहाच्या नावाने हे नगर शहर अहमदनगर झालेले आहे. अहमदनगर शहरावर १४९० ते १६५३ या दिडशे वर्षात बारा निजामी सुलतानांनी राज्य केले.

१) सुलतान अहमद निजामशाह (इ.स. १४८९ ते १५०८)

२) बुऱ्हाण निजामशाह (इ.स. १५०८ ते १५५३)

३) हुसेन निजामशाह (इ.स. १५५३ ते १५६५)

४) मूर्तजा निजामशाह (इ.स. १५६५ ते १५८६)

५) मारन हुसेन निजामशाह (इ.स. १५८६ ते १५८८)

६) इस्माईल निजामशाह (इ.स. १५८८ ते १५९१)

७) बुऱ्हाण निजामशाह (इ.स. १५९१ ते १५९५)

८) इब्राहिम निजामशाह (इ.स. १५९५ ते १५९६)

९) अहमद निजामशाह (इ.स. १५९५ ते १५९६)

१०) बहादूर निजामशाह (इ.स. १५९६ एक वर्षे)

११) मूर्तजा निजामशाह (इ.स. १६०३ ते १६३०)

१२) हुसेन निजामशाह (इ.स. १६३० ते १६३३)

'निजामशाहीच्या पाऊलखुणांमध्ये सलबत खानाची कबर असलेला चाँदबिबिचा महाल, भिस्तबाग, दगडी मशिद, कासिरखानी मशिद, चंगेजखान महाल, हिना महाल, सर्जेखान महाल, बागेरोजा या वास्तू आहेत.

इ.स. १६३६ मध्ये या निजामशाहीची अखेर सुरु झाली. इ.स. १७५९ मध्ये मोगल सेनापती महंमदखान उर्फ कवी जंग याच्याशी करार करुन नानासाहेब पेशवे यांनी अहमदनगर मराठयांच्या राज्यात विलीन केले आणि बाबाजी नगरकर हा नवा सुभेदार नेमला. थोडक्यात मोगलाई जाऊन पेशवाई सुरु झाली. इ.स. १८१३ मध्ये पेशवाईचा अस्त झाला व ब्रिटिशांची हुकूमत सुरु झाली. दुष्काळामुळे व गव्हर्नर लॉर्ड वेलस्ली फितुरीमुळे नगर शहरावर ब्रिटिशांचा युनियन जॅक फडकला.'[२०]

दिनांक ३१ मे १९१६ रोजी लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" ही घोषणा अहमदनगरच्या कापड बाजारच्या मागील पटांगणात (सध्या तेथे इमारत कंपनीच्या इमारती व पोस्ट ऑफिस आहे) केली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी अहमदनगरच्या फत्ते बुरुजावर आचार्य नरेंद्र देव यांनी स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकविला.'[२१]

**नगर किल्ल्यावर युनियन जॅक**

शेवटच्या बाजीरावाला ताब्यात घेतल्यानंतर इतर मराठे सरदारांचा बीमोड करण्याकडे इंग्रजांचा कल होता. शिंदे, होळकरांचा बीमोड करावा म्हणून शिंदयांच्या ताब्यात असलेल्या अहमदनगर किल्ल्याला वेढा देण्याचे काम जनरल वेलस्ली याने केले. त्यावेळी किल्ल्यावर पायदळ, घोडे, घोडस्वार व अरब शिपाई होते. परंतु त्यांनी किल्ला खाली करण्यास नकार दिल्यानंतर इंग्रजांनी तटाभोवती वेढा दिला.

किल्ला काही खाली होत नाही म्हणून त्यांनी शहरातील लोकांना त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु त्यामुळे शहरातील लोक किल्ल्यात घुसले. किल्ल्याच्या भिंती मजबूत होत्या. त्यामुळे ब्रिटिशांना किल्ल्यात प्रवेश मिळेना. शेवटी त्यांनी ' भिंगार गावच्या देशमुखाला चार हजार रुपये लाच दिली व किल्ल्यावर कसा प्रवेश करावयाचा हे माहित करुन घेतले आणि शेवटी अहमदनगरचा किल्ला दिनांक ११ ऑगस्ट १८०३ रोजी ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. पेशवाईचा जरीपटका उतरुन त्यावर युनियन जॅक फडकू लागला.'[२२]

२८ मे १४९० रोजी स्थापन झालेल्या या नगर शहरालगत हा भुईकोट किल्ला असून तो १ मैल व ८० यार्ड परीघ युक्त असून त्यास २२ बुरुज आहेत. याच किल्ल्यात पंडित नेहरुंनी "डिस्कव्हरी ऑफ इंडिया" हा ग्रंथ लिहिला. तसेच सरदार वल्लभभाई पटेल, संभाजी राजांची पत्नी येसूबाई, मुलगी भवानीबाई तसेच चौथे शिवाजीमहाराजही कैदेत होते. सध्या हा किल्ला लष्कराच्या ताब्यात असून पूर्वपरवानगीने पाहता येतो.

(भुईकोट किल्ल्याचे छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)

**चाँदबिबी**

'चाँदबिबीचा जन्म १५५० च्या दरम्यानचा असून, कार्यकाल १५९९ पर्यंत आहे. चाँदबिबी ही एक निजामशाहीतील कर्तबगार स्त्री होय. हुसैन निजामशाहाची चाँदबिबी ही मुलगी इ.स. १५६४ साली चाँदबिबीचे पहिल्या अदिलशाहाशी लग्न झाले; परंतु १५८० मध्ये तिच्या पतीचा खून झाला. त्यानंतर ती स्वतः गादीवर बसली व पुतण्या इब्राहीम याच्या सोबतीने राज्यकारभार पाहू लागली. १५८२ मध्ये तिला तिचा बंडखोर सरदार किश्वरखान याने साताऱ्याला अटक केली. परंतु ती त्यातून शिताफीने बाहेर पडली. नंतर १५८४-८५ साली ती अहमदनगरमध्ये आली. पुढे तिने मोगलांविरुध्द अभूतपूर्व सामना करुन चाँद सुलताना हा किताब मिळविला. १५९७ साली मोगलांनी नगरवर हल्ला केला. तिने शाहजाद दानियालच्या नेतृत्वाखाली मोगलांवर जोरदार प्रतीहल्ला चढविला. परंतु त्यानंतर तिचा वादग्रस्त मृत्यू झाला.

चाँदबिबीला मराठी, उर्दू, फार्सी, कन्नड या भाषा येत. संगीत व चित्रकलेचीदेखील तिला आवड होती. शौर्य व गुणवत्ता या गुणांवर तिने इतिहास घडविला. अहमदनगरच्या

निजामशाहीवर तिची पकड मजबूत होती. या तिच्या शौर्याचे प्रतीक 'चाँदबिबी का महाल' आजही सांगत आहे.

चाँदबिबीचा महाल म्हणून ज्या वास्तूचा उल्लेख करण्यात येतो, ती वास्तू सलाबतखानाने १५८० मध्ये बांधली. सदर वास्तू नगर शहराच्या पूर्वेस १२ कि.मी. अंतरावर गर्भगिरी डोंगररांगेत शहर डोंगरावर जमिनीपासून १०० फूट उंचीवर आहे. हा अष्टकोनी महाल दूरवरुन दिसतो. या महालाला ३ मजले आहेत. मूर्तजा निजामशहाचा प्रधान दुसरा सलाबत खान हा उत्तम वास्तुविशारद व प्रशासक होता. त्यानेच तिसगाव, (ता. पाथर्डी) येथील ३० वेषी बांधल्या होत्या.

इ.स. १५८९ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यावेळी त्याची व त्याच्या एका पत्नीची कबर या वास्तूच्या तळघरात बांधण्यात आली. वास्तूच्या आवारात दुसऱ्या पत्नीची व पाळीव कुत्र्याची कबर बांधण्यात आली आहे. पायथ्याला "वीरभद्र मंदिर" आहे. जवळ छोटा तलाव व धबधबा आहे. इंग्रजांच्या काळात या वास्तूचे थंड हवेचा महाल व टेहाळणी कामासाठी उपयोग केला जात असे.'[२३]

(चाँदबिबी महालाचे छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)

**दर्गा दायरा**

नगर शहराच्या उत्तरेस दोन किलोमीटर अंतरावर शहा शरिफ उर्फ दर्गा दायरा आहे. मुस्लिम साधू शहा शरिफ यांची ही कबर असून ते मालोजी राजे भोसले यांचे गुरु होते. त्यांच्याच आशीर्वादाने मालोजीराजांना पुत्रप्राप्ती झाली होती.

मालोजी राजे हे वेरुळचे, परंतु त्यांची पत्नी निंबाळकर घराण्यातली त्यांचा वाडा नगर शहरात होता. त्यामुळे नगर शहरात जाणे-येणे होते. त्यासाठी मालोजीराजांनी स्वतःसाठी एक वाडा शहरात बांधला. याच वाडयात शहाजीराजांचा जन्म झाला होता. आज हे ठिकाण म्हणजेच अमृतेश्वरांचे मंदिर होय. हे मंदिर नगर अर्बन बँकेसमोर आहे.

**फराहबाग** :- ताजमहाल बांधण्यापूर्वी या महालाची मापे शहाजहान बादशहाने नेली होती. सुंदर, व आरोग्यदायी वातावरणामुळे बादशहा येथे हवापालटासाठी येत असे.

**बागरोजा** :- अहमद निजामशाहा यांची कबर त्याच्या पत्नीसोबत येथे आहे. या वास्तूवर कुराणातील वचने कोरलेली आहेत. तसेच येथे दमडीमशीद, बेहस्तबाग (फैजबध महल) व फराहबाग या वास्तूही इतिहासाची साक्ष देत उभ्या आहेत.

**नगर शहरात छत्रपती शिवाजीमहाराज**

'इ.स. १६५७ ते १६५८ चा काळमहाराजांनी जुन्नर परिसर लुटला. त्यावेळेसच मिनाजी भोसले हामहाराजांचा साथी मोगलांशी लढण्यास श्रीगोंदा येथे गेला.महाराज लगेच अहमदनगर या मोगलांच्या शहराकडे धावले. नगरच्या किल्ल्यात मोगलांचे वास्तव्य होते. नौसिरखान हा मोगलांचा सरदार अफाट फौजेनिशी किल्ल्यात ठाण मांडून बसला होता.महाराज नगर शहरात आल्याचे खानाला कळाले.महाराजांनी लढा देत शहराची लूट केली. खानाला मागे लोटतमहाराज लूट घेऊन गनिमीकाव्याने पुण्याकडे पसार झाले.

ज्या शाहिस्तेखानाचीमहाराजांनी पुण्यात बोटे तोडली तो औरंगाबादहून ११ फेब्रुवारी १६६० रोजी अहमदनगरला आला व आपल्या अफाट फौजेनिशी २५ फेब्रुवारी १६६० पर्यंत नगर शहरातच मुक्कामास राहिला.'[२४]

**चौथे शिवाजीमहाराज :-**

"कोल्हापूरच्या छत्रपती शिवाजीमहाराजांची सध्याची अशी स्थिती आहे, की ती ऐकून पाषाणहृदयी माणसाच्या देखील काळजाला घरे पडतील.महाराजांचे प्राण जाऊन शव हाती आल्यावर आमचे लॉर्डसाहेब जागृत होणार काय?" असे परखड विचार '११ ऑक्टोबर १८८१ मध्ये दै. 'केसरी' च्या अग्रलेखात टिळकांनी चौथे शिवाजीमहाराज यांच्याविषयी मांडले.

चौथे शिवाजीमहाराज हे कोल्हापूरच्या गादीचे वारस ते स्वतः साडेआठ वर्षाचे असताना इंग्रज अधिकाऱ्याच्या मदतीने दत्तक झाले व गादीवर बसले. ते अतिशय हुशार व बलदंड होते. परंतु ते नाममात्र छत्रपती होते, याचे शल्य त्यांना बोचत असे.

१८ जून १८८२ मध्ये चौथे शिवजीमहाराजांना वेडे ठरवून इंग्रज सरकारने त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबध्द केले. ब्रिटिशांच्या हुकूमशाहीत छत्रपती जराही घाबरले नाही. तेथे त्यांचे अतोनात छळ झाले. त्यांच्या छळाला लोकमान्य टिळक, आगरकर यांनी 'केसरी' मधून वाचा फोडली. ब्रिटिश सरकारला इशारा दिला. परंतु निर्दयी सरकारपर्यंत हा

आवाज पोहोचू शकला नाही. ब्रिटिशांनी मुद्दाम कानाडोळा केला, उलट टिळकांवरच तुरुंगवासाची कारवाई केली.

ग्रीन नावाच्या इंग्रज शिपायानेमहाराजांना लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्यातचमहाराजांच्या प्लीहा आतडयाला जखम झाली. पोटात रक्तस्त्राव सुरु झाला. नाका-तोंडातून रक्त पडू लागले. परंतु त्या निर्दयी ग्रीनलामहाराजांची दया आली नाही आणि या करुण घटनेतचमहाराजांचा अंत झाला.

चौथे शिवाजीमहाराजांच्या मृत्यूने सरकार हादरले. त्यांनी त्यांचा अग्निसंस्कार करण्याचे ठरविले. शेवटी सिटी स्कूलचा शिपाई परशुराम उमाजी भोसले कलेक्टर एलफिन्स्टनला जाऊन भेटला. त्यानेमहाराजांशी निगडित आपली जानकुली समजाऊन दिली.महाराजांच्या जवळ मल्हारी नामक एक हुजऱ्या होता. त्याने परशुरामाचे म्हणणे खरे आहे हे सांगितले. हा परशुराम पोटा-पाण्यासाठी कोल्हापूर सोडून नगरमध्ये आला होता.

शेवटी याच परशुराम उमाजी भोसले याने कोल्हापूर संस्थानच्या छत्रपतीचा चौथे शिवाजीमहाराजांचा अंत्यसंस्कार दिल्ली दरवाजाबाहेरील मठासमोर केला वमहाराजांना मृत्यूनंतर थोडा तरी न्याय देण्याचा प्रयत्न केला. या छत्रपतींची समाधी आजही दिल्लीगेट जवळ आहे. त्यावर त्यांचा पूर्णकृती पुतळा देखील आहे. नगरमध्ये प्रवेश करताच आपणांस हा संपूर्ण इतिहास डोळयांसमोर येतो.'[२५]

**कोठला बारा इमाम :-** मुसलमानात शिया व सुन्नी असे दोन पंथ अस्तित्वात आहेत. सुमारे ४५० वर्षापूर्वी शियापंथीय "मुसलमानांचे विद्यापीठ" म्हणून रुमी मशीदीजवळ ही वास्तू आहे. मोहरमच्या पहिल्या १० दिवसात येथेच ताबूत बसतात. येथे जुन्या पवित्र तलवारी प्रदर्शित केल्या जातात. महंमद पैगंबरानंतर १२ धर्मगुरु होऊन गेले त्यांच्या स्मरणार्थ हया भागाला "१२ इमाम कोठला" म्हणून संबोधले जाते. निजामशाहने शिया पंथाचा स्वीकार केल्यानंतर ही ऐतिहासिक वास्तू बांधून येथे धार्मिक विद्यापीठ सुरु केले होते.

**व्ही.आर.डी.ई. :-** केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडातले सर्वोत्कृष्ट वाहन संशोधन व विकास केंद्र म्हणून हे प्रसिध्द आहे. अहमदनगरचे लष्कर हे भारतातील प्रमुख लष्कर दलापैकी एक आहे. नगर अरणगाव रस्त्यावर व्हेईकल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट

एस्टॅब्लिशमेंट ही लष्करी विभागाची अग्रगण्य संस्था असून देशातील नव्या प्रकारच्या वाहनाला रस्त्यावर आणण्यापूर्वी प्रथम येथे आणले जाते व येथे त्याची चाचणी घेऊन व्यवस्थित वाटले तरच त्या वाहनाला येथून परवानगी दिली जाते. असे हे महत्त्वाचे केंद्र आहे. येथे १७ प्रकारचे ट्रॅक आहेत, त्यावर ही चाचणी घेतली जाते वाहनाचा दर्जा, वाहनाची सुरक्षितता, वाहनाची क्षमता या संबंधात चाचण्या असतात. लष्करासाठी लागणाऱ्या लढाऊ वाहनांचेही संशोधन येथे केले जाते. बुलेटप्रुफ वाहनांची निर्मिती या ठिकाणी केली जाते.

**रणगाडा प्रशिक्षण केंद्र :-** अहमदनगरमधील लष्कराने उभे केलेले युध्द स्मारक येथे पहायला मिळते. १९४८ मध्ये ही यंत्रणा येथे दाखल झाली. येथे रणगाडयाचे प्रशिक्षण दिले जाते. या दलाला चिलखतीदल म्हणून ओळखतात. भारताच्या गौरव गाथेतील जनरल अरुण वैद्य काही काळ या विभागाचे प्रमुख होते.

**रणगाडा संग्रहालय :-** अहमदनगर सोलापूर रस्त्यावर आशिया खंडातील एकमेव असे रणगाडा संग्रहालय सर्वांना पाहण्यासाठी १६ मे १९९४ पासून खुले करण्यात आले असून सकाळी ९ ते ५ या वेळात विनामूल्य पाहता येते. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, रशिया, इंग्लंड इत्यादी देशातील निरनिराळया युध्दात वापरलेले रणगाडे येथे पहायला मिळतात. "सिल्वर फॉक्स" हे चिलखती वहान जे जालियनवाला युध्दात वापरण्यात आले होते ते ही येथे पहायला मिळते. पाण्यावर तरंगणारे रणगाडे, पुरलेले सुरुंग नष्ट करणारे रणगाडे, सैन्यासाठी रस्ता तयार करणारे रणगाडे असे विविध प्रकारच्या कामगिऱ्या बजावणारे ४० चे वर रणगाडे येथे पहायला मिळतात. पाक युध्दात महत्त्वाचे काम बजावणारा 'पॅटर्न' रणगाडा ही येथे पहायला मिळतो. या सोबत काही रणगाडयंची छायाचित्रे, लष्करी ध्वज, काही रणगाडयांच्या प्रतिकृतीही येथे पहायला मिळतात. १९१७ सालचा सर्वात जुना रणगाडा "रोल्स राईस" येथे पहायला मिळतो.

**अहमदनगर वस्तूसंग्रहालय :-** ऐतिहासिक वस्तु संग्रहालय तत्कालीन नगराध्यक्ष विद्याधर चन्ननख, तत्कालीन जिल्हाधिकारी एस.बी. काझी, सरदार मिरीकर, चिंतोपंत नगरकर, नाथ विठ्ठल पाठक, मुन्शी उम्मीद, साहेबराव मिसाळ, सध्याचे कार्यकारी विश्वस्त सुरेश जोशी यांनी १ मे १९६० ला याची स्थापना केली. हे ठिकाण जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असून अतिशय जुने ५० हजाराहून अधिक दस्ताऐवज, ताम्रपट, जुनी दुर्मिळ शस्त्रे, अनेक जुनी नाणी विविध

जुन्या मूर्ती, जुन्या दुर्मिळ पोथ्या, नेवासे, जोर्वे, दायमाबाद येथे उत्खननात सापडलेल्या वस्तू येथे संग्रहित केल्या आहेत. शिळा प्रेस, १७७५ साली तयार केलेली कडयाच्या देशमुख घराण्यातील २०० फूट लांबीची जन्मपत्रिका, उलट सुलट वाचता येणारे रामकृष्ण काव्य, ताम्रपाषाणयुगातील दुर्मिळ भांडी, विविध प्रकारचे गणपती इ. विविध वस्तू या संग्रहालयात पहायला मिळतात.

**१.८ दक्षिण नगर भागातील धार्मिक, पर्यटनस्थळे -**

**नगरमधील मंदिर प्रवेश :**

या भारतभूमीवर अनेकांनी धार्मिक आघात केले पण वैदिक तत्त्वज्ञान आणि आर्यसंस्कृती अद्याप कोणतेही परकीय राष्ट्र किंवा स्वकीय धर्मद्वेशी नष्ट करु शकले नाहीत. अनंत कालापासून प्रज्वलित असणारा हा वैदिक तत्त्वज्ञानाचा नंदादीप विझविण्याचा आणि त्याबरोबरच भारतीय संस्कृती त्या अंधकारात गडप करुन टाकण्याचा प्रयत्न अनेकांकडून झाला होता. त्याच मार्गाचा अवलंब अव्वल इंग्रजी राजकीयदृष्टया भारत देश जिंकल्यावर तो धार्मिक व सामाजिकदृष्टया जिंकण्याचा इंग्रजांनी उपक्रम सुरु केला. या उद्योगात मिशनरी लोक राजसत्तेच्या पाठबळावर पुढे सरसावले आणि त्यांनी अज्ञानी लोकांना आपल्या कळपात ओढून घेतले. इंग्रजांचा हा धार्मिक हल्ला १८७० पर्यंत मोठया धुमधडाक्याने यशस्वी होत होता. या हल्ल्यात अशिक्षिताबरोबरच सुशिक्षित देखील त्यांनी घायाळ केले. मिशनऱ्यांच्या आणि सुशिक्षित बाटग्यांच्या मार्फत हिंदूधर्मावर होणारा हल्ला पाहून विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपली धारदार लेखणी उचलली आणि 'निबंधमाले'तून नाककटाई सुरु केली. पण या काळात सामाजिक आचारविचारावर जी अनुकूल व प्रतिकूल टीका होत असे, ती आचाराचे व विचारांचे प्राचीन स्वरुप कोणत्या प्रकारचे होते, त्यांच्या मुळाशी कोणती तत्त्वे होती व तत्त्वे मानवी जीवनाच्या दृष्टीने कशी सोयीस्कर आहेत, या दृष्टीने सखोल विचार करुन ती टीका होत नव्हती तर दैनंदिन व्यवहारातील ज्या गोष्टी व्यवहारदृष्टया निरुपयोगी व हानीकारक आहेत त्या गोष्टींवर होत असे. १८९० साली पुण्यातील वादळ याच दृष्टिकोनातून माजले आणि भिंगार येथील स्त्रियांनी श्रीमद् शंकराचार्य जगद्रुप यांना व्यवहार्य दृष्टिकोनातून हतवीर्य केले. सुधारक आणि पुराणमताभिमानी यांच्यात लढत जुंपली. अशा वेळी, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारखे

अव्वल दर्जाचे पुरोगामी लोकोत्तर विद्वान सुधारकांने शास्त्रीय विचाराचा मध्यबिंदू अचूक पकडून दोन्हीही पक्षास नामोहरम केले अशा संक्रमण काळात जुने आचार सोडणे आणि नव्याच्या पायवाटेने जाणे हे अपरिहार्य होय.

ज्या टोपीवाल्यासाहेबाचे दर्शन घेण्याचे देखील टाळीत, त्याला स्पर्श करण्याची पाळी कालांतराने आली होती. एक काळ असा होता की, खेडेगावात धर्मप्रचारार्थ एखादा मिशनरी गेला असता त्याला आपल्या भांडयातून पाणी पिण्यास देण्यास महारमांग लोक देखील तयार नसत. पण काळाच्या कलाटणीत त्याच साहेबाच्या हाताचा चहा मिळण्यात धन्यता वाटू लागली. मुसलमान सत्ताधीश राज्यकर्ते होताच त्यांचे काही आचार व्यवहारात जसे सामावून घेतले आणि तसेच युरोपियन हे 'स्पृश्य की अस्पृश्य' हा विचार उपस्थित करण्याचे प्रयोजन ज्या कालगतीमुळे सोडून दिले गेले आणि तसाच विचार प्राप्त परिस्थितीत अस्पृश्य मानलेल्या समाजाविषयी करावयास पाहिजे, असा सुविचार राष्ट्रीयवृत्तीच्या विचारवंताच्या मनात घोळू लागणे क्रमप्राप्तच झाले. १९१८ मध्ये राजकीयदृष्टया अस्पृश्यता निवारण्यास चालना मिळाली. पुढे अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात खादीप्रचार आणि अस्पृश्यता निवारणास विशेष चालना देऊन अस्पृश्यता हा हिंदूधर्मावर कलंक असून तो नाहीसा झालाच पाहिजे. या धोरणाचा पुरस्कार जाहीर रीतीने होऊ लागला तसेच सामाजिक विषमता नष्ट व्हावी, सर्वांनी हातात हात घालून स्वराज्याकरिता झगडावे. अस्पृश्यता मानणे हा गुन्हा आहे. असे जोराने प्रतिपादण्यात येऊ लागले. त्याकरिता म. गांधीजींनी 'हरिजन' हे वृत्तपत्र सुरु केले. अस्पृश्यता निवारणाची मोहीम नगर जिल्हयात सुरु झाली. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचे दृष्य दिसू लागले.

विद्यामंदिर, सरकारदरबार, सार्वजनिकसभा, बाजार यातील अस्पृश्यता यापूर्वीच नष्ट झाली होती. आता राष्ट्रीय उत्सव स्पृश्यास्पृश्य हे दोन्ही समाज एकदिलाने पार पाडू लागले. सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता जनतेच्या मत परिवर्तनाने हळूहळू कमी होऊ लागली. परंतु सार्वजनिक असणाऱ्या मंदिरात अस्पृश्यांना मंदीर प्रवेश मिळाल्याशिवाय या कार्याची परिपूर्तता होऊ शकत नाही, असा विचारप्रवाह नागरिक-जनतेत सुरु होऊन प्रत्यक्ष मंदिर प्रवेश करण्याचे धाडस १९३२ साली अहमदनगर येथे झाले.[२६]

सन १९३२ च्या ४ जानेवारीस म. गांधीजीना अटक करुन एरवडा जेलमध्ये ठेवण्यात आले. तेथे त्यांनी सरकारी दडपशाहीच्या निषेधार्थ एकवीस दिवसांचे प्राणांतिक उपोषण केले. महात्माजींच्या उपोषणाबद्दल आपली सहानभूती आणि निष्ठा व्यक्त करण्याकरिता सर्व भारतातील जनतेने एक दिवस उपोषण करावे, असा आदेश देताच सर्व जिल्हाभर उपोषणदिन पाळण्यात आला. त्या दिवशी ही पवित्र पर्वणी समजून सार्वजनिक सभा, भजन, कीर्तन, प्रवचन, वगैरे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. परंतु विशेष चिरस्मरणीय गोष्ट म्हणजे अहमदनगर येथील डांगेगल्ली (माणिक चौक) या भर ब्राम्हणवस्तीत असलेले बाबुराव तांबोळी यांच्या खाजगी मालकीचे भव्य दत्तमंदिर अस्पृश्यांना खुले करण्यात आले. ता. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता भाऊसाहेब फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली बागडे थियटरमध्ये सर्वजमातीच्या लोकांची सभा घेण्यात आली. अस्पृश्यांसह सर्व थरातील लोकांनी थियटर पूर्ण भरुन गेले होते. मंदिर प्रवेश आणि अस्पृश्यता निवारण यावर झालेल्या भाषणानंतर आपल्या दत्तमंदिरात अस्पृश्यांना प्रवेश करण्यास परवानगी देणारे बाबुराव तांबोळी यांच्या उदार अंत:करणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. नंतर अध्यक्षांकडून मंदीर खुले झाल्याबद्दल घोषणा करण्यात आल्यावर म. गांधीजींच्या जयजयकारात सभा विसर्जन झाले, आणि स्पृश्यास्पृशांचा समुदाय दत्तमंदीरात जाऊन सर्वांनी अभेदपणे दत्तदर्शन घेतले. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश दिल्याचा मान महाराष्ट्रातच काय पण अखिल भारतात प्रथम अहमदनगर जिल्हयांनी मिळविला ही मोठी अभिमानाची गोष्ट होय.

अस्पृश्यता निवारण आणि मंदिर प्रवेश याचा अखंड प्रचार चालू असता या कार्यात विशेष चालना मिळावी आणि महाराष्ट्रातील प्रसिध्द मंदिरे हरिजनास खुली व्हावीत, या दृष्टीने पूज्य सहजानंद स्वामीजी यांनी आपला मोर्चा अहमदनगर जिल्हयाच्या सरहद्दीवरुन वाहणाऱ्या पवित्र गोदामाईच्या कुशीत बसलेल्या पैठण उर्फ प्रतिष्ठानाकडे वळविला. तत्पूर्वी पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांस खुले व्हावे म्हणून पूज्य साने गुरुजी यांनी कार्तिकी एकादशीपासून उपोषण सुरु केले होते. पण सेनापती बापट व इतर मित्रमंडळींच्याइच्छेला मान देऊन लोकमत अधिक जागृत करण्याकरिता त्यांनी उपोषणाचा आपला निश्चय सहा महिने पुढे ढकलला. त्या अवधीत त्यांनी सेनापती बापट आणि पुण्याचे महाराष्ट्र शाहीर पथकाचे कलावंत बरोबर

आपल्या तुफानी दौऱ्यास प्रारंभ केला होता. अशा वेळी नगर जिल्हयातील कार्यकर्त्यांनी पंढरपुराप्रमाणेच प्रतिष्ठानचे कार्यक्षेत्र निवडणे हे अगदी स्वाभाविक होय.[२७]

प्रतिष्ठान ऊर्फ पैठण ही प्रसिध्द संत एकनाथमहाराज यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी महाराष्ट्रात प्रख्यात असून तेथे फाल्गुन वद्य ५ ला नाथषष्ठीस महायात्रा भरत असते. प्रतिष्ठान हे क्षेत्र प्राचीन काळापासून दक्षिण भारताची काशी या गौरवास्पद पदवीने मशहूर आहे. तसेच आपणाकडे ज्यांच्या नावावर शालिवाहन शके प्रचलित आहे. तो शककर्ता शालिवाहन ऊर्फ सातवाहन राजा याच प्रतिष्ठान नगरीत राज्य करीत होता. त्याच्या राजवाडयाचा विस्तीर्ण तट अमाप राजवैभवाची साक्ष देत आहे. सुमोर अडीच हजार वर्षांपासून नावाजलेली ही पुण्यभूमी होती, हे जरी नाथषष्टीचा सोहळा पाहणाऱ्यांना आज पहावयास मिळत नाही तरी संत शिरोमणी एकनाथमहाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे स्थान असल्यामुळे महायात्रेच्या वेळी हजारो भाविक लोक येथे आकर्षिले जात आहेत. गोदावरीच्या तीरावरील या पावन क्षेत्रातून मानवतेचा दिव्यसंदेश नाथमहाराजांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीने अखिल महाराष्ट्रास दिला होता.

संसार तापोन संतप्त झालेले हजारो अनाथ भाविक लोक नाथ महात्म्यास मोहित होऊन नाथषष्टीच्या महोत्सवाकरिता पैठणास जमतात. शिवाय नाथषष्टीला एक असामान्य महत्त्व प्राप्त झाले आहे. ते म्हणजे नाथमहाराजांचा जन्म फाल्गुन वद्य ६ ला त्यांना श्री जनार्दन स्वामींपासून गुरुपदेश झाला तो षष्टीला आणि त्यांनी समाधी ती देखील ६ लाच म्हणजे सत्पुरुषाच्या जीवनातील ही तिन्ही स्थित्यंतरे एकाच तिथीला झाल्यामुळे नाथषष्टीस पैठणची वारी केल्यास पुण्य लाभते.

या वर्षी यात्रेचा विशेष स्वरुप आले होते. कारण वद्य ७ मीच्या दिवशी स्टेट काँग्रेसची जाहीर सभा गोदावरीच्या वाळवंटात भरवायचे ठरले होते. दबलेली वाफ जशी जोराने बाहेर पडते तसे लोकांच्या उत्साहाला भरते आले होते. नगर जिल्हयातील पूज्य स्वामीजींसह अनेक कार्यकर्ते सभेला उपस्थित राहिले होते. तसेच औरंगाबादचे कार्यकर्ते माणिकचंद पहाडे, गुलाबचंद नागेरी, शिवाजीबुवा नारायणगडकर, चंपालाल नागोरी, नागोरी पाठक, रामगोपाळ नावंदर वगैरे कार्यकर्त्यांची व्याख्याने झाली. सुमारे २० हजार जनसमुदाय स्टेट काँग्रेसचा संदेश

ऐकण्याकरिता जमला होता आणि तल्लीन झाला होता. अस्पृश्य हे आपले धर्मबंधू आहेत. त्यांना आपण जवळ केले पाहिजे. कालगतीकडे लक्ष देऊन हा हिंदूधर्मावरील कलंक आपण सर्वांना धुऊन टाकला पाहिजे, असे सांगण्यात आले. याच सभेत पूज्य साने गुरुजींच्या मंदिर प्रवेशाला पाठिंबा देणारा व पंढरपूर येथील नाथ मंदिर, हरिजनांस खुले रहावे, अशा मागणीचा ठराव २० हजार भाविकांनी एकमताने मंजूर करण्यात आला. विशेष आश्चर्याची गोष्ट की, ज्यावेळी हरिजन सेवेच्या आनंदात वीस हजार लोक टाळया पिटून आपली संमती व्यक्त करीत होते, त्याचवेळी काही जीर्णमतवादी सनातनी मुखंड म. गांधीजी व पूज्य साने गरुजी यांच्या नावाने बोटे मोडीत होते. सर्व मंत्री मंडळानी अधर्म माजविला आहे. प्रथम ना. बाळासाहेब खेर यांना गोळया घालून ठार केले पाहिजे, अशी कल्पना करण्यासही त्यांनी कमी केले नाही.

पूज्य सानेगुरुजींचा दौरा नागपुरापासून गोव्यापर्यंत चालू होता. या दौऱ्यात सर्वमंदिरे हरिजनांस खुली करावी, अशी मागणी असणाऱ्या ठरावावर लाखो लोकांच्या सहया त्यांनी मिळविल्या होत्या. हा दौरा म्हणजे अस्पृश्यता निवारण आणि मंदिरप्रवेश यासाठी महाराष्ट्रात सुरु झालेला एक महायज्ञच होता.

जाहीर केल्याप्रमाणे पूज्य सानेगुरुजींचा दौरा एप्रिल ता. १२ रोजी अहमदनगर जिल्हयात सुरु झाला. जिल्हयातील बहुतेक कार्यकर्ते त्यांच्याबरोबर दौऱ्यात सामील झाले होते. दौऱ्यास सुरुवात होताच त्यांनी राजूर, संगमनेर, हरेगाव, बेलापूर, नेवासे, शेवगाव, नांदूर, पाथर्डी ही गावे घेतली. नंतर आपल्या कलापथकासह दि. १४ रोजी त्यांनी नगर शहरात आगमन केले. सोसायटीच्या भव्य आणि विस्तीर्ण पटांगणात गुरुजींचे भाषण आणि कलापथकाचा कार्यक्रम झाला. सुमारे १५ हजार श्रोतृ समुदाय उपस्थित होता. हिंदूधर्माचे उज्ज्वल आणि विशुध्द दर्शन श्रोत्यांना करुन देताना ते म्हणाले - "स्वराज्य म्हणजे स्वराज्य आणि मानवधर्म यांची एकरुपता होय. स्वातंत्र्य, समता आणि शांती यांच्या पायावर अखिल मानव समाज मंदिर उभे राहिले आहे. सर्व मानवांना भूलोकी स्वर्गसुखाचा प्रयत्य आणून द्यावा म्हणून मानवतेचे महात्मे आपले रक्त आटवीत आले आहेत. "सर्व खल्विदं ब्रम्हा" अशी घोषणा करणारा भारतच जगाला विश्वकुटुंबाची दीक्षा देईल. अणुरेणूत परमात्मा भरला आहे, असे मानणाऱ्या धर्मनिष्ठांत अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या माणसाची सावलीदेखील सहन होत नाही, याचे आश्चर्य वाटते.

'कृण्वतो विश्वमार्यम्' असे म्हणत साऱ्या जगाला आर्य बनविणारे हिंदू आर्य आपल्या धर्मबांधवांशी अनार्यासारखे वागत आहेत आणि गोऱ्या जगाला आर्य बनविणारे हिंदू आपल्याच बांधवांना नरकात ठेवीत आहेत. याला काय म्हणावे! नरदेहाची महती गाणारे हरिदास पुराणिक नरदेहधाऱ्यांना जनावरांप्रमाणे लेखीत आहेत, अशी परिस्थिती पाहिल्यावर कोणत्याही सात्त्विक माणसाचे हृदय तळमळल्याशिवाय राहाणार नाही. मात्र तो मनुष्य असावा.

"देवाच्या पवित्र मंदिरात हरिजनांना मज्जाव असावा हाच महान अधर्म आहे. हे विचारी माणसाला सहज पटेल. चराचर सृष्टीत एकच परमात्म तत्त्व आहे, असा उपदेश ज्या मंदिरात बसून केला जातो तेथे मानवांना मज्जावा केला जावा हे आश्चर्य नव्हे काय?" गुरुजींचे हे भाषण अत्यंत अंतःकरणाच्या तळमळीने झाले. ते ऐकून मेघराजाच्या डोळयांना देखील पाणी आले. पाऊस सुरु झाला. लोक तटस्थपणे ऐकत होते. पण नाईलाजाने शेवटी सभा बरखास्त करावी लागली. यानंतर गुरुजींचा दौरा नगर जिल्हयाच्या दक्षिण भागात सुरु झाला. त्यांच्याबरोबर भारदे, गरुड, बाळासाहेब सप्तर्षी, रावसाहेब पटवर्धन हे कार्यकर्ते होते. या दक्षिण दौऱ्यात कान्हूर, श्रीगोंदे, वडगाव, कर्जत, अकोळनेर, जामखेड, खर्डे ही गावे घेतली जाऊन त्या ठिकाणी गुरुजींची भाषणे झाली. खर्डे हे गाव मोगलाई सरहद्दीस लागून असल्यामुळे मोगलाईतील हजारो लोक गुरुजींच्या भाषणाचा आणि दर्शनाचा लाभ घेण्यास आले होते. प्रथम कलापथकाचा कार्यक्रम होऊन नंतर पूज्य गुरुजींचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "स्वराज्य आले तरी जोपर्यंत स्पृश्यास्पृश्य भावना व जातिभेद नष्ट झाली नाहीत, तोपर्यंत स्वराज्याचे सुराज्य होणार नाही आणि स्वातंत्र्याचे अमृत भारतीय जनतेस चाखता येणार नाही. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय, महाराष्ट्राचा जिव्हाळा, पंढरपूरची कळ दाबली की महाराष्ट्रात प्रकाश पडेल. पंढरपूर म्हणजे दक्षिणची काशी. सर्व योनीत मनुष्य योनी श्रेष्ठ आहे. सर्वांना ब्रम्हानंद देणारे परब्रम्ह विटेवर उभे राहिले ते परब्रह्म नजरकैदेत ठेवणे याला धर्म म्हणता येईल काय? फोडिले भांडार धन्याचा हा माल। मी तो हमाल भार वाही।।१।। वेदकालापासून महर्षींनी आणि महाराष्ट्रीय संतांनी तसेच विविकानंद, म. गांधीजी अशा थार देशभक्तांनी आठवण जनतेला देत आहे." म. गांधीजींच्या जयजयकारात व्याख्यान संपले व याच ठिकाणी नगर जिल्हयातील साने गुरुजींचा दौराही संपला. आतापर्यत पूज्य गुरुजींचा दौरा सुमारे १२००

मैलांचा झाला होता. यानंतर ते पुण्याहून पंढरपुराकडे रवाना झाले. नगरहून त्याचबरोबर सेनापती बापट, पूज्य सहजानंद स्वामीजी, श्रीमती मामी कडूसकर, जानकीबाई आपटे, रावसाहेब पटवर्धन, बेलापूरच्या कामगार युनियनचे रामभाऊ डिके, वगैरे मंडळी गेली होती.[२८]

चंद्रभागेच्या वाळवंटात सभा घेण्यात आली. सभेस हजारो लोक उपस्थित होते. या शेवटच्या सभेत पूज्य गुरुजींनी पुन्हा आपला संकल्प जाहीर केला आणि गुरुवार ता. १ पासून आपले उपोषण सुरु केले. सहजानंद भारती आणि बाळासाहेब सप्तर्षी यांनी आपला मुक्काम तेथेच ठोकला होता. उपोषण काळात गुरुजी अत्यंत शांत होते. स्थानिक कार्यकर्त्यांकडून विठ्ठल मंदिर खुले करावे म्हणून पंचक्रोशीत पत्रद्वारे विनंती करण्यात आली. पंढरपूर ही महाराष्ट्राची धार्मिक राजधानी आहे. या धर्मराज्यात तरी अस्पृश्यता ठेऊ नका, काळवेळ ओळखा. कायद्याचा बडगा पाठीवर बसवून घेण्याच्या अगोदर उदार अंतःकरणाने विठ्ठल मंदिर खुले करण्याचे श्रेय त्वरीत घ्या. याप्रमाणे परत सभा घेऊन सांगण्यात आले. शेवटी पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराचे पूजारी बडवे रीतीने गुरुजींच्या संकल्पित पूर्ण झाल्यावर दिनांक १०/०५/१९४७ रोजी मोसंबीचा रस घेऊन आपल्या दिव्य उपोषणाची सांगता केली. नगर जिल्हयातील कार्यकर्त्यांना आनंद झाला. याबरोबरच अस्पृश्यांना विठ्ठल मंदिर खुले झाले हे ऐकून आणि वाचून सर्व महाराष्ट्रीयांना पराकाष्टेचा आनंद झाला. स्वातंत्र्यपूर्व कालापर्यंत अहमदनगर जिल्हयातील अस्पृश्यता निवारण आणि मंदिर प्रवेश हे कार्य सतत चालू होते. त्यामुळे जनतेचे मतपरिवर्तन होत आहे असे बऱ्याच मोठया प्रमाणात होत आहे असे दैनंदिन व्यवहारावरुन दिसून येत होते. सामाजिक अस्पृश्यता जवळ जवळ नष्ट झाली होती. पण काही बाबतीत अगदी उलटा अनुभव येत होता. तो म्हणजे अस्पृश्यातील पाहिली जाणारी अस्पृश्यता महार मांगांना कमी दर्जाचे समजतात व त्यांच्या हातचे पाणीही पीत नाही. तसेच चांभार आणि ढोर हे एकमेकांस कमी दार्जाचे समजतात.

अहमदनगर जिल्हयातील अस्पृश्यता निवारण कार्याची पाहणी करण्याकरिता महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाचे चिटणीस तपासे व हरिजन उपजातीचे संशोधन करणारे वामनराव भट्ट हे नगर जिल्हयात आले असता त्यांनी नगर, नारायणडोह, मिरजगाव, खर्डे या गावी प्रचार कार्य केले. नगर येथील सौ. जानकीबाई आपटे यांनी चालविलेले कार्य आणि बालिकाश्रम

पाहून तपासे यांनी समाधान व्यक्त केले. सथ्था यांची 'दलित दोस्त' ही संस्थाही त्यांनी पाहिली, या संस्था पाहिल्यावर त्यांना वाटले की हरिजनांकरता इतरांनी त्यागपूर्वक कार्य करावे आणि त्यांनी मात्र निष्कारण स्पृश्य जनतेच्या नावानी बोटे मोडावी. अशासारखा प्रकार दिसून येतो. नगरनंतर नारायणडोह येथे प्रचारार्थ स्पृश्य-अस्पृश्यांसह मारुतीच्या देवळात सभा घेण्यात आली. सभेत अस्पृश्यता पाळणे हे धर्माविरुध्द आहे असे सांगण्यात आले. सभेनंतर नारायणडोह येथील राजाराम पाटील यांनी एक देऊळ हरिजनांकरीता खुले केले आहे असे जाहीर केले. त्यानंतर मिरजगाव येथे सभा घेण्यात आली. खर्डा येथे घेतलेल्या सभेत हरिजनांकडून अनेक तक्रारी सांगण्यात आल्या. तेथील विशेष म्हणजे सार्वजनिक वाचनालयात देखील हरिजनांना प्रवेश मिळत नाही हे ऐकून कार्यकर्त्यांना पराकाष्ठेचे वाईट वाटले. अशा वेळी देव करो आणि त्यांचे मनपरिवर्तन होवो असे म्हणावे लागते.

पूज्य साने गुरुजी यांनी मंदिर प्रवेशाच्या बाबतीत मोठा वीजय मिळविला आणि पंढरपूरच्या साकार परब्रम्हाचे दर्शन अस्पृश्य समाजास घडविले म्हणून त्यांचे अभिनंदन करावे आणि हरिजनांना आपल्या कार्याची ओळख करुन देऊन त्यांच्याकरता सरकारने ज्या सवलती दिल्या आहेत त्याची जाणीव त्यांना करुन द्यावी. म्हणून नगर येथील हरिजन पुढारी श्रीपतराव वाल्हेकर, नगर जिल्हा परिषद, शेवगाव तालुक्यातील ठाकूर पिंपळगाव परिषदेच्या खर्चाची व एकंदर व्यवस्थेची जबाबदारी वाल्हेकर यांनी स्वतःकडे घेतली होती. नगरचे पुढारी व कार्यकर्ते भारदे, जानकीबाई आपटे, बोगावत ही मंडळी मार्गदर्शनाकरिता हजर होती. अध्यक्ष म्हणून मुंबई राज्याचे उद्योगमंत्री ना. तपासे व पूज्य गुरुजी यांना निमंत्रण दिले होते. १४/०६/१९४७ रोजी उभयता परिषदेस हजर झाले. स्वागताध्यक्ष बाबुराव भारस्कर आणि श्रीपतराव वाल्हेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. ना. तपासे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'हरिजन बंधूंच्या हाकेसाठी मला येथे यावे लागले आहे. पण माझे सारे लक्ष दिल्लीकडे लागले आहे. कारण आज तेथे मोठया क्रांतिकारक घटनेची चर्चा आपले पूज्य नेते करीत आहेत. १५ ऑगस्टच्या आत इंग्रज जाणार! पण खुद्द ज्या मुसलमान शहानी येथे राज्य करीत असता देशाचे दोन तुकडे करा असा विचार कधीही मनात आणला नाही त्याच गोष्टीकरता आमचे मुसलमान बंधू हट्ट धरुन बसले आहेत.' सभेकरिता नगर जिल्हयातील शेकडो हरिजन उपस्थित होते.[२९]

## १) नगर तालुका

नगर तालुका बराचसा नगरशहराशीच नाळ राखणारा आहे. सर्व कार्यालय जिल्हा व तालुक्याचे एकाच ठिकाणी आहेत. नगर तालुक्याचा बहुतांशी प्रदेश डोंगराळ व नापिक आहे. काही भाग मिलिटरीच्या अखत्यारित असून थोडीफार उसाची शेती येथे पिकते. तालुक्यातून सीना नदी वाहते दौंड-मनमाड लोहमार्ग शहराजवळून जातो. नगर-सोलापूर, नगर-कल्याण, नगर-पुणे, नगर-जामखेड हे राजरस्ते तालुक्यापासून जातात.

अहमदनगर तालुक्यास दादा पाटील शेळके, शिवाजीराव कर्डिले, बाळासाहेब नागवडे, बापूसाहेब भापकर इत्यादींचे नेतृत्त्व लाभलेले आहे. शेतकरी बांधवांच्या विकासासाठी नगर तालुका साखर कारखाना, वाळकी येथे कार्यान्वित आहे.

**दासगणुमहाराज :-**

संताच्या गुणवर्णनी झिजविली वाणी तनू लेखणी |
भक्तिचा झरला अर्हनिश झरा यन्नामसंकीर्तनी ||
रंगे किर्तने पद्‌मजात्मन दुजा प्रल्हाद जो नंदन |
श्रीमत् सद्‌गुरु संत दासगणुच्या पादांबुजा वंदन ||

'दासगणुमहाराजांचे पूर्वज मूळचे कोकणातील रत्नागिरी तालुक्यातील कोतवडे गावचे. तेथे सहस्त्रबुध्दे नावाचे खोत होते. या खोतांकडे गावच्या विठ्ठल मंदिराची पूजा-अर्चा करण्याचाही मान होता. पटवर्धनांच्या संस्थानात पंढरपूर जवळच्या करकंब गावी दासगणुंचे पूर्वज कालांतराने स्थायिक झाले. हे पटवर्धन सुध्दा पूर्वीचे कोतवडे येथीलच व सहस्त्रबुध्दाचे उपाध्याय, परंतु पुढे ते स्वपराक्रमाने सरदार झाले.

दासगणुमहाराजांचे पणजोबा आप्पाजी गणेश सहस्त्रबुध्दे हे मामलेदार असल्याने नगर येथे बदलून आले. पुढे त्यांचे पुत्र एकनाथपंत हेही मामलेदार झाले. एकनाथपंतांना चार मुलगे, त्यातील एक दत्तात्रय, या दत्तात्रयांचा विवाह अकोळनेर, ता. नगर येथे झाला. यथावकाश त्यांच्या पोटी १७८९ मध्ये दासगणुमहाराजांचा जन्म झाला.

दासगणुमहाराजांचे पाळण्यातील नाव नारायण असे होते. परंतु त्यांच्या आजोबांनी त्यांचे मोठे कान व पोट पाहून मजेने गणपती असे नाव ठेवले. आजोबा-आजींनी दासगणुंचे खूप

लाड केले. दासगणुंचे एक मामा काशिनाथपंत हे विठ्ठलभक्त होते. ते पांडूरंगाच्या मंदिरात पायात चाळ बांधून देहभान हरपून नाचत. त्यांच्या सोबत छोटे दासगणुही भजनाला जात.

अहमदनगर शहरात दासगणुंचे कुटुंब कोडत गल्लीत, पुंडलिक विठ्ठल मंदिराजवळ राहत होते. दासगणुंना शाळेविषयी आकर्षण नव्हते. शके १७९८ मध्ये त्यांची मुंज झाली. विद्याभ्यासात त्यांची प्रगती चांगली नव्हती. त्यांना बालपणीच तमाशा, शाहिरी, पोवाडे या विषयी आकर्षण जडले. त्यांचा हा नाद तुटावा म्हणून त्यांच्या वडिलांनी त्यांना त्यांच्या काकांकडे बडोद्यास ठेवले. दासगणुंनी तेथे संस्थानात नोकरी पत्करली. गुजराथी भाषा आत्मसात करुन त्या भाषेत कवित्व केले. तेथेच त्यांचा विवाह शके १८१३ मध्ये झाला. त्यांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे त्यांना नोकरी सोडावी लागली घरी येताच तेथेही त्यांचे वाद होऊ लागले. शेवटी घरादाराचा त्याग करुन, पोलिसाची नोकरी पत्करली. पोलिसी नोकरीच्या काळात ते श्रीगोंदा येथे होते. त्यावेळी ते तमाशालाही जात. 'मंजुखा' नावाचे एक नाटक त्यांनी यावेळी लिहिले व त्याचे प्रयोगदेखील केले. तमाशाच्या लावण्या, बाजीराव मस्तानीवर आधारित पोवाडा त्यांनी लिहिला. त्यामुळे दासगणुंभोवती शाहीर व तमासगिरांचा वावर वाढू लागला.

श्रीगोंदा येथे नोकरीत असताना दासगणुंची भेट वामनशास्त्री इस्लामपूरकर यांच्याशी झाली. ते पांडुरंगाचे भक्त व वारकरी होते. दासगणु त्यांच्याकडून प्रभावित झाले. त्यांना गुरुस्थानी मानून नियमित पंढरपूरची वारी करु लागले. पुढे वामनशास्त्री देह ठेवण्यासाठी काशीला निघाले. निघताना त्यांनी शिर्डीच्या साईबाबांस माझ्या ठिकाणी मान असा उपदेश दासगणुंना केला व सर्व संपत्ती दासगणुंना देऊन टाकली. परंतु दासगणुंनी एका पैशालाही हात लावला नाही. फक्त देवघरातील पांडुरंगाची मूर्ती घेतली.

श्रीगोंदयाहून दासगणुंची बदली जामखेड येथे झाली. येथील गाव उत्सवात ऐनवेळी कीर्तनकार आले नाहीत म्हणून दासगणु स्वतः कीर्तनासाठी उभे राहिले व संत दामाजींचे रसाळ आख्यान सांगितले, हे त्यांचे पहिले कीर्तन.

गुरुंच्या आदेशाप्रमाणे दासगणु १८९६ मध्ये शिर्डीस गेले. तेथे साईबाबांची भेट घेतली. साईबाबांनी दासगणुंच्या मस्तकावर हात ठेवून सांगितले की, 'आजपासून पोवाडे, लावण्या लिहिणे बंद, सर्व संतांची चरित्रे लिहिण्यास प्रारंभ करा.'

साईबाबांच्या आदेशानुसार दासगणुंनी संतांची चरित्रे लिहिण्यास आरंभ केला. नोकरीनिमित्त विविध ठिकाणी असताना त्यांनी वेगवेगळया संतपुरुषंची माहिती गोळा केली.

"म्हणून या संतचरित्रांचा | उपयोग करा नित्यसाचा |
जेणे जीवन यात्रेचा | पंथ सुगम होईल की |
संत चरित्रे पाहून | आपले ठेवा वर्तन |
ऊगीच अहंकारवश होवून | भलते सलते करु नका ||

१८९६ च्या प्लेगच्या साथीत दासगणुंनी लोकांची खूप सेवा केली. मृत लोकांना पाठीवरुन वाहून नेले. १९०० साली नेवासा येथे नोकरीस असताना 'भक्तिलीलामृत' हा ग्रंथ पूर्ण केला. दासगणु शिर्डीस जेव्हा-जेव्हा साईबाबांच्या दर्शनास जात त्या-त्या वेळेस बाबा त्यांना नोकरी सोडण्याचा सल्ला देत. कितीतरी संकटांतून दासगणुंना साईबाबांनी वाचविले. एका प्रकरणत दासगणु विनाकारण गुंतले असताना साईबाबांनी त्यांना विनासायास सोडविले. या घटनेनंतर मात्र दासगणुंनी त्वरित नोकरीचा राजीनामा दिला व बराच काळ बाबांच्या सान्निध्यात शिर्डीत राहिले. शेवटी साईबाबांच्याच आज्ञेनुसार दासगणु नांदेड येथे गेले.

दासगणु आता दासगणुमहाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. ते आता कीर्तन करु लागले, परंतु बिदागी घेत नसत. त्यांनी भक्तिलीलामृत, ईशावास्य बोधिनी, शंकराचार्य चरित्रामृत, विचार सागर टिकामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत, श्रीगजानन वीजय, मध्ववीजय अशी ग्रंथसंपदा निर्मिली. तसेच ६९५ ओव्यांचे नागझरी महात्म्य, २५१ ओव्यांचे ज्ञानेश्वर चरित्र, १६० ओव्यांचे केशवराजचरित्र, २६३३ ओव्यांचे गोदामाहात्म्य, १६९६ ओव्यांचे मंगेश माहात्म्य, ६९७ ओव्यांचे शनिप्रताप या रचना केल्या. दासगणुंचे 'ऊर्ध्ववागमनं' खंडकाव्य प्रसिध्द आहे. तसेच तानाजी, झाशीची राणी, होळकर स्वारी, रंगपंचमी यावर पोवाडे लिहिले. पांडुरंग स्तोत्र, व्यंकटेश स्तोत्र, महालक्ष्मी स्तोत्र, मोहिनीराज स्तोत्र, गायत्री स्तोत्र, साईनाथ स्तवन मंजिरी, गोदा स्तोत्र अशी स्तोत्रे देखील दासगणुंनी लिहिली. तसेच त्यांचे शिष्यबोध व छात्रबोध हे ग्रंथही प्रसिध्द आहेत.

दासगणु प्रतिवर्षी साईबाबा महोत्सवात रामनवमीस जात. प्रतिवर्षी ज्ञानेश्वर पालखी दर्शनासाठी पुण्यास जात. आयुष्याच्या उत्तरार्धात दासगणुमहाराज नांदेड येथील गोरंटे याच

गावी राहिले. १९५८ साली नगर येथेमहाराजांचा सत्कार झाला होता. त्यावेळची सर्व रक्कम त्यांनी नगर वाचनालयास दान केली होती. त्यावेळेसमहाराजांनी सत्कारास उत्तर देताना म्हटले की, "मी नगरचा आहे, नगरचा मला फार अभिमान आहे. नगरच्या लोकांनी कौतुक न करता मला जोडे मारले असते तरी ते मी स्वीकारले असते."[३०]

**अवतार मेहेरबाबा :-**

I have came not to teach, but to awaken.

(मी शिकविण्यासाठी नाहीतर आत्मजागृती निर्माण करण्यासाठी आलो आहे.)

'पुण्यामध्ये कॅम्प परिसरात बटलर मोहल्ला नावाच्या गल्लीत शेरियार व शिरीन हे ईराणी कुटुंब राहात होते. एकदा शिरिन माईंना स्वप्न पडले. वेगवेगळया देशातील लोक त्यांच्या सभोवती जमलेले आहेत व मोठया आदरयुक्त कुतूहलाने त्यांच्याकडे पाहात आहेत. त्यावेळी पारशी पंचांगप्रमाणे मेहेर हा महिना चालू होता. मेहेरचा अर्थ सूर्य. इराणी भाषेत मेहेरचा अर्थ दया.

या दाम्पत्याला २ फेब्रुवारी १८९४ रोजी पहाटे पाच वाजता एकपुत्र रत्न प्राप्त झाले. त्यांनी त्याचे नाव मेहेरबान असे ठेवले. मेहेरबाबांचे सर्व शिक्षण पुण्यातच झाले. पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये असताना त्यांना कॅम्प परिसरात माल्कम टूंकजवळ लिंबाच्या झाडाखाली हजरत बाबाजान नावाच्या एका महिला साध्वीचे दर्शन झाले. तिने मेहेरबाबांच्या भुवयांच्याजवळ चुंबन घेतले. या घटनेनंतर बाबांचे आयुष्य आमूलाग्र बदलले.

मेहेरबाबांचा सेलर नावाचा कॉलेजमधील एक मित्र होता, हाच पुढे त्यांचा पहिला शिष्य झाला. सेलरसोबत मेहेरबान एकदा शिर्डीला गेले. तेव्हा साईबाबा सकाळीच लेंडी बागेतून परतत होते. मेहेरबानने साईबाबांच्या पायावर डोके ठेवताच बाबा उद्‌गारले 'परवरदीगार' (जगाचे पालन करणारा परमात्मा).

मेहेरबान लहानपणापासून प्रेमळ, आनंदी व विनोदप्रिय होता. त्यांना काव्याची विशेषतः सुफी सद्‌गुरु हफीजच्या काव्याची विशेष गोडी होती. तसेच क्रिकेट, गोटया, आटयापाटया व पतंग उडविण्यात तरबेज होता. कॉलेजमध्ये असताना त्यांनी विश्वबंधू संघाची स्थापना केली होती.

पुढे १९२१ मध्ये मेहेरबानचा साकुरच्या उपासनीमहाराजांशी संबंध आला. त्या वास्तव्यात उपासनीमहाराजांनी सर्व शिष्यांदेखत घोषणा केली, "मेहेरबान, तू आदिशक्ती आहेस, तू आता तुझे कार्य स्वतंत्रपणे करण्यास मोकळा आहेस."

आपले भक्त रुस्तुम इराणी यांच्या विवाहानिमित्ताने मेहेरबान १९२३ साली अहमदनगरला आले व पुढे अहमदनगर हीच त्याची कर्मभूमी ठरली. नगर शहरापासून १० किमी अंतरावरील अरणगावातील एक टेकडी मेहेरबानने निवडली व तेथेच ते वास्तव्य करु लागले. पुढे हाच परिसर मेहेराबाद म्हणून ओळखला जाऊ लागला.

मेहेराबाद येथील आश्रमात १० जुलै १९२५ रोजी मेहेरबाबांनी आपल्या शिष्य मंडळींसमोर मौन पाळण्याचे जाहीर केले. पुढे त्यांना देशविदेशांतील बरेचशे शिष्य मिळाले. त्यांनी बाबांचे मेहेरबाबा असे नामकरण केले. मेहेरबाबांनी आत्मजागृतीचे कार्य हाती घेतले. आपल्या देहत्यागापर्यंतच्या ४४ वर्षांच्या कालखंडात बाबांनी अखंड मौन पाळले. रोम लिपीतील आद्याक्षरे व १ ते ९ पर्यंत अंक असलेला वर्णाक्षरांचा फलक हा त्यांची वाणी बनला. या फलकावरील अक्षरांवरुन बाबा भरभर बोटे फिरवित. त्यावरुन जे शब्द तयार होत ते शब्दच त्यांचे मनोगत असे. ही फलकाची भाषा त्यांचे शिष्य एरच जस्सावाला व बहीण मनिंना इराणी यांना चांगली समजे. याच फलकाच्या आधारे बाबांनी "God Speaks" सारख्या विश्वविख्यात ग्रंथाची निर्मिती केली. हा ग्रंथ "ईश्वरवाणी" या नावाने मराठीतही उपलब्ध आहे.

७ सप्टेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश येथील डेहराडूण कार्यक्रमात बाबांनी आपणच पुराण पुरुषोत्तम अवतार असल्याची घोषणा केली व मीच तो सनातन पुरुष आहे. यावर तुम्ही विश्वास ठेवा, क्षणभर याबद्दल संशय ठेऊ नका. मी हे शरीर नव्हे, जे तुम्हाला दिसते हा भव्य कोट आहे. "प्रेम हेच ईश्वर" हा जीवनोपयोगी संदेश बाबांनी जगाला दिला. पंथ, संप्रदाय, तत्त्व, जात, धर्म, कर्मकांड याला अजिबात त्यांनी महत्त्व दिले नाही.

नगरमधील मेहेराबाद, मेहराजाद (पिंपळगाव माळवी) व पुण्यात बंड गार्डन रोडवरील गुरुप्रसाद या बंगल्यामध्ये बाबांच्या दर्शनाचे अनेक कार्यक्रम झाले. या कार्यक्रमात बाबा कुष्ठरोग्यांना आपल्या हाताने आंघोळ घालत व त्यांना नमस्कार करत. गलिच्छ पिंजऱ्यातील सुंदर पक्षी असे बाबा त्यांचे वर्णन करत.'[३१]

१२ सप्टेंबर १९५४ रोजी नगरमधील वाडियापार्क मैदानात ५० हजाराहून अधिक लोकांच्या उपस्थितीत अविस्मरणीय कार्यक्रम बाबांचा झाला. या कार्यक्रमास संत गाडगेबाबा, सती गोदावरी माता देखील उपस्थित होत्या. पुण्यात सेंटमिरा हायस्कूलच्या प्रांगणात तर राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांनी बाबांना खांद्यावर घेऊन त्यांचा गौरव केला. मेहेरबाबांनी ऑस्ट्रेलिया, स्विस, कॅनडा, इंग्लंड, इटली इत्यादी देशांना भेटी दिल्या. तेथ आजही मेहेरबाबा केंद्र चालू आहेत.

४ सप्टेंबर १९३१ रोजी महात्त्मा गांधी इंग्लंडला जात असताना त्यांची व बाबांची भेट झाली. गांधीजींनी बाबांना मौन सोडण्याचा सल्ला दिला. यावर बाबा गांधीजींना म्हणाले, "जेव्हा जीभ मौन पाळते तेव्हा मन बोलू लागते, मन मौन पाळते तेव्हा हृदय गाते, हृदयाचे गाणे थांबते, तेव्हा आत्मा स्वानुभाव घेतो."

ताज्जुदीन बाबा, नारायणमहाराज, उपासनीमहाराज, साईबाबा व बाबाजान हे बाबांचे गुरु होते. बाबांनी आपल्या अवतार समाप्तीची घोषणा आपल्या भक्तांना अगोदरच दिली होती. मेहेराबाद येथील टेकडीवरील जागा बाबांनी समाधीस्थानासाठी निश्‍चित केली. ३१ जानेवारी १९६९ रोजी गुरुचे पुनर्वसन नक्षत्र चालू असताना बाबांनी देह त्याग केला. परंतु ७०० वर्षांनी या पृथ्वी तलावर जन्म घेण्याचे वचन देऊन आज तेथे त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या समाध्या व नित्य वापरावयाच्या वस्तू व वाचनालय आहे.

"माझ्या देहत्यागानंतर तुम्ही माझ्यावर अधिक प्रेम करु लागाल. मी जसा आहे तसा तुम्ही पाहू शकाल. मेहेरबाबा या नाम रुपी वर्ण आकार यांच्या चौकटीत मी बसणार नाही. एका थेंबातून मी प्रकटलो हे खरे असले तरी मी अमर्याद महासागर आहे. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाच्या अंतःकरणात ईश्वरी प्रेमाचे बीज पेरण्यासाठी मी आलो आहे."[३२]

**श्री क्षेत्र डोंगरगण :-**

Dongargaon village, ten miles north east of Ahmednagar with in 1881 a population of 617 has a romantic little revine called the Happy Valley between two spurs of the Ahmednagar Platium. A road braneling from the Ahmednagar. Toka road at

the six mile stone leads past Dongargaon. The last through an opening in the hills to the rich market town of Vambori, Standing on the out skirts of Dongargaon and looking north lies the happy Valley. A deep height of rock out steps runs past a temple of Mahadeo from behind which a spring gushes from the rock and flow into a round cistern. About four feet deep from the first cistern the stream is carried by a channel into a second cistern and winding round a muhammadan tomb now a travellers bungalow tumbles over a rockers ledge about 20th and dashes along a rugged bed for a quarter if a mile till it leaps on the edge of the platease to the plain below. During the hot whether, when the country round is dry, the stream continous to flow and all down the valley the trees gives a great full slade. (Gazzeter Deccan, chapter XIV B'day Page 716, 1885)

वरील वर्णन बॉम्बे गॅझेटमध्ये इंग्रजांनी केले आहे ते गाव म्हणजेच डोंगरगण होय.[३३]

प्रभू रामचंद्र वनवासात असताना त्यांना "विरोध" नावाचा राक्षस भेटला. त्याने रामास पाहाताच आक्राळ विक्राळ रुप धारण केले व रामावर हल्ला केला. प्रभुरामचंद्रांनी बाणाने त्याच्या दोन्ही भुजा तोडल्या, तेथे त्यास दिव्य शरीर प्राप्त झाले. यावर तो प्रभुरामास म्हणाला की, मी तुंबर नावाचा गंधर्व होतो, परंतु मद्य पिऊन गायन केले म्हणून कुबेराने मला शाप दिला होता. आता तुम्ही मला शापमुक्त केले आहे. यानंतर तो गंधर्व प्रभुरामांना दंडकारण्यात शरभंगऋषींच्या भेटीस घेऊन गेला व त्यांना कुष्ठ मुक्त केले. येथे त्यांनी (रामाने) लिंग स्थापन करुन पूजा केली. त्यास रामेश्वर लिंग म्हणून ओळखले जाते. तेथे एक गुंफा व सीता माईची मूर्ती आहे. याच परिसरात महानुभव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी हे देखील काही काळ वास्तव्यास होते.

येथेच "ज्ञानेश योगाश्रम संस्था" ही वारकरी शिक्षण देणारी संस्था प.पू. पुंडलिकमहाराज जंगले शास्त्री चालवितात. स्वतः जंगलेशास्त्री ब्रम्हचारी असून वारकरी संप्रदायातील महान व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांची कीर्तन, प्रवचन सेवा, पंढरपूर दिंडी सोहळा अप्रतिम आहे.

**भिंगारचे शुकलेश्वर :-**

१५०० वर्षापूर्वी शालिवाहन राजाच्या उत्तर काळातही या मंदिराचा उल्लेख आढळून येतो. शालिवाहनराजाने आंबिका व कुशना ही नगरें वसविली. त्यातील कुशना या नगरीतील शिवलिंग पढे शुक्लेश्वर या नावाने प्रसिध्द झाले. सदाशिवराव पेशव्यांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला. येथे शिवलिंग असून ते नदीच्या पायाजवळ आहे. या मंदिराचा उल्लेख काशीखंडात असून नारदपुत्र अष्टवक्रा येथेच स्नान करुन या लिंगाची पूजा करत असत. या लिंगाच्या पूजाफळानेच त्यास मानव योनीत जन्म मिळाला.[३४]

**नृसिंह मंदिर (भातोडी) :-**

संपूर्ण अहमदनगर जिल्हयात एकमेव असलेले हे नृसिंह मंदिर नगर तालुक्यात भातोडी या गावी मेहेकरी नदीकाठी वसलेले आहे. निजामशाहीचा संस्थापक अहमदशहाच्या दरबारी कान्हो नरसोजी नावाचा एक ब्राम्हण वजीर होता. तो मुत्सुद्दी व हुशार होता त्याच्याच काही हितशत्रूंनी त्याच्या विरुध्द बादशहाकडे चुगली केली. त्यामुळे बादशहाने कानहो नरसोजी यास नोकरीवरुन काढून टाकले. त्यानंतर कान्हो नरसोजी भातोडी या गावी जाऊन राहू लागला. आपल्यावर विनाकारण आलेले बालट निघून जावे म्हणून भगवान नृसिंहासमोर अनुष्ठान मांडले.

अहमदनगरच्या निजामशाहीवर या काळात खूप संकटे येऊ लागले. त्यामुळे अहमदशहाला कान्हो नरसोजीची आठवण झाली. बादशहाला त्याची चूक समजली. त्याने कान्हो नरसोजीस पुन्हा कामावर घेतले.

हा सर्व नृसिंहाचा चमत्कार म्हणून कान्हो नरसोजीने नृसिंह मंदिराचा जीर्णोध्दार केला. हे मंदिर ७००-८०० वर्षापूर्वीचे असावे, असा अंदाज वर्तविला जातो.

भातोडी परिसरात ऐतिहासिक भातोडीची लढाई १६२४ साली झाली. मलिक अंबरने छत्रपती शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी राजे व शरिफजी (शहाजींचे भाऊ) यांच्याशी युध्द केले. यात शरीफजींना वीरमरण आले. परंतु शहाजीराजांनी मलिक अंबरच्या सैन्याची अपरिमित हानी केली.[३५]

## २) पाथर्डी तालुका

"पांडव वनवासात असताना अर्जुनास शाप मिळाला. या शापानुसार अर्जुनाचे पौरुषत्व नष्ट होऊन त्यास नपुसंकत्व प्राप्त झाले. त्यामुळे अर्जुन दुःखी झाला व तो रडू लागला. श्रीकृष्ण अर्जुनास प्रेमाने पार्थ म्हणत. पार्थ रडला ते ठिकाण म्हणजे पार्थ-रडी पाथर्डी."

अजून एक अख्यायिका पाथर्डी या नावाशी संबंधित आहे. अर्जुनाचे गर्वहरण करावे व त्याच्या हातून तपश्चर्या घडावी म्हणून भगवान शंकरांनी अर्जुनाला शाप दिला की, तू तुझ्या पुत्राकडून पराजित होशील. या शापाप्रमाणे अर्जुन व त्याचा बभ्रुवाहन पुत्र यांच्यात युध्द झाले. त्या युध्दात अर्जुनाचा पराभव झाला. हे युध्द झाले तो परिसर म्हणजे पाथर्डी जवळील करोडी, येळी, खरवंडी, भालगाव, टाकळी ही गावे अर्जुनाचा या युध्दात पराभव झाल्याने अर्जुनाच्या ध्वजस्तंभावरील हनुमंत नाराज झाला व काळा पडला. आजही करोडी या गावच्या हनुमंताचे तोंड काळे आहे. पुत्राकडून पराभव झाल्याने पार्थ रडू लागला ते ठिकाण म्हणजेच पार्थ-रडी - पाथर्डी. नंतर भगवान श्रीकृष्णाच्या सल्ल्यानुसार अर्जुनाने येथे शिवलिंगाची स्थापना करुन शंकराला प्रसन्न करुन घेतले. आजही पाथर्डी येथील खोलेश्वर लिंग या घटनेची साक्ष देत आहे.

पाथर्डी तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने बागायती शेतीचे प्रमाण कमी आहे. बहुतांश कष्टकरी वर्ग ऊस तोडणीसाठी इतरत्र स्थलांतर करतो. तालुक्याच्या विकासासाठी दादा पाटील राजळे, आप्पासाहेब राजळे व राजीव राजळे यांनी वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून विकासकामे हाती घेतलेली आहेत.

तसेच तालुक्यात बबनराव ढाकणे, नवनाथ आव्हाड, दगडू बढे, रावसाहेब म्हस्के, कि.बा. म्हस्के, बाबुजी आव्हाड यांचा राजकीय वारसा असून धार्मिक वारसा तर पाथर्डीला खूप मोठा आहे. आनंदऋषीजीमहाराज, कृष्णमहाराज लोहिया, तनपुरेमहाराज, एकनाथ म.गुरु जनार्दन पंत, मोहटादेवी, वृध्देश्वर, कानिफनाथंची मढी, देवराईचा बालाजी इ.[३६]

**देवराईचा बालाजी :-**

रुसलेल्या लक्ष्मीला समजूत घालून तिला भगवान विष्णूंनी (बालाजी) वेंकटाचल पर्वतावर आणले. लक्ष्मीची समजूत घालताना बालाजीला कुबेराकडून कर्ज घ्यावे लागले. ते कर्ज बालाजीला फिटता फिटेना. कुबेराचे कर्जफेडीचे तगादे सुरुच होते. शेवटी बालाजीने कुबेराला वचन दिले की, कलियुगाच्या अंतापर्यंत मी कर्ज चुकते करीन. त्यानुसार बालाजीचे भक्त बालाजीस त्याचे कर्ज कमी करण्यासाठी पैसे, सोने-चांदी अर्पण करतात. तिरुपती बालाजीचे नगर जिल्हयात दोन ठिकाणे अंशात्मक रुपाने आहेत. एक कुकाण्याजवळ देडगाव तर दुसरे देवराई.

मच्छिंद्रनाथांच्या तीर्थयात्रांचे मावंदे घालण्यासाठी गोरक्षनाथांनी संपूर्ण गर्भगिरी डोंगर सुवर्णाचा केला. मावंद्याचा कार्यक्रम संपल्यानंतर उरलेले सुवर्ण देवराईच्या बालाजीस त्याचे कर्ज फेडण्यासाठी देऊन टाकले. कुबेराने संपत्तीला हात लावला व उर्वरित सुवर्ण तेथेच बालाजीस रक्षण करण्यास सांगितले. त्यामुळे आजही कुबेराच्या आज्ञेनुसार बालाजी तेथे त्या सुवर्णाचे रक्षण करण्यासाठी स्थित आहे. देवराईच्या बालाजीच्या दर्शनानंतर वृध्देश्वराचे दर्शन घेतल्यास तिरुपतीच्या बालाजीच्या दर्शनाचे व महापूजेचे पुण्य प्राप्त होते. कृष्णाष्टमीच्या दिवशी बालाजीची मोठया प्रमाणात यात्रा भरते.[३७]

**आदिशक्ती मोहटादेवी :-**

पाथर्डी तालुक्याच्या ठिकाणाहून १०-१२ किलोमीटर अंतरावर एका छोटया टेकडीवर आदिमाया आदिशक्तीचे हे ठिकाण असून त्यास मोहटादेवी हे नाव आहे. पाथर्डी तालुक्यातील काही भाविक नित्यनियमाने माहूर गडावर जगदंबा मातेच्या दर्शनासाठी जात असत. वर्षानुवर्षे ही परंपरा होती. कालांतराने ही मातेची भक्त मंडळी वृध्द झाली. त्यांचे शरीर थकल्याने मातेच्या सेवेत अंतर पडू लागते. या काळजीने ही मंडळी मातेचा धावा करु लागली. त्यांनी जगदंबेस साकडे घातले. माता भक्तांवर प्रसन्न झाली व त्यांना सांगितले की तुम्ही आता वृध्द झालेले आहात, तुम्हाला येथपर्यंत येण्याची गरज नाही, मीच आता तुमच्या गावी येते. परंतु त्यासाठी एक अट आहे, मी तुमच्या पाठी येत असताना तुम्ही वळून मागे पाहू नका, अन्यथा मी तेथेच प्रकट होईल व कायमस्वरुपी वास्तव्य करीन.

या अटीनुसार देवी भक्तांच्या पाठी गावापर्यंत आली, परंतु त्यांनी वळून पाहताच माता तेथेच स्थिरावली. सदर ठिकाण नदीकाठी होते. जगदंबा माता तेथेच प्रगट झाली.

"मोहटे गावी ओढयानजिक | देखोनि सुंदर परिसर |

केले होते वास्तव्य | येता क्षणी तेथे |

लोकांची देखोनी वर्दळ | आणि विटाळ चांडाळ |

मग सोडूनी हे स्थान | येती डोंगर माथ्यावर |"

परंतु नदीकाठी स्त्रिया कपडे धुण्यासाठी येऊ लागल्याने, देवीस विटाळ होऊ लागला, म्हणून देवी नजीकच्या एका डोंगरावर प्रकट झाली, तो डोंगर म्हणजेच मोहटादेवी गड.

श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिरात प्रवेश करताच आपणांस मातेचे मनमोहक रुप प्रसन्न करते, "जगदंबेसी पाहतां वेधिले मन माझे | मस्तंकी मुकुट रत्नजडीताचा कुंकुम चर्चिले माथा | दाट चुप्र नेसे पितांबर कुंचटी कटीतटी छाता | चंद्रवदन जिचे सरल नासिक शस्त्रे झळके आठी हाता | मूर्ति पाहूनी मन माझे झाले उन्मन बंदू जगन्माता ||

मोहटादेवी मंदिराचा जीर्णोध्दार ग्वाल्हेरचे राजे शिंदे यांनी केलेला आहे. त्यास कारण अद्‌भुत घडले होते. त्यांचा चिटणीस बक्षी नावाचे गृहस्थ होते. त्यांच्याकडून एकदा हिशोबात चूक झाल्याने, त्यांना तुरुंगवास भोगावा लागला, परंतु बक्षींनी जगन्मातेचा धावा करताच राजासमोर तुरुंगाची कुलपे गळून पडली. राजाने याची विचारणा केली असता, बक्षी म्हणाला की, ही सर्व आई जगदंबेची कृपा आहे. राजा आश्चर्यचकित झाला. त्यानेही पुत्रप्राप्तीसाठी जगदंबेस नवस केला, त्याचाही नवस फलद्रुप झाला म्हणून त्यांनी देवीच्या मंदिराचा जीर्णोध्दार केला.

देवीच्या मंदिरात प्रवेश करण्यासाठी शंभर  पायऱ्या चढून जावे लागते. निम्म्या गडापर्यंत वाहने जाऊ शकतात. नवरात्रात गडावर भक्तांची खूपच गर्दी असते. मंगळवार व शुक्रवारी भक्त दर्शनास येतात.

**दैत्य पूजक - दैत्य नांदुर :-**

अहमदनगर जिल्हयातील हे एक अद्‌भुत गाव. या गावात ग्रामदैवतांचा मान मारुतीस न देता एका दैत्यास दिला जातो.

पाथर्डी तालुक्यीील हे दैत्य नांदुर नावाचे गाव. रामायणातील घटनाक्रमामुळे प्रभु रामचंद्रास चौदा वर्षाचा वनवास पत्कारावा लागला होता. त्या काळात ते सीतामाई व भ्राता लक्ष्मण यांच्यासह पंचवटी परिसरात वास्तव्यास होते.

यावेळी ते केदारेश्वर येथील वाल्मिक ऋषीच्या भेटीसह चालले होते, त्यावेळी तेथे जवळच निंबादैत्य नावाचा राक्षस राहत होता. प्रभुरामचंद्र तेथे मुक्कामी असताना त्या राक्षसाने त्यांची श्रध्दापूर्वक सेवा केली. त्यामुळे प्रभुरामचंद्र त्या राक्षसावर प्रसन्न झाले व त्या दैत्यास वर दिला की, या गावी ग्रामदैवताचा मान तुला मिळेल. "प्रभु रामचंद्रांच्या वर आशीर्वादानुसार निंबादैत्यास कुलदैवत व ग्रामदैवताचा मान मिळाला या गावाची सर्व कार्य निंबादैत्याच्याच साक्षीने पार पडतात."

दरवर्षी भाद्रपद अमावस्या व पाडव्याला निंबादैत्यमहाराजांची भव्य यात्रा भरते. या गावात मारुतीचे मंदिर नाही. अथवा मारुती, हनुमान या नावाची व्यक्तिदेखील नाही. गावकरी घरांना चुना देत नाहीत तसेच गावात दुमजली इमारत देखील बांधत नाही.[३८]

**आनंदऋषीजीमहाराज :-**

पाथर्डी तालुक्यातील चिंचोडी शिराळ या खेडेगावात माता हुलसाबाई व पिता देवी चंदजी गुगळे या घरात श्रावण शुध्द प्रतिपदेस २७ जुलै १९०० रोजी एका पुत्ररत्नाचा जन्म झाला त्याचे नाव नेमीचंद.

धार्मिक वातावरणात नेमीचंद मोठा झाला. त्याबरोबरच त्यांनी विविध धर्माचे ग्रंथ, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी अशा विविध भषांवरही प्रभुत्व मिळविले. लहानपणी मुस्लिम धर्माचे जंबुभाई नावाचे गृहस्थ त्यांचे शिक्षक होते. ते नेमीचंदला एका लाकडी पेटीत बसवत व गाणे गायनाचा कार्यक्रम करत.

एकदा नेमीचंद बालपणी हिवरे या गावी महासती रामकुंवरजी साध्वींच्या दर्शनासाठी बैलगाडीतून गेले होते. दर्शनाचा कार्यक्रम आटोपून परत येतांना नेमीचंद गाडीतून खाली पडले

व अंगावरुन गाडीचे चाक गेले. नेमीचंदच्या अंगाला साधा ओरखडादेखील लागला नाही. त्यांच्या आईच्या विश्वासानुसार महान संकटातून वाचलेली माणसे पुढे खूप मोठी होतात आणि खरोखरच आईचा हा विश्वास नेमीचंदने खरा करुन दाखविला. नेमीचंद वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत न चुकता भजनाला जात. वयाच्या १३ व्या वर्षी ते जैन संत स्व. रतन ऋषीजीमहाराज यांच्या सानिध्यात आले व त्यांना वैराग्यप्राप्ती झाली. त्याच वर्षी त्यांनी मिरी या गावी जैन धर्माची दीक्षा घेतली व आनंदऋषीजी हे नाव धारण केले. १९४९ मध्ये राजस्थानमधील सर्व संप्रदायाचे अधिवेशन भरले होते, त्यात ऋषी संप्रदायाचे मुख्य म्हणून आनंद ऋषीजी होते, त्यांनी सर्व संप्रदायांना एकत्र करुन आचार्यपद मिळविले. १९५२ मध्ये त्यांच्याच पुढाकाराने साधुसंमेलन भरले व त्याचे ते प्रधानमंत्री होते.[३९]

आनंदऋषीजींनी धार्मिक प्रवचन करुन धर्माची शिकवण दिली, तसेच आदिवासी मुलांसाठी शाळा, वाचनालय अशी कितीतरी समाज उपयोगी कार्येदेखील केली. शेवटच्या क्षणापर्यंतमहाराजांनी समाजसेवेचा वसा पत्करला व शेवटी २८ मार्च १९९२ रोजी देह पंचतत्वात विलीन केला.

**राष्ट्रसंत तनपुरेमहाराज :-**

पाथर्डी तालुक्यातील दगडगाव या खेडयात गीता जयंतीच्या दिवशी १९०५ साली एक सालदाराच्या घरात बाळाजी व भागिरथी या दाम्पत्याच्या पोटी पुत्ररत्नाचा जन्म झाला. त्याचे नाव म्हणजेच कुशाबा वडिलांच्या सालदारकीच्या पाठोपाठ या मुलाच्या नशिबीही सालदारकी आली.

१९५० च्या दरम्यान संत गाडगेबाबा एका सप्ताहाच्या निमित्ताने दगडवाडी येथे आले होते. तेथे त्यांनी त्यांच्या कीर्तनात "आपुलिया हिता असे जो जागता | धन्य मातापिता तयाचिया |" हे वाक्य ऐकले व त्यांच्या मनात एकदम विचार चमकून गेला समाजसेवा यानुसार कुशाबा गाडगेबाबांकडे ओढले गेले.

कुशाबा या घटनेनंतर गाडगेबाबांच्याच विचार छत्राखाली वावरु लागला. त्यांच्या या विचारसरणीस घरातून विरोध होवू लागला. त्यावर पायबंध म्हणून त्यांचा रुक्मिणी नामक मुलीशी विवाह करुन देण्यात आला. संसाराचा गाडा चालविण्यासाठी कुशाबा एका सुताराच्या

हाताखाली काम करु लागला. परंतु पारमार्थिक विचार कुशाबास स्वस्थ बसू देईनात. कुशाबाने घराचा त्याग केला व नाशिक येथे राहिले. पुढे पांडुरंगाचा आशीर्वाद प्राप्त होऊन कुशाबाचा तनपुरेमहाराज झाला. आता ते कीर्तनातून समाज प्रबोधन करु लागले. "गाडगेबाबांच्या विचाराचा प्रसार करुन १९२१ मध्ये चौदा नाम सप्ताह साजरे केले. १९४१ मध्ये सावरकर भेटले. १९३० मध्ये चारधाम पदयात्रा केली. पंढरपूर येथे १९४३ साली अन्नछत्र उभारले. चारीधाम मंडप उभारला. याच मंडपातून साने गुरुजींनी हरिजनांना विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आमरण उपोषण केले. दुष्काळात येवला, मालेगाव, दगडवाडी, जळगाव अशी कितीतरी ठिकाणीमहाराजांनी अन्नछत्र सुरु केली. त्यावेळी पंडित नेहरुंनी देखील त्यांच्या कार्याची दखल घेतली होती. १९६७ मध्ये त्यांनी गोहत्याबंदी चळवळ सुरु केली, त्यासाठी पंढरपुरात गोशाळा सुरु केली. त्यास १९६८ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी भेट दिली होती. अशा प्रकारे सगुननिर्गुण पांडुरंगाची सेवा करुन तनपुरेमहाराजांनी प्रायोपवेशनाच्या शास्त्रोक्त पध्दतीने २६ नोव्हेंबर १९८५ रोजी वैकुंठ चतुर्दशीस देह पांडुरंग चरणी विलीन केला.'[४०]

**संत एकनाथमहाराज गुरु - जनार्दन स्वामी :-**

'खानदेशामधील चाळीसगाव येथे यजुर्वेदी, देवस्थ ब्राम्हण हरिपंत व लक्ष्मीबाई या धर्मपरायण दाम्पत्याच्या पोटी पुत्ररत्नाचा जन्म झाला. फाल्गुन वद्य षष्ठी शके १४२६ त्याचे नाव जनार्दन असे होते. काळाच्या ओघात सदर कुटुंब देवगिरी येथे यवनांच्या चाकरीत लागले. तेथे ते किल्लेदार होते. जनार्दन हळूहळू लहानाचा मोठा झाला, उपनयन संस्कर पार पाडून तो पाठशाळेत शिकू लागला.

उपाध्याय सांगती पंतासी | आश्चर्य वाटते हे आंम्हासी ||
एकदाची पाठ देता जनार्दनासी | मुखोद्गत म्हणोनिया दाविती ||

तद्नंतर जनार्दन वडिलांना कामात मदत करु लागले. हळूहळू त्यांचे ज्ञानग्रहण व व्यवहार यात परिपक्वता येऊ लागली. त्यांचा विवाह सावित्री व रमा यांच्याशी झाला, कालांतराने त्यांचे आई-वडील मृत्यू पावले. नोकरी व संसार त्यातूनच परमार्थाचा ओढा जनार्दनपंतांना होता. एकदा कृष्ण तिरावर शत्रू सैन्याचा बीमोड झाल्यानंतर जनार्दनपंतांना औदुंबर क्षेत्र दत्तात्रयांचे सगुण दर्शन झाले व दृष्टांत दिला की,

तु राहुनी देवगिरी | दुःखे निपटावी जनतेची सारी ||

पंत किल्लेदार होते, त्यांच्या धार्मिकतेचा परिणाम मुस्लिम राज्यकर्त्यांवरही झाला होता. ते नित्यनियमाने देवगिरीची किल्लेदारी निभावित असताना जवळील शुलभंजन या स्थान जात. तेथे श्री दत्तात्रयांचे ध्यान करत व मार्ग विचारत.

जनार्दनस्वामींचे गुरु स्तुतीपर १४ व एकनाथमहाराजांना उपदेशाचे २० अभंग आहेत. त्यांनी 'आत्मानात्म विवेकसागर' हा ग्रंथही लिहिलेला आहे. जनार्दनपंतांचे पंचक शिष्य होते. त्यातील प्रमुख म्हणजे संत एकनाथमहाराज, जनी जनार्दन, रामा जनार्दन होय. जनार्दनपंतांनी शके १४९७ फाल्गुन वद्य षष्ठीस, पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे समाधी घेतली.'[४१]

## ३) पारनेर तालुका

नगर जिल्हयातील दक्षिण भागातील हा पारनेर तालुका ज्यांच्या नावाने ओळखला जातो व ज्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला आहे ते म्हणजेच महर्षी पाराषर ऋषी होय.

पारनेर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमीच असल्याने बागायती शेतीचे प्रमाण कमी आहे. बहुतांश कष्टकरी वर्ग शेती, उद्योगधंदे, व्यवसाय करुन आपले दैनंदिन जीवन जगताना दिसतो. नोकरी व्यवसायनिमित्त इतरत्र स्थलांतर केले जाते. पारनेर तालुक्याच्या विकासासाठी अण्णा हजारे यांनी विविध योजना राबविल्याचे दिसते. पारनेर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगत, नंदकुमार झावरे, गुलाबराव शेळके यांनी काही प्रमाणात विकासकामे हाती घेतल्याचे दिसते.

तसेच तालुक्यात वसंतराव झावरे, आ. विजयराव औटी, सुजित झावरे, दादाभाऊ कळमकर यांचा तालुक्यात राजकीय वारसा असून धार्मिक वारसा तर पारनेर तालुक्यात खूप मोठा आहे. समाजभूषण अण्णा हजारे यांच्या कार्यकर्तुत्वमुळे पारनेर तालुका संपूर्ण देशात नावाजलेला दिसून येतो.

**पाराषर ऋषी :-**

नगर जिल्हयातील हा पारनेर तालुका ज्यांच्या नावाने ओळखला जातो व ज्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला आहे, ते म्हणजेच महर्षी पाराषर एक महान व्यक्ती होते. त्यांच्या वडिलांचे नाव शक्ती आणि आई अदृश्यन्ती. वसिष्ठ ऋषी हे त्यांचे आजोबा. पाराषर ऋषी

आपल्या आईच्या गर्भात असतानाच वेद म्हणत. बालपणीच त्यांना आईकडून समजले की त्यांच्या वडिलांना राक्षसांनी मारलेले आहे. या घटनेमुळे त्यानी विश्वातील सर्व असूरांचा नाश करण्याचे सत्र आरंभिले, परंतु शेवटी वसिष्ठांनी त्यांना समजाविले व या कृत्यापासून परावृत्त केले. या घटनेनंतर ते अंतर्मुख झाले. त्यातुन त्यांनी होराशास्त्रावर लिखाण केले. निसर्गाच्या सानिध्यात खूप भटकंती केली.

महर्षी पाराषरांच्या पत्नीचे नाव काली होते. एकदा पाराषर नदी ओलांडत असताना त्यांना लावण्यावती सत्यवती दुसऱ्या होडीत दिसली. त्यातूनच आकर्षण उत्पन्न झाले व त्यांचे मिलन झाले. पाराषर ऋषी व सत्यवती यांच्यापासून महर्षी व्यासांचा जन्म झाला. पुढे हिच सत्यवती हस्तिनापूर साम्राज्याची पट्टराणी झाली. महर्षी पाराषरांनी दहा सिध्दांत सांगितलेले आहेत.

१) तात्त्विक, व्यावहारिक व कौटुंबिक सत्यसिध्दांत निश्चित करा. ते सिध्दांतसत्य म्हणजे त्रिकाल आबाधित असले पाहिजे.
२) सत्यसिध्दांताचे व्रत घेतलेली व्रतनिष्ठ माणसे तयार व्हायला पाहिजेत.
३) बुध्दिशक्ती शरीरशक्ती व वित्त शक्ती हे तीन प्रवाह आहेत.
४) जीवन पुष्ट होण्यासाठी आग्रह ठेवा.
५) क्षत्रियांची युयुत्सुवृत्ती व प्रतिकारवृत्ती पुष्ट करा.
६) प्रभावी नेतृत्व असले पाहिजे.
७) स्त्रिला निराळे शिक्षण दिले पाहिजे.
८) वैभवासाठी सतत प्रयत्न असला पाहिजे.
९) ज्ञानी, शक्तिशाली व वैभववान पुरुषांनी राहून काम केले पाहिजे.
१०) परमेश्वराबद्दलची भीती, प्रीती व आत्मीयता समाजात वाढायला हवी.

महर्षी पाराषरांनी शेतीवर आधारित कृषी पाराषर या ग्रंथाची निर्मिती केली. त्यावेळी ताडपत्रीवर लिहिलेल्या या ग्रंथात आजच्या सेंद्रिय शेतीचे महत्त्व, ऋतू, पीक, हवामान या गोष्टी निवेदन केलेल्या आहेत.

पृथ्वीवर स्वर्ग आणण्याची वृत्ती राखणाऱ्या पाराषारांनी त्यांच्यासाठी विशिष्ट जीवन प्रवाह निर्माण केलेला होता. वेद व्यासांसारख्या महान शक्तीचा पिता, वसिष्ठासारख्यांचा नातू अशा या पाराषर ऋषींची तपोभूमी व समाधी मंदिर पारनेर येथे आहे.[४२]

**संत गणपतबाबा :-**

तालुक्यातील वडगाव आमली येथे इ.स. १८८७ मध्ये चौरे कुटुंबात एकादशीच्या शुभमुहूर्तावर गणपतबाबांचा जन्म झाला. बालपणीच वडील मृत्यू पावले. त्यामुळे ते वडगाव सावताळ येथे मामाच्या गावी जनावरे चारण्याचे काम करु लागले. गाया चारत असतानाच ते ईश्वरचिंतन करत असत व त्यातूनच ते समाधि अवस्था प्राप्त करत असत. जवळ-जवळ एक तपाच्या कालखंडानंतर बाबांना दत्तात्रयाचे सगुन दर्शन झाले व दिव्य वाणी लाभली. या घटनेनंतर बाबा समाजप्रबोधन करु लागले. त्यांचा शिष्य परिवार अगदी सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर येथपर्यंत पसरला. त्यांनी त्या त्या ठिकाणी मठ स्थापन केले.

दिनांक ७ मे १९३७ रोजी बाबांनी मुंबई येथे डिलई रोज या ठिकाणी समाधी घेतली. दरवर्षी त्यांचा शिष्य परिवार बाबांच्या श्रध्देपोटी त्यांच्या जन्मदिनी चैत्र वद्य एकादशीला एकत्र जमत असतो.

**संत निळोबाराय :-**

जगद्‌गुरु श्रीसंत तुकाराममहाराजांच्या शिष्य परंपरेचा वारसा नगर जिल्हयाला लाभलेला आहे. ही गौरवशाली परंपरा जोपासली ती संतश्रेष्ठ निळोबारायांनी.

पारनेर तालुक्यात पिंपळनेर येथे १७१३ च्या दरम्यान मुकुंदपंत मकासरे नावाचे अश्वलायन शाखेतील देशस्थ ब्राम्हण गावचे कुलकर्णी पद सांभळत होते ईश्वरी कृपेने त्यांना निळकंठ उर्फ निळा या नावाचा पुत्र झाला. त्यांच्या कुटुंबात पूर्व परंपरागत शिवभक्ती चालू होती.

बालपणीच निळाला संत साहित्याची ओढ लागली. पुराण व तत्त्वज्ञान यांचे चिंतन वाचन भरपूर झाले. यथावकाश त्यांचा विवाह मैनाबाईंशी झाला. संसार गृहस्थी व कुलकर्णी पद सांभाळत निळोबांनी अध्यात्मिक वारसा वडिलांपश्चात योग्य पध्दतीने जोपासला. देवपूजा ते नियमित करत, या काळात ते जराही व्यत्यय सहन करत नसत. एकदा असेच ते देवपूजा

करत असताना चावडीवर दिवाण आले त्यांनी निळोबांना सेवकाव्दारे तातडीचा निरोप पाठविला, परंतु निळोबा तर देवपूजा करत होते. त्यामुळे ते चावडीवर आले नाही. आपल्या आज्ञेचा भंग झाला. म्हणून दिवाण चिडला. त्याने पुन्हा निरोप दिला की कुलकर्णीपद सांभाळायचं असेल तर माफी मागायला या निळोबांची पूजाआटोपली शांत चित्ताने ते उठले एका कागदावर मजकूर लिहिला व चावडीवर दाखल झाले. दिवाणास आपल्या नोकरीचा राजीनामा सादर करुन घरी आले.

निस्पृह त्यागी वृत्तीने निळोबांनी कुलकर्णीपदाची नोकरी सोडली. त्यांच्या गृहस्थीस त्यांची पत्नी मैनावतीचीही साथ होती. त्यांना भिवाजी व काशिनाथ असे दोन पुत्र व एक कन्या झाली. दिवसेंदिवस निळोबा ईश्वर भक्तीत लीन होऊ लागले त्यांनी सर्व व्यवहार भावकीकडे सोपविले त्यांची परमार्थिक अधिकार पाहून इ.स. १७२३ मध्ये शिरुरच्या गावकऱ्यांनी व पिंपळनेरच्या ग्रामस्थांनी त्यांना दानपत्रे दिली.

निळोबा १७१३ पर्यंत शिरुरलाच राहात होते, त्यांनतर ते पिंपळनेरला आले. त्यांनी पंढरीची वारीही सुरु केली. पांडुरंगाशी त्यांची प्रीत जडली होती. पुढे निळोबा देहूस येऊन तुकोबांच्या समाधीस भेटले. तुकाराममहाराजांचे पुत्र नारायणबाबांची भेट घेतली. तद्नंतर तुकोबांचे सगुण दर्शन व्हावे म्हणून व्याकुळ झाले. निळोबारायांची अवस्था पाहून पांडुरंगाला दया आली, तेच त्यांना भेटायला आले, तर

येथे तुजलागी बोलविले | प्रार्थिला वाचोनी आलास का?

प्रल्हादा कैवारी देत्याशी दंडाया | स्तंभी देवराय प्रकटोनी ||

तैशापरी मला नाही बा संकट | तरी फुकट प्रम केला |

निळा म्हणे आम्ही नोळखूच देवा | तुकयाचा धावा करितसे ||

पांडुरंगाच्या दर्शनानंतर दुसरेच दिवशी जगद्‌गुरु तुकाराममहाराजांचे दर्शन निळोबारायांना झाले. "जय जय रामकृष्ण हरी" हा बीजमंत्र दिला. सद्‌गुरुच्या दर्शनानंतर निळोबारायांच्या कवित्वाला बहर आला. तुकाराममहाराजांच्या आज्ञेनुसार एक कोटी अभंगांची निर्मिती केली. नंतर तुकाराम स्तुती व चांगदेव चरित्र हे विषयही त्यांनी हाताळले.

निळोबारायांनी त्यांना मिळालेली सर्व दानपत्रे वाटून टाकली. संपूर्ण आयुष्य त्यागी वृत्तीने जोपासले. पंढरीच्या पांडुरंगाची भक्ती, राम कृष्ण हरीचा जप, तुकोबांचे स्मरण असा दिनक्रम निळोबाराय यांचा होता. शिरुर येथील शंकरस्वामीस अनुग्रह देऊन शिष्यपरंपरा पुढे सुरु ठेवली होती.

वृध्दापकाळ जवळ येत होता. पांडुरंगाची, तुकोबांची ओढ निळोबारायांना लागली होती. एके सुदिनी समस्त पिंपळनेरवासीयांच्या साथीने निळोबाराय पांडुरंगचरणी कायमचे लीन झाले.[४३]

**पूर्णवादाचे जणक - प.पू. पारनेरकरमहाराज :-**

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळात त्यांच्याबरोबर दक्षिणेतून बृहदेश्वराच्या तंजावरची काही मंडळी महाराष्ट्रात आली होती.महाराजांच्या कुटुंबीयांना पोथ्यापुराणे वाचून दाखविणे हे काम ही मंडळी करत असत त्यामुळेच त्यांचे मूळ पोरे हे आडनाव बदलून गुरु हे नाव झाले. पुढे हेच गुरु घराणे पारनेर येथे राहावयास आले. त्यातीलच एक पुरुष प्रल्हाद गुरु त्यांनी इंदूर येथे जाऊन वेद अध्यायन करुन दशग्रंथी हे मानाचे स्थान मिळविले होते. त्यांच्याच पोटी एक थोर विभूती जन्माला आली आणि काळाला योग्य, उपयुक्त व जरुरी असणाऱ्या पूर्णवाद या तत्त्वज्ञानाला त्यांनी जन्माला घातले. संपूर्ण जगाला मार्गदर्शन करणारे अभिनव असे तत्त्वज्ञानच त्यांनी जगापुढे मांडले.

अशी ही थोर व्यक्ती म्हणजेच प.पू.डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकरमहाराज. "पूर्णवादाचार्य विद्वतरत्न डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर यांचा जन्म १६ जुलै १९१६ आषाढ शुध्द पौर्णिमा शके १८३८ (गुरु-पौर्णिमा) रोजी इंदूर येथे झाला. इंदूर व उज्जैन येथे शिक्षण घेऊन ज्योतिर्गणित, पदार्थविज्ञान, जीवशास्त्र व भूगर्भशास्त्र यांच्या आधारे विश्वोपत्ती शास्त्रावर एक प्रबंध डॉक्टरेटसाठी बर्लीन (जर्मनी) विद्यापीठास सादर केला."

दुसऱ्या महायुध्दाच्या अग्निकुंडात हा प्रबंध भस्मसात झाला, परंतु एवढयाने उमेद न सोडता श्रीमद्शंकराचार्य यांचा मायावाद व श्री गोडेपादाचार्याचा अजानवाद यांना पूर्वपक्ष करुन पूर्णवाद हा प्रबंध भारतधर्म मंडळ वाराणसी (संस्कृत ॲण्ड स्पिरीच्युअल युनिव्हर्सिटी) या सर्वात जुन्या विद्यापीठास इ.स. १९४८ मध्ये सादर केला व त्या विद्यापीठाने त्यांना या

प्रबंधासाठी डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली. भारतातील अग्रगण्य पंडीत राजराजेश्वर शास्त्री दवडी हे त्यांचे परीक्षक होते. तर अहमदाबादचे वाडीकर शास्त्री या प्रस्तुत प्रबंधावरच न्याय तर्काचे दृष्टीने निर्दोष काटेकोर असल्याचा अभिप्राय लिहून दिला.

प.पू. डॉ. पारनेकरमहाराज रत्नपारखी देखील होते. ज्ञानेश्वरीवर सुंदर प्रसादपूर्ण प्रवचने करीत असल्याने त्यांचा जनसंपर्क वाढला. ज्ञानाबरोबर पारमार्थिक साधना करुन निर्गुण साक्षात्कार करुन घेतल्यानंतर त्यांना श्रीगणेशाने सगुण स्वरुपात दर्शन देऊन गुरुत्व करण्याची आज्ञा केली. या काळातील त्यांनी केलेली प्रवचने, व्याख्याने व प्रश्नोत्तरे यांचे संकलन रुपाने तोंडओळख व परिचय असे दोन ग्रंथनिर्मिती करुन याचे जोडीस अभिनव अभंग ही पद्यरचना करुन गुरु म्हणून देवाने जे कार्य सोपविले होते, ते पूर्ण झाल्याने कृतार्थ जीवनाची कबुली संघर्ष या ग्रंथाचे शेवटी त्यांनी दिली. त्यांच्या पश्चात त्यांनी लिहिलेल्या पूर्णवाद या तत्वज्ञान ग्रंथाचे तसेच पूर्णवादी अर्थशास्त्र या ग्रंथाचे प्रकाशन झाले असून हयुमॅनिझम व त्यांच्या कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

पूर्णवाद आजच्या काळाला उपयुक्त असे तत्त्वज्ञान असून ते अतिशय तर्कशुध्द रीतीने, श्रुती, उपनिषदे व वेदांच्या आधाराने शिव, विष्णु-विश्व या तीन तत्त्वांचा स्वरुप संबंध प्रस्थापित करतो. तसेच त्यांचे नित्यत्वही सिध्द करतो. ही तीनही तत्त्वे जगाचे कारण नाहीत किंवा तीन पैकी कुणा एकालाच केवलत्व प्रदान करता येत नसुन सर्वांना सारखेच महत्त्व असुन त्यांचा स्वरुप संबंध सांगतो, वेदांती पण यालाच पूर्ण म्हटलेले आहे. या पुर्णाच्या प्राप्ती वा अनुभूतीकरिता एकांगी साधनाचा स्वीकार हा ऐच्छिक होऊ शकत नाही. म्हणून पूर्णवाद ज्ञान कर्म, उपासना हया साधन त्रयींचा समावेश करतो व या योगे जीवनलाभ व मरणमय निवृत्तीची ग्वाही देतो. पूर्णवाद हा जीवनाच्या सापेक्षात्त्वात जग आणि जगदिश्वर यांचा विचार करण्यास शिकवितो. मानवी जीवनाचे महत्त्व एकदा का व्यक्तींच्या लक्षात आले, तर त्याला सावरण्याकरिता, फुलविण्याकरिता लागणाऱ्या साऱ्या गोष्टींचे महत्त्व त्याला कळु लागते. म्हणूनच डॉ. पारनेरकरमहाराज म्हणतात की, जीवन ही कला आहे व नीती म्हणजे माणूस.

डॉ. पारनेरकरमहाराज जसे परमार्थ क्षेत्रात प्रसिध्द झाले तसेच त्यांनी आपल्या युवा अवस्थेत वैज्ञानिक प्रयोग करुन हिरव्या गुलाबाची निर्मिती केली होती. आपल्या स्वभाव या

ग्रंथात माणसाचे मन हे त्यांच्या जन्मानंतर काही काळाने जन्माला येते. तसेच माणसाच्या बुध्दीच्या विकासाबरोबर त्याचा मेंदूही विस्तार पावतो, असे काही निष्कर्ष त्यांनी नोंदविले होते.

व्यक्तिजीवनात व समाजजीवनात परमेश्वरांच्या कृपेचे महत्त्व प्रतिपादन करुन देव हा देवासाठी पूजावयाचा नसून आपल्या स्वतःच्या प्रगतीकरिता पूजावयाचा असतो याची समज त्यांनी सर्वांना दिली. इ.स. १९५२ साली शिर्डीच्या साईबाबा मंदिरावर प.पू.डॉ. पारनेरकरमहाराजांच्या हस्ते कळस बसविण्यात आला. अनेक मंदिरात शास्त्रोक्त पूजाअर्चा चालु करण्याची प्रेरणा दिली. आस्तिकतेला, वेदनिष्ठेला प्रतिष्ठा आणली. मानवी जीवनात आणून दिली.

आजच्या काळात अनुसरुन देवकृपेसाठी ऊपासना या मार्गाची सामान्य जनांकरिता उपलब्धता करुन देऊन मानवी जीवन उजळून टाकले. समाजातील अंधश्रध्दा, करणी, भानामती आदि दृष्ट प्रयोगांना आळा घालून जनजागृती केली व लोकांना देवाचा प्रसाद चाखावयाची गोडी निर्माण केली. पुरुषार्थाने जीवन जगून त्यांनी पूर्णवाद या प्रणालीचा प्रसार व प्रचार केला. हे कृतार्थ जीवन वैशाख शु. १३ शके १९०२ दि. २८ एप्रिल १९८० रोजी पूर्णत्त्वात विलीन केले.[४४]

**शिवकालीन गुप्तहेर बहिर्जी नाईक :-**

छ. शिवाजीमहाराजांच्या सैन्यदलात लढणाऱ्या शिपायांबरोबरच गुप्त हेरांचेही कार्य मोलाचे होते. त्यातीलच एक म्हणजे बहिर्जी नाईक. त्यांचे मूळ गाव पारनेर तालुक्यातील हंगा, आजही त्यांचा वाडा त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे.

छत्रपतींनी जालना शहरावर हल्ला करण्याचे ठरविले तेथे एक भुईकोट किल्ला होता. शहर त्याकाळी फारच श्रीमंत होते व मोगलाईचे भूषण होते. १६ नोव्हेंबर १६७९ रोजीमहाराजांनी जालना शहरावर हल्ला केला व शहर लुटले, परंतु त्याच वेळी मोगलांचा सरदार रणमस्तखानमहाराजांवर चालून आला.महाराजांनी त्याला कैद करताच सरदारखान व केसरसिंग यांची मोठी फौजमहाराजांचा पाठलाग करु लागली.महाराजांना आता काही मार्ग सुचेना, तेंव्हा बहिर्जी नाईक याने महाराजांना धीर दिला व अतिशय कौशल्याने महाराजांसह सर्व लूट व सैन्य हुलकावण्या देत देत अकोल तालुक्यातील पट्टा किल्ल्यावर सुखरुप आले. ही

धावपळ बहिर्जींच्या मार्गदर्शनाखाली सतत तीन दिवस व तीन रात्र चालली होती. बहिर्जी गुप्तहेर असल्याने त्याला आडवाटा परिचित होत्या. या घटनेमुळे छत्रपती शिवाजीमहाराज बहिर्जींवर खुश झाले. असे हे बहिरजी नाईक पारनेर तालुक्यातील हंगा या गावचे होत.

**सेनापती बापट :-**

भारताच्या स्वातंत्र्यलढयात पारनेर तालुक्याला नाव मिळवून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे सेनापती बापट. १२ नोव्हेंबर १८८० रोजी महादेवराव व गंगाबाई या दाम्पत्याच्या पोटी धर्मपारायण बापट घराण्यात कार्तिकी एकादशीच्या दिवशी जन्म झाला. त्याचे नाव पांडुरंग पारनेर गावी प्राथमिक शिक्षण घेऊन पांडुरंग पुढे पुण्यात आले व बी.ए.ची पदवी प्राप्त केली. तेथेच १९०२ साली तालीम मास्तर भिडे यांच्याकडून क्रांतिकारी विचारांचे शिक्षणही घेतले.

"मी पांडुरंग बापट, भवानी आईच्या, या नंग्या तलवारीची शपथ घेऊन प्रतिज्ञा करतो की, माझ्या पारतंत्र्य मायभूमीला स्वतंत्र करण्याकरिता मी आजपासून झटेन व तिच्या हाकेला धावेन. या कामी मला देहाचा होम करावा लागला तरी मी फिरुन याच भारतखंडात जन्म घेईल व अपुरे राहिलेले काम पुरे करुन दाखवीन. वंदे मातरम्."

बापट इंजिनिअरींगच्या उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्याबरोबरच त्यांनी तेथे पिस्तूल बंदूक चालविण्याचे लष्करी शिक्षणही घेतले. तसेच तेथे हिंदुस्थान या विषयावर जहाल देशप्रेम भाषण इंग्रज श्रोत्यांसमोर केले. तेथेच एक रशियन मैत्रिणीच्या मदतीने बॉब बनविण्याचे तंत्रही शिकले.

भारतातील एका खोटया खटल्यात त्यांना गुंतविण्यात आले. त्यासाठी त्यांनी जून १९०८ मध्ये अज्ञातवास पत्करला, परंतु १९११ मध्ये पोलिसांनी शेवटी त्यांना अटक केली.

पुण्यातील मुळशी धरणाच्या बांधकामाला बापटांनी विरोध केला. त्यासाठी सत्याग्रहही केला. अशा प्रकारे त्यांनी नाशिक, येरवडा, हिंडलगा या कारागृहात १८-१९ वर्षे देशासाठी तुरुंगवास पत्करला. ज्या काळात त्यांनी लिखान केले, काव्यही लिहिले पुढे ते "सेनापती बापट समग्र वाङ्‌मय" या तीन खंडात प्रकाशित करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साने गुरुजींबरोबर पंढरपूर मंदिर हरिजनांना खुले व्हावे, यासाठी उपोषणही केले. गोवामुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ यात सहभाग घेतला.

"जगातील प्रत्येक घटना जीवांच्या विकासासाठी आहे. ही घटना घडवून आणणारा एकच एक जगत्पालक असून तो जीवांच्या विकासासाठी प्रत्येक घटना योजनापूर्वक घडवून आणतो, अशी माझी विचारसरणी आहे." हे विधान बापटांनी स्वतःच्या मुलीच्या मृत्यूसमयी केले होते. अशा प्रकारे स्वातंत्र्याची प्रखर ज्योत जागविणारे, संकटांना हसत सामना करणारे सेनापती बापट २७ नोव्हेंबर १९६७ रोजी मृत्यू पावले.

"महाराष्ट्र मेला तर राष्ट्र मेले, मराठयाविना राष्ट्रगाडा न चाले
खरा वीर, वैरी पराधिनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा"[४५]

**अण्णा हजारे**

अण्णासाहेबांचा जन्म १५ जून १९३८ रोजी भिंगार येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर मुंबई येथे ७ वी पर्यंत शिक्षण घेऊन फुलांचा व्यवसाय सुरु केला. १९६३ मध्ये अण्णासाहेब आर्मी सप्लाय कोअर विभागात भरती झाले. १९६५ च्या भारत पाक युध्दात त्यांचे २८ जीवलग मित्र शहीद झाले. १९७१ च्या बांग्लादेश लढयातही अण्णा सहभागी होते. १९७५ साली त्यांची लष्करी सेवा संपली व गावाकडे परतत असताना दिल्लीच्या रेल्वे स्थानकावर विवेकानंदाच्या जीवनावरील पुस्तक वाचनात आले व त्यातूनच त्यांच्या ग्रामविकासाच्या कल्पनेने जन्म घेतला.

अण्णांनी केवळ स्वप्नच पाहिले नाही, तर त्यासाठी आपल्या भविष्य निर्वाह निधीतील २०,०००/- रुपये या कार्याच्या शुभारंभासाठी वापरले. स्वतःचे गाव राळेगणसिध्दी दारु, व्यसन, अंधश्रध्दा यात गुरफटलेले होते. अण्णांनी प्रथम गावच्या ग्राम मंदिराचा जिर्णोध्दार केला. यादवबाबा मंदिराचे त्यांनी समाज मंदिर केले. अनिष्ठ प्रथा, पशु हत्या यावर बंदी आणली. गावातील तरुणांच्या मदतीने हातभट्टयांवरील दारु विक्री बंद केली. व्यसनमुक्तीसाठी जीवाचे रान केले. पावसाचे पाणी डोंगर उतारावरुन वाहून जाते. त्यासाठी त्यांनी डोंगराला बांध घातले. तेथे पाणी अडविले, डोंगराची धूप टळली, झाडे वाढू लागली. पाणलोट क्षेत्र विकास कल्पनेचा जन्म यातूनच झाला. नालाबंडींग, भूमिगत बंधारे, गॅबियन बंधारे बांधणे, पडणाऱ्या पावसाचा थेंब न थेंब राळेगणसिध्दीच्या विकासासाठी वापरण्यात आला.

अण्णांनी गावात धान्य बँक सुरु केली. देणगी रुपाने जमा होणारे धान्य गरजूंना देण्यात आले. यादवबाबा वसतिगृहातील मुलांची देखील नियमित जेवणाची व्यवस्था यातूनच लागली गेली. शुध्द पाणी, वैयक्तीक स्वच्छता, ग्रामसफाई, कुपोषण, बालमृत्यू, सर्वधर्मीय विवाह हे धडे देखील आता अण्णांच्या मार्गदर्शनाखाली लोक गिरवू लागले. अण्णांच्या कार्याचा सुगंध राळेगण सिध्दी पुरताच मर्यादित न राहता उर्वरित महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, ओरिसा, कर्नाटक इ. राज्यांपर्यंत पसरु लागला. विविध क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्यांचाही अण्णा गौरव करत.

ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जपान या परदेशात जाऊन अण्णांनी जागतिक पाणी परिषदेत आपला सहभाग नोंदविला. भारत सरकर, महाराष्ट्र सरकार यांच्या कितीतरी समित्यांवरही अण्णा आज निर्भीडपणे कार्य करत आहे. भ्रष्टाचार निर्मुलन व माहितीचा अधिकार ही अण्णांची समस्त भारतवासीयांना मुख्य देणगी आहे. अण्णांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने अण्णांना पद्मभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे.[४६]

**निघोजचे रांजनखळगे व निघोजची मळगंगा :-**

पुणे नगर रस्त्यावर गव्हाणेवाडी गावापासून २० कि.मी. अंतरावर निघोज हे गाव कुकडी नदी तिरावर वसलेले आहे. या नदीकाठी मळगगंगा देवीचे जागृत देवस्थान आहे. नदीला कितीही पूर आला तरी आतील गाभाऱ्यात कधीही पाणी जात नाही. या मंदिराजवळील नदी पात्रात जगप्रसिध्द रांजणखळगे आहेत. रांजणाच्या आकाराचे खोल दगडी खड्डे नदीच्या पात्रात असून एका रांजणातून पाणी दुसऱ्या रांजणात जाते. या रांजण खळयांची गिनीज बुकामध्येही नोंद झालेली आहे.

(रांजनखळगे छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)

**कोरठान खंडोबा :-**

बिन टाकीचा, विना घडविलेला कोरा देव व या कोऱ्या देवाचं ठाणं म्हणजेच कोरठान येथील प्रसिध्द खंडोबा. पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा या गावालगत उंच पठारावर खंडोबाची ही स्वयंभू मूर्ती व सुंदर मंदिर आहे. तांदळा रुपात बाणाई, म्हाळसा व खंडोबा आहेत. मनी मल्लाचा वध केल्यानंतर मल्हारी मार्तंड येथेच राहिलेले आहेत. ॲड. पांडुरंग

गायकवाड हे मुंबई हायकोर्टामधील वकील १९८८ पासून येथे वर्चस्व अर्पण करुन वास्तव्यास आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून भक्तगण वर्षभर येथे दर्शनास येतात.[४७]

## ४) श्रीगोंदा तालुका

ऐतिहासिक महत्त्व असलेल्या अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुका आजच्या गतिशील जीवनातही ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, परंपरा जीर्णावस्थेत सांभाळत आहे. श्रीगोंदा शहर सरस्वती नदी किनारी दिमाखाने उभे आहे. श्रीपूर, चांभारगोंदे, श्रीगोंदा अशा नावाने ओळखले जाणारे हे शहर पांडू विप्राच्या भक्तीमुळे व लक्ष्मीच्या आग्रहाखातर विष्णूने वसवलेले श्रीपूर शहर असे पुराणातून दाखले मिळतात. गोविंद चांभार हा श्रीगोंद्यातील संत चांभारांची वस्ती असलेल्या श्रीगोंदयात गावाच्या मध्यभागी असल्यामुळे संत गोविंदचांभार यांच्या अध्यात्मिक साधनेमुळे श्रीपुर या शहराचे चांभारगोंदा असे नामकरण झाले. पुढे ब्रिटिश राजवटीत चांभारगोंद्याचे श्रीगोंदा झाले. १०८ तीर्थस्थाने व काशी समजलेल्या श्रीगोंदा नगरीत संत महात्म्यांची मालिकाच होऊन गेली आहे. आजही श्रीगोंदा या घटनेची साक्ष देत आहे.

तालुक्यात पावसाचे प्रमाण व घोड, कुकडी कॅनॉलमुळे पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे बागायती शेतीचे प्रमाण आढळते. वेगवेगळे उद्योगधंदे, व्यवसाय, शेती, नोकरी बहुतांश कष्टकरी वर्ग गुंतलेला दिसतो. त्यामुळे तालुक्याची आर्थिक स्थिती सर्वसाधारण दिसते. तालुक्याच्या विकासासाठी शिवाजीराव नागवडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच बबनराव पाचपुते, कुंडलिकराव जगताप, घनःश्याम शेलार, बाबासाहेब भोस ही नेते मंडळी तालुक्याच्या विकासाकरिता कटिबध्द असल्याचे दिसून येते.

**संत शेख महंमदमहाराज**

ऐसे केले या गोपाळे |नाही सोवळे ओवळे ||१||

फणसा अंगी काटे | आंत अमृताचे साठे ||२||

काटे कतकीच्या झाडा | आंत जन्मला केवडा ||३||

नारळ दिसता कठीण | परी अंतरी जीवन ||४||

शेख महंमद अविंध | त्याचे हृदयी गोविंद ||५||

"निजामशाहीमध्ये राजमहंमद नावाचे एक मुलानी गृहस्थ होते. सुफी सांप्रदायाच्या प्रचारासाठी ईराणमधून महंमद गौस नावाचे गृहस्थ भारतात आले होते. ग्वाल्हेर हे त्यांच्या प्रचाराचे मुख्य केंद्र होते. राजमहंमद हे गौस यांचे शिष्य. अशा प्रकारे धर्मकार्याची आवड असलेल्या राजमहंमद व फुलाई या दाम्पत्याच्या पोटी इ.स.१५७५ मध्ये दौलताबाद येथे निजामाच्या पदरी किल्लेदार असताना शेख महंमद या बालकाचा जन्म झाला."

शेख महंमदाचे घराणे मुलानी, म्हणजे देवाला बकरे कापणे, परंतु शेख महंमदांना बालपणीच भजन, किर्तन यांची आवड लागली. एकदा वडिलांनी त्यांना बकरु कापण्यास सांगितले. वडिलांची आज्ञा मानून बकरु कापण्यास गेले, परंतु ते बकरु ओरडताना पाहून त्यांना वाईट वाटले व स्वतःची करंगळी कापून पाहिली. वेदना किती असतात याचा स्वतः अनुभव घेतला व ती बकरी न कापताच सोडून दिली व तीर्थाटन सुरु केले.

तीर्थाटन करत असताना हिंदु-मुस्लिम असा भेदभाव न करता समाजप्रबोधन शेख महंमदमहाराजांनी सुरु केले. या काळात त्यांच्या आयुष्यात खूप चमत्कार घडले. प्रत्यक्ष औरंगजेबाने त्यांना मांसाहार खाण्यास आज्ञा केली असताना, त्यांनी आपल्या योग सामर्थ्याने त्याची फुले केली. या घटनेनंतर स्वतः औरंगजेबाने त्याची माफी मागितली व चौदा नंबर जमीन त्यांना इनाम दिली. देहू येथे संत तुकाराममहाराजांच्या कीर्तन मंडपास लागलेली आग शेख महंमदमहाराजांनी श्रीगोंदा येथूनच विझावली.

चुकला देव कुठे पाहिला | गेला असेल देव गावाला |
शेख महंमद तिथे गेला | त्यांनी मंडप विझविला |
संत पाहती पंढरी | देव इंद्रायणीच्या तिरी ||
तुकापासी कळले वर्म | यांचे अंगी देवपण ||

शेख महंमदमहाराजांनी कबीर पंथाचाही प्रसार केला. त्यांनी हिंदी, मराठी, पारशी भाषेतही लिखाण केले. "योगसंग्राम" हा अठरा अध्यायांचा ग्रंथ, पवन वीजय हा खंड ४८२ ओव्यांचा अपूर्ण ग्रंथ "निष्कलंक प्रबोध" हा ३०० गीत ओव्या, रुपके, अभंग, भारुड अशी साहित्यसेवामहाराजांनी केली. इ.स. १६७४ मध्ये संत शेख महंमदमहाराजांनी श्रीगोंदा येथे समाधी घेतली.[४८]

**संत निंबराजमहाराज**

भीमा व निरा या दोन नद्यांच्या संगमावर नरसिंहपूर नामक गाव आहे. या गावात मुरहरपंत दंडवते हे ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण राहात होते. त्यांच्याकडे गावच्या भक्त प्रल्हाद यांनी स्थापलेल्या नरसिंहाची पूजा करण्याचा मान होता. परंतु केवळ पूजा अर्चेवर कुटुंबाचा उदर निर्वाह होत नसल्याने मुरहर पंतांनी उद्योगधंद्याच्या दृष्टीने गाव सोडण्याचा निर्णय घेतला व ते फिरत फिरत दैठण या गावी आले.

दैठण गावी मुरहरपंत व निराबाई राहू लागले. त्यांना गावे कुलकर्णी पदही मिळाले. संसार व्यवस्थित सुरु होता. परंतु पोटी संतान नसल्याने निराबाई दु:खी होत्या. त्यावर उपाय म्हणून त्या दोघांनीही संसाराचा त्याग केला. दैठण गावापासून जवळच शिरुर गाव आहे. त्याला लागूनच भगवान शंकराचे रामलिंग देवालय रत्नगिरी नामक टेकडीवर आहे. या ठिकाणी मुरहरपंत व मिराबाई पुत्रप्राप्तीच्या तपश्चर्येसाठी राहू लागले. एका निंबाच्या झाडाखाली बसून ते उभयता शंकराची आराधना करु लागले. निराबाई निंबाची पानं तोडून वाटत व त्यांचा गोळा करुन भगवान शंकरास नैवद्य अर्पण करत, पूजेनंतर तोच प्रसाद ते भक्षण करत. अशा प्रकारे केवळ निंबाचा पाला खाऊन अनेक वर्षे उभयतांनी तपश्चर्या केली व भगवान शंकराकडून पुत्र प्राप्तीचा आशीर्वाद मिळविला.

या वेळी मुरहरपंताचे वय होते ७० वर्षे तर निराबाई ६० वर्षे ईश्वरीशक्तीने अश्विन शुध्द १५ शके १५२७ (इ.स. १६००) रोजी मुरहरपंत व निराबाई यांना ईश्वरीकृपेने पुत्ररत्न प्राप्त झाले. निंबाचा पाला भक्षण करुन तप केले व भगवान शंकरास प्रसन्न करुन घेतले म्हणून पुत्राचे नामकरण केले निंबराज.

निंब भक्षोनि अनुष्ठान | म्हणोनी पुत्रासी नामाभिधान |
निंबराज उत्तम लक्षण | सामुद्रिके ऐसा ||

कालांतराने मुरहरपंत व निराबाईचे निधन झाले. निंबराज शिरुर येथेच राहिले, त्यांनी वडिलांची कुलकर्णी पदाची जबाबदारी स्वीकारली व देवदैठण येथे येऊन स्थायिक झाले. निंबराजांचे लग्न श्रीगोंदा तालुक्यातील कसबे मांडवगण या गावातील गंगा या मुलीशी झाले.

परंतु संतान प्राप्त न झाल्याने त्यांनी दुसरा विवाह पिंपळगाव पिसा या गावतील भगिरथी या मुलीशी केला. निंबराजाची गृहस्थी व नोकरी आता व्यवस्थित चालू होती.

कुलकर्णी पदाची जबाबदारी स्वीकारत असताना त्यांच्याकडे दोन भावांचे प्रकरण आले. द्वारकेच्या प्रवासात एकाने दुसऱ्याचा खुन केला व प्रेत खोल खड्ड्यात पुरुन ठेवले. निंबराजांनी चौकशीसाठी प्रेत उकरुन पाहिले तर तेथे गंगाजळ त्यांच्या दृष्टीस पडले व त्या अस्थी चंक्रांकित माश्यासारख्या फिरत असल्याचे दिसले. निंबराजाच्या मनावर या घटनेचा खोल परिणाम झाला. ते विचार करु लागले, जर द्वारकेच्या वाटेवर मृत्यू प्राप्त झाला तर मुक्ती मिळते तर संपूर्ण देहच द्वारकाधिशाच्या चरणी अर्पण केला तर किती पुण्यसंचय होईल.

प्रपंचा सोडिले पाणी | तुज अर्पिले दौत लेखणीं ||
न धरी याकर्मी येथूनी | सत्य वाणी वदतो हे ||
ऐसा अनुताप धरोणी जाणा | मग चालिले तिर्थाटणा ||
बारा ज्योर्तिलिंगे देखोनि नयना | संतोष मना वाटला ||

अशा प्रकारे नोकरीचा त्याग करुन निंबराज कुटुंबासह तीर्थयात्रेस निघाले. ज्योतिर्लिंग, द्वारका, काशी अशी यात्रा सुरु असताना सिध्द नदीच्या काठी संत श्रेष्ठ एकनाथमहाराज यांचे शिष्य सिध्द नरहरी यांची भेट झाली व त्यांची दृष्टादृष्ट होताच गुरुस्थानी मानले.

निंबराजांना दोन कन्या काशी व बद्राबाई तसेच चार पुत्र शिवराम, अनंत, नारायण, नरहरी  झाले. निंबराजांनी आता सर्वत्र तीर्थाटन केले. त्यांच्या हातून कितीतरी चमत्कार घडले. वृध्दत्वाकडे वाटचाल सुरु असताना विश्वेश्वराने स्वप्नात दृष्टांत दिला की, "आता माझी सेवा पुरी कर. हरिहराचे प्रतीक असणाऱ्या पंढरीच्या पांडूरंगाला आता भेट." पंढरीची वारी गावातून चालली होती. निंबराजही वारीत सामील झाले. प्रत्यक्ष पांडुरंग त्यांना सामोरे गेले व त्यांच्या हाती पिवळी पताका देऊन सन्मान केला. आता निंबराज पिवळी पताका घेऊन नियमित पंढरीस जात असत. एकदा त्याची परीक्षा घेण्यासाठी रुक्मिणी मातेने माळीणीचं रुप घेतले व महाद्वारात टोपली घेऊन बसली. निंबराज जवळ येताच ती माळीण म्हणाली, या टोपलीत गाजरं झाकलेली आहे, मी घरी जाऊन माझ्या बाळाला दूध पाजून येते, तो पर्यंत तू लक्ष ठेव. याबरोबरच ती

माळीण गेली, खूप वेळ झाला तरी परतेना. शेवटी निंबराजांनी टोपलीत डोकावले तर टोपलीत सोन्याची गाजरं होती. निंबराज मनी उमगले व म्हणाले,

"हात जोडूनि करी विनंती म्हणे | देवा का मज करितोसी गुंजी |
तुझी कृपा इच्छितो चित्ती | न लगे संपत्ती धन काही |"

एका वारीत पार्वती मातेने निंबराजास दुग्धपान केले. चंद्रभागेच्या वाळवंटी कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंग बाळरुप घेऊन निंबराजाच्या खांद्यावर बसले. असे कितीतरी प्रसंग निंबराजाच्या आयुष्यात घडले. गोपाळपूरच्या काल्याच्या कीर्तनाचा मान पांडुरंगास लाहयाचा प्रसाद अर्पण करण्याचा मान निंबाराजास लाभला होता. अशा प्रकारे पांडुरंगाची सेवा करत निंबाराजांनी शालिवाहन शके १६०० (इ.स. १६७८) माघ अमावस्येस आपला देह ठेवला. अहमदनगरहून पुण्याकडे जातांना शिरुर गाव लागते, तेथून पूर्वेला १० कि.मी. अंतरावर देवदैठण हे गाव असून तेथे निंबाराजांचे समाधी मंदिर आहे.[४९]

**मांडवगण**

मांडव्या ऋषींनी भगवान शंकराच्या प्राप्तीसाठी पुरातन काळी तपश्चर्या आरंभिली होती. योग्यवेळी शंकर प्रसन्न झाले. मांडव्या ऋषींनी भगवान शंकरांना इच्छित स्थळी वास्तव्य करण्याचा वर मागितला. भगवान महादेव म्हणाले, मी तयार आहे, तू पुढे हो. मी तुझ्यापाठी येतो, परंतु तू जर वळून पाहिले तर मात्र मी त्याच ठिकाणी राहीन. मांडव्य ऋषींनी यानुसार चालत असताना चुकून एके ठिकाणी वळून पाहिले तर भगवान शंकर त्याच ठिकाणी विसावले व ते ठिकाण म्हणजेच आजचे मांडवगण येथील सिध्देश्वर महादेव. मांडवगण येथेच मांडव्यऋषींची समाधीही आहे.

**आनंदाश्रम स्वामी**

श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव येथे सातपुते नावाचे ब्राम्हण कुटुंब राहात होते. या घराण्याकडे या गावचे कुलकर्णीपद होते. याच घराण्यात नरहरपंत व गंगुबाई यांच्या पोटी माघ वद्य सप्तमी शके १८३२ रोजी एका अलौकिक पुत्ररत्नाचा जन्म झाला त्याचे नाव श्रीधर. मॅट्रीकपर्यत श्रीधरचे शिक्षण झाले. त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. त्यातच १९३० मध्ये त्यांना दोन महिन्याची कारावासाची शिक्षा झाली. तद्नंतरही त्यांना येरवडा तुरुंगात

एक वर्षे सश्रम कारावास भोगावा लागला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी पेन्शन, इतर सवलती न घेता, शेती व्यवसायात लक्ष घातले. परंतु त्यांच्या मनातून शेतीत काम आवडत नव्हते. त्यानंतर ते केडगाव येथे नारायणमहाराज यांच्या सहवासात आले व त्यांच्याच उपदेशानुसार श्रीधर आळंदीस दादामहाराज साखरे यांच्या साधकाश्रमात येऊन राहिले.

साधकाश्रमात ७-८ वर्षे वास्तव्य केल्यानंतर श्रीधरपंत आजीच्या आग्रहाखातर पुनःश्च गावाकडे आले, त्याचक्षणी संन्यास घेण्याच्या विचारात असतानाच आईच्या आज्ञेनुसार तो विचार पुढे ढकलला गेला. पारमार्थिक मार्गावरुन वाटचाल करत मातृवियोगानंतर श्रीधरपंत पुनःश्च १९६६ मध्ये व्यास क्षेत्री गेले व सद्गुरु कैवल्याश्रम स्वामीमहाराजांचा अनुग्रह घेऊन संन्यासाश्रम स्वीकारला आणि आता श्रीधरपंतांचे आनंदाश्रम स्वामी झाले.

आनंदाश्रम स्वामी आता सुरेगावचेच न राहाता सर्व धार्मिक सज्जनांचे प्राणच झाले होते. सतत तिर्थाटन, कीर्तन, प्रवचन करत असताना सद्गुरुंच्या सोबत परमेश्वराच्याच कृपेने नर्मदेच्या महापुरातून सुखरुप बाहेर पडले.

काशी येथे तारकमठात काही काळ आनंदाश्रम स्वामी वास्तव्यास होते. त्यांनतर वृध्दत्वाकडे झुकताच आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊलींच्या सहवासात इंद्रायणीतीरी आले व कन्हैया आश्रमात येऊन राहिले. प्रपंच हा होतच असतो, परमार्थ हा करावा लागतो, असे ते सर्वांना सांगत.

सतत आयुष्यभर भगवंताची सेवा करत ज्येष्ठ वद्य ११ शके १९२४ रोजी शनिवार दि. ६ जुलै २००२ रोजी एकादशीच्या दिनी रात्री १०.४५ वा. आनंदाश्रम स्वामी वैकुंठवासी झाले. त्यांचा पार्थिव देह सुरेगाव येथे समाधिस्त करण्यात आला. आज हा परिसर प्रतिआळंदी म्हणून ओळखला जातो.

धन्य धन्य देश भारत | धन्य धन्य महाराष्ट्र प्रांत |
नगर जिल्हा श्रीगोंदे तालुक्यात | झाले पवित्र सुरेगाव ||[५०]

**संत कैकाडीमहाराज**

संत रामदास कैकाडीमहाराजांचा जन्म १९०४ मध्ये भागोजी जाधव यांच्या घरात कात्राबाद मांडवगण येथे झाला. वडील कॉन्ट्रॅक्टर व सत्त्वशील होते.महाराजांचे धाकटे बंधू

कोंडाजीमहाराज यांचा जन्म १९०८ सालचा. दोघांचेही शिक्षण व्यवस्थित झाले. घरचे वातावरण धार्मिक असल्याने दोघांचीही परमार्थाकडे ओढ रामदासमहाराजांचे लक्ष घरादाराकडे लागेना. त्यांनी शेवटी सर्व सुखसमृध्दीस विनम्र नकार दिला व वयाच्या २५ व्या वर्षी गृहत्याग केला. पोथ्या, प्रवचने, कीर्तने यातील गोडीच्या आधारावर त्यांनी विठ्ठलाच्या सगुणाकडे धाव घेतली. कोंडाजी काकांनी मात्र संसारात राहून थोरल्या भावाच्या विचारांना साथ दिली. एकदा रामदासमहाराज व संत गाडगेबाबांची भेट झाली. त्यानंतर कैकाडीमहाराजांनी शाकाहार व समाजप्रबोधन यावर भर दिला.

एका कीर्तनातमहाराज उभे असताना त्यांचे जवळच मुलगा मृत झाला तरीमहाराज निश्चल होते.महाराजांनी आजन्म ईश्वराची सेवा केली. पंढरपूरला सहस्त्र कोटी देवांची स्थापना करुन भव्यदिव्य मठ उभारला आहे. आजहीमहाराजांच्या कीर्तीचा ध्वज या रुपाने उभा आहे.

**बहादूरगड**

बहादूर गडाहून खुद्द औरंगजेबानेच मुकर्रब खानास निरोप पाठविला, "मुबारक हो खान अलमपन्हा का हुक्म है, दोने कैदिओं को तरक्ता कुलाह डालो | उतार दो उनके बदन के काफर असवाब और चढाओ ये खास खुशामदगारोंके कुर्ते | जकड दो उनको उंट के पिठपर और ले चलो बाजे बजाने, धिंड निकलकर बहादुरगड !"

हुकुमानुसार हशमांनी पटापट हालचाली करुन घोडयावर जखडलेल्या संभाजीराजांना व कवी कुलेशाला खाली घेतले. त्यांच्या अंगावरचे जामे ओरबाडून काढण्यात आले त्याऐवजी विदुषकासारखे ढगाळ कुर्ते दोघांच्याही अंगी चढविण्यात आले. कमरेला माळा व काटेरी वेलींची कडी आवळण्यात आली. ते राजे नव्हतेच. विदुषकी पोषाखात बादशाहासमोर पेश केले जाणारे बळी होते. राजचिन्हाची एकच खूण नाचिज म्हणून कुणीही उचकटून न टाकल्याने त्यांच्या अंगावर तशीच होती आणि तीही आबासाहेबांनी दिनरात छातीवर वागवलेली चौसष्ट कवडयांची भवानीमाळ ! संग सोबतीला एकच माणूस - कुठल्या कुठे कनोज देशात उपजलेला एक कवी छंदोग्रामातय-कुलेश.

शाही शहाजणे, तुताऱ्या, नगारे यांची एकमेकांना मिसळती घोष गर्दी उसळली. बेहोश हशमांनी नरडयांच्या घाटया फोडत किलकाऱ्या उठविल्या. धिं न-धी नं .... वाटेवर येणाऱ्या

मागली मौजे बुद्रुकातील औरंगची रिआया मुकर्रब व इखलासवर खोबरे आणि खारकांचे तुकडे फेकत हर्षाने नाचत होती. दिवस ईदसारखा साजरा होत होता. रात्र शबे बारात सारखी सजली जाणार होती. आपल्या बाया, मर्दांना, बच्चांना मागे हटवत होते. त्यांची नजर चुकवून बच्चे मोगल आणि औरती उंटावरच्या कैद्यांना हाती मिळतील ते पायदळीचे दगडे गुंडे मारत होते. कुत्ते, शैतान, काफर असे पोटतिडकीने म्हणत नफरतीने मनातला घुस्सा थुंकित एकवट करुन पायांशी पचपच थुंकत होते.

अशा या ऐतिहासिक दुर्दैवी धिंडीचे वर्णन थोर साहित्यिक शिवाजी सावंत यांनी 'छावा' या कादंबरीत केलेले आहे. आणि दुर्दैवाने या धिंडीला साथ घ्यावी लागली ती नगर जिल्हयातील बहादूरगडाला !

स्वतःच्या जिद्दीवर व कर्तृत्त्वावर मराठेशाही स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र संभाजीराजे व कवी कलुश यांची अखेरची यात्रा याच बहादूरगडाने उघडया डोळयांनी पाहिली ती १५ फेब्रुवारी १६८९ रोजी. श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव हे ५२ पेठा व १२ वेशी असलेले गाव पूर्वी पांडे पेडगाव म्हणून ओळखले जाई. येथे भीमा व सरस्वती या दोन नद्यांचा संगम आहे.[५१]

"औरंगजेबाने दखखनच्या सुभेदारपदी नेमलेला आपला दूधभाऊ मीर मलीक हुसेन उर्फ खान जहान कोकलताश उर्फ बहादूरखान याने १६७२ च्या सुमारास भीमानदीच्या तीरावर एक अप्रतिम भुईकोट किल्ला बांधला व या किल्ल्याला स्वतःचे नाव दिले बहादूरगड १६७२ ते १६८० पर्यंत बहादूरखान येथे वास्तव्यास होता."[५२]

१६७४ च्या दरम्यान छत्रपती शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडला होता. त्यासाठी झालेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठीमहाराजांची नजर बहादूरगडाकडे वळली. तेथे एक कोटींचा खजिना व दोनशे अरबी घोडे सांभाळीत बहादूरखान बसला होता.महाराजांच्या २००० घोडेस्वारांनी अचानक बहादूरगडावर हल्ला केला. बहादूरखानानेही निकराने मराठी सैन्याला प्रतिकार केला मराठी सैन्याची पिछेहाट होऊ लागली. मराठे मागे हटू लागले. बहादूरखान गड सोडून मराठयांचा पाठलाग करु लागला. बहादूरखान गडापासून दूर जाऊन मराठयांचा पाठलाग करत असतानामहाराजांचे उरलेले सात हजार सैन्य लपून गडाजवळच

बसलेले होते. बहादूरखान दूर गेल्याचे पहाताच, त्यांनी गडावर लुटालूट सुरु केली. तेथे आता फक्त बाजारबुणगे, आचारी, पाणके व बायकां मुलेच होती. गडाच्या रक्षणासाठी मागे सैन्याची एकही तुकडी बहादूरखानाने ठेवलेली नव्हती. मराठयांनी सर्व लूट करुन गड धुऊन नेले. इकडे बहादूरखान मराठयांना पिटाळून गडावर येऊन पाहतो तर सर्व धनधान्य, घोडेमहाराजांच्या मावळयांनी लूटून नेले म्हणून म्हण पडली - पेडगावचा शहाणा.

महाराजांची कर्नाटक प्रांतावर स्वारीची तयारी सुरु होती, परंतु औरंगजेबाने बहादूरखानास प्रचंड सैन्य देऊनमहाराजांचा नायनाट करण्याचा आदेश दिला. महाराजांनी विचार केला, इतक्या अफाट सैन्याला तोंड देण्यास आता युक्तीची गरज आहे.

महाराजांनी बहादूरखानास संपूर्ण शरणागतीची याचना कळविली. तसेच सर्व किल्ले बादशाहाच्या ताब्यात देऊन मांडलिकत्त्वाची तयारी दाखविली. बहादूरखानास अतिशय आनंद झाला. परंतु या तहनाम्यावर औरंगजेबाची मान्यता मुद्रा अंकित व्हावी, अशीमहाराजांनी बहादूरखानास अट घातली. या घटनेस वेळ लागणार होता हे महाराजांना माहीत होते, तोपर्यंत स्वराज्यावरील संकट लांबणार होते. दिल्लीवरुन काही महिन्यांनी शाही फर्मान आले, फौजफाटा माघारी बोलविला गेला. विनायुध्द शिवाजी आपल्या ताब्यात येत आहे. हे पाहुन औरंगजेबाने खुश होऊन बहादूरखानास एक हत्ती भेट पाठविला.

बहादूरखानाने हे फर्मान मोठया दिमाखात वकिलामार्फत रायगडावर महाराजांकडे पाठविले. बहादूरखान इकडे आपल्या पदोन्नतीची स्वप्न पहात होता. तोच त्याचा वकील सुतकी चेहऱ्याने परततांना दिसला कारण शिवाजीमहाराजांनी तह फेटाळून लावला होता. दक्षिणप्रांताची कर्नाटकवरील स्वारी सुखकर व्हावी म्हणून महाराजांनी वेळकाढू धोरण अंगिकारले होते व पुन्हा बहादूरखानास पेडगावचा शहाणा बनविले होते.

पेशवाईच्या काळात बारभाईंचे कारस्थान घडले. त्यामुळे राघोबादादा पेशवे बहादूरगडावर लपून बसले होते. पुण्याहून बहादूरगडापर्यंत येतांना आपल्याला कुणी ओळखू नये यासाठी त्यांनी वेडयाचे सोंग घेतले होते, म्हणून म्हण पडली, वेड घेऊन पेडगावला जाऊ नका ! बहादूरगडाने छत्रपती शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज, पेशवाई, मोगलाई यांचा काळ पाहिला.

बहादूरगडावर कोरीव मंदिर, प्रवेशद्वार असून तो भीमा सरस्वतीच्या काठी, श्रीगोंद्यापासून २४ कि.मी. अंतरावर आहे.

### ५) कर्जत तालुका

सीना व भीमा नद्यांच्या सरहद्दींनी बंदिस्त असलेला हा तालुका शेतीच्या दृष्टीने तरीही मागासलेला थोडयाफार प्रमाणात ऊस शेती पिकवणारा त्यासाठी जगदंबा सहकारी साखर कारखाना उभा आहे.

कर्जत तालुक्यास पर्यटन व धार्मिक क्षेत्राचा मात्र मोठा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील प्रसिध्द अशा अष्टविनायकांपैकी एक सिध्दटेकचा सिध्दिविनायक गणपती येथेच आहे. दुर्मिळ असे दुर्योधन मंदिर दूरगाव, रेहेकुरी अभयारण्य, थोर लेखक ना.सी. फडके यांची जन्मभूमी, प्रसिध्द हलत्या दीपमाळांचे राशिन, समाजकारणी आबासाहेब निंबाळकरांची कर्मभूमी, कुमार सप्तर्षीची जन्मभूमी, संत गोदडमहाराजांच्या, आत्मारामहाराजांच्या आशीर्वादाची ही पुण्यनगरी होय.

कर्जत तालुक्यातील शेती पावसाच्या पाण्यावर जास्त अवलंबून. काही प्रमाणात कुकडी, घोड कॅनॉलचे पाणी या सर्वांच्या उपलब्धतेनुसार चालणारा शेती व्यवसाय, छोटे-मोठे उद्योग-धंदे होत. शेती, जोडधंदे, नोकरी व्यावसाय या मध्ये कष्टकरी वर्ग गुंतलेला दिसून येतो. तालुक्याच्या विकासाकरिता बापूसाहेब देशमुख, विठ्ठलराव भैलुमे, राजेंद्र गुंड, राजेंद्र फाळके ही नेते मंडळी पुढाकार घेताना आजही दिसतात.

**सिध्दटेकचा सिध्दिविनायक**

अहमदनगर जिल्हयाला लाभलेले हे कर्जत तालुक्यातील एकमेव अष्टविनायकाचे स्थान असून त्याचे नाव सिध्दटेक. भीमा नदीच्या तिरावर वसलेले हे तीर्थक्षेत्र. मधू कैटभाच्या संहारासाठी साक्षात भगवान विष्णूंनी या स्थानाची निवड करुन गणेशाची स्थापना येथे केली. येथेच तपश्चर्या करुन गणेशास प्रसन्न करुन घेतले. मधू कैटभाच्या संहारासाठी गणेशाकडून सिध्दी प्राप्त करुन घेतल्या. म्हणून या स्थानास सिध्दटेक अथवा सिध्दक्षेत्र असे म्हणतात व गणेशास सिध्दिविनायक असे म्हणतात. स्वतः विष्णूंनी स्थापन केलेला हा गणेश अष्टविनायकांपैकी एकमेव उजव्या सोंडीचा आहे.

सिध्दटेकला भीमा नदी दक्षिण वाहिनी झालेली आहे. भीमा नदीला कितीही पाणी आले तरी भीमा गणेशाला शांतपणे चरण प्रक्षालन करते व पुढे जाते. सिध्दिविनायकाचे मंदिर उंच टेकडीवर आहे. मंदिराचा गाभारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेला असून देवळासमोरचे महाद्वार व फरशी हरिपंत फडके यांनी बांधलेला आहे. पेशव्यांचे सेनापती हरिपंत फडके यांनी आपले सेनापतिपद काही कारणास्तव गमावले. त्यामुळे हरिपंत सिध्दटेकला आले व गणेशाची पूजा आरंभिली. बरोबर २१ व्या दिवशी त्यांना सेनापती पदाची वस्त्रे गणेशाच्या कृपेने पुनश्चः मिळाली. त्यामुळे हरिपंत फडक्यांनी सेनापती पदानंतर पहिली स्वारी बदामी किल्ल्यावर केली व त्या किल्ल्याच्या दगडांनी या मंदिरासमोरील दगडी रस्ता बनवला तसेच समोरची वेस बांधली.

सिध्दिविनायकाची मूर्ती विष्णुस्थापित असून स्वयंभू आहे. ती ३ फूट उंच व २.५ फूट रुंद आहे. मूर्ती उत्तराभिमुख असून गजमुख आहे. मूर्ती उजव्या सोंडेची असून पोट मात्र मोठे नाही. एक मांडी घातलेली असून त्यावर रिध्दी-सिध्दी बसलेल्या आहेत. मूर्ती डोंगराच्या कडेला स्थापन असल्याने प्रदक्षिणा घालावयाची असल्यास संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालावी लागते.

सिध्दटेकला श्रीची पूजा सकाळी ४ वाजेपासून ते रात्री ९:१५ पर्यंत नित्याने होत असते. भाद्रपद शुध्दप्रतिपदा ते पंचमी आणि माघ शुध्दप्रतिपदा ते पंचमी असे दोन मोठे उत्सव होतात. या मंदिराचा कारभार चिंचवड देवस्थान ट्रस्टकडे आहे. सिध्दटेकला जाण्यासाठी पुणे-सोलापूर मार्गावर दौंड हे स्टेशन आहे. दौंड ते सिध्दटेक हे २० कि.मी. अंतर असून दौंडवरुन बसेस शिरापूरपर्यंत येतात. दौंड-काष्टी पेडगावमार्गे सिध्दटेकला ५० किमी अंतर कापून गाडीने सिध्दटेकला पोहोचता येते. अहमदनगर ते सिध्दटेक अंतर ८० किमी आहे. तसेच पुणे ते सिध्दटेक १४० किमी अंतर आहे.[५३]

**संत गोदडमहाराज**

कृष्णभक्त मीराबाईचा सासरच्या लोकांकडून खूप छळ झाला. तिचा सासरा व दिराने तर तिला विषाचा प्याला प्राशन करण्यास दिला. तरी देखील मीराबाईने त्यांच्या हिताचीच वाणी उच्चारण केली. तुमच्या घराण्यात दोन थोर पुरुष जन्मास येणार असून त्यापैकी एक दक्षिणेकडे

रामराज्य करेल तर दुसरा वैराग्य पत्करेन मालोजीराजे भोसले तर दुसरे वैराग्य पत्करणारे संत गोदडमहाराज यांचे पूर्वज बंबोजी.

राजस्थानमध्ये उदयपूर नगरीत शके १६७२ साली श्रावण शुध्द दशमीस माता चंद्रभागा व पिता भिकाजीराजे भोसले यांच्या पोटी गोदडमहाराजांचा जन्म झाला. पाळण्यातले त्यांचे नाव अमरसिंह कृष्णभक्त मीराबाईच्या सातव्या वंशातील हे व्यक्तिमत्त्व. अमरसिंहाचे मामा कर्जत तालुक्यातील तोरडमल घराणे.

अमरसिंहांनी बालपणीच खडतर तपश्चर्या केली वयाच्या सातव्या वर्षीच त्यांनी वैराग्य पत्करुन संपूर्ण देशभर तीर्थाटन केले. दक्षिण भारतात प्रवास करत असताना त्यांना नारायण नाथांचा अनुग्रह लाभला व त्यांचे शिष्यत्त्वमहाराजांनी पत्करले. शिष्याची ज्ञानाची तगमग व जिज्ञासा पाहून नारायण नाथांनी अमरसिंहाला आपल्या जवळील गोधडीचे आसन प्रेमाने दिले, त्यावेळेपासून अमरसिंह हे नाव जाऊन गोदडनाथ हे नाव धारण केले. गोदडमहाराज आता फलटण येथील राजेनिंबाळकर यांच्या राजाश्रयास राहू लागले. तेथून ते नियमित पंढरपूरची पायी वारी करु लागले. तद्नंतर ते कर्जत येथे वास्तव्यास आले तरी ते पंढरीस नियमित जात.

एकदा गोदडमहाराज पंढरपूरला गेले होते वाळवंटात त्यांची राहुटी होती. पहाटेच्या अंधारात एक स्त्री चंद्रभागेवर पाणी आणण्यास चालली होती. तिच्या डोक्यावर घागर होती, तिचा पाय राहुटीच्या दोरीत अडकला व ती स्त्री जमिनीवर पडली. रागाने त्या स्त्रीने राहुटीवाल्याला शिव्या शाप दिले. तो राहुटीवाला म्हणजेच गोदडमहाराज. त्या स्त्रीचा रागमहाराजांना सहन झाला नाही. त्यांनी राहुटी गोळा केली, पताका लपेटून घेतली व त्या पेटवून दिल्या. गोदडमहाराज पांडुरंगाला म्हणाले, "विठ्ठला तू माझा राग करतोस, मी पंढरपूरला येऊ नये असेच तुला वाटते म्हणूनच तू आज हा प्रसंग आणला आहे, मी आता या अग्नीत देह अर्पण करत आहे." तितक्यात तेथे साक्षत पांडुरंगाचे घननिळे रुप साकार झाले.महाराजांचा हात हाती घेतला व महाराजांना सांगितले की, "तू आता पंढरीला येवू नकोस, मीच धाकटया आषाढीला तुला दरवर्षी कर्जतला भेटायला येत जाईन." पांडुरंगाच्या या वचनाप्रमाणे प्रत्येक धाकटया आषाढी एकादशीला पांडुरंग स्वतः कर्जतला गोदडनाथांना भेटायला आजही येतात. म्हणूनच कर्जतला "धाकटी पंढरी" म्हणतात.

संत गोदडनाथांनी "जगतारक" हा ग्रंथ लिहिला. तसेच साठ संवत्सरांचे भविष्य लिहिले. आजही त्याचे वाचन गुढीपाडव्याच्या दिवशी केले जाते. त्यासाठी पंचक्रोशीतील भाविक खूप गर्दी करतात.

गोदडमहाराजांनी शेवटच्या श्वासापर्यंत पांडुरंगाची सेवा केली व पांडुरंगाच्या नामस्मरणात शके १७५९ साली माघ वद्य चतुर्थीस कर्जत येथे संजीवन समाधी घेतली. आषाढ वद्य एकादशीला येथे रथयात्रा निघते व भव्य दिव्य अशी यात्रा भरते.[५४]

**राशीनची येमाई देवी**

"कर्जत तालुक्यातील राशीन हे गाव इ.स. ७०० च्या दरम्यान येथे येमाई देवीची स्थापना झाल्याचे वीजयादित्य चालुक्य काळातील ताम्रपट सांगतो."

ब्रम्हदेवाकडून अमरत्वाचा वर लाभलेला महिषासुर नावाचा राक्षस देवदिमानवांना त्रासदायक ठरु लागला. त्याच्या संहारासाठी माता पार्वतीने वेगवेगळया नावाने आदिशक्तीचे रुप धारण केले. सर्व देवांनी तिला शस्त्र दिले व त्यातूनच महिषासुराचा वध झाला. अशा प्रकारे भंडासुर नावाच्या राक्षसानेही अमरत्त्वाचा वर प्राप्त केला व सर्व देवांना, माणसांना त्रास देऊ लागला. त्याच्या संहारासाठी आदिमाया माहूर गडाहून राशीन येथे येमाई मातेच्या रुपाने प्रकट झाली व नऊ दिवस सतत भंडासुराशी युध्द करुन त्याचा वध केला. या दोन्ही युध्दांत राक्षसांच्या राशीच्या राशी पडल्या, त्यावरुन या गावाचे नाव राशीन पडले.

राशीन गावाच्या पश्चिमेस देवीचा स्वयंभू ४ फूट उंचीचा तांदळा असून देवीला चार हात आहेत. देवीचे पूर्वाभिमुख असे हेमाडपंथी मंदिर आहे.

प्रभुरामचंद्र वनवासात असताना सीतामाईच्या शोधात ते फिरत होते. त्यांची परीक्षा पहावी या हेतूने माता पार्वतीने सीतामाईचे रुप घेतले व रामचंद्रांना फसवावे या हेतूने त्यांच्या पुढे उभी राहिली. त्यावेळी मर्यादापुरुषोत्तम राम सीतारुपी पार्वतीला म्हणाले, ये माई यावरुन या आदिमायेचे येमाई असे झाले.

येमाई मंदिरासमोर आतमधून वर जाण्यासाठी रस्ता असलेल्या दोन दीपमाळा आहे. त्या दोन्हीही दीपमाळा हालत्या दीपमाळा म्हणून प्रसिध्द आहेत. नवरात्रात येथे मोठी यात्रा भरते. घटस्थापना, आरती, पोत नाचविणे, झेंडूच्या फुलांनी कौल लावणे, पालखीची मिरवणूक असे

विविध कार्यक्रम या मंदिरात भक्तिभावाने पार पाडतात.औरंगजेबाने राशीनजवळ वसवलेली औरंगपूर पेठ म्हणजेच येमाई देवीच्या सभोवतालचा परिसर, ज्याला आज मंगळवार पेठ म्हणून ओळखले जाते.[५५]

**दुर्योधन मंदिर**

संपूर्ण भारतात दुर्मिळ असे दुर्योधनाचे मंदिर कर्जत तालुक्यात दूरगाव येथे आहे. मुख्य मंदिर हेमाडपंथी शैलीचे असून पूर्वाभिमुख आहे. तेथे वर्तुळाकार एक व आयताकृती एक अशा दोन महादेवाच्या पिंडी आहेत. याच मंदिरात दक्षिणेकडे तोंड करुन दुर्योधनाची मूर्ती आहे. या मंदिरापासून जवळच एक दुसरे मंदिर आहे. त्यास चिंतामणी अथवा अश्वत्थामा मंदिर असे म्हणतात.

एका आख्यायिकेनुसार महाभारत काळात कुरुक्षेत्रावर झालेल्या युध्दात कौरवांची पांडवांनी अपरिमित हानी केली. एके दिवशीच्या युध्दात शल्य कौरवांचा सारथी असताना युध्दिष्ठिराने त्याचा वध केला. या गदारोळात दुर्योधन जखमी झाला. मृत्यू जवळ येतो आहे असे पाहून त्याने कुरुक्षेत्रावरुन काढता पाय घेतला. तो सरस्वती नदी ओलांडून व्देपायन सरोवराकडे गेला व या सरोवराच्या तळाशी लपून बसला. तद्नंतर अश्वत्थामा या सरोवराकाठी दुर्योधनास शोधण्यास आला. याच सरोवराच्या जलाशयाने दुर्योधनाने अश्वत्थामाचा सेनापती म्हणून अभिषेक केला.

दुर्योधनाची शोचनीय अवस्था पाहून अश्वत्थाम्याने याच सरोवराकाठी प्रतिज्ञा केली की, ज्या पांडवांनी तुझी ही दयनीय अवस्था केली, त्या पांडवांचा मी निःसंशय विनाश घडवून आणीन. एकही पांडव द्रौपदी पुत्रांसह पृथ्वीवर जिवंत ठेवणार नाही. अशी भयानक प्रतिज्ञा करुन अश्वत्थामा निघाला. दुर्योधन या सरोवरात लपून बसला हे पांडवांना कळताच ते कृष्णासह येथे आले. श्रीकृष्णाने भीमाला दुर्योधनासोबत गदायुध्द करण्यास भाग पाडले. कृष्णाच्याच इशाऱ्यावरुन भीमाने दुर्योधनाच्या मांडीवर गदेचा प्रहार केला व दुर्योधन याच द्वैपायन सरोवराकाठी निष्प्राण झाला.

कौरवपुत्र दुर्योधनाचा अंत याच ठिकाणी झाल्याने यास दूरगाव म्हणून ओळखले जाते व द्वैपायन सरोवर काळाच्या महिम्याने नष्टप्राय झाले. दुर्योधन व अश्वत्थामा यांच्या मैत्रीचे स्मारक आजही या घटनांची साक्ष देत दूरगाव येथे उभे आहे.

**रेहकुरी अभयारण्य**

कर्जत तालुक्यात रेहेकुरी अभयारण्य म्हणजे काळविट व हरिणांचे माहेरघर आहे. संपूर्ण देशाला अभिमान असणारे हे अभयारण्य नगर शहरापासून ७० किमी. अंतरावर तर कर्जत शहरापासून १० किमी. अंतरावर आहे.

दोनशे हेक्टर क्षेत्रफळावर वसलेले हे अभयारण्य १९८० मध्ये वन खात्यातर्फे उभारण्यात आले. सुरुवातीला येथील काळविटांची संख्या फक्त ५०० होती. आज ती ६ ते ७ हजारापर्यंत गेली आहे. काळविटाच्या मादीस हरीण असे म्हणतात. कळप करुन राहणारा हा प्राणी २० ते ३० प्राण्यांच्या कळपाने राहतो. नराचा रंग काळसर असून त्यास दोन शिंगे असतात. पोटाचा रंग पांढरा असतो. मादीला शिंगे नसतात तिच्या शरीरावर पांढरे ठिपके असतात. खुरटया गवताच्या जंगलात राहणारा हा प्राणी कोवळे गवत, हिरवा पाला, बाभळीच्या शेंगा खातो. टुणुटुण उडया मारत धावणारा कळप क्षणात आपल्या नजरेसमोर येतो व लागलीच अदृश्य होतो. पावसाळयात पर्यटक काळविटांना पाहण्यास खूप गर्दी करतात. रेहेकुरीबरोबरच कर्जत, श्रीगोंदा, जामखेड येथेही काळविट आढळून येतात. तसेच येथे मुंगुस, लांडगे, खोकडं हे देखील आढळतात. याच रेहेकुरीच्या अभयारण्यात अजून एक दुर्मिळ पक्षी आपणांस दिसून येतो तो म्हणजेच माळढोकपक्षी होय.

शहामृगासारखा दिसणारा हा माळढोक पक्षी, बर्डलाईफ इंटरनॅशनल या संस्थेने तयार केलेल्या जगातील अत्यंत धोक्यात असलेल्या पक्ष्याच्या यादीत याचा समावेश केलेला आहे. माळढोकांची जगातील संख्याच ३०० पेक्षाही कमी आहे. १८३१ साली व्हिगोर्स या शास्त्रज्ञाने हिमालयच्या पायथ्याशी या पक्षाची पहिली नोंद केली तर मोगल शहाजान बाबर याने माळढोकचे मांस रुचकर असल्याची नोंद केलेली आहे. भारतीय वन्य जीव संरक्षण कायद्यान्वये माळढोक पक्षाला अभय आहे. १९७९ मध्ये महाराष्ट्र सरकारने सोलापूर व नगर जिल्हयातील ८००० चौ.कि.मी. परिक्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. त्यात रेहेकुरीचा

महत्त्वाचा समावेश आहे. एकेकाळी पाकिस्तानपासून बांगलादेशापर्यंत माळढोक पक्षी दिसायचा. आज तो फक्त महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान येथेच दिसत आहे.[५६]

## ६) जामखेड तालुका

अहमदनगर शहराचे पूर्वेकडील टोक, सीनानदीच्या प्रवाहामुळे जिल्हयापासून जरा विभक्त  झालेले. मध्येच बीड जिल्हयाचा कडा-आष्टी असा प्रदेश, त्यामुळे जिल्हयाच्या ठिकाणापासून दुरच. सीमेवरुन वाहणारी नदी असूनही तालुका कोरडा, दुष्काळी, बहुतांशी जमिनी नापिक किंवा जिरायती शेतकरीवर्ग ऊसतोड करण्यासाठी इतरत्र विखुरलेला. मतदारसंघ राजकीयदृष्या आरक्षित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे जन्मस्थन चौंडी त्यांच्या घराण्यातील मातब्बरांच्या समाध्या वाडे सर्वकाही इतिहासाची फक्त वैभवशाली साक्ष देत उभे आहेत. तिच स्थिती ऐतिहासिक खर्डा किल्ल्याची, परंतु याच भूमीचा कायापालट करणारे रजनीकांत आरोळे दाम्पत्याचा व रामदास फूटाणे, सदाशिवराव लोखंडे, राम शिंदे यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. पर्यटनस्थळांच्या दृष्टीने, खर्डा, चौंडी, सीना परिसर खरं तर सर्वांना साद घालत आहे. अशा या तालुक्याचा इतिहास निश्चित प्रेरणादायी आहे.

**खर्डा किल्ला**

जामखेड शहरापासून २० किमी अंतरावर आग्नेय दिशेला खर्डा हे बारा वेशींनी युक्त असलेले गाव आहे. त्यास खड्डा खर्डा असेही म्हणतात. तसेच ऐतिहासिक कागदपत्रात शिवपट्टन असाही उल्लेख आढळतो.

या शिवपट्टन नावाशी एक अख्यायिका येथे प्रचलित आहे. सातारा जिल्हयातून तुकाराम पुरंदरे हे अतिशय तपनिष्ट परंतु शीघ्रकोपी सज्जन या गावी आले. त्याचे महात्त्म्य निजामाचे सरदार राजेनिंबाळकरांना समजले त्यांनी स्वतःहून त्यांचे शिष्यत्त्व पत्करले. त्यांच्याबरोबरच त्यांनी धार्मिक ज्ञानाकरिता पुढील वाटचालीची दिशाही ठरविली. त्यासाठी ते तीर्थयात्रेला गेले. नर्मदा नदीच्या पात्रात त्यांना शिवशंभोच्या बारा स्वयंभू पिंडी मिळाल्या. त्या घेऊन त्यांनी काशी यात्रा पूर्ण केली. गावी येताच त्यांनी त्या बाराही पिंडी या परिसरात स्थापन केल्या या बारा शिवपिंडीच्या स्थापनेनंतर हा परिसर शिवाचा पट्टा अथवा शिवपट्टन म्हणून ओळखला जाऊ लागला. ही बारा शिवलिंग पुढील नावांनी ओळखली जातात. कोटेश्वर, अमृतलिंग,

ओंकारेश्वर, संगमेश्वर, कपुरेश्वर, मल्लिकार्जुन, कपिलेश्वर, मोरेश्वर, गांधनेश्वर, बेलेश्वर, केदारेश्वर, घृष्णेश्वर, बालखंडी.

"खर्डा गावाच्या दक्षिणेकडील पठारावर हैद्राबादच्या निजामाचे सरदार सुतलानराव राजे निंबाळकर यांनी इ.स. १७४३ मध्ये सुलतान दुर्ग नावाचा दगडी किल्ला बांधला, यालाच खडर्याचा किल्ला म्हणतात. चौकोनी आकाराचा चार दरवाजांचा हा किल्ला असून याच्या पूर्व दरवाजावर पुढील देवनागरी शिलालेख आहे.

स्वस्तीश्री शालीवाहन शके १६६५ संवत्सर व ५१२ इंदुवासर हे दिनी राजश्री सुलतानजी राजे निंबाळकर, देशमुख, देशपांडे व मोकदम कसबे शिवपट्टण व अष्टाधिकारी पेटा कसबे मजकूर परगणे जामखेड सरकार अहमदनगर सुमे खुनत्तर बुनियाद औरंगाबाद यांनी किल्ले सुल्तान दुर्गाचे रचनेस आरंभ केला. || सन ११५३ || शुभं भवतू ||

या खर्डा गावातच निंबाळकरांची उंचावर गढी असून तेथून किल्ल्यापर्यंत भुयार आहे. या किल्ल्याने आजपावेतो कितीतरी परकीय आक्रमणांना तोंड दिलेले आहे. त्यातीलच एक प्रसिध्द खडर्याची लढाई.

११ मार्च १७९५ रोजी मराठे आणि निजाममुलुक यांच्यात जी लढाई झाली ती म्हणजे नाना फडणीसांची कर्तव्यपूर्ती मराठयांना दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी १७१८ मध्ये मिळाली होती, परंतु निजाम यात सतत हस्तक्षेप करत असे. त्यामुळे निजाम व मराठे यांच्यातील वितुष्ट वाढू लागले.

त्याचवेळी हैद्राबादचा दिवाण मुशीसल्लामुलक मराठयांच्या विनाशाचे स्वप्न पाहात होता. निजाम ४ जानेवारी १७९५ रोजी बिदरजवळ आला, नाना फडणवीसाने सरदारांना पुण्यास बोलविले व निजामाच्या पाडावासाठी लढाईचे आवाहन केले. त्यानुसार सर्व मंडळी सीनानदीकाठी जमले. निजामदेखील मोहरी घाट उतरुन खर नदीच्या काठाने लोणी व वाकी दरम्यान आला, ११ मार्च १७९५ राजी खडर्याजवळील रणटेकडीवर दोन्ही सैन्यात युध्द झाले. मराठयांचे विठ्ठलराव पटवर्धन व चिंतामणराव खाडिलकर त्यात ठार झाले. त्यानंतर शिंदे व भोसले या मराठा सरदारांनी निजामावर जोराचा हल्ला चढविला व निजामाला खडर्याच्या किल्ल्यात बंदिस्त केले. त्याची सर्व रसद तोडली, त्यामुळे निजामाला तह करणे भाग पडले.

१२ ते २७ मार्च पर्यंत तहाच्या वाटाघाटी सुरु होत्या. अन्न पाण्याविना निजामाच्या सैन्याचे खूप हाल झाले. शेवटी निजामाने २७ मार्च १७९५ रोजी संपूर्ण शरणागती पत्करली. या तहात पेशव्यांना साडे चौतीस लक्षाचा मुलुख आणि तीन कोटी दहा लक्ष रुपये करारान्वये मिळाले. मराठयांनी आपल्या मर्जीनुसार निजामाच्या दरबारी दिवाण नेमून वर्चस्व तयार केले, परंतु दुर्दैवाने नाना फडणवीसांचा मृत्यू झाला व निजामाने या तहातील एकही कलम पाळले नाही.

अशा प्रकारे पेशवाईचे चारही बुरुज शिंदे, होळकर, भोसले व गायकवाड खडर्याच्या निमित्ताने एकत्र आले व निजामाविरुध्द अविस्मरणीय वीजय मिळविला. अशी ही नगर जिल्हयातील खडर्याची लढाई होय.

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जन्मस्थान चौंडी :-**

"तस्यैया कुलदक्षिणी कुल्पते मंल्लनरिरावस्य वै |
धनिष्ठार्थकारी स्नुषा शुभमती स्तुतयात्व हयाभिक्षा |
खंडेराव वधू:सती प्रियगुणायत्त्वार लोकहिंतं |
नित्यं वैष्ण सदवंत गुणवती पूर्व यथा कुवर्ती |"

संस्कृत कवी खुशालिराम याने "अहिल्या कामधेनू" या ग्रंथात वरील वर्णन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याविषयी केलेले आहे. या अहिल्यादेवींचा जन्म इ.स. १७२५ मध्ये जामखेड तालुक्यतील चौंडी या गावी माणकोजी शिंदे व सुशीलाबाई या धनगर दाम्पत्याच्या पोटी झाला.

एकदा पेशवेसरकार व सरदार मल्हारराव होळकर स्वारीवर असताना त्यांचा मुक्काम सीना नदीकाठी चौंडी या गावी होता. त्यावेळी त्यांनी नदीकाठी डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन चाललेली एक हुशार व चुणचुणीत मुलगी पाहिली. पेशव्यांनी तिची चौकशी केली असता, ती गावच्या पाटलाची, शिंदयांची मुलगी असल्याचे समजले. पेशव्यांनी मल्हाररावांना त्या मुलीस सून करुन घेण्याची आज्ञा केली व पेशव्यांच्या इच्छेखातर मल्हाररावांचे सुपुत्र खंडेराव व चौंडीच्या शिंदे पाटलांची कन्या अहिल्या यांचा विवाह २० मे १७३७ रोजी पेशव्यांच्याच खर्चाने मोठया थाटामाटात संपन्न झाला.

अहिल्या मूळचीच धार्मिक वृत्तीची, वाचण्या लिहिण्याची आवड असणारी होती. त्यामुळे ती मल्हाररावांची लाडकी सूनबाई झाली. परंतु त्यांचा पती खंडेराव हा व्यसनी असल्याने त्याला राजकारण, सरदारकी यात रस नव्हता. हळूहळू अहिल्या सर्व गोष्टी आपले सासरे मल्हारराव यांच्याकडून शिकल्या.

अहिल्यादेवींना मालेराव व मुक्ता ही दोन अपत्ये होती. नवरा व्यसनी, त्यातच मल्हाररावांचाही मृत्यू झाला. त्यामुळे सरदारकी, कर वसुली, सैन्य ही कामे अहिल्यादेवी स्वतः करु लागल्या. त्यांना माणसांची उत्तम पार होती, तसेच त्या नित्य धार्मिक ग्रंथाचेही वाचन करत. कितीतरी मंदिरांचा जीर्णोध्दार, नियमित गंगाजळी, नद्यांवर घाट, अन्न, पाणपोई, विहिरी अशा समाजहिताच्या गोष्टी देवी अहिल्या यांनी केल्या. सन १८४९ मध्ये लंडन येथे स्कॉटलंडची कवयित्री जोना वेली हिने देवी अहिल्यांविषयी केलेले भाष्य,

'For Thirtyyears her reign of pace,
And she was blassed by every tounge
By storn and gentle, old and young.'

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवीला पेशव्यांनी मोलाची साथ दिली. इंदौरची सुभेदारी त्यांनी समर्थपणे पेलली. अहिल्यादेवींचा मुलगा मालेराव देखील व्यसनी निघाला व लवकरच मृत्यू पावला. परंतु राजकारणात त्या कधीही डगमगल्या नाहीत. अगदी राघोबा दादा पेशवे समोर असतानादेखील.

पतीनिधनाच्या वेळी अहिल्यादेवी अवघ्या तीस वर्षाच्या होत्या. सासू सासऱ्यांच्या आग्रहावर त्या सती गेल्या नाहीत. यानंतर मात्र त्या संपूर्ण साध्वीचेच जीवन जगू लागल्या. संपूर्ण शाकाहार, सफेद वस्त्र, गळयात फक्त एकच हार असा वेश त्यांचा असे. पेशव्यांनी अहिल्यादेवींना माळवा या प्रांताची सुभेदारी दिली. १७६६ ते १७९६ पर्यंत त्यांनी इंदूर प्रांत सांभाळला.

अशा या कर्तृत्वसंपन्न, धार्मिक पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा मृत्यू १३ ऑक्टोबर १७९५ रोजी नर्मदा तिरावर महेश्वर येथे झाला. शाहिर प्रभाकर म्हणतात,

सती धन्य धन्य कलीयुगी अहिल्याबाई |

गेली कीर्ती करुनिया भूमंडळाचे ठाई |

वर्णिती कीर्ती गातात संत जे गाणी |

झाली दैवदशे ती होळकरांची राणी |

अहमदनगर सोलापूर रस्त्यावर चौंडी गावाकडे जाण्याचा रस्ता आहे. तेथे भव्य कमान असून वळणांचा ३ ते ४ किमी अंतराचा रस्ता असून सीनानदी ओलांडताच चौंडी हे छोटे गाव दिसते. गावात प्रवेश करतांनाच नदीकाठी अहिल्यादेवींच्या पूर्वजांच्या समाध्या दिसतात. जवळच त्यांच्या वडिलांची, शिंदे पाटलांची गढी आहे. त्या गढीचे आता स्मारकात रुपांतर केलेले असून तेथे त्यांचा पुतळा उभारण्याचा व जीवनकार्य चित्रित करण्याचा मानस आहे.[५७]

**१.९ जिल्हयाचे समाजजीवन वैशिष्टये :-**

"एखादा समाज संस्कृती कितपत प्रगत आहे हे पाहण्यासाठी काही कसोटया लावल्या जातात. लोकसंख्येची घनता, सामाजिक व आर्थिक विकास यांचा घनिष्ठ संबंध, सुस्पष्ट नियोजन, तांत्रिक व आर्थिक विकास, व्यापार व आर्थिक देवघेवीसाठी उपलब्ध झालेल्या संधी, कला, साहित्य या क्षेत्राच्या प्रगतीसाठी देण्यात आलेले प्रोत्साहन इत्यादी कसोटयांवर संस्कृती उतरली पाहिजे."[५८]

भारतीय समाजव्यवस्था जगातील इतर कोणत्याही देशातील समाजव्यवस्थेपेक्षा वेगळी आहे आणि भारतातील समाजव्यवस्थेचा अभ्यास करत असताना महाराष्ट्रातील समाज व्यवस्था ही तर विविधतेने नटलेली आहे. अहमदनगर जिल्हयातील दक्षिणेकडील तालुक्यांचे समाजजीवन अभ्यासत असताना येथील राजकारण, आर्थिक व्यवहार, सामाजिक संबंध, वैचारिक देवघेव आणि भावनिक एकात्मता यामध्ये वेगळेपण आहे.

**जात :-**

"भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जात संज्ञा रुढ झाली आहे. जात हा मूळ (Cast) या पोर्तुगीज शब्दाचा पर्यायी मराठी शब्द आहे. वंशाची शुध्दता टिकविण्यासाठी जात हा बंद वर्ग प्रकार बनला. कोणतीही व्यक्ती ज्या कुळात जन्मते, त्याची ती जात ठरते. रिस्ते या समाजशास्त्रज्ञाने जातीविषयी समाजविज्ञान कोशात पुढील व्याख्या दिली आहे. पुराण

काळातील दैवी अथवा मानवी पूर्वजांचा वंशज म्हणून सांगणारा, परंपरागत एकच व्यवसाय करणारा, समाजधुरिणांनी एकजिनसी मानलेला विशिष्ट नाव धारण करणारा, अनेक कुटुंबाचा गट म्हणजे जात होय.

येथील जातिसंस्था आणि जातिवाद निर्माण झालेल्या रुढी आणि परंपरा यांचा प्रभाव आजही टिकून आहे. "जातिसंस्था प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेच्या संरचनेचा महत्त्वाचा घटक आहे तर जातिवाद ही आधुनिक भारताच्या सामाजिक जीवनातील एक अत्यंत प्रबळ अशी प्रवृत्ती बनली आहे."[५९]

जातीशिवाय दुसरी महत्त्वाची व्यवस्था धर्म ही आहे. येथे विविध जाती धार्माच्या लोकांनी आश्रय घेतला आहे. कला निर्माण केली. निसर्गसंपत्तीचा उपभोग घेतला आणि सामाजिक जीवनाला वळण दिले. सांस्कृतिक संघर्ष आणि सांस्कृतिक संगम यामधून नवनवीन सांस्कृतिक गुणविशेष रुढ झाले. या सांस्कृतिक देवाणघेवाणीचा प्रभाव सामाजिक संरचनेवर पडत राहिला. येथील संस्कृतीमध्ये कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, नातेपध्दती, सण उत्सव, मालमत्ताविषयक नियम इत्यादींची संरचना हयात त्या-त्या समाजाचा ठसा उमटलेला दिसतो. समाजव्यवस्थेतील महत्त्वाच्या संस्था वैशिष्टयपूर्ण आहेत. समाज व्यवस्थेचेस्वरुप, संरचना, प्रमाणके, भूमिका आणि घटकांचा दर्जा व स्थान, समाजव्यवस्था, कुटुंबाशी निगडित अशी शिक्षणव्यवस्था या उपव्यवस्थांचा समावेश आहे.

आज जरी समाजात विविध धर्माचे समूह राहत असले तरी बऱ्याच काळापर्यंत हिंदू धर्माचा प्रभाव होता. आजही समाजव्यवस्थेवर भारतीय संस्कृतीची छाप आहे. बहुसंख्य लोकांनी हिंदू धर्माचाच स्वीकार केलेला असल्यामुळे येथे हिंदूचेच तत्त्वज्ञान अधिक प्रभावी ठरले. हिंदू धर्माचा पगडा सर्वांच्याच मनावर असल्याने मूल जन्माला येण्यापासून ते मृत्यूनंतरही सर्व संस्कार हिंदू धर्माने नेमून दिलेलेच होता. स्त्री-पुरुष या समाजातील दोन मानवी घटकांच्या भूमिका आहेत. स्त्रीचे कुटुंबात स्थान हेही हिंदू धर्मात सांगितल्याप्रमाणेच आहे.

जिल्हयाची धार्मिक परंपरा मध्यकाळापासून ते आधुनिक काळापर्यंत अविरतपणे चालू आहे. प्रत्येक तालुक्याला वेगवेगळया संत महंतांची परंपरा लाभली आहे. राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक म्हणून संत व देवस्थान यांचा नावलौकिक आहे. अठरा पगड जाती आणि वर्णाश्रम

असलेल्या समाजाचे श्रध्दास्थान आहे. सर्व जाती धर्माचे लोक यात्रोत्सवामध्ये सहभागी होतात व येथील कोणत्याही शुभकार्याची सुरुवात ही ग्रामदैवतापासून होताना दिसते.

**सामाजिक परिवर्तन झालेली भौतिक प्रगती :-**

जिल्हयाचा दक्षिण भाग हा दुष्काळी तालुक्यांचा होता. परंतु या तालुक्यांतील लहान मोठे तलाव, तळे, घोड-कुकडी कॅनॉल, याच बरोबर सरस्वती नदी, हंगानदी, सीना नदी, घोड, भीमा नदी यांमुळे तालुक्याचा पाणीप्रश्न हा काही प्रमाणावर सुटला राज्याच्या सर्व भागांमध्ये जोडणारी रेल्वे लाईन आहे. रस्तेही सर्व मोठया शहरांना जोडण्यासाठी आहेत. परंतु जसजशी सोयीसुविधा वाढत जाऊ लागल्या तसेकाही गोष्टींची टंचाई जाणवू लागली. परंतु व्यापार, दळणवळण आणि वाहतूक छोटया-छोटया खेडयांपर्यंत आणि ग्रामीण तसेच डोंगराळ भागापर्यंत पोहचली आहे. त्यामुळे येथील भागाचा विकास झाला. परंतु तो पूर्णपणे झाला असे नाही. व्यापार उद्योग वाढला, लोक श्रीमंत झाले. किमान अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टी प्राप्त झाल्या. तालुक्यांमध्ये सहकारी साखर कारखानदारी, दूध संस्था इतर लहान-मोठे उद्योग वाढले. शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध झाल्या. गाव तेथे विद्यालय, महाविद्यालय, कृषी पदविका, डेअरी दुग्ध पदविका, इंजिनिअरींग पदविका, डी.एड्., शिक्षणशास्त्र महाविद्यालय अशा शैक्षणिक सोयी सुविध उपलबध झाल्या. ग्रामपंचायती, नगरपालिकेच्या माध्यमातून तालुक्यांचा शहरातील लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ झाली. काही प्रमाणात प्रदूषण, गर्दी, बेकारी वाढलेली दिसते. शहरापासून काही अंतरावर ग्रामीण प्रदेश पसरला असल्याचे दिसते. काही ठराविक भाग पाण्यापासून वंचित राहिल्यामुळे त्या भागातील शेतीचा विकास झाला नाही. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ त्यातील लागवडयोग्य क्षेत्रात पाण्याच्या उपलब्धतेनुसार गहू, ज्वारी, करडई, बाजरी, ऊस ही प्रमुख पिके घेतली जातात. या पिकांबरोबरच तालुक्यात लिंबू, द्राक्षे, डाळींब आणि विविध प्रकारच्या फळबागा पाण्याच्या उपलब्धतेनुसार आढळतात. त्या माध्यमातून उत्पादन मोठया प्रमाणात होते. ग्रामीण क्षेत्रामध्ये शेतीचा विकास झाला आहे. साखर कारखाने, दूध उद्योग, शैक्षणिक संस्था इत्यादीमुळे भौतिक विकास नियोजनबध्द झाला. त्यामुळे दक्षिणेतील तालुके स्वावलंबी झाले असे म्हणण्यास हरकत नाही. एकूणच तालुक्यांचे समाजजीवन पाहता विविध जाती धर्मांचे लोक दिसून येतात.

सण उत्सव, समारंभ, विवाह पध्दती, सांस्कृतिक परंपरा ही फारशी वेगळया स्वरुपाची नसून महाराष्ट्राने जोपासलेल्या संस्कृतीचे संवर्धन केलेले दिसून येते. यावरुन एकूण दक्षिणेतील तालुक्याचे समाजजीवन आणि वैशिष्टये लक्षात येते.

**समारोप :-**

राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय इतिहास लेखनाबरोबरच स्थानिक पातळीवरील इतिहास ज्याला आपण प्रादेशिक इतिहास म्हणतो की ज्याचा इतिहासलेखनशास्त्रात मोठया प्रमाणावर वापर होताना दिसतो. इतिहास लिहित असताना स्थानिक इतिहासाचे महत्त्व व शास्त्रशुध्द इतिहास लिहिणे आवश्यक आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेला अहमदनगर जिल्हा आजच्या गतिशील जीवनातही ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, परंपरा जीर्णावस्थेत सांभाळत आहे.

अहमदनगर जिल्हयाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, अक्षवृत्तीय, रेखावृत्तीय विस्तार, प्रशासकीय विभाग, हवामान, पाऊस, प्रमुख नद्या, भूवैशिष्टये व भूरचना, प्रमुख पिके, दळणवळण, उद्योगधंदे, दक्षिण नगरमधील तालुके त्यांचे क्षेत्रफळ, तालुकानिहाय लोकसंख्या यांचा अभ्यास केला व सविस्तर मांडणी केलेली आहे.

अहमदनगरची ऐतिहासिक पार्श्वभूमी, अहमदनगरची निजामशाही, भुईकोट किल्ला, पंडित नेहरु, नगर किल्ल्यावर युनियन जॅक, चाँदबिबी, नगर शहरात छ. शिवाजीमहाराज, चौथे शिवाजीमहाराज अशा विविध ऐतिहासिक घटनांचा अभ्यास केला आहे.

जिल्हयाची धार्मिक परंपरा मध्यकाळापासून ते आधुनिक काळापर्यंत अविरतपणे चालू आहे. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागाचा अभ्यास करत असताना प्रत्येक तालुक्याला वेगवेगळया संत महंतांची परंपरा लाभली आहे. राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक म्हणून संत व देवस्थान यांचा नावलौकिक आहे. अठरा पगड जाती आणि वर्णाश्रम असलेल्या समाजाचे श्रध्दास्थान आहे. सर्व जाती धार्माचे लोक यात्रोत्सवामध्ये सहभाग घेतात आजही समाजव्यवस्थेवर भारतीय संस्कृतीची छाप आहे. पर्यटनस्थळांचा विचार करता दक्षिणेत असणाऱ्या तालुक्यांमध्ये अष्टविनायकापैकी सिध्दीविनायक देवस्थान कर्जत तालुक्यात आहे. तसेच काळविट व हरिणांचे माहेरघर असणारे रेहकुरी अभयारण्य कर्जत तालुक्यात आहे. जामखेड तालुक्यात ऐतिहासिक खर्डा किल्ला, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे जन्मस्थान चौंडी सीना नदीकाठी आहे. श्रीगोंदा तालुक्यात ऐतिहासिक बहादूरगड भीमेकाठी आहे. ज्याला आज 'धर्मवीर गड'

नावाने संबोधले जाते. समाजभूषण, समाजसेवक, अण्णा हजारे यांचा पारनेर तालुका कुकडी नदीवरील निघोजचे रांजणखळगे तसेच राळेगणसिध्दी हे पर्यटकांचे स्थान आहे. तसेच नगर तालुक्यातील डोंगरगण, जिल्हयातील वैशिष्टयपूर्ण परदेशी पर्यटकांचे धार्मिक पर्यटनस्थळ म्हणजे अहमदनगर शहरापासून काही अंतरावर असणारे अवतार मेहेरबाबा समाधी अशी विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनस्थळे दक्षिणनगर मधील विविध तालुक्यात आहेत.

जिल्हयाच्या दक्षिण भागात असणाऱ्या धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनस्थळामुळे स्थानिक लोकांना उद्योगधंदे व्यवसाय, रोजगार निर्माण झाल्याचे दिसते व काही प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला त्या माध्यमातून स्थानिक लोकांना आर्थिक हातभार लागल्याचे दिसून येते. यातून ग्रामीण विकास व परिस्थितीत बदल झाला.

दक्षिणेकडील तालुक्यांचे समाजजीवन अभ्यासत असताना येथील राजकारण, आर्थिक व्यवहार, सामाजिक संबंध, वैचारिक देवघेव, भावनिक एकात्मता यात वेगळेपण आहे. बहुसंख्य लोकांनी हिंदू धर्माचाच स्वीकार केलेला आहे. हिंदूंचेच तत्वज्ञान प्रभावी ठरते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत हिंदू धर्माने नेमून दिलेले संस्कार होतात. स्त्री, पुरुष समाजातील दोन मानवी घटकांच्या भूमिका आहेत.

जिल्हयाचा दक्षिण भाग हा दुष्काळी तालुक्यांचा परंतु तालुक्यांतील लहान-मोठे पाटबंधारे प्रकल्प, विसापूर प्रकल्प विसापूर ता. श्रीगोंदा, सीना प्रकल्प, निमगांव ता. कर्जत, खैरी प्रकल्प वंजारवाडी ता. जामखेड, येरढा प्रकल्प कोपरे ता. पाथर्डी, पारगांव घाटशिळ प्रकल्प पारगांव ता. पाथर्डी, मांडओहोळ प्रकल्प तालुका पारनेर या मध्यम प्रकल्पामुळे तालुक्यातील बारमाही व हंगामी क्षेत्र ओलिताखाली आहे."[६०] घोड, कुकडी कॅनॉल तसेच भीमा, घोड, सीना, हंगा, कुकडी नदी यामुळे पाणीप्रश्न काही प्रमाणात सुटला शेती विकासाबरोबर काही प्रमाणात उद्योगधंदे वाढले. अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी प्राप्त झाल्या. साखर कारखानदारी वाढली, शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची सोयीसुविधा उपलब्ध झाल्या, रोजगार प्राप्त झाले. परंतु पाण्यापासून सोयीसुविधा उपलब्ध झाल्या. रोजगार प्राप्त झाले. परंतु पाण्यापासून वंचित राहिलेल्या प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीचा विचार करता काही भागाचा शेतीविकास झालेला नाही.

विविध संस्थांच्या, उद्योगांच्या माध्यमातून भौतिक विकास नियोजनबध्द करण्याचा प्रयत्न झाला. दक्षिणेतील तालुके स्वावलंबी बनले म्हणण्यास हरकत नाही. जिल्हयाचे

समाजजीवन पाहता महाराष्ट्राने जोपासलेल्या संस्कृतीचे संवर्धन झाल्याचे दिसून येते व यातूनच पुढे समाजजीवनात झालेला बदल व त्यातून निर्माण झालेली चळवळ राजकीय नेत्यांचा उदय आपणास दिसून येतो व यातूनच जिल्हयात व जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय संस्था उभ्या राहिल्या आहेत.

## तळटिपा

१) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९१-९२, पृष्ठ. १४.

२) कित्ता; पृष्ठ. १७.

३) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११, पृष्ठ. ३.

४) www.ahmednagar.nic.in/gazetteer/geography,page १, २.; सु.ना. म्हस्के, *"नगर गौरव"*, रेखा सु. म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथम आवृत्ती, २००९, पृष्ठ - ९.

५) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९०-१९९१, पृष्ठ. १९.

६) कित्ता; पृष्ठ. १९.

७) www.ahmednagar.nic.in/gazetteer/geography,page ५.; रा.नी. देशमुख *"आपला अहमदनगर जिल्हा"* कल्पना प्रकाशन, नांदेड, सुधारित आवृत्ती, २०११, पृष्ठ. ११.

८) कित्ता; पृष्ठ. ९.

९) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"* उपरोक्त, १९९०-९१, पृष्ठ. १९.

१०) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२-९३, पृष्ठ. १२.

११) सु.ना. म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ९.

१२) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९२-९३, पृष्ठ. १२.

१३) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा,"* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१०-११, पृष्ठ. ५.

१४) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९२-९३, पृष्ठ. १३.

१५) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, २०१०-११, पृष्ठ. ४.

१६) लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), *"मराठी विश्वकोश खंड - १"*, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६, पुनर्मुद्रण - २०००, पृष्ठ. २४१.

१७) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९२-९३, पृष्ठ. १३.

१८) सु.ना. म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ५८.

१९) कित्ता; पृष्ठ. ५९.

२०) कित्ता; पृष्ठ. ६०.

२१) सुरेश जोशी, *"अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्य-संग्राम"*, (१८१८-१८४७), अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, प्रथमावृत्ती, १९९३, पृष्ठ. ४९.

२२) सु.ना. म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ६१.

२३) कित्ता ; पृष्ठ. ६१, ६२.

२४) कित्ता; पृष्ठ. ६३, ६४.

२५) कित्ता; पृष्ठ. ६४.

२६) सुरेश जोशी, उपरोक्त, पृष्ठ. - ६३.

२७) कित्ता; पृष्ठ. ६४.

२८) कित्ता; पृष्ठ. ६६, ६७.

२९) कित्ता; पृष्ठ. ६८.

३०) सु.ना. म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. १०५, १०६

३१) कित्ता; पृष्ठ. ११०.

३२) कित्ता; पृष्ठ. १११.

३३) Gazetteer of India, Maharashtra state, Gazetteer Deccan, Chapter XIV Page (File No.) 716, 1885.; सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ क्र. १११, ११२.

३४) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ११७.

३५) कित्ता; पृष्ठ. ११८.

३६) कित्ता; पृष्ठ. ३१०.

३७) कित्ता; पृष्ठ. ३११.

३८) कित्ता; पृष्ठ. ३१२.

३९) कित्ता; पृष्ठ. ३१५.

४०) कित्ता; पृष्ठ. ३१६.

४१) कित्ता; पृष्ठ. ३१७.

४२) कित्ता; पृष्ठ. ३३१.

४३) कित्ता; पृष्ठ. ३३३.

४४) कित्ता; पृष्ठ. ३३६.

४५) कित्ता; पृष्ठ. ३४१.

४६) कित्ता; पृष्ठ. ३४२, ३४३.

४७) कित्ता; पृष्ठ. ३४८.

४८) कित्ता; पृष्ठ. ३५१.

४९) कित्ता; पृष्ठ. ३५२, ३५३.

५०) कित्ता; पृष्ठ. ३५६.

५१) कित्ता; पृष्ठ. ३६०, ३६४.; अशोक नेवासकर, *"श्रीगोंदा तालुक्याची ऐतिहासिक पाहणी",* अहमदनगर, डिसेंबर १९६९, पृष्ठ क्र. ८५, ८६.

५२) अशोक नेवासकर, उपरोक्त, पृष्ठ. ८६.

५३) सु.ना. म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ३७४.

५४) कित्ता; पृष्ठ. ३७५.

५५) कित्ता; पृष्ठ. ३७६.

५६) कित्ता; पृष्ठ. ३७९.

५७) कित्ता; पृष्ठ. ३८५.

५८) य.ना. कदम, *"समग्र भारताचा इतिहास"*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००३, पृष्ठ. १५.

५९) विश्वंभर कुलकर्णी, सुधा काळदाते, *"उदयोन्मुख भारतीय समाज संस्कृती आणि शिक्षण"*, श्री विद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पुणे, २००७, पृष्ठ. २४.

६०) कार्यकारी अभियंता, अहमदनगर, *"पाटबंधारे विभाग अहवाल"*, अहमदनगर, १९९५, पृष्ठ. ५.

# प्रकरण - २

# अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थिती

# प्रकरण - २

## अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थिती

### २.१ प्रस्तावना -

"मनुष्य जेव्हापासून समूह करुन राहू लागला तेव्हापासून समूहाच्या नेतृत्वासाठी सत्तासंघर्ष सुरु झाला असावा. निसर्गतःच प्रत्येकाला दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याचा मोह निर्माण होत असतो. लहान मुलांमध्येही अशी नेतृत्वाची भावना दिसून येते. कळप करुन राहणाऱ्या पशू-प्राण्यांतही ही भावना रुजलेली असते. समूहाचे नेतृत्व प्राप्त झाल्यानंतर आपोआपच सत्ताधारी आणि त्यांच्या तत्त्वात असलेल्या लोकांमध्ये हक्क आणि कर्तव्याची नियमावली तयार होत असते. ही राजकीय सत्तेची हक्कविषयक नियमावली हजारो वर्षांपासून सुरु असल्याने राजकीय सत्ता हा नेहमीच राजकीय चिंतनाचा केंद्रबिंदू राहत आलेला आहे. सत्ताधाऱ्यांनी हवे तसे नियम तयार करायचे आणि ते प्रजेवर लादायचे असा सिलसिला चालू असल्याने प्रजेच्या बाजूने कोणीही फारसे पुढे येत नसत."[१]

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिणेकडील तालुक्यात तरी सत्ता या संकल्पनेचा सर्वांगीण विचार समाजचिंतकांनी केला. राजकीय सत्ता व प्रशासन एवढाच नेत्यांचा विचार सीमित नव्हता. तर सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक दिसणाऱ्या बाबींच्या मुळाशी असलेल्या राजकीय बाबींचा सुध्दा त्यांनी शोध घेतला. राजकीय सत्ता ही जशी विशुध्द असते तसेच भ्रष्टही असते. सत्ता जर विशुध्द स्वरुपाची असेल तर जनतेचा विकास हात असतो. राजकीय सत्ता ही समाजपरिवर्तनाचे एक साधन म्हणून फार महत्त्वाची भूमिका पार पाडण्यास समर्थ असते.

नेतृत्व म्हणजे द्रव्यलोभ न करणार, सारासार विचार करुन प्रत्येक पाऊल उचलणारं, सततोद्योगी, निर्भय, सावध जनतेला जीव लावणारं व तिच्या सुखासाठी झटणार सर्वोत्तम नि आदर्श असते. नेत्यांचे विचार हे अगदी स्पष्ट नि परखड स्वरुपाचे असावेत. त्यांचे विचार त्या कळात न पटणारे जरी असले तरी ते वास्तवावर आधारित आहेत. नेते ज्या लोकांचे प्रतिनिधित्त्व करतात ते सर्व काबाडकष्ट करणारे, त्यांचे अश्रु पुसण्यासाठी ते अहोरात्र कार्य करीत आहेत. ज्या समाजाशी नाळ जोडली त्या समाजापासून ते दूर गेलेले दिसत नाहीत. ते समाजाशी सतत विविध माध्यमातून संवाद साधतात.

नेत्यांचा पिंड हा तसा समाजाच दुःख जाणून घेऊन त्यावर फुंकर घालणारा एक दिलदार समाजसुधारक आहे. राजकीय कार्य करताना लोकांशी हितगुज साधून त्यांच्याशी एकरुप होणे. शेतकरी, कामगार, पीडितांचे दुःखनिवारण करण्यासाठी ते अहोरात्र तळमळत असतात. म्हणजे सामाजिक कार्य करीत ते किती उत्तुंग आहेत नि किती विचारी आहेत हे लक्षात येते.

आजपर्यंत या जगात अनेक महात्मे युग पुरुष नेते होऊन गेले आहेत व त्यांनी त्यांच्या समाजासाठी उत्तुंग कार्य केले. कीर्ती संपादन केली, विशिष्ट लोकोत्तर कार्यामुळे व लोकसंग्रहामुळे असे नेते अजरामर होतात व झाले आहेत. हे महात्म्य, नेते विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले असतात. अविरत कष्ट, अफाट लोकसंग्रह आपल्या समाजाबद्दल प्रेम, करुणा, उदंड आत्मविश्वास, कर्तव्य कठोरता संस्था चालविण्यासाठी सत्वगुणयुक्त रजोगुण, दुर्दशित्व, द्रष्टेपणा समाजाची उन्नती करण्याची तीव्र इच्छा हे गुण लोकोत्तर कार्य करणाऱ्यांमध्ये असतात. आजच्या काळात लोकोत्तर कार्य करणाऱ्या नेत्यांचा अभ्यास कशासाठी करावयाचा हा प्रश्न पडल्याने त्याचे उत्तर शोधत असताना सामान्य खडतर जीवन जगणाऱ्या समाजाला त्यांचे जीवन सुसहय बनविण्यामध्ये नेत्यांचा वाटा निश्चितपणे असतो. अशा नेत्यांच्या कार्यामुळे अनेकांचे संसार फुललेले असतात.

इतिहासामध्ये आतापर्यंत झालेले युध्द वेगवेगळया राजांचे सत्ता हुकूमत गाजविण्याची सुप्त इच्छा, झालेली युध्दे, मिळालेले विजय यांची वर्णने दिसतात. पैसा, संपत्ती, भोगवस्तू, काम यापासून मानवी मनाला समाधान प्राप्त होते किंवा होत असते असे वाटते. अगदी त्याप्रमाणे अधिकार गाजवायला मिळाला युध्दामागची ही महत्त्वाची प्रेरणा आहे. युध्द या उक्तीचे प्रतीक आहे. स्वतः व स्वतःचा वंश यांना टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने उपजत प्रवृत्तीला महत्त्व आहे. मनुष्याच्या बुध्दीचा खूप विकास झालेला असल्यामुळे या मूलभूत प्रवृत्तीला अनेक असंख्य शाखा उपशाखा फूटल्या आहेत. युध्द प्रवृत्ती हा मानवी स्वभावाचा एक गुण असल्यामुळे इतिहास हा संघर्षाचा बनला आहे. परंतु काळाच्या ओघात इतिहास झपाटयाने बदलतो आहे. आता माणसाच्या प्रयत्नाचा, माणसाच्या विकासामागील कारणाचा वेगवेगळया बदलत्या आर्थिक स्थितीचा वेग इतिहास देतो आहे.

दक्षिणेतील बऱ्याच नेत्यांचा जन्म पारतंत्र्याच्या कालखंडातील जन्म व बालपण प्रामुख्याने परतंत्र्य व स्वातंत्र्याच्या मध्यावरती गेले. यांच्या बालपणाच्या वाटचालीतच १९४२ चा काळ हा स्वातंत्र्याच्या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा होता. संपूर्ण हिदुस्थान गुलामिगरीच्या शृंखला तोडून टाकण्याच्या तयारीला लागला होता. संपूर्ण वातावरणही मूळात देशप्रेमाने भारलेले होते. अशा परिस्थितीमध्ये शिक्षणाचा फायदा आपल्या समाजाला कसा होईल याचा प्रयत्न प्रत्येक नेत्यांनी केला. प्रत्येक नेत्याला सामाजिक व धार्मिक कार्याची आवड होती. घरातील सर्वांच्याच विचारांचा व आचारांचा परिणाम होऊन नेते सामाजिक व राजकीय कार्यात ओढले गेले.

महात्मा गांधीच्या प्रभावी नेतृत्वाने व अहिंसामय मार्गाने पुकारलेला लढा खेडयापाडयात आणि घराघरात पोहचलेला होता. ब्रिटिशांच्या विरोधी "भारत छोडो" असा नारा देऊन प्रभावी जनआंदोलन सुरु होते. भारतीय स्वातंत्र्यलढयात अहमदनगर जिल्हयातून अण्णासाहेब शिंदे, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, चंद्रभान आठरे पाटील, भाऊसाहेब थोरात, बापूसाहेब भापकर, बन्सीलाल कोठारी, बाळासाहेब भारदे, रावसाहेब म्हसके, दादापाटील राजळे, नवनीतभाई बार्शीकर, पी.बी.कडू पाटील, रावसाहेब शिंदे, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील अशा अग्रेसर नेत्यांच्या कार्याची प्रेरणा दक्षिणेतील नेत्यांच्या मनावर ठसली.

८ ऑगस्ट १९४२ ला भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीने एक वेगळीच कलाटणी घेतली होती. महात्मा गांधी हे संयमी वृत्तीने चळवळ पुढे नेत होते. जवळ जवळ २०-२२ वर्षे त्यांनी राष्ट्रीय आंदोलन सत्य-अहिंसेच्या मार्गाने नेऊन स्वातंत्र्य चळवळ प्रखर बनविण्याचा प्रयत्न केला. परंतु इंग्रज सरकारवर त्याचा काहीही परिणाम होत नव्हता. गांधीजींचा देखील संयम सुटत चालला होता. शेवटी ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी इंग्रजांना "चले जाव" असा आदेश देऊन "करेंगे या मरेंगे" असा नारा देऊन प्रसंगी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्राणाची आहुती देण्याचे आवाहन केले. या घटनेने ब्रिटिश सरकारचे माथे भडकले व त्यांनी प्रमुख भारतीय नेत्यांना अटक करण्याचे सत्र सुरु केले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधीसह अनेक प्रमुख नेत्यांना अटक झाल्यामुळे "चले जाव" आंदोलनाचे प्रमुख नेतेच कारावासात गेले. प्रमुख नेते कारावासात गेले

म्हणुन आंदोलन थांबले नाही तर अधिक तीव्र बनले. अहमदनगर जिल्हाही त्याला अपवाद नव्हता. काँग्रेसमधील सोशॅलिस्ट अरुण असफ आली, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, जयप्रकाश नारायण, साने गुरुजी इत्यादी मंडळी देखील "चले जाव चळवळ" खेडयापाडयापर्यंत पोहचवण्यासाठी भूमिगत होऊन कार्य करत होते. त्याच दरम्यान साताऱ्याकडे नाना पाटलांनी पत्री सरकारची स्थापना केली. ब्रिटिश विरोधी वातावरण तापत चालले होते. त्यामुळे ब्रिटिशांनी देखील दडपशाहीचा मार्ग अवलंबला. नेत्यांची धरपकड तर केलीच परंतु त्याच बरोबर क्रांतिकार्याशी संबंध आहे अशा संशयितांना संशयावरुन तुरुंगात डांबले. त्यामुळे क्रांतिकारक भूमिगत होऊन आपला लढा चालवू लागले. "अहमदनगर जिल्हयात अण्णासाहेब शिंदे, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, पी.बी. कडू पाटील, चंद्रभान आठरे, पी.जी. भांगरे, धर्मा पोखरकर ही मंडळी भूमिगत झाली होती." स्वातंत्र्यलढयात सहभागी बापूसाहेब भापकर १ वर्षे कारावास तर बन्सीलाल सुवालाल कोठारी १९४२ च्या चले जाव चळवळीत योगदानाबद्दल नवनीतभाई बार्शीकर यांना ताम्रपत्र प्राप्त झाले हे सर्व जिल्हयातील नेत्यांनी बालपणात पाहिले व तरुणपणात अभ्यासले. त्यामुळे नेते राजकीय कार्यात सक्रीय झाले व राजकारणातून सामाजिक विकास हा ध्यास त्यांनी घेतला.

दक्षिणेतील तालुक्याची भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे. त्या सफारीतील आम्ही प्रवासी आहोत. ही सफर तुम्हाआम्हाला पुरी करावयाची आहे. ती सफर आज मला माझ्या डोळयांसमोर दिसते आहे. वीजेच्या प्रकाशाने लखलखल्यासारखी मला दिसते आहे. ती लांबची सफर आहे, कष्टाची सफर आहे. उद्योगाची सफर आहे. पण ती पुरी केलीच पाहिजे. कारण त्यात जनतेचे कल्याण आहे. समाजाचे निष्ठावंत प्रचारक, समकालीन वास्तवाचे भान ठेवून जीवनाच्या सर्वांगीण क्षेत्रात पुरोगामी भूमिका घेऊन लढणारे नेते आहेत. समाजातील दीन-दलित, वंचित उपेक्षित, गोरगरीब, शेतकरी, कामगार, व्यावसायिकांचे प्रश्न सोडवताना ते कधी स्थिरावलेले दिसत नाहीत. राजकीय कार्य करीत असताना वाणी आणि कृती यांच्या साहाय्याने आपल्या व्यापक ध्येयाशी ते समरस होत गेले आहेत. राजकीय भूमिका स्पष्ट करताना हे नेते म्हणतात, "राजकारणात प्रत्येकाचे मत आणि कल पूर्णतः राष्ट्रीय

पक्षाकडे होता आणि आहे तथापि, आम्ही कोणत्याही पक्षाशी तादात्म्य पावलो नाही पण मत स्पष्ट सांगायला आणि तद्नुरुप वागायला आम्ही कधीच घाबरलो नाही."

यशाने हुरळून जायचं नाही आणि अपयशाने नाऊमेद व्हायचं नाही. सकारात्मक व विधायक वृत्तीने पक्षाबरोबर, तसेच सर्वसामान्याच्या प्रश्नांची अभंग निष्ठा ठेवून सतत लढणारे नेते म्हणून दक्षिणेतील नेत्यांची ओळख जिल्हयातच नव्हे, तर राज्यात व देशातही आहे. सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय असणारे हे व्यक्तिमत्त्व आपल्या तालुक्यातील सामान्यांच्या विविध प्रश्नांसाठी अहोरात्र झटत आहेत.

**२.२ नगर जिल्हयातील कम्युनिस्ट चळवळ :-**

"आधुनिक भारतामध्ये उच्चभ्रू बुध्दिजीवी वर्गामध्ये जागृती सुरु झाली. कष्टकऱ्यांच्या कनिष्ठ वर्गापर्यंत ही जागृती झिरपायला काही काळ जावा लागला. पण एकदा कष्टकऱ्यांमध्ये नव्या जाणिवा जागृत झाल्यानंतर भारताच्या राष्ट्रीय चळवळीला नवे व अर्थपूर्ण परिणाम प्राप्त झाले. अभिजन वर्गापुरती मर्यादित राष्ट्रीय चळवळ बहुजन समाजापर्यंत पोहोचली. तेव्हा तिला जोम प्राप्त झाला. काळाच्या ओघत राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कष्टकऱ्यांच्या चळवळीत सदस्यांची दखल घ्यावी लागली. मात्र, ही दखल पुरेशी नसल्याने कष्टकऱ्यांच्या चळवळी स्वातंत्र्य आंदोलनाशी पूर्णपणे एकजीव झाल्या नाहीत. कष्टकऱ्यांच्या चळवळींनी स्वातंत्र्य आंदोलनाशी नाते जोडले, पण गरजेनुसार आपले स्वतंत्र अस्तित्वही कायम राखले. समाजवाद हे कष्टकऱ्यांच्या हक्कांचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान आहे. भारताच्या आधुनिकतेला आकार देणाऱ्या घटकांपैकी, समाजवादाचा उदय हा एक महत्त्वपूर्ण घटक होता. भारताच्या राष्ट्रीय जागृतीने हे जे जनताभिमुख वळण घेतले ते महत्त्वपूर्ण आहे."[२]

शेतकरी आणि कामगार हे भारतीय समाजातील कनिष्ठ वर्ग होते. परकीय सत्ताधाऱ्यांकडून आणि स्वकीय समाजातील वरिष्ठ वर्गीयांकडून या कष्टकरी वर्गाचे जे शोषण होत होते, त्या विरुध्दचा असंतोष हळूहळू संघटित होत गेला. या असंतोषाचा उद्रेक त्यांच्या चळवळीमधून झाला. परिणामी, कष्टकऱ्यांना काही हक्कांची प्राप्ती झाली, त्यांची परिस्थिती काही प्रमाणात सुधारली आणि भारताची राष्ट्रीय चळवळ अधिक जनताभिमुख बनली.

ब्रिटीश कालखंडात महसुलाची पध्दत बदलली. रोख व वक्तशीर महसूल भरणा आवश्यक बनला. खेडयांची स्वयंपूर्णता संपुष्टात आली. पारंपरिक उद्योगांचा ऱ्हास झाला. शेतीवरील भार प्रचंड वाढला. शेतीचे व्यापारीकरण झाले. या व्यापारीकरणाची कुऱ्हाड आदिवासींच्या जंगल जमिनीवर सुध्दा कोसळली. जमिनदार, वसुली अधिकारी, सावकार, दलाल यांनी हरप्रकारे शेतकऱ्यांमध्ये शोषण करण्यास सुरुवात केली. या साऱ्या परिस्थिती विरुध्द शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसू लागला. महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले आणि त्यांचा "सत्यशोधक समाज" यांनी शेतकऱ्यांचा कैवार घेतला. 'शेतकऱ्याचा असुड', 'गुलामगिरी' इ. ग्रंथामधून शेतकऱ्यांच्या दैन्याची व शोषणाची रोखठोक कारणमीमांसा फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या 'दिनबंधू' मुखपत्रातून करुन शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडली.

ब्रिटिशांच्या रयतवारी पध्दतीमुळे जमीनधारक शेतकऱ्यांचा वर्ग निर्माण झाला. या वर्गात वरिष्ठ, मध्यम, कनिष्ठ असे स्तर पडले. अतिरिक्त शेतसारा, अल्प जमिन धारणा, जमिनीचे विभक्तीकरण, वाढता कर्जबाजारीपणा इत्यादी गोष्टीमुळे जमीनधारक शेतकऱ्यांची दुर्दशा वाढत गेली. त्यांच्या मधील वरिष्ठ आणि कनिष्ठ स्तरामधील दरी वाढू लागली. मध्यम स्तरातील शेतकरी अधिकाधिक प्रमाणात कनिष्ठ स्तरात समाविष्ट होऊ लागले. जमीनदारी पध्दती खालील कुळांच्या तुलनेने रयतवारी पध्दतीतील जमीनधारकांमध्ये राष्ट्रीय जागृती लवकर घडून आली कारण जमीनदारी पध्दतीत सरकार व कुळ यांच्यात जमीनदार हे मध्यस्थ होते. खंड देण्यावरुन कुळांचे जमीनदारांशी संबंध व संघर्ष होत असत. त्यांचा असंतोष प्रामुख्याने स्वदेशी समाजातील जमीनदार सावकार वर्गावरच केंद्रित झाला होता. याउलट रयतवारी पध्दतीतील जमीनधारक शेतकऱ्यांचा थेट सरकारशी संबंध येत असे. त्यामुळे त्यांच्यात परकीय सरकार विरुध्द असंतोष लवकरच जागृत झाला.

'भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व राष्ट्रीय सभेकडे होते. काँग्रेसच्या छत्राखाली देशातील विविध चळवळी एकत्र येऊ लागल्या. त्यामध्ये शेतकरी चळवळीचाही समावेश होता. पहिल्या महायुध्दाच्या काळात होमरुल आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी असंतोषाचे लोन ग्रामीण भागापर्यंत पोहचवले. अनेक शेतकऱ्यांनी सरकारच्या युध्दफंडाला पैसा देण्याचे नाकारले. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या चळवळीला व्यापक स्वरुप प्राप्त झाले. शेतकरी,

कामगार, स्त्रिया, समाजातील घटक या चळवळीत सामील होऊ लागले. खरा भारत खेडयात आहे याची जाण महात्मा गांधीच्या कार्यक्रमात राखली गेली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सुरुवातीपासूनच त्यांचे लक्ष गेले. अशा रीतीने शेतकरी व कामगारांचे प्रश्न स्वातंत्र्याच्या अगोदरच्या काळात महत्त्वाचे होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जे नेते होते, त्यांच्याकडून व काँग्रेस पक्षाकडून शेतकऱ्यांचे व कामगारांचे प्रश्न सुटणार नाहीत असे वाटल्यामुळे शेतकरी व कामगारांच्या हितासाठी महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्षाची चळवळ जोमाने सुरु झाली.'[३]

'कम्युनिस्ट पक्षाने १९५२ मध्ये निवेदन काढून भारतातील क्रांतिकारकांना देशातील लोकशाही क्रांती पुढे नेण्यासाठी पक्षात येण्याचे आवाहन केले होते. अनेकांनी यास प्रतिसाद दिला. बापूराव जगताप यांनी प्रयत्न केले आणि विचारांती नाशिक जिल्हयात रानवट येथे कम्युनिस्टांची परिषद भरली. या परिषदेत अनेकांनी या पक्षात प्रवेश केला. परंतु या पक्षाबद्दल त्याकाळीही आणि आजही फारसे चांगले मत दिसून येत नाही. या पक्षाला कोणी देशद्रोही समजते तर कुणी अतिरेकी, कारण श्रमिकांची बाजू मांडणारा हा पक्ष आहे.'[४]

'महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्षाची चळवळ जोमाने सुरु झाली आणि अहमदनगर जिल्हयात ती जोमाने फोफावली. कम्युनिस्ट चळवळीने अहमदनगर जिल्हा म्हणजे जणू काही महाराष्ट्राचे केंद्रच बनले. भाई सथ्था, चंद्रभान आठरे पाटील, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, पी.बी. कडू पाटील, रावसाहेब शिंदे, दादापाटील राजळे, कॉ. राम रत्नाकर, पांडुरंग भांगरे, शिवाजीराव नागवडे, रावसाहेब शेटे असे कार्यकर्त्यांचे मोहोळच कम्युनिष्ठ विचारसरणीने भारावून गेले. तसे पाहता तरुणपणीच या नेत्यांवर कम्युनिस्ट पक्षाचा पगडा पडला व ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. परंतू राजकारण न करता त्यांनी त्यातुन समाजकारण केले.

शेतीबरोबरच शेतकऱ्यांच्या हितासाठी व परिसराच्या उन्नतीसाठी दक्षिणेतील शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी जाणून घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी दक्षिणेकडील नेत्यांनी तालुक्याच्या विविध गावांमध्ये त्यांनी दौरे करुन शेतकऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांची आर्थिक स्थिती, त्यांची दयनीय अवस्था यांचे भेदक चित्रण नजरेसमोर तयार केले. शेतकरी

जगला तरच समाज जगेल. शेतकऱ्यांना या अवस्थेमधून जर बाहेर काढायचे असेल तर खूप भरीव स्वरुपाचे काम महत्त्वाचे आहे याची जाणीव नेत्यांना झाली. तालुक्यात त्यांनी कधी पायी तर कधी सायकल, बैलगाडीने फिरुन कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार केला. लाल झेंडयाची महती तालुक्याला पटवून दिली. जनतेचा मोठया प्रमाणावर पाठिंबा मिळवला.

१९५२ साली महाराष्ट्रात महादुष्काळ पडला होता. सर्व शेती धंदा आणि परिणामी ग्रामीण जीवनच कोलमडून पडले होते. ही परिस्थिती सतत महाराष्ट्राच्या वाटयाला येत होती याचा कायमचा बीमोड होऊन ग्रामीण भागातील शेतीचा विकास व्हावा आणि त्याकरिता शेती उद्योगाला मदतनीस ठरणारी पाणीपुरवठा, पतपुरवठयाच्या परंपरागत साधनसामग्रीऐवजी शेतीधंद्यात यांत्रिक सुविधांचा वापर करुन नवीन तंत्रान शेतीधंदा केला जावा व ग्रामीण कष्टकरी जीव स्वतःच्या पायावर उभे राहावे. महाराष्ट्रामध्ये याच तऱ्हेने समाज उत्थापनाच्या दृष्टीने कायमचे दुष्काळ निवारण व विकास ही चळवळ कार्य करत होती. त्याचे नेते कै. दत्ता देशमुख, कै. भाई सथ्था, बापुसाहेब भापकर आदि होते. त्यांच्या पुढाकाराने विशेषतः नगर जिल्हयामध्ये या चळवळीने जोर धरला होता. दक्षिण भागातून या चळवळीत शिवाजीराव नागवडे, शिवराम अण्णा पाचपुते, रंगनाथ पंधरकर, बापूसाहेब भापकर, दादा पाटील राजळे, कॉ. राम रत्नाकर असे अनेकजण दक्षिणेत प्रत्यक्ष काम करीत होते.

शेतकरी समुदाय व कामगार यांना एकत्रित करुन या परिस्थितीतून सावरण्यासाठी विकासाभिमुख प्रश्नांना चालना देऊन पुरोगामीत्वाचा ध्यास घेतलेली एक तरुणांची फळी जिल्हयात तयार झाली. दुष्काळातून कायमची मुक्तता होण्यासाठी नद्या अडवून त्यावर बंधारे घालून पाटपाण्याची व्यवस्था करण्याचे उत्पादक काम हातात घेऊन सरकारकडे त्यासाठी पाठपुरावा व जनआंदोलनाचा रेटा अशा पध्दतीने विशेषतः सीना धरण, घोड धरण व कुकडी धरणाला चालना देण्यासाठी ही फळी विशेष यशस्वी झाली. भविष्याचा अचूक वेध घेऊन त्याचा पाठपुरावा करणारे व एकूणच समाजजीवनाच्या विकासाची, अस्मितेची जाण असणारे चळवळीत अग्रभागी होते. मुळा, घोड, कुकडी योजनेची अंमलबजावणी प्रामुख्याने पुढे करण्यात आली.

दक्षिणेतील नेत्यांच्या नेतृत्वाखाली चळवळ संघटित होऊन तिचा रेटा अशा पध्दतीने वाढत होता. १९५४-१९५५ सालचा महाराष्ट्रातील कुळ कायदा लढा जोराने फोपावला. त्या काळी श्रीगोंदा तालुका हे त्याचे प्रमुख केंद्र होते. सावकारशाही विरुध्दचा लढा व या शेतकरी चळवळीचा परिणाम म्हणून सरकारला कुळकायदा पास कावा लागला. पुढे भाषिक राज्यनिर्मिती व त्या धोरणाची परिणती म्हणून १९५६ साली मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरु झाला. गावोगावी मिळेल त्या साधनाने फिरुन जनमत संघटित करण्याचे काम सुरु झाले. दत्ता देशमुख, अमर शेख, क्रांतीसिंह नाना पाटील, सर्व कार्यकर्ते यांनी दक्षिणेतील तालुके पिंजून काढले. लोकजागृती केली. जिल्हा एका नव्या जाणिवेने व विचाराने भारावून गेला होता. अगदी झपाटल्यासारखे सर्व तरुण पुरोगामी विचाराची दिशा घेऊन संघटित झाले होते. नेत्यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ राबवत असताना कष्टकरी वर्गाच्या भवितव्याची काळजी वाहणं, समाजातील दुबळया वर्गासाठी झटतो आहोत त्यांच्यासाठी आपले हात प्रयत्न करीत आहेत. त्याचे पुण्य आपल्याला नक्कीच मिळेल ही भावना देखील इतरांना सुखावून टाकत असे.'[५]

'घोड धरण अस्तित्त्वात आल्यानंतर श्रीगोंदे तालुक्याचे चित्र पालटू लागले. त्या काळी नगर जिल्हयात दक्षिण भागात श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी बुद्रूक येथे डहाणूकरांचा एक खाजगी साखर कारखाना होता. या कारखान्यात कामगारांवर प्रचंड दडपशाही व शेतकऱ्यांची अडवणूक होत होती. डहाणूकरांना तडीपार करण्याचा ध्यास घेऊन शिवाजीराव नागवडेंनी शेतकऱ्यांना संघटित करुन आपल्या मालकीचा कारखाना उभा करण्याचा व त्यासाठी भाग भांडवल गोळा करुन रजिस्ट्रेशन करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. त्याकाळी सत्तारुढ पक्षात कार्यरत असणारी काँग्रेस पक्षातील मंडळीही या कामात धावून आली व काँग्रेससह डाव्या विचारांच्या कार्यकर्त्यांनी बापूंची ही मागणी उचलून धरली. बापूंसहीत सुरुवातीचे बोर्ड नॉमीनेट करण्यात आले. जनतेच्या आर्थिक मागासलेपणाची मोठी अडचण निर्माण झाली. आर्थिक टंचाईमुळे इच्छा व नेतृत्वावर विश्वास असून सुध्दा लोक शेअर्स खरेदी करण्यात शेतकरी हतबल ठरले. पण बँकांची मदत घेऊन लोकांना शेअर्स मिळवून देण्याचे मोठे काम नागवडेंनी केले. या कामकाजात नगर जिल्हयातील अण्णासाहेब शिंदे, बाबूराव दादा तनपुरे, खासेराव काका वाबळे, आबासाहेब लगड, बापूसाहेब जामदार अशा सर्वांचेच सहकार्य लाभले.

राज्य व केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना नगर जिल्हयात मात्र लाल बावटा दिमाखाने फडकत होता. डाव्या चळवळीतील एक अग्रणी कॉम्रेड म्हणून नागवडेंची तेव्हा ओळख होती. डाव्यांच्या वर्चस्वाखाली नगर जिल्हयात दक्षिणेत उभा राहिलेला पहिला कारखाना म्हणून श्रीगोंदाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.'[६]

'२ ऑक्टोबर १९५२ रोजी नेहरुंनी अलिपूर येथे भाषण केले. आपल्या मायभूमीचे सर्वजण घटक आहोत. तिच्या सेवेसाठी आपण तत्पर असले पाहिजे. त्यासाठी आपणास अविश्रांत परिश्रम करावे लागते. प्रसंगी आपण आपले रक्त सांडण्यास तयार असले पाहिजे. आपले परिश्रम आपल्या कोटयावधी देश बांधवांना प्रगती पथावर नेण्यास त्यांच्या हालअपेष्टा सहन करण्यास कारणीभूत होते. राष्ट्रीय नेत्यांच्या आव्हानामुळे गावागावात अनेक तरुण कार्यकर्ते कामाला लागले. मायभूमीची सेवा आणि जनतेचा विकास हाच निजीध्यास बनला. वादविवाद करुन चर्चा करुन काहीही साध्य होणार नाही. सहकार्याने व शांततापूर्वक मार्गाने क्रांती घडवून आणण्याची मनीषा बाळगली पाहिजे असेही आवाहन नेहरुंनी केले होते. नेहरुंना अपेक्षित असणाऱ्या क्रांतीचे दूत म्हणून अनेक कार्यकर्ते कामाला लागले होते.'[७] ऑक्टोबर १९५३ रोजी नेहरुंनी भारतातील आमकार्यकर्त्यांना एक संदेश दिला होता. नेहरुंचे हे भाषण कुरुक्षेत्रवर झाले होते. नेहरु म्हणाले होते, भारताच्या इतिहासात या भूमीवर एक ऐतिहासिक युध्द लढले गेले आहे. या भूमीवर आपण निराळया स्वरुपाच्या युध्दास प्रारंभ करीत आहोत हे युध्द, आपले दोष, दारिद्रय आणि अज्ञान या विरुध्द आहे.

काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून जिल्हयातील नेत्यांनी नेहरुंच्या संदेशाप्रमाणे शेतकऱ्यांचे दारिद्रय दूर करण्यासाठी सहकारी चळवळीच्या माध्यमातून साखर कारखाने काढून शेतकऱ्यांचा उत्पादित कच्च्या मालावरील प्रक्रिया उद्योग सुरु केला व शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही याची काळजी घेतली. तसेच शिक्षण संस्थांचा विकास करुन हरितक्रांती व धवलक्रांती याला अपेक्षित असणारे तंत्रज्ञान समाजापर्यंत पोहचवले.'[८]

'समाजवादी समाजरचनेचा अंगिकार भारतीय राज्यघटनेने केला होता. दुसरी पंचवार्षिक योजना या विचारांचा पाया होती. देशाला भविष्यकाळात समाजवादी समाजरचना उभी करावयाची होती. त्यासाठी शेती उत्पादनात वाढ करणे आणि ग्रामीण उद्योगधंद्याची वाढ

करणे आणि क्रमाक्रमाने हे उद्योगधंदे सहकारी उत्पादक संस्था म्हणून संघटित करणे, भविष्यकाळातील सर्व प्रगती ही उत्पादन वाढविण्यास अवलंबून आहे. हे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आले होते.'[९]

अन्नधान्य उत्पादन जलद गतीने वाढविणे आवश्यक होते. त्यासाठी सधन शेती, सुधारित बियाणे, तंत्रकला, रासायनिक खते इत्यादींचा प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक होते. हे कार्य दक्षिणेतील नेत्यांनी सरपंच, सेवा सोसायटी चेअरमन आणि पंचायत समिती, जिल्हा परिषद, शैक्षणिक संस्थामधील कार्याच्या रुपाने केले आहे. १९९० ते २००० या काळात स्थानिक सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये काम करताना लोकांचा पुढाकार कसा वाढेल तसेच लोक स्वतः जबाबदारी कशी घेतील, सहकारी संस्थेवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःहून कार्य कसे करतील यावर भर दिला. राष्ट्रीय नेत्यांची सुध्दा हिच अपेक्षा होती.

'स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेत लोकांपर्यंत कसे पोहचायचे, विकास योजनांना जनतेचा सहभाग कसा मिळवायचा, ही समस्या राष्ट्रीय नेत्यांना नसतांना कुठलाही गवगवा आणि देखावा करण्यापेक्षा ग्रामीण जीवन या कार्यक्रमात समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट होते.

याच राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांशी सांगड घालत दक्षिणेतील नेत्यांनी सामाजिक कार्य करत असताना कुठलाही गवगवा, देखावा, जाहिरात न करता ग्रामीण जनतेपर्यंत सोयी सुविधा पुरविण्याचे कार्य केले आहे आणि यातूनच सामाजिक विकास साधला आहे.'[१०]

**२.३ दक्षिण नगरमधील राजकीय, सामाजिक नेते व कारकीर्द :-**

महाराष्ट्रातील इतर सर्व जिल्हयाप्रमाणेच अहमदनगर जिल्हादेखील साहित्य व संस्कृतीचा वारसा म्हणून ओळखला जातो. त्याच प्रमाणे जिल्हयाचा राजकीय वारसासुध्दा खूप मोठा आहे. दक्षिण नगरमधील तालुकानिहाय राजकीय नेते व त्यांची कारकीर्द पाहता कौटुंबिक राजकीय वारसा नसतानासुध्दा या नेते मंडळींनी स्वतःला राजकीय कार्यात वाहून घेतल्याचे दिसते.

## नगर तालुका

### १) कॉ. राम रत्नाकर

'राम रत्नाकर यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३० रोजी कोऱ्हाळे ता. राहता येथे झाला. आठवीपर्यंतचे शिक्षण जन्मगावी झाले, पुढील शिक्षण अहमदनगर येथे झाले व पुढे कम्युनिस्ट चळवळीकडे ओढा. त्या माध्यमातून कार्य, १९३७ व १९७२ साली सातभाई गल्ली, चितळे रस्ता या प्रभागातून दोन वेळा निवडून गेले. सलग १० वर्षे नगरसेवक होते.

१९५३ साली लालबावटा विडी कामगार युनियनचे अध्यक्ष झाले. कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कौन्सिल व प्रांतिक कार्यकारणी सदस्य म्हणून काम पाहिले. पुढे १९८१ भारतीय कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला आणि १९८७ ला ऑल इंडिया विडी कामगारांच्या अधिवेशानात राष्ट्रीय सरचिटणीस झाले. देशभरातील विडी कामगारांना संघटित केले. नगर येथे श्रमिक नगरची उभारणी नगर शहर वकील संघटनेचे अध्यक्ष बनले. हे कार्य करत असतानाच १९७२ व १९७८ साली विधानसभा सदस्य म्हणून दोनदा निवडून गेले मात्र राजकीय कार्य व विकास कामे करुनसुध्दा १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत अपयश आले. तरीसुध्दा आपले कार्य पुढे चालूच ठेवले. ऑल इंडिया विडी सिगार वर्कर्स फेडरेशनचे कार्याध्यक्ष इत्यादी पदे भूषवून आपला राजकीय ठसा उमटविला. यांचा मृत्यू वाशी (मुंबई) येथे ऑक्टोबर २००८ साली झाला.'[११]

### २) बाळासाहेब नागवडे

बाळासाहेब नागवडे यांचा जन्म १८ नोव्हेंबर १९२४ रोजी झाला. मूळ गाव गुणवडी, ता. नगर, शिक्षण चौथीपर्यंत मांडवगण येथे झाले. वयाच्या २१ व्या वर्षी राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी विविध राजकीय पदे भूषविली. १९४५-५३ या कालावधीत तालुका विकास मंडळ उपाध्यक्ष याच काळात १९४८ साली बॉम्बे प्रोव्हिन्शियल बँक संचालक म्हणून काम केले. पुढे १९५० साली शेकापचे कार्य करत १९५३ आणि १९६२ साली वाळकी गटातून जिल्हा लोकल बोर्ड सदस्य म्हणून आपला ठसा उमटवला व १९६२ साली महाराष्ट्र राज्य विधानसभेवर आमदार म्हणून तालुक्याचे लोकप्रतिनिधित्त्व केले. या काळात समाज विकास करण्याचा प्रयत्न केला. पुढे १९६५ च्या अन्नधान्य कृती समिती आंदोलनात सहभाग नोंदवला. १९६८ साली

धरणग्रस्तांच्या प्रश्नाकरिता आंदोलन केले हे करत असतानाच श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना उभारणीत मोठा सहभाग दिसून येतो. नगर तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले. केंद्रीय किसान सभेचे सदस्य म्हणून काहीकाळ काम केले हे करत असतानाच शिक्षण संस्थेची स्थापना केली. रुईछत्तीशी व नारायणडोह येथील विद्यालयाचे संस्थापक बनले. एकूण राजकीय कारकीर्द पाहता नागवडे यांनी गावपातळीपासून ते राज्य, केंद्र पातळीपर्यंत विविध संस्थांमध्ये काम केल्याचे दिसून येते व शैक्षणिक कार्यातसुध्दा अग्रेसर असल्याचे त्यांनी स्थापन केलेल्या विद्यालयाच्या विकासावरुन दिसून येते. राजकीय अपयश आले तरी काम जोमाने करत असल्याचे दिसून येते.

### ३) दादापाटील शेळके

नगर तालुक्यात ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबात खारेकर्जुने येथे १९४१ साली जन्म झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कुठलाही राजकीय वारसा नसताना सामाजिक कार्याची आवड, संघटना बांधणी यातून राजकीय कार्यास प्रारंभ केला आणि सर्वप्रथम १९६२ साली अहमदनगर जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. पुढे १९६२-६४ जिल्हा परिषद उपसभापती म्हणून कार्य केले या कार्याचा ठसा उमटवत १९६६-६७ च्या काळात नगर तालुका पंचायत समिति सभापती म्हणून कार्य केले आणि हे कार्य करतच सर्वप्रथम १९८० साली विधानसभेची निवडणूक लढवून निवडून आले. पुढे १९८५, १९९० नगर तालुक्यातून महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्य (आमदार) म्हणून निवड येण्याचा मान मिळवला. १९९४-१९९६ साली नगर दक्षिणमधून भारतीय लोकसभेवर खासदार म्हणून काँग्रेस पक्षाकडून निवडून आले.

नगर तालुका सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, चेअरमन, नगर तालुका सहकारी दूध संघ स्थापना केली. १९६२ पासून राजकीय, सामाजिक कार्यास प्रारंभ करुन आजपर्यंत नगर तालुक्यात आणि लोकसभा प्रतिनिधी असताना दक्षिणेचा विकास मोठया प्रमाणात केल्याचे दिसून येते. परंतु दुष्काळी तालुका असल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात विकास साधता आला नाही. शैक्षणिक प्रसाराचे कार्य मोठया प्रमाणात तालुक्यात केले व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिली.[१२]

**४) शिवाजीराव कर्डिले :-**

ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबात नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे जन्म झाला. जेमतेम शिक्षण झाल्यानंतर कुठलाही राजकीय वारसा नसताना वडिलांना शेतीव्यवसायात मदत करत बुऱ्हाणनगरच्या सरपंचपदापासून आपल्या राजकीय कार्यास प्रारंभ केला. गावचे सरपंच तसेच छोटया मोठया संस्थांचे पद भूषवित वेळप्रसंगी राजकीय पक्ष बदल करत राजकारणातून समाजकार्य करण्याचा प्रयत्न केला.

**राजकीय कारकीर्द -**

नगर-नेवासा तालुका विधानसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा १९९५ आणि १९९९ (अपक्ष) आमदार म्हणून निवडून आले. २००२ साली महाराष्ट्र राज्य मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास राज्यमंत्री म्हणून काम केले याच कळात २००२ साली अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून पालकत्त्व पार पाडले. तसेच २००२ साली महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजनेचे सदस्य म्हणून रोजगार हमी योजनेचे काम पाहिले व ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने प्रयत्न केले. याच काळात सामाजिक विकास पुढीलप्रमाणे केल्याचा दिसतो.

**सामाजिक कार्य -**

१) देवगाव व रुईछत्तीसी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु केले.

२) दुष्काळी परिस्थितीत तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागात जनावरांच्या छावण्या सुरु केल्या.

३) बुऱ्हाणनगर, घोसपुरी नळ पाणीपुरवठा योजना.

४) बुऱ्हाणनगर परिसरात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालय, डी.एड्., बी. एड्. महाविद्यालयांची स्थापना या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार व प्रचार.

५) मिरावली पहाड, नृसिंह मंदिर, कानिफनाथ गड, गोरक्षनाथ गड, डोंगरगण इत्यादी तीर्थ व पर्यटन क्षेत्रांचा विकास.

६) मांडवा, निमगाव घाणा इत्यादी ठिकाणी लघु पाटबंधार तलाव उभारले.

७) शनिशिंगणापूर, सोनई, चांदा इत्यादी ठिकाणी पाणी पुरवठा योजना सुरु.

विविध विकास कामांतून मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडविण्याचे काम लोकप्रतिनिधी असताना केल्याचे दिसून येते.[१३]

**५) दिलीप गांधी :-**

अहमदनगर शहरात गांधी कुटुंबात दिलीपरावांचा जन्म झाला. वडील मनसुखलाल गांधी यांनी आपला उद्योग व्यवसाय करत मार्गदर्शन केले. शिक्षण घेत असतानाच सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. पुढे हिंद सेवा मंडळाच्या माध्यमातून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माध्यमातून कार्यास प्रारंभ केला आणि हळूहळू राजकीय कार्य सुरु केले.

१९८५ साली प्रथम अहमदनगर नगरपालिका नगरसेवक म्हणून निवडून आले व प्रभागातील प्रश्न सोडलि. पुन्हा १९९१ व १९९५ ला नगरसेवक म्हणून निवड झाली हे कार्य करत १९९९ साली अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून भाजपातर्फे खासदार बनले व सामान्य जनतेपर्यंत विकास पोहचविला, ग्रामीण भागात बसस्थानके, समाजमंदिर, सांस्कृतिक भवन उभे करण्याचे काम दक्षिणेत केले. पुढे २००३ मध्ये केंद्रीय लघुजहाज राज्यमंत्री म्हणून केंद्रात काम केले तसेच २००३ साली अखिल भारतीय मराठी नाटयसंमेलन (नगर) स्वागताध्यक्ष पद भूषविले. अल्पसंख्यांक समाजातील व्यक्ती आपल्या राजकीय व सामाजिक कार्यातून, जनतेत विकासकार्यातून आपला ठसा उमटविला.

**सामाजिक कार्ये :-**

हिंद सेवामंडळाच्या माध्यमातून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते म्हणून कार्य, नगरसेवक कालावधीत प्रभागातील विकासकामे, नगर दक्षिण मतदारसंघातून निवडून आल्यानंतर वीज, पाणी, रस्ते, आरोग्य केंद्र, समाजमंदिर, वाचनालय, बसस्थानके, शैक्षणिक विकास, सांस्कृतिक भवन, कृषी उद्योग अशी विविध विकास कामे मोठया प्रमाणात केली.[१४]

**६) श्री. पोपटराव पवार :-**

पोपटराव पवार जन्म ०१/०६/१९५८ रोजी हिवरे बाजार ता. नगर येथे झाला. शिक्षण एम.कॉम. पर्यंत झाल्यानंतर एस.टी. महामंडळात चांगली नोकरी मिळत असतानाही गावकऱ्यांच्या आग्रहाखातर गावचे सरपंचपद बिनविरोध स्वीकारले व राजकीय कार्यास प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

१९९२ साली नगर तालुका पंचायत समिती सदस्यपदाची निवडणूक लढविली आणि वीजयी झाले. पुढे १९९२ ला नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक म्हणून निवड झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या बाजार समितीतून समस्या सोडविल्या. १९९४-९५ मध्ये हिवरे बाजारची निवड आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प या योजनेत झाली याचे श्रेय पोपट पवार यांना दिले जाते. १९९७-९८ साली आदर्श ग्रामपंचायतीचा बहुमान प्राप्त झाला. १९९८ साली केंद्र सरकारचा राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार, वनश्री पुरस्कार, सातारा येथील आर.आर.बाबा प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार ही त्यांनी केलेल्या कार्यातून प्राप्त झाला. केंद्र सरकारचा कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक जलसंधारण पुरस्कार, जपान येथील पाणी परिषदेत सहभाग नोंदवून अहमदनगर जिल्हयाची वेगवेगळी ओळख करुन दिली.

**सामाजिक कार्य :-**

हिवरे बाजार आदर्श गाव करण्याचा संकल्प पूर्ण केला, नसबंदी, नशाबंदी, चराई बंदी, कुऱ्हाडबंदी, श्रमदान या पंचसूत्रीचा अंमल करुन ग्रामविकास आराखडा राबविला. ग्रामपंचायत, पंचायत समिती, बाजारसमितीच्या माध्यमातून रस्ते, वीज, पाणी, जलसंधारणाची कामे, आरोग्य सुविधा, अशी विविध विकासकामे करुन सामाजिक विकास साधला व हिवरे बाजार हे देशात आदर्श गाव बनवले.[१५]

## पाथर्डी तालुका

### १) नारायण गणपत आव्हाड

नारायण गणपत आव्हाड यांचा जन्म १९२० साली पाथर्डी तालुक्यात शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण घेत असतानाच सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली आणि त्यातूनच राजकीय व सामाजिक कार्यास प्रारंभ केला. तरुणपणी सैन्यात नोकरी केली व नंतर सामाजिक कार्य आणि चळवळ यांमध्ये मोठया प्रमाणावर सहभाग घेतला.

**राजकीय कारकीर्द :-**

सर्व प्रथम १९५७ ते १९६२ महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवडणूक लढवून वीजय संपादन केला. केलेल्या कार्यातून पुढे १९६२ ते १९६७ पुन्हा विधानसभा सदस्य म्हणून

पाथर्डी मतदारसंघात विकास करण्याचा प्रयत्न केला. अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्यक्षपद भूषविले. तसेच वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना उपाध्यक्ष म्हणून काम केले व शेतकऱ्यांच्या दृष्टीने योग्य निर्णय घेतले. अपयश आले तरी कार्य तडफेने चालू ठेवले.

**सामाजिक कार्ये :-**

तालुक्याचे १९५७ ते १९६७ या दहा वर्षाच्या कालावधीत लोकप्रतिनिधित्व करत असताना शेती विकास, पाणी आडवा-पाणी जिरवा, वीजेचे प्रश्न, रस्ते, आरोग्य, लोकसहभागातून शिक्षण या विविध कामांना बाबूजींनी प्राधान्य दिले. वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत मोलाचा वाटा देऊन सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले. तरुणांना एकत्र करुन तालुक्यातील विविध समस्या जाणून घेतल्या. एकूण त्यांची राजकीय कारकीर्द पहाता वृध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष, अहमदनगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष आणि १९५७ ते १९६७ तालुक्याचे आमदार असताना विविध विकासकामे केल्याचे आढळते.

**२) श्री. दादा पाटील राजळे :-**

दादा पाटील राजळे यांचा जन्म २२ ऑगस्ट १९२२ रोजी पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव या खेडयात झाला. त्यांचे शिक्षण फक्त चौथीपर्यंतच झालेले. वयाच्या २० व्या वर्षापासून भाऊंनी आपल्या राजकीय व सामाजिक कार्याच्या लढयास प्रारंभ केला. हे भाऊंच्या राजकीय कारकीर्दीतून दिसून येते. सर्वात प्रथम त्यांनी १९४२ च्या 'चलेजाव' लढयात सहभाग घेऊन चळवळीस प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

सन १९४६ मध्ये कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. करंजी परिषदेत सक्रिय सहभाग घेतला आणि १९४७ साली महाराष्ट्रातील धुळे येथे कम्युनिस्ट पक्ष बैठकिस उपस्थित राहिले. १९४८ मध्ये सावकारशाही व रझाकारविरोधी चळवळीत भाग घेतला आणि सावकारशाहीतून शेतकऱ्यांची मुक्तता केली. पुढे १९५६ साली कासार पिंपळगाव येथे ग्रामपंचायतीची स्थापना केली. १९५६ ते १९८४ कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून काम केले. १९५७ ते १९६२ अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून कार्यकारिणीत काम केले. १९६२ ते १९७२ अहमदनगर जिल्हा परिषदेचे सदस्य व पुढे १९६४ ते १९६५ पाथर्डी तालुका पंचायत

समितीचे उपसभापती म्हणून तालुक्यात काम केले. १९७३ साली श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना संस्थापक, चेअरमन पद भूषवून तालुक्यात सहकार चळवळीला महत्त्व प्राप्त करुन दिले.

**सामाजिक कार्ये :-**

१९४२ च्या 'चले जाव' लढयात सहभाग नोंदवून आपल्या सामाजिक कार्यास भाऊंनी प्रारंभ केला. करंजी येथील पाणी परिषदेत सहभाग, १९४६ साली तालुक्यातील सहकारी चळवळीस कासार पिंपळगाव येथे सेवा सहकारी सोसायटीची स्थापना करुन प्रारंभ केला. सेवा संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सभासदत्व देऊन अल्प, मध्यम, दीर्घ मुदतीवर कर्ज वितरणाचे कामकाज सुरु केले. सेवा संस्थेच्या माध्यमातून खते बी-बीयाणे, औषधे उपलबध करुन देण्याचे कार्य केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यदिनी नगर येथील भुईकोट किल्ल्यातील ध्वजवंदनेला उपस्थित राहिले. १९४८ साली सावकारशाही विरोधी चळवळ उभी केली. हे कार्य करत असतानाच शेतकऱ्यांमध्ये आंतरक्रिया घडून येण्याकरिता १९५० साली कासार पिंपळगाव येथे पोस्ट ऑफिस व शेतकरी वाचनालय सुरु केले. १९६२ ते १९७२ या कालावधीत जिल्हा परिषदेचे सदस्य, पाथर्डी तालुका पंचायत समितीचे उपसभापती असताना तालुक्यातील विविध प्रश्नांना हात घालून ते सोडविण्याचे कार्य भाऊंनी केले. १९७३ साली वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करुन कारखान्याचे चेअरमद पद भूषविले. कारखान्याच्या माध्यमातून सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांच्या ऊसाला चांगला बाजारभाव देऊन शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साधण्याचे काम भाऊंनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीत कल्याचे दिसून येते. १९८९ साली इंग्लंड व फ्रान्स, १९९१ साली मॉरेशिएला भेट दिली. भाऊंनी राजकीय व सामाजिक कार्य तालुका व जिल्हा पातळीवर करीत असताना बाहेरील देशांचे दौरे करुन तेथील महत्त्वपूर्ण अभ्यास करुन याचा उपयोग आपल्या राजकीय जीवनात केल्याचे दिसून येते. भाऊंनी केलेल्या कार्यातूनच त्यांच्या कार्याचा लेखाजोखा म्हणून त्यांचे आत्मचरित्र 'पार्थभूमीभूषण' या नावाने प्रसिध्द करण्यात आले. अशा राजकीय नेत्याचा मृत्यू ३० जून २००६ साली झाला.[१६]

**३) बबनराव ढाकणे :-**

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील पाथर्डी तालुक्यातील अकोले या गावी १० नोव्हेंबर १९३७ रोजी बबनराव ढाकणे यांचा शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शिक्षण संपल्यानंतर आपल्या राजकीय व सामाजिक जीवनास तालुक्यापासून प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

सन १९५५ साली गोवा मुक्ती संग्रामात सहभाग घेऊन चळवळ उभा केली. १९६२ साली पाथर्डी तालुका सुपरवायझिंग युनियनचे अध्यक्ष म्हणून काम करुन युनियन बळकट केली. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, खरेदी विक्री संघाचे संचालक म्हणून काम केले. १९७२ साली अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून जिल्हयात कार्य केले. तसेच १९७२ साली स्थायी समितीचे सदस्य, १९६९ ते १९७२ जिल्हा मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले. १९७२ ते १९७५ पाथर्डी तालुका पंचायत समितीचे सभापती म्हणून काम केले. १९७५-१९७६ साली जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक होते. पुढे विधानसभा निवडणूक लढवून १९७८ ते १९९० पाथर्डी विधानसभा मतदारसंघातून लोकप्रतिनिधी म्हणून कार्य केले. २ ऑगस्ट १९७८ रोजी महाराष्ट्र राज्याच्या बांधकाम खात्याचे राज्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. २१ डिसेंबर १९७९ महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास खात्याचे कॅबिनेट मंत्रिपद बहाल करण्यात आले. पुढे १७ डिसेंबर १९८१ साली  विधानसभा विरोधीपक्षनेते म्हणून काम केले. १९८७ ला आमदार निवास सुधार समितीचे अध्यक्ष म्हणून कार्य केले हे करत असताना १९८८ मध्ये विधानसभा महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव उपाध्यक्ष, २८ जुलै १९८८ रोजी विधानसभा उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आणि १९८९ च्या निवडणुकीत बीड लोकसभा मतदारसंघातून खासदार व केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री बनले. हे करत असतानाच १९८९ रोजी केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करुन तालुक्यात साखर उद्योगाला चालना दिली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले. पुन्हा १९९४ मध्ये  महाराष्ट्र राज्य विधान परिषदेवर निवड, दुग्धविकास व पशुसंवर्धन राज्यमंत्री म्हणून महाराष्ट्र सरकार मध्ये काम केले, याच काळात दुग्धविकासाला चालना दिली. तालुक्यात १९९८ मध्ये पाथर्डी येथे एकलव्य शिक्षण संस्थेची स्थापना करुन शैक्षणिक कार्य सुरु केले.

**सामाजिक कार्ये :-**

१९५५ पासून गोवा मुक्ती संग्रामात सहभाग घेऊन आपल्या राजकीय व सामाजिक कार्यास प्रारंभ केला. बबनराव ढाकणे यांचे पंडित जवाहरलाल नेहरु व सी.डी. देशमुख यांचे जवळचे संबंध होते. ढाकणे यांनी तालुक्यातील राजकीय व सामाजिक कार्यास १९६२ पासून प्रारंभ केला. तालुक्यातील विविध संस्थांची पदे भूषवून त्या माध्यमातून रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, नाला बंडींग असे विविध प्रश्न सोडविण्याचे काम केले. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी मोफत वसतिगृह स्थापन केले. एकलव्य शिक्षणसंस्थेची स्थापना करुन तालुक्यात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिली. तालुक्यातील दारुबंदी, दुष्काळ निर्मूलन, धरणग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडविले. पाथर्डी तालुक्याचे लोकप्रतिनिधी असताना तालुक्यातील ऊसतोड कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे काम केले. त्याच बरोबर विविध विकासकामे करुन एक आदर्श निर्माण करुन दिला.[१७]

**४) आप्पासाहेब राजळे :-**

आप्पासाहेब राजळे यांचा जन्म ११ ऑगस्ट १९४४ रोजी पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव या गावी झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वडिलांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने आप्पासाहेबांनी आपल्या राजकीय कार्यास प्रारंभ केल्याचे दिसून येते.

**राजकीय कारकीर्द :-**

आदिनाथ कृषीविकास प्रतिष्ठाणची स्थापना करुन राजकीय कार्यास प्रारंभ केला आणि सर्वप्रथम जिल्हा परिषद निवडणूक लढवून वीजयी झाले आणि १९८५ ते १९९० अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम केले. पुढे १९९० साली पाथर्डी विधानसभा मतदार संघातून आमदार झाले आणि १९९४ साली वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणून काम करुन तालुक्यातील शेतकऱ्यांचा विकास केला. १९९५ साली पुन्हा पाथर्डी मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले आणि तालुक्यात विकासकामे केली हे करत असताना

काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यामुळे पुढे १९९९ साली अहमदनगर जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

**सामाजिक कार्ये :-**

आप्पासाहेबांनी आदिनाथ कृषीविकास प्रतिष्ठाणची स्थापना करुन तालुक्यात शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. या संस्थेच्या माध्यमातून कार्य करत असतानाच १९८५ ते १९९० साली कोरडगाव गटातून ते जिल्हा परिषदेत निवडून आले व त्यांनी पुढे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत जिल्हयाच्या विकासाबरोबरच विशेष करुन पाथर्डी तालुक्यात रस्ते, वीज, आरोग्य, साठवणबंधारे, खते, बी-बियाणे, औषधे, शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात उपलबध करुन देण्याचे काम आप्पासाहेबांनी केले. १९९०, १९९५ या लोकप्रतिनिधीच्या कालखंडामध्ये तालुक्यातील प्रलंबित प्रश्न प्राधान्य क्रमाने सोडविण्याचे काम आप्पासाहेबांनी केले. वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून दुष्काळी भागातील मजुरांना ऊसतोडणी बरोबरच छोटया मोठया उद्योगधंद्यांकरिता सोयी सुविधा उपलबध करुन दिल्या. ऊसतोड कामगारांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा देण्याचे काम केले. सामाजिक कार्य करीत असताना गरीब-श्रीमंत दरी भरुन काढण्याचे काम आप्पासाहेबांनी त्यांच्या राजकीय व सामाजिक कारकीर्दीत प्राधान्य क्रमाने केल्याचे दिसून येते.

**५) राजीव राजळे :-**

जन्म ५ डिसेंबर १९७० रोजी पाथर्डी तालुक्यात झाला. वडील माजी आमदार आप्पासाहेब राजळे व मामा ना. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनातून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आणि १९९९ पासून राजकारणात प्रवेश केला.

**राजकीय कारकीर्द :-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी कार्यकारी परिषद सदस्य या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून नवीन ज्ञान देण्याचे काम करत पुढे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणून निवड झाली. या माध्यमातून मोठया प्रमाणावर कर्जपुरवठा केला हे करत असताना वृध्देश्वर सहकारी तालुका दूध संघाचे अध्यक्ष, राजीव युवक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक, अध्यक्ष आणि आदिनाथ कृषी विकास प्रतिष्ठाणचे सदस्य या माध्यमातून कृषी

शैक्षणिक विकास घडवून आणला. राजकीय अपयश आले तरी खचून न जाता जोमाने काम सुरु ठेवले.

**सामाजिक कार्ये :-**

१९९९ पासून राजकीय कार्यास प्रारंभ केल्यानंतर तरुणांची फळी उभी करुन तालुक्यातील विविध प्रश्न जाणून घेण्यास प्रारंभ केला. वडील आप्पासाहेब राजळे व मामा बाळासाहेब थोरात यांच्या राजकीय वारसातून बाळकडू मिळालेले राजीव राजळे यांनी कृषी विकास प्रतिष्ठाण व युवक क्रीडा मंडळाच्या माध्यमातून गावपातळीवर प्रलंबित असणारे प्रश्न सोडविण्यास प्रारंभ केला. वृध्देश्वर सहकारी दूध संघाच्या माध्यमातून अध्यक्ष पदाच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांच्या दूधास योग्य दर देण्याचे काम केले. तालुका दूध संघाच्या माध्यमातून संकरीत गो पैदास करुन दूध उत्पादनात वाढ केली. २००४ साली पाथर्डी विधानसभा मतदार संघातून युवा लोकप्रतिनधी म्हणून निवडून आल्यानंतर तालुक्यातील विविध प्रश्न प्राधान्य क्रमाने सोडविले. विशेषकरुन बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेला वांबोरी चारीचा पाणीप्रश्न तालुक्याच्या दृष्टीने राजीव राजळेंनी आपल्या लोकप्रतिनिधींच्या कारकीर्दीत प्राधान्य क्रमाने सोडविला.[१८]

## पारनेर तालुका

**१) अण्णा हजारे**

अण्णांचा जन्म १५ जून १९३८ रोजी नगर तालुक्यातील भिंगार येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर मुंबई येथे ७ वी पर्यंत शिक्षण घेऊन फुलांचा व्यवसाय सुरु केला. १९६३ मध्ये अण्णा आर्मी सप्लाय कोअर विभागात भरती झाले. १९६५ च्या भारत पाक युध्दात अण्णा सहभागी होते. या युध्दात त्यांचे २८ जीवलग मित्र शहिद झाले. १९७१ च्या बांगलादेश लढयातही अण्णा सहभागी होते. १९७५ साली त्यांची लष्करी सेवा संपली आणि गावाकडे येत असताना दिल्लीच्या रेल्वे स्थानकावर अण्णांच्या वाचनात स्वामी विवेकानंदांच्या जीवनावरील पुस्तक आले आणि त्यातूनच ग्रामविकासाच्या कल्पनेने अण्णा प्रेरित झाले.

अण्णांनी केवळ स्वप्न न पाहता आपल्या भविष्य निर्वाह निधितील २० हजार रुपये या कार्याच्या शुभारंभासाठी वापरले. राळेगणसिध्दी या स्वतःच्या गावापासुन दारु, व्यसन,

अंधश्रध्दा यांपासून तरुणांना व ग्रामस्थांना दूर करण्याचे कार्य केले. गावच्या ग्राम मंदिराचा जीर्णोध्दार केला. यादव बाबा मंदिराचे समाज मंदिर केले आणि गावातील तरुणांच्या मदतीने अनिष्ठ प्रथा, पशू हत्या, दारु बंदी, व्यसनमुक्ती यासाठी आवाज उठविला.

अण्णांनी पावसाचे पाणी डोंगर उतारावरुन वाहून जाते ते पाणी अडवून डोंगराची धूप टाळली. वृक्षारोपण केले, यातूनच पाणलोट क्षेत्र विकास कल्पनेचा जन्म झाला. नाला बंडींग, भूमिगत बंधारे व पावसाचे अडवलेले पाणी राळेगणसिध्दीच्या विकासाकरिता वापरण्यात आले. गावात धान्य बँक सुरु केली, जमा झालेले धान्य गोरगरीब व गरजूंना वाटप करण्यात आले. यातूनच पुढे यादव बाबा वसतिगृहातील मुलांची नियमित जेवणाची व्यवस्था करण्यात आली. शुध्द पाणी, वैयक्तिक स्वच्छता, ग्राम सफाई, कुपोषण, बालमृत्यू, सर्वधर्म विवाह याचा अवलंब गावात केला जाऊ लागला.

अण्णांचे सामाजिक कार्य राळेगणसिध्दी किंवा नगर जिल्हयापुरते मर्यादित न राहता उर्वरित महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्रप्रदेश, ओरिसा, कर्नाटक इ. राज्यांमध्ये पसरु लागले. अण्णांच्या या कार्यातूनच विविध राज्यांमध्ये अण्णांची मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आली. ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जपान या देशात जाऊन अण्णांनी पाणी परिषदेत आपला सहभाग नोंदविला. भारत सरकार व महाराष्ट्र सरकार मार्फत अण्णांची कित्येक समित्यांवर निवड करण्यात आली व आजही अण्णा या समित्यांवर निर्भिडपणे कार्य करीत आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन व माहितीचा अधिकार ही अण्णांची समस्त भारत वासियांना मुख्य देणगीच मिळालेली आहे. अण्णांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने अण्णांना पद्मभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. अण्णांचे सामाजिक कार्य पाहता अण्णांनी कोणत्याही राजकीय संस्थेचे पद भूषविलेले नाही. परंतु, समाज विकासाने प्रेरित झालेले अण्णा आजही संपूर्ण देशभर सामान्य जनतेकरिता कार्य करत असल्याचे दिसते.[१९]

**२) नंदकुमार झावरे**

नंदकुमार झावरे यांचा जन्म १९ सप्टेंबर १९४६ रोजी पारनेर तालुक्यात झाला. शिक्षण बी.एस्सी. पर्यंत झाले. पदवीपर्यंतचे शिक्षण सुरु असतानाच विद्यार्थी चळवळीत सहभागी.

विद्यार्थ्यांच्या डब्यांची ने-आण एस.टी. महामंडळाने मोफत करावी म्हणून आंदोलन केले आणि येथून पुढे खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकीय व सामाजिक चळवळीस प्रारंभ झाला.

**राजकीय कारकीर्द :-**

१९७८ साली अहमदनगर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पद स्वीकारुन राजकीय कार्यास प्रारंभ केला आणि १९८२ साली पारनेर सहकारी साखर कारखाना सरकार नियुक्त संचालक म्हणून निवड झाली या कार्यातून पुढे १९८५ ला पारनेर मतदारसंघातून विधानसभा सदस्य (आमदार) म्हणून निवडून आले या कार्यातूनच १९९० साली पुन्हा पारनेर मतदारसंघातून विधानसभा सदस्य झाले. विधिमंडळ अंदाजसमितीवर सलग ७ वर्षे प्रतिनिधी म्हणूनही काम केले.

**सामाजिक कार्य :-**

१९७६ साली जागतिक युथ फेडरेशन आयोजित परिषदेत सहभागासाठी परदेश दौरा करुन खऱ्या अर्थाने राजकीय कारकीर्दीच्या आगोदर सामाजिक कार्यास प्रारंभ केला. बाळासाहेब विखेंचा आदर्श डोळयासमोर ठेवून राजकीय कारकीर्द चालू झाल्यानंतर जिल्हा युवक काँग्रेसच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर तरुणांची फळी तयार केली. त्या माध्यमातून कार्य करत असताना पारनेर सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाल्यानंतर सरकार नियुक्त संचालक म्हणून १९८२ साली त्यांची नियुक्ती करण्यात आली व पुढे पारनेर तालुक्यात सहकारी उद्योगास चालना मिळवून दिली. १९८५ साली पारनेर मतदारसंघातून विधानसभेवर नियुक्ती झाल्यानंतर पारनेर तालुक्यातील वीज, रस्ते, पाणी, आरोग्य हे विविध प्रश्न दहा वर्षाच्या लोकप्रतिनिधीच्या कालखंडात सोडविले. तालुक्यातील सुपे मिनी एम.आय.डी.सी. चे मुख्य प्रवर्तक, तालुक्याच्या पाणी योजनेच्या मंजुरीकरिता मुख्य सहभाग घेतला. त्याचबरोबर शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने टाकळी ढोकेश्वर महाविद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय, पारनेर तांत्रिक विद्यालय अशा विविध शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेमध्ये सिंहाचा वाटा दिसून येतो. यातूनच त्यांची राजकीय व सामाजिक कारकीर्द व विकासाभिमुख दृष्टी समाजासमोर येते.

### ३) वसंतराव झावरे

वसंतराव झावरे यांचा जन्म पारनेर तालुक्यात झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राजकीय व सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे स्वतःला सामाजिक कार्यामध्ये झोकून दिले. तरुणांची संघटना बांधणी, त्याचबरोबर समवयस्क व्यक्तींना बरोबर घेऊन तालुक्याच्या प्रलंबित समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली.

**राजकीय कारकीर्द :-**

सर्वप्रथम १९९५ साली महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्यपदाची निवडणूक लढवून वीजयी झाले. यांनी नंदकुमार झावरे यांचा पराभव केला आणि राजकीय कार्याचा ठसा उमटवला पुढे १९९९ मध्ये महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्य म्हणून पुन्हा निवडून आले व यातून विकासकामे केली.

**सामाजिक कार्ये :-**

वसंतराव झावरे यांनी आपल्या सामाजिक कार्यास प्रारंभ केल्यानंतर १९९५ साली तालुक्याचे लोकप्रतिनिधित्त्व करत असताना दुष्काळग्रस्त तालुका म्हणून पारनेर तालुक्याकडे पाहिले जाते. त्या दृष्टिकोनातून तालुक्याच्या विकासाकरिता लोकप्रतिनिधी या नात्याने वीज, पाणी, रस्ते हे प्रश्न प्राधान्याने सोडविले. त्याच बरोबर तालुक्यात शैक्षणिक संस्थेची स्थापना करुन शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार सुरु केला. सहकारी चळवळीस प्रोत्साहन देण्याचे काम केले.

### ४) बाळासाहेब भगत

बाळासाहेब भगत यांनी आपल्या राजकीय कार्यास १९६० पासून प्रारंभ केला. १९६२ साली महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्य (आमदार) म्हणून तालुक्याचे प्रतिनिधित्व करत होते. तालुक्याचे प्रतिनिधित्व करत असताना एक ज्येष्ठ व विकासाभिमुख नेते म्हणून बाळासाहेब भगत यांच्याकडे पाहिले जात होते. पारनेर सहकारी साखर कारखान्याची स्थापना बाळासाहेब भगत यांनी केली म्हणून ते कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष ठरले. १९७७ साली नाशिक निवड मंडळाचे अध्यक्ष झाले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त म्हणूनही बाळासाहेबांनी शैक्षणिक कार्य केले. १९६० पासून पारनेर तालुक्यात सामाजिक कार्य करत

असताना रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शेती या बरोबरच शैक्षणिक विकास या दृष्टिकोनातून तालुक्याच्या विकासामध्ये भर टाकली. अशा या सामाजिक नेत्याचा मृत्यू २४ मे २००३ साली झाला.

**५) विजयराव औटी**

वीजयराव औटी यांचा जन्म पारनेर तालुक्यात झाला वडील कै. भास्करराव औटी हे १९५२ ते १९६२ सलग दहा वर्षे पारनेर तालुक्याचे (भा.क.प.) पक्षाकडून लोकप्रतिनिधित्त्व करत होते. वडिलांचे संस्कार रुजलेले औटींनी आपल्या राजकीय व सामाजिक कार्यास १९८८ साली सेनापती बापट पतसंस्थेची स्थापना करुन प्रारंभ केला. अहमदनगर जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून कार्य करत असताना आपल्या जिल्हा परिषद गटातील प्रलंबित समस्या सोडविण्याबरोबरच तालुक्यातील इतर समस्याही जाणून घेतल्या. खऱ्या अर्थाने पारनेर तालुक्यात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व असतानाही २००४ साली पारनेर मतदारसंघातून शिवसेनेच्या वतीने विधानसभेची उमेदवारी करुन वीजय मिळविला व तेथून पुढे तालुक्याचे नेतृत्व करण्यास प्रारंभ केला. पाठीमागील लोकप्रतिनिधींच्या काळातील प्रलंबित समस्या जाणून घेऊन विकासास प्रारंभ केला व तालुक्यात मिनी एम.आय.डि.सी. त्या माध्यमातून उद्योगधंद्यांना चालना बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे, पाणी, रस्ते वीज याबरोबरच तालुक्याचा विकास करण्याचे धोरण ठेवून २००४ सालापासून सामाजिक कार्यास गती दिली. या कार्याच्या पाठबळावरच पुन्हा एकदा २००९ साली शिवसेनेचे आमदार म्हणून लोकप्रतिनिधित्व करु लागले व पारनेर तालुक्याच्या समस्या अण्णा हजारेंच्या मार्गदर्शनातून सोडविण्याचे कार्य आजही सुरु ठेवले आहे.

## श्रीगोंदा तालुका

**१) बापूसाहेब भापकर**

प्रभाकर कोंडाजी भापकर यांचा जन्म १५ डिसेंबर १९०३ रोजी भापकरवाडी ता. श्रीगोंदा येथे झाला. शिक्षण एम.ए. एल.एल.बी., एम.ए. (सुवर्णपदक) पुण्यात शिक्षण घेत असतानाच लाला लजपतरायांची जहाल भाषणे ऐकून देशभक्तीच्या विचारांनी बापूसाहेब प्रेरित झाले. १९२८ साली वकिलीच्या निमित्ताने नगर शहरात स्थायिक झाले. १९३० साली हिराबाईंशी

विवाह, उभयतांनी गोवा मुक्ती आंदोलन संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढयात सहभाग जिल्हा लोकल बोर्डाचे ३ वर्षे अध्यक्ष आणि १९४६ ते १९५१, १९५७ ते १९६२ आमदार अशी विविध पदे भूषवून राजकीय कार्यातून समाजकार्य केले.

**सामाजिक कार्य :-**

१९२८ साली नगर शहरात वकिली व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झाल्यानंतर हुतात्मा श्री. करविर छत्रपती चौथे शिवाजीमहाराज मराठा बोर्डींगशी त्यांचा संबंध आला व त्यातूनच त्यांनी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ही शिक्षण संस्था उभी केली. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शिक्षणकार्यालाही भरीव मदत केली. लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना १० वर्षाच्या कालखंडामध्ये गोरगरीब जनतेच्या दृष्टीने विकासाची कामे केली. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या, कामगारांच्या प्रश्नावर आवाज उठविला. त्याचबरोबर वीज, पाणी, रस्ते, आरोग्य या समस्या सोडविल्या. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यातूनच 'शेतकऱ्यांच्या झोपडीत' व 'विकासाचे प्रयत्न' ही दोन पुस्तके तसेच 'हिराप्रभा' या नावाने मराठी, इंग्रजी कविता, स्कायबर्ड हा इंग्रजी काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. सलग ८८ वर्ष आयुष्यात विना मोबदला देशसेवा करण्याचे कार्य बापूसाहेब भापकर यांनी केले.

**२) शिवाजीराव नागवडे**

शिवाजीराव नागवडे यांचा जन्म १९ जानेवारी १९३४ रोजी कर्जत तालुक्यातील रुईगव्हाण येथे त्यांच्या आजोळी झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बापूंनी गाव पातळीवरुन आपल्या राजकीय व सामाजिक कार्यास प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

वांगदरी गावचे सरपंचपदापासून राजकीय कार्यात प्रवेश केला. सेवा संस्थेचे चेअरमन, श्रीगोंदा पंचायत समिती सदस्य म्हणून तालुका पातळीवर पाय रोवला आणि २६ नोव्हेंबर १९७३ साली श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याची स्थापना सहकार्याच्या मदतीतून केली पुढे १९७८ श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षातर्फे लोकप्रतिनिधी पदाकरिता वीजयी झाले हे करत १९८२ साली छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना अध्यक्ष, १९८६ साली

ज्ञानदीप ग्रामीण विकास संस्थेची स्थापना आणि शैक्षणिक कार्य जोमाने केले. हे सर्व करत असताना सुध्दा १९८०, १९८५, १९९०, १९९५ या काळात विधानसभेला पराभूत झाले मात्र १९९९ मध्ये श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षातर्फे लोकप्रतिनिधी म्हणून काम केले. अपयश आले तरी सुध्दा आपल्या राजकीय कार्यात सतत मग्न असल्याचे दिसून येते. डेक्कन शुगर टेकनोलॉजिस्ट असोसिएशन पुणे उपाध्यक्ष, अध्यक्ष, राज्य सहकारी साखर कारखाना खरेदी समितीचे २० वर्ष सदस्य, ३ वर्ष राष्ट्रीय साखर कारखाना संघाचे संचालक म्हणून काम केले.

**सामाजिक कार्य :-**

१९५२ साली घोड, कुकडी प्रकल्पाचा पाठपुरावा करण्यास प्रारंभ केला व येथून पुढे त्यांच्या सामाजिक कार्यास प्रारंभ झाला. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे डहाणूकरांचा असणारा खाजगी कारखाना शेतकऱ्यांसाठी चालविण्यास घेतला. त्या कारखान्यावर शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक व आर्थिक संकटांना कंटाळून २६ नोव्हेंबर १९७३ राजी श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याची सुरुवात केली. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील पहिला सहकारी साखर कारखाना शिवाजीराव नागवडे, बाबुराव तनपुरे, खासेराव वाबळे, शिवराम अण्णा पाचपुते या नेत्यांनी स्थापन केला व येथून पुढे श्रीगोंदा तालुक्यात सहकारी चळवळ फोफावू लागली. श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली व महाराष्ट्र राज्यातील पहिले खाजगी पॉलिटेक्निक तत्कालिन शिक्षणमंत्री शरदचंद्रिका पाटील यांच्याकडून मान्यता मिळवून घेतली व तेथून पुढे तालुक्यात सहकार चळवळीबरोबर शैक्षणिक चळवळीसही प्रारंभ केला. या संस्थेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, पॉलिटेक्निक आणि ८ माध्यमिक विद्यालये सुरु केली. हे शैक्षणिक कार्य करीत असतनांच १९८६ साली ज्ञानदीप ग्रामविकास शिक्षण संस्था काष्टी या नावाने स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून ४ कनिष्ठ महाविद्यालये व १३ माध्यमिक विद्यालये तालुक्यात सुरु केली. या दोन संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात गावोगावी शैक्षणिक संकुल उभा करुन शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. या शैक्षणिक कार्याबरोबरच ज्या विविध संस्थांच्या माध्यमातून पद

भूषवित असताना तालुक्यातील १९७८ व १९९९ साली लोकप्रतिनिधी म्हणून रस्ते, वीज, पाणी, जससंधारणाची कामे, वृक्षारोपण, आरोग्य, सहकारी संस्थांचा विकास अशा विविध कामांवर भर दिला. तालुक्यात विविध विकासकामे केली. तालुक्यातील या भरीव कामांमुळे इंटरनॅशनल फ्रेंडशिप असोसिएशन नवी दिल्ली मार्फत नागवडेंना वीजयरत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावरुन त्यांच्या सामाजिक कार्याच्या विकासाचा डोंगर दिसून येतो.[२१]

**३) बबनराव पाचपुते :-**

'बबनराव पाचपुते यांचा जन्म ९ सप्टेंबर १९५४ रोजी काष्टी येथे शेतकरी कुटुंबात झाला. वडील भिकाजीराव पाचपुते व आई तुळसाई यांच्या संस्कारातून अहमदनगर व पुणे येथे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेताना विद्यार्थी चळवळीत सहभागी झाले आणि तेथून पुढे स्वतःला राजकीय, सामाजिक कार्यात झोकून दिले.

**राजकीय कारकीर्द :-**

१९७८ साली पंचायत समिती काष्टी गणातून सदस्य, १९८० साली अविवाहित असतानाच श्रीगोंदा विधानसभा मतदार संघातून जनता पक्षातर्फे निवडणूक लढविली व प्रस्थापितांना धक्का देत विधानसभेचे प्रतिनिधित्व केले. पुढे जून १९८२ साली श्रीगोंदा येथे रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय सुरु करण्याची प्रतिज्ञा पूर्ण केल्यानंतर विवाह केला. मे १९८४ विवाहाच्या दिवशी श्रीगोंदा सहकारी साखर करखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडून प्रस्थापितांना लढा देत सत्ता हस्तगत केली व संपूर्ण महाराष्ट्रात सर्वात तरुण चेअरमन होण्याचा मान मिळविला. परंतु सहकार कारखानदारी अभ्यास आणि संचालक मंडळाचे सहकार्यातून सत्ता टिकविण्यात अपयशी ठरले. १९८५ साली जनता पक्षातर्फे पुन्हा तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व केले, १९९० साली पुन्हा जनता पक्षातर्फे तालुक्याचे चोकप्रतिनिधित्व केले. आणि २ ऑगस्ट १९९१ रोजी शरद पवारांसोबत काँग्रेस पक्षात प्रवेश करुन राज्याचे गृहराज्यमंत्री पद भूषविले. राजकीय कार्यातून १९९३ साली श्रीगोंदा तालुका ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना करुन तालुक्यात शैक्षणिक कार्यास सुरुवात केली. १९९५ साली काँग्रेस पक्षामार्फत श्रीगोंदा विधानसभा मतदार संघातून उमेदवारी करुन पुन्हा तालुक्याचे

लोकप्रतिनिधित्व केले. १९९६ साली ढवळगाव येथे खाजगी साईकृपा साखर कारखान्याची स्थापना केली आणि १९९९ साली मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे तालुक्याचे २० वर्षे प्रतिनिधित्व करीत असतानाही विधानसभा निवडणुकीमध्ये पराभवास सामोरे जावे लागले. या अपयशानंतर १९९९ मध्ये शरद पवारांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारली आणि आजपर्यंत आपले सामाजिक कार्य हे सुरु ठेवल्याचे दिसून येत आहे.

**सामाजिक कार्य :-**

पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानतर १९७८ साली काष्टी गणातून पंचायत समितीचे प्रतिनिधित्व केले तेथून पुढे खऱ्या अर्थाने सामाजिक कार्यास प्रारंभ केला. १९८४ साली विवाहाच्या दिवशी श्रीगोंदा सहकारी साखर करखान्याच्या प्रचाराचा शुभारंभ करुन प्रस्थापितांना लढा देत सत्ता हस्तगत केली. श्रीगोंदा साखर करखान्याचे चेअरमन असताना मागासवर्गीयांना तसेच गरीब शेतकऱ्यांना ५०० रुपये शेअर अनुदान देऊन कारखान्याचे सभासदत्व दिले. तसेच कारखाना परिसरात लाखो वृक्षांची लागवड करुन कारखान्याचे सुशोभीकरण केले. १९८०, १९८५, १९९०, १९९५, २००४, २००९ या कालावधीत श्रीगोंदा तालुका विधानसभा मतदारसंघातून तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करीत असताना तालुक्यातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शैक्षणिक सुविधा, शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे कार्य केले. तरी सुध्दा परिपूर्ण विकास झाल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर घोड व कुकडी पाणीप्रश्नासाठी झगडले. राजकीय व सामाजिक कार्य करीत असतानाच स्वतःला धार्मिक कार्यात झोकून दिले आणि नियमित आळंदी ते पंढरपूर पायी वारी व त्याच बरोबर उत्तम प्रवचनकार म्हणूनही कार्य करीत आहेत.'[२२]

## कर्जत तालुका

**१) ना.सी.फडके :-**

'नारायण सीताराम फडके यांचा जन्म कर्जत तालुक्यात ४ ऑगस्ट १८९४ साली झाला. शिक्षण १९१७ मध्ये एम.ए. पर्यंतचे पूर्ण केले आणि पुण्याच्या एस.पी. कॉलेजमध्ये

प्राध्यापक म्हणून नोकरी स्विकारली. १९२० च्या महात्मा गांधींच्या असहकारीता चळवळीतही सहभाग घेतला. 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचे उपसंपादक म्हणून काम केले.

**समाजिक कार्य :-**

दिल्ली, सिंध, हैद्राबाद, नागपूर, कोल्हापूर या ठिकाणी तत्वज्ञान व मानसशास्त्र या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले. १९९७ मध्ये अल्लाहो अकबर ही पहिली कादंबरी आणि नंतर १९२५ साली कुलाब्याची दांडी, १९२८ साली जादूगार, १९२९ साली दौलत, १९३१ साली अटकेपार, १९३२ साली निरंजन, १९३३ साली कलंक शोभा या कादंबरीवर चित्रपट, १९३५ साली उध्दार, १९३७ साली प्रवासी, १९४४ साली अखेरचे बंड, १९४८ साली झंझावात, १९५० उजडलं पण सूर्य कोठे आहे, १९५८ साली ऋतूसंहार, १९६० साली कुहू कुहू, १९६१ साली ही का कल्पद्रुमांची फळं, १९६२ साली बावनकशी (कथासंग्रह), १९६४ साली एक होता युवराज आणि १९७८ साली भूपाळी ही शेवटची कादंबरी प्रसिध्द केली. १९२५ मध्ये रत्नाकर नावाचे मासिक सुरु केले. १९४० मध्ये झंकार साप्ताहिक सुरु केले. १९४२ साली कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयामधून सेवा निवृत्ती. १९५१ मध्ये अंजली प्रकाशन संस्था स्थापन केली व अंजली हे नियतकालिक सुरु केले.

युगांतर, जानकी, संजीवन, काळे गोरे इत्यादी नाटकेही प्रसिध्द झाली. १९४० साली रत्नागिरी येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. १९६२ साली भारत सरकारद्वारा पद्मभूषण प्रदान करण्यात आले. १९६९ मध्ये माझे जीवन एक कादंबरी हे आत्मचरित्र प्रसिध्द झाले. अशा थोर साहित्यिकाचा मृत्यू २२ ऑक्टोबर १९७८ रोजी झाला.'[२३]

**२) आबासाहेब निंबाळकर :-**

आबासाहेब निंबाळकर यांचा जन्म कर्जत तालुक्यात शेतकरी कुटुंबात झाला. जेमतेम शिक्षण पूर्ण केल्यानंतर शेती करण्यास प्रारंभ केला. सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे स्वतःला गावपातळीपासूनच राजकीय व सामाजिक कार्यात झोकून दिले आणि आपल्या कार्यास प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

तालुक्यातील सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व केले. हे करत असतानाच १९५२ साली सर्वप्रथम श्रीगोंदा, कर्जत विधानसभा मतदारसंघातून शे.का.प.पक्षातर्फे विधानसभा निवडणूक लढवून या मतदारसंघाचे चोकप्रतिनिधित्व केले. पुढे १९६२ साली कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातून कॉग्रेस पक्षातर्फे निवडणूक लढवून या मतदार संघाचे लोकप्रतिनिधित्व केले आणि १९६७ साली पुन्हा निवडणूक लढवून कर्जत-जामखेड मतदार संघाचे काँग्रेस पक्षामार्फत प्रतिनिधित्व केले. १९७२ साली कर्जत जामखेड याच मतदारसंघातून विधानसभेचे प्रतिनिधित्व केले. सलग २० वर्षे आमदार म्हणून काम केले परंतु दुष्काळग्रस्त तालुके असल्यामुळे विकास संथ गतीने दिसतो. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेत निवडून आल्यानंतर १९९२ ते १९९३ साली अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन पद भूषविले व मोठया प्रमाणात बँकेचा विस्तार करुन शेतकऱ्यांना कर्ज वितरण केले.

**सामाजिक कार्य :-**

कर्जत तालुक्यात सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व करीत असताना तालुक्यात विविध संस्थांची स्थापना करण्याचे कार्य आबासाहेबांनी केले. १९५२ ते १९७२ या कालावधीत श्रीगोंदा, कर्जत, जामखेड या विधानसभा मतदार संघातून लोकप्रतिनीधित्व करीत असताना रस्ते, वीज, पाणी आरोग्य, शैक्षणिक सुविधा यांच्याकडे विशेष लक्ष दिले. दुष्काळग्रस्त भागात पाणी आडवा व पाणी जिरवा, लघु पाटबंधारे या विविध योजना मोठया प्रामाणावर राबविण्याचे कार्य केले. जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमन पदाच्या कालखंडात संपूर्ण जिल्हयात सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर कर्ज वितरणाचे कार्य केले.

## जामखेड तालुका

**१) बन्सीलाल कोठारी :-**

'बन्सीलाल सुवालाल कोठारी यांचा जन्म ३१ जानेवारी १९२६ रोजी जामखेड तालुक्यात झाला. प्राथमिक शिक्षणानंतर आपल्या व्यवसायास प्रारंभ केला. १९४२ च्या आंदोलनात सहभाग घेतला आणि तेथून पुढे राजकीय व सामाजिक कार्यास सुरुवात झाली.

**राजकीय कारकीर्द :-**

जामखेड ग्रामपंचायतचे सरपंच, १९६७ साली जिल्हा परिषद सदस्य, अर्थ व आरोग्य विभागाचे सभापती, जामखेड पंचायत समितीचे सभापती, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, भारत सेवक समाजसंस्थेचे कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सदस्य अशी विविध पदे भूषविली.

**सामाजिक कार्य :-**

जामखेड ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे अर्थ व आरोग्य विभागाचे सभापती असे विविध पदे भूषवित असताना गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत स्वतः पूर्ण वेळ सामाजिक कार्यात सहभागी झाले. १९४२ च्या आंदोलनात सहभाग. १९४८ साली ऑनर ऑफ स्वोर्ड पुरस्कार. १९८० साली राष्ट्रपतींचे जीवनरक्षा पदक, १९९४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार आणि स्वातंत्र्य सैनिक सन्मान पत्र प्राप्त झालेले. कोठारी यांनी राजकीय, सामाजिक कार्यातून विकास साधण्याचे काम केले.'[२४]

**२) गोपाळराव सोले पाटील :-**

सोले पाटील यांचा जन्म जामखेड तालुक्यातील आरणगाव येथे ११ मार्च १९२९ रोजी झाला. त्यांचे शिक्षण पुणे येथे व्हार्नाक्युलर फायनल विभाग प्रथम श्रेणीत पूर्ण झाले. शिक्षण घेत असतानाच राजकीय व सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे दादांनी स्वतःला राजकीय कार्यात झोकून दिले. १९३५ साली अरणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून त्यांचे वडील कार्य करत होते. वडिलांच्या कार्याचा ठसा स्वतःवर उमटल्यामुळे १९५० पासून म्हणजेच वयाच्या २१ व्या वर्षापासून त्यांनी राजकीय कार्यास प्रारंभ केला.

**राजकीय कारकीर्द :-**

अरणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, १९५२ साली अरणगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची स्थापना, १९६२ साली तालुका पंचायत समितीचे सदस्य सलग १५ वर्षे, १९६२ साली जिल्हा सहकारी भूविकास बँकेचे संचालक, १९६५ साली अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे ३० वर्षे संचालक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष, जिल्हा सहकारी मंडळाचे ४० वर्षे संचालक व ५ वर्षे अध्यक्ष, जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघाचे

संस्थापक अध्यक्ष, कर्जत येथील यशवंत शैक्षणिक संस्थेचे संस्थापक सदस्य, राज्य सहकारी संघाचे मानद सचिव, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनचे संचालक, जामखेड तालुका खरेदी विक्री संघाचे संस्थापक अशी राजकीय पदभार स्वीकारला.

**सामाजिक कार्य :-**

गोपाळराव सोले पाटील यांना वडिलांचा राजकीय वारसा असल्यामुळे वयाच्या २१ व्या वर्षी गावचे सरपंच पद आणि जामखेड तालुका पंचायत समितीचे सदस्य पदापासून त्यांनी आपल्या सामाजिक कार्यास प्रारंभ केला. पंचायत समितीच्या माध्यमातून आपल्या गटातील प्रलंबित असणारे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे कार्य केले. १९६५ साली अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणून निवडून आल्यानंतर सलग ३० वर्षे जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती विकासाकरिता लघु मुदत, मध्यम मुदत, दीर्घ मुदतीवर सहकारी सोसायटींच्या माध्यमातून कर्ज वितरणाचे कार्य मोठया प्रमाणावर केले. शेतकरी सुधारला तरच तालुक्याचा विकास होईल हा ध्यास सोले पाटलांनी घेतला होता. त्याचबरोबर जिल्हा व तालुका खेरदी विक्री संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे मोठया प्रमाणावर पुरविण्याचे कार्य केले. या कार्याबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास झाला पाहिजे या दृष्टिकोनातून यशवंत शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून गावपातळी, तालुकापातळी व जिल्हापातळीवर काम करत असतानाच राज्य सहकारी संघ, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, नाफेड या राज्यपातळीवरील संस्थांच्या माध्यमातूनही कार्य केले. हे कार्य करत असतानाच जिल्हयात काँग्रेस पक्षाच्या मजबुतीकरणातही मोठा सहभाग घेतला. त्यांनी केलेल्या कार्यातून त्यांना काकासाहेब म्हस्के मेडिकल फाउंडेशन नगर, सोशल सेंटर अहमदनगर, वैकुंठभाई मेहता सहकारी संस्था पुणे यांच्याकडून पुरस्कार प्रदान करुन त्यांना गौरविण्यात आले.[२५]

**३) डॉ. रजनीकांत आरोळे :-**

डॉ. रजनीकांत आरोळे यांचा जन्म १० जुलै १९३४ रोजी पारनेर तालुक्यातील सुपा येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण राहुरी येथे झाले व त्यानंतर विल्सन कॉलेज मुंबई येथे १९५४

साली बी.एस्सी. ही पदवी प्राप्त केली आणि एम.बी.बी.एस. १९५९ साली ख्रिश्चन मेडीकल कॉलेज वेल्लोर येथून पूर्ण केले. डॉ. मेबल यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

**सामाजिक संस्थांची भूषविलेली पदे :-**

अध्यक्ष : इमॅन्युअल हॉस्पिटल असोसिएशन ऑफ इंडिया, सदस्य : प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी, हायजीन ॲन्ड हेल्स, बाल्टीमोर सहाय्यक प्राध्यापक, सदस्य : हॉल्टरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, अध्यक्ष : अखिल भारतीय विज्ञान परिषद, सदस्य : विशेषाधिकार समिती - राष्ट्रीय ग्रामीण आरोगय प्रोग्रॅम, सदस्य : पुणे विद्यापीठ अधिसभा, सदस्य : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नियोजन समिती, फॅमिली प्लॅनिंग फाउंडेशन ऑफ इंडिया सल्लागार सदस्य, भारत सरकार आहारविषयक कृतीगट सदस्य, राज्य नियोजन मंडळ सदस्य, ग्लोबल मिनीस्ट्रीय ऑफ युनायटेड मेथॉडीस्ट चर्च, न्यूयॉर्क कम्युनिटी हेल्थ कन्सलटंट, बँकॉक, बर्लिन, पॅरिस, लंडन, दिल्ली, नागपूर अशा देशी परदेशी परिषदांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**सामाजिक कार्य :-**

१९५९ साली एम.बी.बी.एस. पदवी पूर्ण केल्यानंतर डॉ. आरोळे यांनी १९६५ साली वडाळा मिशन येथे आपल्या रुग्णसेवेस प्रारंभ केला. १९६८-६९ मराठवाडा व उस्मानाबाद येथे रुग्णसेवा केली. रुग्णसेवा करत असतानाच आपल्या तालुक्यातील गोरगरीब जनतेला विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची कल्पना जाणवली आणि २७ सप्टेंबर १९७० साली जामखेड तालुक्यातील ८ खेडयांमधील दहा हजार लोकांची जामखेड प्रकल्पांतर्गत निवड केली. जमिनीचे सपाटीकरण, कूपनलिका, विहीर खोदणे, ग्रामीण जनतेस आरोग्य शिक्षण देणे, प्रसूती करणे, बाल मृत्यू टाळणे या योजना या गावांमध्ये राबविण्यात आल्या. आजारासाठी ग्रामीण जनतेला शहरी भागाकडे करावी लागणारी धावपळ टाळण्यासाठी डॉ. आरोळे यांनी जामखेड येथे सर्व सोयींनी युक्त रुग्णालय उभारले. हे कार्य करत असतानाच नंतर त्यांनी अकोले व कर्जत या तालुक्यांचाही यात समावेश केला. Raching to Unreach या ब्रीद वाक्यानुसार त्यांनी आपले कार्य सुरु केले. डॉ. आरोळे यांनी विविध सामाजिक व आरोग्य संस्थांच्या माध्यमातून कार्य करुन एक वेगळा ठसा उमटविला. त्यांनी केलेल्या कार्यातूनच

त्यांना विविध संस्थांच्या माध्यमातून पुरस्कार प्रदान करण्यात आले. १९६६ साली पॉल हॅरिसन पुरस्कार, १९७९ साली फिलीपाईन्सचा रॅमन मॅगसेस अॅवार्ड, १९८५ साली यू.एस.ए. च्या गेट्सबर्ग कॉलेजमधून पीएच.डी., १९८७ साली अपंगांच्या पुनर्वसनाबद्दल एन.डी.दिवान मेमोरिअल अॅवार्ड, १९८८ साली आंतरराष्ट्रीय आरोग्य सेवेबद्दल एन.सी.२आय.एच. पुरस्कार, १९९० भारत सरकारतर्फे पद्मभूषण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरसकार, २००५ साली मदत तेरेसा राष्ट्रीय पुरस्कारांनी डॉ. आरोळे यांना गौरविण्यात आले.

**४) रामदास फूटाणे :-**

रामदास फूटाणे यांचा जन्म १४ एप्रिल १९४३ रोजी जामखेड येथे सामान्य कुटुंबात झाला. शिक्षण घेत असतानाच सामाजिक कार्याची व कलेची आवड असल्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी शिक्षकी पेशाचा स्वीकार केला व या माध्यमातूनच पुढे हळुहळु कलेबरोबर राजकीय व सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली.

**राजकीय कारकीर्द :-**

१९८०-८५ महाराष्ट्र राज्य सेन्सॉर बोर्डाचे संचालक, १९९० मराठी चित्रपट महामंडाळाचे अध्यक्ष, १९९१ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे सरचिटणीस, १९९६ महाराष्ट्र राज्य विधान परिषद सदस्य.

**सामाजिक कार्य :-**

रामदास फूटाणे हे चित्रकार, कवि, समाजकारण, ऋतुराज या नियतकालिकांचे संपादक होत. त्याचबरोबर 'सफेद टोपी', 'लाल बत्ती', 'चांगभलं', असे काव्य संग्रह प्रसिध्द. 'सामना' या चित्रपटाची निर्मिती आणि राष्ट्रीय पातळीवरील ३ पुरस्कार प्रदान, ७ फिल्मफेअर व ७ राज्य पुरस्कार प्रदान. सर्वसाक्षी - हाँगकाँग फिल्म फेस्टिवलसाठी निवड. सुवार्ता - उत्कृष्ठ ग्रामीण चित्रपटाचा पुरस्कार, एकपात्री नाटक 'भारत कधी कधी माझा देश आहे'. अशा विविध नियतकालिके, काव्यसंग्रह, नाटके, चित्रपट यांच्या माध्यमातून रामदास फूटाणे यांनी प्रबोधनात्मक कार्य केले आणि त्यांनी केलेल्या कार्यातूनच विविध पुरस्काराच्या माध्यमातून त्यांना गौरविण्यात आले.

**५) सदाशिवराव लोखंडे :-**

सदाशिवराव लोखंडे यांचा जन्म जामखेड तालुक्यात झाला. कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसतांना आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर सामाजिक व राजकीय कार्याची आवड असल्यामुळे गावपातळीवरुन आपल्या राजकीय कार्यास प्रारंभ केला आणि विविध संस्थांच्या माध्यमातून विकासाचा ध्यास घेऊन कार्य केले.

**राजकीय कारकीर्द :-**

खेमानंद दूध संघाचे संस्थापक, कर्जत ग्रामीण रुग्णालय स्थापनेत सक्रिय सहभाग, खेमानंद इंग्लिश स्कूलची स्थापना, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक, १९९५ कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी, १९९९ कर्जत जामखेड विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधी म्हणून कामकाज केले.

**सामाजिक कार्य :-**

आमदार सदाशिवराव लोखंडे यांचे प्रेरणास्थान कै. ह.शू. अडवाणी यांच्या प्रेरणेतून लोखंडे यांनी आपल्या राजकीय व सामाजिक कार्यास प्रारंभ केला. खेमानंद दूध संस्थेची स्थापना करुन शेतकऱ्यांना दुग्धव्यवसायास चालना दिली. अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थान चौंडी या पर्यटनस्थळाकरिता सक्रिय सहभाग व जामखेड पासून २० कि.मी. अंतरावर आग्नेय दिशेला असणाऱ्या खर्डा किल्ल्याच्या विकासाकरिता सक्रिय सहभाग. कर्जत येथे ग्रामीण रुग्णालयाची स्थापना. कुकडी कालव्याचे पाणी मतदारसंघातील भुतवडा जाडतलावात आणले. जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांना मोठया प्रामणावर कर्ज वितरणाचे कार्य केले. कर्जत जामखेड मतदार संघाचे सलग १५ वर्षे लोकप्रतिनिधित्व करत असताना तालुक्यातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, सहकारी संस्था यांच्या विकासाकडे प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आणि कुकडीच्या माध्यमातून मतदारसंघाचा विकास मोठया प्रामाणावर केला. या कार्याबरोबरच खेमानंद संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यही सदाशिव लोखंडे यांनी केल्याचे दिसून येते.

**२.४ दक्षिण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था, सह. संस्था, बँका व साखर कारखाने :-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये महाराष्ट्रात जी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, भौतिक जडण-घडण झाली त्यामध्ये सहकाराचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. ही सहकार चळवळ अहमदनगर जिल्हयाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. म्हणून दक्षिणेतील नेत्यांनी उभ्या केलेल्या व त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या सहकारी संस्थांवरुन दिसून येते.

दक्षिणेतील नेत्यांनी प्रथम विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी व ग्रामपंचायतीपासून राजकीय कार्याला सुरुवात केली. त्या काळी तालुक्यात वेगवेगळे नेतेमंडळी प्रभावशाली होते. तालुक्यात दूरदृष्टीचे नेतृत्त्व नसल्याचे जाणवले. तालुक्याच्या विकासाचे दृष्टीने कुठलेही पाऊल उचलल्याचे दिसून आले नाही. परंतु शांत संयमी नेतृत्व होते. तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने दक्षिणेतील नेते मंडळींनी कार्यकर्त्यांना संघटित करुन साखर कारखाना उभा केला. सावकारी वर्चस्व आणि आर्थिक चणचण अशा अनेक अडचणींवर मात केली आणि तालुका उभा केला हे सर्व करत असताना खडतर प्रसंग टाळण्यासाठी १९७६-७७ साली माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना श्रीगोंदा तालुक्यात आणून काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर बापूंनी राज्यातील ग्रामीण भागातील पहिले पॉलिटेक्निक बेलवंडी शुगर येथे सुरु केले. शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून माध्यमिक विद्यालय, महाविद्यालय, महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इंग्लिश मेडियम या माध्यमातून शैक्षणिक विकास, विविध कामे करण्यास पुढाकार घेतला. त्यात विशेषतः शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने पावले उचललेली दिसून येतात. याच पध्दतीने दक्षिणेतील नेते मंडळींनी आपल्या तालुक्यात कामकाज केल्याचे दिसते.

दक्षिणेतील नेत्यांनी गावपातळी, तालुका, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवरील अनेक संस्थांवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व पदाधिकारी या नात्याने कार्य केले आहे आणि करत आहेत. प्रथम राजकीय प्रारंभ केला आणि त्या काळी स्थानिक स्वराज्य संस्थेची, सहकारी संस्थेची निवडणूक लढवून गावचे सरपंच पद, चेअरमन पद भूषविले आणि सरपंच, चेअरमन, पंचायत समिती सभापती सदस्य म्हणून काम केले. सरपंच, चेअरमन पदाच्या काळात

गावातील विविध प्रश्न तळमळीने आणि तातडीने सोडविण्याचे काम केले. जनतेच्या आणि गावाच्या विकासाकरिता त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन कार्य केले व गावाला विकासाची दिशा देण्याचे काम सुरु केले. सत्तेचा दुरुपयोग न करता स्थानिक प्रश्नांना महत्त्व दिले. राजकीय अपयश आले तरी काम करत राहिले.

गावातील असणारे प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे काम करत असताना सामांन्यातील सामान्य माणसांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदत करण्याचे कार्य केले व यातूनच पुढे त्यांच्यावर गावाने विश्वास टाकून त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांची सहकारी संस्थेत निवड केली.

**ग्रामपंचायत :-**

'खेडे हे विकासाच्या योजनेतील मूलभूत घटक असून त्या पातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. गावातील लोकप्रतिनिधी निवडतात. स्त्रिया आणि अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्व देण्याची तरतूद असते. सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत खेडयाचे शासन आणि विकास याविषयी कार्य पार पाडते. ग्रामसेवक ही महत्त्वपूर्ण भूमिका असून पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्याकडून तांत्रिक मार्गदर्शन मिळते. ग्रामस्वच्छता, पाणीपुरवठा, प्राथमिक शिक्षण, नोंदी ठेवणे इ. कामे ग्रामपंचायत पार पाडते'[२६]

**१९९० ते २००० सालातील दक्षिण भागातील तालुकानिहाय ग्रामपंचायत**

| अ. क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायती व गटग्रामपंचायती | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **१९९०** | **१९९१** | **१९९२** | **१९९३** | **१९९४** | **१९९५** | **१९९६** | **१९९७** | **१९९८** | **१९९९** | **२०००** |
| **१** | **नगर** | १०४ | १०४ | १०४ | १०४ | १०४ | १०४ | १०४ | १०४ | १०७ | १०७ | १०७ |
| **२** | **पाथर्डी** | ८९ | ८९ | ८९ | १०० | १०७ | १०७ | १०७ | १०७ | १०७ | १०७ | १०७ |
| **३** | **जामखेड** | ५३ | ५३ | ५३ | ५३ | ५३ | ५३ | ५३ | ५३ | ५५ | ५५ | ५५ |
| **४** | **कर्जत** | ७५ | ७५ | ७५ | ९१ | ९१ | ९१ | ९१ | ९१ | ९१ | ९१ | ९१ |
| **५** | **श्रीगोंदा** | ८० | ८० | ८२ | ८२ | ८२ | ८२ | ८२ | ८२ | ८२ | ८२ | ८२ |
| **६** | **पारनेर** | १०९ | १०९ | १११ | ११२ | ११२ | ११२ | ११२ | ११२ | ११२ | ११२ | ११२ |

आधार - जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग, अहमदनगर.

सन १९९० ते २००० या कालखंडातील तालुकानिहाय पंचायतसमिती व गटग्रामपंचायती संस्था निदर्शनास येते. पैकी पाथर्डी, कर्जत, पारनेर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये १९९२-१९९३ पासून वाढ झाल्याचे दिसून येते. यातूनच हळूहळू स्थानिक संस्थांच्या स्थापनेला व विकासाला चालना मिळाल्याचे दिसते.[२७]

**विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे कार्य :-**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सहकारी पतसंस्थेची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना अल्प, मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या पतसंस्थेची जी त्रिस्तरीय रचना आहे त्यामध्ये सर्वात खालच्या स्तरावर कार्यरत असणारी संस्था म्हणजे प्राथमिक कृषी सहकारी संस्था होय.

'सहकारी संस्थांचा एक प्रकार, एका केंद्रभूत कार्यासोबत इतर आनुषंगिक कार्ये सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने विविध कार्यकारी वा बहुउद्देशीय संस्था अस्तित्वात येतात. सुरुवातीस एकमेव उद्देशाने स्थापन झालेल्या सहकारी संस्थेचा विकास होताना सभासदांच्या इतर अनेक गरजांचे समाधान त्याच संस्थेमार्फत करण्याची आवश्यकता वाटू लागली की, संस्थेचे रुपांतर विविध कार्यकारी संस्थेत होण्याचा कल भारतासह इतर अनेक देशांत आढळतो. शेतीमध्ये प्राथमिक पातळीवर अनेक सेवांची गरज विशेष करुन भासते. शेतमालाच्या उत्पादनवाढीसाठी अल्प, मध्यम पीक कर्ज देण्याच्या मुख्य कार्यासोबत सभासदांचा शेतमाल सहकारी विपणन संस्थेला विकणे, सभासदांना बियाणे, खते इत्यादी पुरविणे अशी कामे विविध कार्यकारी सहकारी संस्थेमार्फत केली जातात.'[२८]

राजकीय, सामाजिक जीवनात विश्वस्तांच्या भूमिकेतून ग्रामीण परिसराचा चेहरामोहरा बदलून टाकत असताना अर्ध्या भाकरीला महाग असलेला अंगावर पुरेसे कपडे नसलेला आणि नैसर्गिक आपत्तीला तोंड देत दुष्काळाने हैराण झालेला खेडूतवर्ग रडत-रखडत जीवन जगत होता. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील साधने आणि ग्रामीण नेतृत्वाच्या बळावरच येथील विकास बाळसे धरील हे जनतेच्या लक्षात आले आणि सेवा सोसायटीची स्थापना झाली.

### तालुकानिहाय प्राथमिक कृषि सहकारी संस्था

| अ. क्र. | तालुका | सहकारी संस्था सन १९९० ते २००० | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९० | १९९१ | १९९२ | १९९३ | १९९४ | १९९५ | १९९६ | १९९७ | १९९८ | १९९९ | २००० |
| १ | नगर | १०५ | १०६ | १०६ | १०६ | १०७ | १०७ | १०७ | १०७ | ११३ | ११३ | ११३ |
| २ | पाथर्डी | ८० | ८० | ८० | ८० | ८० | ८० | ८० | ८० | ८३ | ८३ | ८३ |
| ३ | जामखेड | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४४ | ४४ | ४५ | ४६ | ४६ |
| ४ | कर्जत | ६४ | ६५ | ६५ | ६५ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ |
| ५ | श्रीगोंदा | ७५ | ७७ | ८६ | ८९ | ९३ | ९५ | ९५ | ९८ | ९८ | ९९ | ९९ |
| ६ | पारनेर | ९९ | ९९ | ९९ | ९९ | ९९ | १०० | १०० | १०१ | १०३ | १०४ | १०४ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

वरील तक्त्यावरुन अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील असणाऱ्या सहा तालुक्यांमधील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांची १९९० ते २००० या कालावधीतील वाढ लक्षात येते. संस्था वाढण्यामागे एक कारण असे सांगता येईल की प्रत्येक खेडयात 'एक गाव-एक संस्था' या माध्यमातून सहकारी संस्था स्थापण्याचे धोरण अवलंबिले गेले. या सहकारी सोसायटी स्थापन केल्यानंतर गावातील जनतेला सोसायटीचे सभासदत्व देऊन मागेल त्याला कर्ज देण्याचे काम सुरु केले. सहकारी सोसायटीच्या माध्यमातून विहीर, मोटार, पाईपलाईन, गाई गोठा, पीककर्ज, ट्रॅक्टर अशा विविध सोयी करता लाखो रुपये शेतकऱ्यांना जिल्हा बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचे काम केले. गरीब कुटुंबातील व्यक्तींना कर्जपुरवठा करण्याचे काम सहकारी सेवा संस्थेच्या माध्यमातून केले. हे सर्व करत असताना संस्थेला झालेला नफा सर्व सभासदांना वाटण्याचे काम नेत्यांनी केले. कुटुंबाचा विकास झाला तरच गाव सुधारेल, तालुका सुधारेल व देश प्रगतिपथावर जाईल हे लक्षात घेऊन दक्षिणेतील नेत्यांनी अहोरात्र कष्ट केले. जनतेच्या प्रश्नांकरिता झिजले. छोटयाशा गावात सुरु केलेली सहकारी सोसायटी तालुक्यामध्ये नावारुपाला आणण्याचे काम केले.

आज या सेवा संस्थेच्या माध्यमातून हजारो सभासदांना अर्थसहाय्य करण्याचे कार्य करत आहे. सेवा संस्थेने लाखो रुपयांची इमारत उभी केलेली आहे. गोडावून उभे केले आहे. या बरोबर प्रशासकीय इमारत, स्वस्त धान्य दुकान, खते, बी-बियाणे, रॉकेल विक्री केंद्र, सहकारी संस्थेमार्फत केले जाते. सहकारी संस्थेचा कारभार सभासद हिताचा व्हावा व संस्थेची

प्रगती व्हावी यासाठी संस्थाचालकांनी त्यागी वृत्तीने काटकसरीने कारभार करावा असे सतत मार्गदर्शन नेते मंडळी करत असतात.[२९]

**पंचायत समिती कार्य :-**

प्रत्येक जिल्हयाचे गट किंवा खंड पाडले जातात. या गटाच्या पातळीवर काम करणारी संस्था म्हणजे पंचायत समिती होय. वेगवेगळी कार्ये या संस्थेकडे सोपविली जातात. त्यामध्ये उल्लेखनीय म्हणजे विकास खंडातील कामाची रुपरेषा तयार करणे, शेती व इतर व्यवसायांच्या विकासाला मदत देणे, प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन व नियंत्रण, मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना आखणे इ. कार्याचा समावेश होतो.[३०]

पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे. तसेच जे जे काही महत्त्वाचे आहे ते मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होते, वीजेची सोय, रस्त्यांचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांचा सतत पाठपुरावा करुन ते सोडविले. या काळात जनतेच्या प्रश्नांशी असणारी बांधिलकी लक्षात घेऊन नेत्यांनी तालुक्यातील विविध प्रश्नांचा अभ्यास केला. पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीसाठी पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लघुपाटबंधारे करता येतील याची आखणी केली. सामुदायिक विहिरी, नालाबंडींग, पाझर तलाव या कामांना गती देऊन पाणीपुरवठा योजना राबवून पूर्ण केली. शेतकऱ्यांची शेती सुधारुन तो सुखी समाधानी व्हावा, त्यांचे जीवनमान उंचवावे ही दूरदृष्टी दक्षिणेतील नेत्यांच्या कामामधून दिसून येते.

अन्नधान्य टंचाईवर मात करण्यासाठी नेत्यांनी पंचायत समितीत कार्य करत असताना विविध प्रयोग तालुक्यात राबविले. या प्रयोगास चालना दिली. यामध्ये प्रामुख्याने बाजरी, ज्वारीच्या सुधारित, संकरित बी-बियाणांचा प्रचार व प्रसार करुन कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांना बियाणे वापरण्यास स्फूर्ती दिली. शेतकऱ्यांनी ही योजना व्यवस्थित समजाऊन राबवली व त्यामुळे उत्पादन प्रचंड वाढले व अन्नधान्य उत्पादनवाढीच्या भरीव कार्याबद्दल जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीचा गौरव करण्यात आला.

**जिल्हा परिषद अहमदनगर :-**

जिल्हा पातळीवर विकास कार्यक्रमांचा समन्वय साधण्याचे काम जिल्हा परिषद करते. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सदस्य म्हणून काम करतात. जिल्हयातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती जिल्हा परिषदेचे पदसिध्द सभासद असतात. जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या योसीसाठी काही समित्या गठित केल्या जातात. त्या म्हणजे स्थायी समिती, आरोग्य, शिक्षण, अर्थ, वाहतूक, बांधकाम, सहकार, शेती इ. समित्या जिल्हा परिषदेकडे असतात. त्यातून विकासाची रुपरेषा निश्चित करणे, योजना कार्यान्वित करणे, अंदाजपत्रक तयार करणे, करनिर्धारणांचे निर्णय घेणे पंचायत समितीच्या कार्यात समन्वय साधणे इ. कार्याचा समावेश असतो.[३१]

अहमदनगर जिल्हा परिषदेची स्थापना १९६२ साली करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दक्षिणेतील नेते मंडळींनी आपआपल्या तालुक्यातील रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, पाणी, लघुबंधारे, विहीर, पाझर तलाव अशा विविध योजना राबवून गोरगरीब जनतेच्या प्रश्नांशी सतर्क राहिल्याचे दिसून येते.

**'१९९० ते २००० या कालखंडातील अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व कार्यकाल'**

| अ.क्र. | अध्यक्षाचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १ | श्री. आप्पासाहेब राजळे | १९८५ ते १९९० |
| २ | श्री. ज्ञानदेव कासार | १२/०४/१९९० ते ३०/०६/१९९० |
| ३ | प्रशासक | ०१/०७/१९९० ते २०/०३/१९९२ |
| ४ | श्री. अरुण कडू | १९९२ ते १९९७ |
| ५ | डॉ. विमलताई ढेरे | १९९७ ते १९९९ |
| ६ | श्री. अशोक भांगरे | १९९८ ते १९९९ |
| ७ | श्री. नरेंद्र घुले | २१/०३/१९९९ ते १६/०८/१९९९ |
| ८ | श्री. बाबासाहेब भोस | १७/०८/१९९९ ते २०/०३/२००२ |

**अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व कार्यकाल'**[३२]

१९९० ते २००० या कालखंडातील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचा कार्यकाल पाहता अहमदनगर जिल्हा परिषदेवर दक्षिण भागातून पाथर्डी तालुक्यातून १९८५ ते १९९० साली आप्पासाहेब राजळे अध्यक्ष होते. नगर तालुक्यातील ज्ञानदेव कासार १२/०४/१९९० ते ३०/०६/१९९० हे अध्यक्ष होते, १७/०८/१९९९ ते २००० या कालावधीत श्रीगोंदा तालुक्यातून बाबासाहेब भोस अध्यक्ष होते. एकूणच १९९० ते २००० या कालावधीतील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचा कालखंड पाहता दक्षिण भागापेक्षा जिल्हयाच्या उत्तर भागाचे वर्चस्व दिसून येते.

पंचायत समितीच्या, जिल्हा परिषदेच्या कार्याबरोबरच शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत अल्पभुधारकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात आली. त्याबरोबर ग्रामपंचायतीसाठी निधी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी विविध सुविधा पुरविण्याचे कार्य नेत्यांनी केल्याचे दिसून येते. सहकारी सोसायटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक कार्य करीत असताना पुढे त्यांच्या कार्यातून घडून आलेला बदल म्हणजे सहकारी साखर कारखान्याची स्थापना व त्या माध्यमातून केलेले कार्य.

(अहमदनगर जिल्हा परिषद छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)

**सहकारी साखर कारखान्यांची स्थापना -**

देशात सहकाराचा पहिला कायदा १९०४ मध्ये संमत करण्यात आला. १९१२, १९१९, १९२५ या वर्षी निरनिराळे कायदे करुन संस्थामधील दोष काढून टाकण्यात आले. ग्रामीण पत सर्वेक्षण समिती १९५४, वैकुंठलाल मेहता समिती १९६० यांच्या अहवालात व पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यांनी सहकाराचा सतत पुरस्कार केला. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर लोणी जि. अहमदनगर येथे १९४९ रोजी सुरु झाला. साखर कारखाने ही महाराष्ट्राची अभिमानास्पद बाब आहे. १९६० साली राज्यात १३ सहकारी साखर कारखाने होते. हाच अभ्यास करुन दक्षिणेतील नेत्यांनी जलसिंचनाचे क्षेत्र वाढत गेल्यावर आपआपल्या तालुक्यात सहकारी कारखानदारीचा प्रयोग राबविण्याचा प्रयत्न केला.[३३]

दुष्काळाचा वारंवार सामना करणाऱ्या तालुक्यांच्या अंगाखांद्यावर घोड, कुकडीचे, सीना, भीमाचे पाणी खेळविणारे खाजगी कारखानदाराची मक्तेदारी मोडून सहकारी तत्त्वावरील

साखर कारखाने काढून तालुक्यात विकासाची मुहूर्तमेढ रोवणारे आदरणीय शिवाजीराव नागवडे, बबनराव पाचपुते, कुंडलिकराव जगताप, बाबुराव बापुजी तनपुरे, बबनराव ढाकणे, दादा पाटील राजळे, बापूसाहेब देशमुख, नारायण गणपत आव्हाड, आबासाहेब निंबाळकर, दादापाटील शेळके, शिवाजीराव कर्डिले, बाळासाहेब भगत, गुलाबराव शेळके यांनी सहकार्याच्या मदतीने आपल्या तालुक्यात कारखाना उभा केला.

खऱ्या अर्थाने तालुक्याचे भाग्यविधाते ठरलेल्या नेत्यांनी भाग्यविधाता हे ध्रुवासारखे अढळपद मिळविण्यासाठी खूप कष्ट सोसले आहेत. उमेदीच्या काळात खूप कष्ट करुन प्रस्थापिताविरुध्द लढा दिला. शेतकऱ्यांच्या भल्यासाठी वणवण भटकले. शासन दरबारी हजारो चकरा मारल्या म्हणूनच तालुक्यातील जनता विकास काय असतो याचा अनुभव घेत आहे. पण हा अनुभव देण्यामागे नेत्यांचे अविरत कष्ट आहेत. या कार्यातून नव्या पिढीला समाजकार्याची प्रेरणा मिळावी आणि त्यातून नवभारताची निर्मिती व्हावी हाच एकमेव उद्देश त्यामागे आहे.

सर्वसामान्यासाठी कष्ट करत असताना निःस्वार्थीपणे जपणे, वेळ काळाचे भान न पाळता लढत राहणे, घेतलेला ध्यास पूर्ण करण्यासाठी जिवाचे रान करणे या गुणांच्या जोरावर दक्षिणेतील नेत्यांनी कारखान्यांच्या माध्यमातून कार्य केले. ऊस लागवडीचे नियोजनबध्द धोरण राबवून उसाच्या क्षेत्रात अधिकाधिक वाढ व उत्कृष्ट दर्जाचे ऊस उत्पादन, मेळावे, शेतकरी सहली, शिबीरे राबवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन त्याच बरोबर संचालक मंडळ व कर्मचारी या सर्वांच्या मदतीने नियोजनबध्द कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांच्या व सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न केला.

एकूणच सहकारी साखर कारखान्यांचा प्रगतीचा विचार करता वाढते ऊस उत्पादन, साखर उतारा या सर्व गोष्टींचा विचार करुन सभासदांना आजपर्यंत चांगला बाजारभाव देण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर सभासदांना विविध योजना उपलब्ध करुन देण्याचे काम केलेले आहे. साखर कारखान्यातील सुरु झालेल्या राजकीय कार्यातून सामाजिक विकास साधून शेतकरी व तालुक्याच्या विकासाची गंगोत्री साखर कारखाना ठरल्याचे दिसून येते.

**दक्षिण भागातील तालुकानिहाय साखर कारखाने**

| अ.क्र. | तहसील | साखर कारखान्याचे नाव | सहकारी/खाजगी |
|---|---|---|---|
| १ | नगर | नगर तालुका सह. साखर का. लि. | सहकारी |
| २ | पाथर्डी | वृध्देश्वर सह.सा.का.लि. अदिनाथनगर | सहकारी |
| ३ | कर्जत | जगदंबा सह.सा.का.लि. | सहकारी |
| ४ | श्रीगोंदा | श्रीगोंदा सह.सा.का.लि. श्रीगोंदा फॅक्टरी<br>कुकडी सह.सा.का.लि. पिंपळगाव पिसा | सहकारी<br>सहकारी |
| ५ | पारनेर | पारनेर सह.सा.का.लि. देवीभोयरे | सहकारी |
| ६ | जामखेड | - | - |

**"प्रादेशिक सहसंचालक" (साखर संघ) अहवाल अहमदनगर, १९९८-९९"**[३४]

१९९० ते २००० या कालखंडातील साखर कारखाने पाहता वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की दक्षिण नगरमधील सहा तालुक्यांपैकी जामखेड तहसीलमध्ये साखर कारखान्याची स्थापना झालेली नाही. तर श्रीगोंदा तालुक्यात दोन सहकारी साखर कारखाने स्थापन झाले आहेत. १९९० ते २००० या कालावधीतील दक्षिणेतील सर्व कारखाने सहकारी तत्त्वावरील दिसून येतात.

**अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून कार्य (स्थापना १ मे १९५८) :-**

राज्यात कृषी क्षेत्रास सहकारी तत्त्वावर अल्प, मध्यम, दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्याच्या त्रिस्तरीय रचनेत दुसऱ्या स्तरावर जिल्हापातळीवर कार्य करणारी जिल्हा सहकारी बँक होय. खेडेगावपातळीवर कार्य करणाऱ्या प्राथमिक पतसंस्था आणि राज्य सहकारी बँक यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्य करते.

'जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे अशी सहकारी बँक की जी विशिष्ट जिल्हयात स्थापन झालेली असते, ही बँक आपल्या जिल्हयातील सहकारी संस्थांना आपल्या भांडवलाच्या कुवतीनुसार कर्जे देते आणि सहकारी कायद्याच्या चौकटीत राहून व्यवहार करते' बँकेचे कार्यक्षेत्र जिल्हयापुरते मर्यादित असते. प्राथमिक सहकारी व इतर सहकारी संस्था बँकेचे सभासद आहेत. सहकारी बँकेचा कारभार संचालक मंडळामार्फत चालविला जातो.

जिल्हयातील सर्वच घटकांना योग्य अशा प्रकारचे प्रतिनिधित्व मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळात दिले जाते. पाच वर्ष संचालक मंडळाची मुदत असते.

जिल्हयातील सर्व प्राथमिक पतसंस्था आणि इतर सहकारी संस्थांच्या कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी या संस्थांना मोठया प्रमाणावर भांडवलाची गरज असते. ते भांडवल सभासद संस्थांना भाग विक्री करुन सभासद, बिगर सभासद ठेवी स्वीकारुन, राखीव इतर निधी उभारुन राज्य सहकारी बँक, रिझर्व्ह बँक व सरकारकडून कर्ज उभारुन, सहकारी अनुदान इत्यादी मार्गाने भांडवल उभारण्यात येते.[३५]

ग्रामपंचायत, सहकारी सोसायटी, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक कार्य करीत असतानाच सहकारी संस्थांचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून जिल्हयातील नेत्यांनी आपले लक्ष जिल्हा बँकेकडे केंद्रित केले अशिया खंडात, सहकार क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व इतर सहकारी बँकेच्या शाखा जिल्हयात कार्यान्वित आहेत. तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण अहमदनगर जिल्हयात सन १९९९ ते २००० अखेर जिल्हा सहकारी बँकेच्या २८९ शाखा सुरु केल्या. कोटयावधी रुपयांचे सहकारी सोसायटींना कर्ज वितरण केले आणि अतिशय दुर्गम भागात सुध्दा बँक शाखा सुरु करुन महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे दिसून येते.

१९९० ते २००० या काळात साखर कारखान्यांना मदत मोठया प्रमाणावर केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांची होणारी अडवणूक दूर करुन कर्ज वितरण साहाय्य मोठया प्रमाणात केले. या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य मोठया प्रमाणात केले व विकासाला चालना देण्याचे काम केल्याचे दिसून आले. सहकारातील महत्त्वपूर्ण निर्णय विश्वस्त मंडळाने घेतल्याचे दिसून येते.

**(अहमदनगर जिल्हा सहकारी बँक छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)**

**१९९० ते २००० कालावधीतील जिल्हा बँकेचे चेअरमन**

| अ.क्र. | वर्षे | चेअरमन |
|---|---|---|
| १ | १९८६-९१ | श्री. मारुतराव घुले |
| २ | १९९१-१९९२ | श्री. दादापाटील शेळके |
| ३ | १९९२-१९९३ | श्री. आबासाहेब निंबाळकर |
| ४ | १९९३ ते १९९५ | श्री. यशवंतराव गडाख |
| ५ | १९९५ ते १९९९ | श्री. भाऊसाहेब थोरात |
| ६ | १९९९ ते २००५ | श्री. यशवंतराव गडाख |

**तालुका सहकारी देखरेख संघ मर्यादित :-**

सहकारी संस्थामध्ये कार्य करत असताना प्रत्येक गोष्टीतून तालुक्याचा विकास कसा साधता येईल या दृष्टिकोनातून विचार करत अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातुन काम करत असताना तालुक्यातील सहकारी सेवा सोसायटीचा विकास झाला पाहिजे व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता तालुका देखरेख संघ स्थापनेचा ध्यास नेत्यांनी घेतला. सहकारी सोसायटी विकास त्याचबरोबर संघाची स्थापना, भव्य दिव्य इमारत उभी केली हे सर्व करत असताना अनेक कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले. यातूनच पुढे संघाचा विकास होत गेल्याचे दिसून येते.

**तालुका सहकारी दूध उत्पादक संस्था :-**

दूध उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. दूध उत्पादन केवळ पूरक व्यवसाय नव्हे तर अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना ते एक वरदान ठरले आहे. १९७०-७१ साली जिल्हयात फक्त १२ दुग्धसंस्था होत्या व त्याद्वारे प्रतिदिनी सरासरी फक्त ४१६ लि. दूध संकलित केले जात असे. याचा अभ्यास करुन दक्षिणेतील नेत्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकत असतानाच राजकारणापेक्षा सामाजिक कार्याला सतत महत्त्व देणारे, शेतीसाठी काही तरी जोडधंदा मिळावा यासाठी कायम तळमळ असे. त्या दृष्टीने प्रयत्न करीत तालुका संघाच्या निर्मितीसाठी प्रस्ताव तयार केला.

१९९९ ते २००० वर्षाअखेर जिल्हयातील ५ दुग्धसंघाखाली २२८६ सहकारी दुग्ध संस्था कार्यरत झाल्या त्यातील सभासदांची संख्या १४५०४ इतकी होती या कालावधीतील दैनंदिनी सरासरी दुग्धसंकलन ७.७२ लाख लिटर इतके होते. या वर्षात २,८२,००७ हजार लिटर दूध संकलित केले गेले. जिल्हयात एकूण २० शीतकरण केंद्रे होती.

तालुका दूध संघाच्या, संस्थेच्या माध्यमातून दूध संकलन करुन खाजगी केंद्रावरील दूध वाढविले. शीतकरण केंद्र उभारणी, जिल्हा परिषदेच्या माध्यमातुन कृत्रिम वेतन कार्यक्रम, संकरित जातीची गो-पैदास, गावपातळीवरील दूध संस्थेची स्थापना केली. दूध उत्पादन वाढीला प्रोत्साहन दिले. दूध घट होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले. संघ स्थापन झाल्यानंतर पहिल्याच वर्षी गोरगरीब दूध उत्पादकांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणून संघाला पुरविलेल्या दूधावर प्रतिलिटर २० पैशांची अतिरिक्त भाववाढ रोख स्वरुपात दिली. तालुका दूध संघाने भावी काळाची गरज ओळखून जिल्हयात ऑनलाईन कॉम्प्युटर सिस्टिमद्वारे दूध संकलन करण्याचा धाडसी निर्णय घेतला.[३६]

तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना करुन शेतकऱ्यांना जोडधंदा उपलब्ध करुन दिला व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे काम नेत्यांनी सुरुवातीच्या काळातच केले परंतु खाजगीकरणानंतर दूध संघ डबघाईला आल्याचे दिसून येते परंतु संघाच्या माध्यमातून आजही शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचे काम सुरु आहे. विविध सुविधा व योग्य बाजारभाव दिला जातो. संघाची सुसज्ज मशिनरी, प्रशासकीय इमारत, संगणकीकृत दूध संकलन केंद्र ही महत्त्वपूर्ण वैशिष्टये दिसून येतात. जिल्हयात संकलित केलेले दूध बहुतांशी पुणे, मुंबईस पाठविले जाते. दूध संकलन प्रक्रिया व वाहतूक या व्यवसायात हजारो व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे. एकेकाळी दुय्यम असलेला दुग्ध व्यवसाय आता कित्येक शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय बनला आहे.

**नगर दक्षिण भागातील विधानसभा सदस्य (१९९०-२०००) :-**

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील तालुक्याची राजकीय परिस्थिती पाहता १९९० ते २००० या कालावधीतील प्रत्येक तालुक्यातील लोकप्रतिनिधी त्यांचे वर्चस्व, राजकीय पक्ष कालावधी पुढील तक्त्यावरुन लक्षात येतो.

**'सन १९९० ते २००० या कालावधीतील दक्षिण भागातील तालुकानिहाय आमदार'**

| अ.क्र. | तालुका (मतदार संघ) | विधानसभा सदस्य/आमदार | | |
|---|---|---|---|---|
| | | **१९९०-९५** | **१९९५-९९** | **१९९९** |
| १ | नगर | दादापाटील शेळके (काँग्रेस) | शिवाजीराव कर्डीले (अपक्ष) | शिवाजीराव कर्डीले (अपक्ष) |
| २ | पारनेर | नंदकुमार झावरे (काँग्रेस) | वसंतराव झावरे (काँग्रेस) | वसंतराव झावरे (काँग्रेस) |
| ३ | पाथर्डी | आप्पासाहेब राजळे (काँग्रेस) | आप्पासाहेब राजळे (काँग्रेस) | दगडूपाटील वडे (भाजपा) |
| ४ | श्रीगोंदा | बबनराव पाचपुते (जनतापक्ष) | बबनराव पाचपुते (काँग्रेस) | शिवाजीराव नागवडे (काँग्रेस) |
| ५ | कर्जत/जामखेड | विठ्ठलराव भैलुमे (काँग्रेस) | सदाशिवराव लोखंडे (भाजपा) | सदाशिवराव लोखंडे (भाजपा) |

**'दक्षिण भागातील तालुकानिहाय आमदार'**[३७]

आमदारकीच्या कालावधीत पदाचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी न करता जनसामान्यांच्या विकासासाठी केला. तालुक्यातील सर्वांगीण विकास साधताना मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासकामे केली. राजकीय, सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करताना सातत्याने सामान्यांच्या विकासाचे स्वप्न पाहिले. सत्तेच्या माध्यमातुन विकासाची परिपुर्ती करण्याचा प्रयत्न लोकप्रतिनिधींनी केला. परंतु तरीसुध्दा परीपूर्ण विकास झाल्याचे दिसून येत नाही.

**रस्ते :-**

'भारतातील रस्ते वाहतूकीचा इतिहास भारतीय संस्कृती इतकाच जुना आहे. आर्य लोक हिंदुस्थानात सुमारे ५००० वर्षापूर्वी आले. त्यावेळी मूळ रहिवाशांना पक्क्या रस्त्यावरुन लाकडी चाकांची वाहने वापरणे माहीत होते.

१९२७ मध्ये मु.रा. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक रस्ते विकास समिती नेमली. तिने आपल्या अहवालात भारताच्या विकासासाठी त्यावेळचे रस्ते किती अपुरे आहेत व त्यांचा विकास करण्याची किती आवश्यकता आहे. यावर विशेष भर दिला. ग्रामीण जनतेची सामाजिक व राजकीय प्रगती साधण्यासाठी, शेतमाल बाजारपेठेत आणण्यासाठी व रेल्वेला पूरक वाहतूक व्यवस्था असावी म्हणून रस्त्यांचे किती महत्त्व आहे हे समितीने विशद केले.[३८]

या रस्तेविकास समितीचा अभ्यास करत आमदारकीच्या काळात तालुक्यातील रस्ते विकास करण्याचे काम मोठया प्रमाणावर केले. याबरोबर पाणी, वीज, शैक्षणिक सुविधेचा प्रश्न सोडविला. तालुक्यातील रस्ते, पाणी वीज, शैक्षणिक सुविधा आदी प्रश्न मार्गी लावले. दुष्काळात तालुक्यातील पाझर तलाव, नालाबंडींग जलसंधरण, बंधारे, रस्ते यांची कामे राबविली. पिण्याच्या पाण्यासह दुष्काळी छावण्यातून जनावरे जगवली. वीज प्रश्न सुरळीत होण्यासाठी वीज उपकेंद्रांना मंजूरी मिळवली. तालुक्यातील शाळा खोल्या, वाचनालय, व्यायामशाळा अशी विकासकामे केली. न्याय हक्काच्या पाण्यासाठी सतत संघर्ष केला. तालुक्यातील प्रत्येक गावात विकासकामे केली. बालवाडया, अंगणवाडया सुरु केल्या. शाळांना इमारत, स्वच्छतागृह, कुंपण (कंपाऊंड) या सुविधा पुरविल्या व एकूणच तालुकयातील प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे कार्य १९९० ते २००० या काळात आमदार असताना केल्याचे दिसून येते.

राजकीय वाटचालीचा आणि सामाजिक कार्याचा अभ्यास करीत असताना दक्षिणेतील नेत्यांनी सरपंच, चेअरमन, सभापती पदापासून आपल्या राजकीय कार्यास प्रारंभ केला आणि तेंव्हापासून तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी गावपातळीपासून देशपातळीवरील संस्थांमध्ये कार्य केले. त्यामध्ये चेअरमन, सरपंच, सभापती, सहकारी साखर कारखाना चेअरमन, जिल्हा सहकारी बँक चेअरमन, राष्ट्रीय साखर कारखाना संघ संचालक, चेअरमन, वसंतदादा शुगर टेक्नॉलॉजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ अशा विविध संस्थांवर काम केले. विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री म्हणून नेत्यांनी काम करत असताना आपल्या काळात तालुक्याचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे कामे केल्याचे दिसून येते. एकूण राजकीय वाटचालीचा अभ्यास करता सर्व संस्थांमधून सामाजिक कार्य करत जनतेच्या प्रश्नाकरिता अहोरात्र वाहून घेतल्याचे दिसून येते. लोकप्रतिनिधींनी

आपल्या कालावधीत सत्तेपक्षा सेवेला, संपत्तीपेक्षा संस्कृतीला आणि सत्कारापेक्षा सत्कार्याला महत्त्व दिल्याचे दिसून येते.

**नगर दक्षिण भागातील लोकसभा मतदारसंघ :-**

अहमदनगर जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा आणि लोकसंख्येचा विचार करता राजकीयदृष्टया अहमदनगर जिल्हयाचे नगर उत्तर आणि नगर दक्षिण असे दोन लोकसभा मतदारसंघ रचलेले आहेत. पैकी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघामध्ये नगर, पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर या सहा तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. १९९० ते २००० या कालावधीत नगर दक्षिणचे प्रतिनिधित्व कोण करत होते हे पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

**'१९९० ते २००० काळातील नगर दक्षिण खासदार'**

| अ.क्र. | सन | लोकसभा सदस्य | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | १९८९-१९९१ | श्री. यशवंतराव गडाख | काँग्रेस आय |
| २ | १९९१-१९९४ | श्री. यशवंतराव गडाख | काँग्रेस आय |
| ३ | १९९४-१९९६ | श्री. मारुती उर्फ दादापाटील शेळके | काँग्रेस |
| ४ | १९९६-१९९८ | श्री. मारुती उर्फ दादापाटील शेळके | काँग्रेस |
| ५ | १९९८-१९९९ | श्री. बाळासाहेब विखे | शिवसेना |
| ६ | १९९९ | श्री. दिलीप गांधी | भाजपा |

**'नगर दक्षिण मधील खासदार यादी'**[३१]

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की राजकीय पक्षाचा विचार करता १९८९ ते १९९३ या कालावधीमध्ये काँग्रेस आय. पक्षाचे यशवंतराव गडाख हे नगर दक्षिणेचे प्रतिनिधित्व करत होते. त्यानंतर १९९४ ते १९९७ या कालावधीत नगर तालुक्याचे मारुती उर्फ दादापाटील शेळके

कॉंग्रेस पक्षातर्फे नगर दक्षिणेचे प्रतिनिधित्व करत होते. तर १९९८ ते १९९९ या काळात शिवसेना पक्षातर्फे बाळासाहेब विखेनी प्रतिनिधित्व केले व त्यानंतर नगर शहरातून १९९९ नंतर दिलीप गांधी भाजपातर्फे नगर दक्षिणचे प्रतिनिधित्व केले.

१९९० ते २००० या कालावधीत असणाऱ्या नगर दक्षिणेचे लोकप्रतिनिधींनी मतदारसंघातील तालुक्यामध्ये रस्ते, वीज, पाणी, शैक्षणिक सुविधा, व्यायामशाळा, अंगणवाडया, सांस्कृतिक भवन, सभामंडप, कृषी योजना, वाचनालय, बसस्थानके, आरोग्य सुविधा, गाव तेथे शाळा, सहकारी संस्था एकूणच ग्रामीण जनतेच्या विकासाच्या दृष्टीने नेते मंडळींनी आपल्या राजकीय पदाचा वापर विकासकामाकरिता केल्याचा दिसून येतो. संपूर्णपणे विकास हा झालेला नाही असे लक्षात येते. हे सर्व करत असताना काही अंशी काही भागाचा विकास खुंटलेला दिसून येतो. परंतु पदाचा वापर हा स्वतःच्या स्वार्थाकरिता न करता जनतेकरिता केल्याचे दिसून येते ते त्यांच्या कालावधीत झालेल्या विकास कामांवरुन लक्षात येते.

**समारोप :-**

महाराष्ट्रातील इतर सर्व जिल्हयाप्रमाणेच अहमदनगर जिल्हादेखील साहित्य व संस्कृतीचा वारसा म्हणून ओळखला जातो. त्याच प्रमाणे जिल्हयाचा राजकीय वारसा सुध्दा खूप मोठा आहे. दक्षिण नगरमधील तालुकानिहाय राजकीय, सामाजिक नेते व त्यांची कारकीर्द पाहता कौटुंबिक राजकीय वारसा नसतानासुध्दा नेते मंडळींनी स्वतःला राजकीय, सामाजिक कार्यात वाहून घेतल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील कम्युनिष्ट चळवळ १९५२ च्या पक्ष निवेदनाने अहमदनगर जिल्हयात मोठया जोमाने सुरु झाली. दक्षिणेतील विविध नेते चंद्रभान आठरे, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, दादापाटील राजळे, कॉ. रामरत्नाकर, पांडूरंग भांगरे, शिवाजी नागवडे, रावसाहेब शेटे कम्युनिष्ट पक्षाचे विचारसरणीने भारावून गेले होते. शेतकरी व कामगारांचे विविध प्रश्नांकरिता झगडलेचे दिसतात. राजकारण न करता समाजकारण केले यातून पुढे राजकीय कार्यास प्रारंभ केला.

दक्षिणेतील नेत्यांनी गावपातळी, तालुका, जिल्हा, राज्य, देशपातळीवरील अनेक संस्थांवर समितीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य व पदाधिकारी या नात्याने विविध पक्षांच्या माध्यमातून कार्ये केले आहे. नेत्यांची राजकीय कारकीर्द व सामाजिक कार्याचा सखोल आढावा घेतला आहे. दक्षिणेतील नेत्यांनी तालुक्यातील संस्थांपासून ते राज्य, देशपातळीवर मिळविलेले यश अपयश अभ्यासले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये महाराष्ट्रात जी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, भौतिक जडण-घडण झाली त्यामध्ये सहकाराचा महत्त्वाचा वाटा दिसून येतो. सहकार चळवळ ही जिल्हयाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. म्हणून दक्षिणेतील नेत्यांनी आपआपल्या तालुक्यात उभ्या केलेल्या व त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या सहकारी, राजकीय संस्था एक आदर्श आहे. परंतु त्या यशस्वी ठरले असे नाही, तर त्यातून समाज विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

१९९० ते २००० या कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्था, पतसंस्था, सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध उत्पादक संस्था, यांचा अभ्यास केला आहे. तसेच याच कालावधीतील जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, दक्षिण भागातील तालुकानिहाय विधानसभा सदस्य (आमदार) तसेच दक्षिण नगरचे लोकसभा सदस्य (खासदार) त्यांचे राजकीय पक्ष यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. दक्षिण भागात तालुक्यात ज्या राजकीय संस्था सामाजिक कार्याच्या दृष्टीने उभ्या केल्या आहेत. त्यातून विकास चक्राला गती देण्याचा प्रयत्न नेत्यांनी तालुक्यात केला आहे. परंतु हे करत असताना राजकीय विकासाबरोबर सामाजिक विकास झाला असे पूर्णतः नाही तर विकास साधण्याचा प्रयत्न विविध संस्थांच्या मार्फत नेत्यांनी केला आहे. हे करत असताना काही सहकारी संस्थावरील वर्चस्व हे एकाच व्यक्तीचे दिसून येते. उदा. श्रीगोंदा सह.सा.का. शिवाजीराव नागवडे, वृध्देश्वर सह.सा.का. पाथर्डी राजळे, कुकडी सह.सा.का. श्रीगोंदा कुंडलिक जगताप, नगर तालुका सह.सा.का. दादापाटील शेळके हे सत्तेचे केंद्रस्थानी दिसून येतात. यावरुन यांचे सहकार साखर कारखान्यातील वर्चस्व सिध्द होते.

१९९० ते २००० या काळातील तालुकानिहाय आमदार पाहता नगर तालुक्यातून १९९० साली दादापाटील शेळके वीजयी झाले पाच वर्षे कार्य करत १९९५ च्या निवडणूकीत अपयश येवून शिवाजी कर्डिले अपक्ष आमदार झाले पुढे १९९९ साठी पुन्हा शिवाजी कर्डिले आमदार झाल्याचे दिसते. पारनेर तालुकयात १९९० साली नंदकुमार झावरे मात्र नंतर सलग दोन वेळेस वसंत झावरे आमदार झाले. पाथर्डी तालुक्यात १९९० व १९९५ साली आप्पासाहेब राजळे मात्र १९९९ ला अपयश येवून भाजपातर्फे दगडू बडे हे आमदार झाले. श्रीगोंदा विधानसभा मतदार संघातून १९९० जनता पक्षामार्फत बबन पाचपुते, १९९५ काँग्रेस पक्षातर्फे आमदार मात्र १० वर्षे सत्ता भोगून १९९९ साली शिवाजीराव नागवडे यांनी पराभव केला. कर्जत व जामखेड राखीव मतदारसंघातून १९९० साली विठ्ठल भैलुमे यांनी प्रतिनिधित्त्व केले. पुढे १९९५ व १९९९ साली भाजपा तर्फे सदाशिव लोखंडे यांनी प्रतिनिधित्त्व केले.

१९९० ते २००० या काळात दक्षिणेचे खासदार म्हणून १९८९ ते ९३ यशवंतराव गडाख, १९९४ ते १९९७ दादापाटील शेळके, १९९८ ते ९९ बाळासाहेब विखे आणि १९९९ पासून दिलीप गांधी यांनी प्रतिनिधित्त्व केले. परंतु या नेते मंडळींनी यश अपयश आले तरी आपल्या राजकीय कार्यातून विविध पक्ष संघटनेतून सामाजिक विकास हा पुढे चालू ठेवल्याचे दिसून येते.

## तळटीपा

१) द.धों.काचोळे, *"फुले-आंबेडकर"*, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, १ जुलै २००४, पृष्ठ. ७५.

२) राजा दिक्षित, अरुण जोशी, निलीमा ठाकूर, *"ब्रिटीश साम्राज्य आणि भारत"*, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृष्ठ. १०१.

३) कित्ता; पृष्ठ. - १०३.

४) दि.रा. मढिकर, *"क्रांतिसिंह नाना पाटील जीवन आणि कार्य"*, ललितराज प्रकाशन, नोव्हेंबर २००५, पृष्ठ. ५१.

५) शिवाजीराव नागवडे यांची मुलाखत, दि. १६/१०/२०१३; आर.एम.कुरुमकर, *"मा.आ. शिवाजीराव नागवडे यांचे श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विकासातील योगदान,"* टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सादर केलेला लघुशोधप्रबंध (अप्रकाशीत), एम.फिल, २००९, पृष्ठ ६२, ६३.

६) दैनिक सकाळ, अनंत दिक्षीत (संपा.), नगर आवृत्ती, दि. २३/०८/२००७, पृष्ठ. १, २.

७) कुरुमकर आर.एम., उपरोक्त, पृष्ठ. ६६.

८) कित्ता; पृष्ठ. ६६, ६७.

९) कित्ता; पृष्ठ. ६७.

१०) कित्ता; पृष्ठ. ६७,.

११) सु.ना.म्हस्के, *"नगर गौरव"*, रेखा सु. म्हस्के, (प्रकाशक), राहुरी, प्रथमावृत्ती - २००९, पृष्ठ. ७०.

१२) दादा पाटील शेळके याची मुलाखत, दि. ०८/०९/२०१३.

१३) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ १२०.

१४) कित्ता; पृष्ठ. ७१.

१५) कित्ता; पृष्ठ. ११७.

१६) व्ही.के.दारकुंडे, *"दादापाटील राजळे यांचे जीवनकार्य एक चिकित्सक अभ्यास"*. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, सादर केलेला लघुशोधप्रबंध (अप्रकाशित) एम.फिल. २००९, पृष्ठ. २५,२९,३२,३३.

१७) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ३२४.

१८) व्ही.के.दारकुंडे, उपरोक्त, पृष्ठ. ८८.

१९) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. ३४२.

२०) आर.बी. भापकर, *"बापूसाहेब भापकर यांचे जीवनकार्य एक चिकित्सक अभ्यास"*, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, सादर केलेला लघुशोधप्रबंध (अप्रकाशित) एम.फिल. २००९, पृष्ठ.

२१) आर.एम.कुरुमकर, २००९, पृष्ठ.

२२) बबनराव पाचपूते यांची मुलाखत, दि. २२/१२/२०१३.

२३) सु.ना.म्हस्के, पृष्ठ. ३८१.

२४) कित्ता; पृष्ठ. ३९०.

२५) कित्ता; पृष्ठ. ३८९.

२६) विजय कविमंडन, *"कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र"* श्री मंगेश प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती, २०१२, पृष्ठ. -४००.

२७) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन",* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९०-२०००,; जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग,अहमदनगर जिल्हा.

२८) मे.पुं. रेगे,(संपा.) *"मराठी विश्वकोश खंड १६"*, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, - १९९९, पृष्ठ. ८२८.

२९) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन"*, उपरोक्त, १९९०-२०००, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रिपोर्ट, अहमदनगर, १९९०-२०००.

३०) विजय कविमंडन, उपरोक्त, पृष्ठ. ४००.

३१) कित्ता; पृष्ठ. ४००.

३२) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. २७.

३३) संतोष दास्ताने, *"महाराष्ट्र २००३",* दास्ताने रामचंद्र,(प्रकाशक), सदाशिव पेठ, पुणे. प्रथमावृत्ती - २००३, पृष्ठ. ८३.

३४) *"प्रादेशिक सहसंचालक (साखर संघ)"*, अहवाल, अहमदनगर, १९९८-९९.

३५) माधव बिराजदार, *"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था"* विद्या प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जुन २०१२, पृष्ठ. १९६, १९७

३६) कार्यकारी संचालक, *"अहमदनगर जिल्हा दुधसंघ अहवाल"*, अहमदनगर, १९९९-२०००, पृष्ठ. ५,६.

३७) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. १८, १९, २२.

३८) लक्ष्मणशास्त्री जोशी,(संपा.) *"मराठी विश्वकोश खंड - १४"*, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८९ पृष्ठ. ५९७.

३९) सु.ना.म्हस्के, उपरोक्त, पृष्ठ. १६.

# प्रकरण - ३

# अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील सामाजिक स्थिती

**प्रकरण - ३**

## अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील सामाजिक स्थिती

### ३.१ प्रस्तावना

**सामूहिक विकास :-**

'अफ्रिकन प्रशासनावरील केंब्रिज परिषदेने १९४८ साली सामूहिक विकासाची व्याख्या खालीलप्रमाणे केली.'

१) सामूहिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये समाजात राहणाऱ्या लोकांचे राहणीमान उंचविण्याचे प्रयत्न करण्यात येतात आणि अशा प्रक्रियेत लोक सक्रीय भाग घेतात.

२) जॅक्सनच्या मताप्रमाणे सामूहिक विकासात समाज स्वतः असे प्रयत्न करीत असतो की, ज्यामुळे समाजातील लोकांचे आर्थिक आणि नैतिक बळ सदृढ होत असते.

३) सामूहिक विकास ही प्रक्रिया अशी की, ज्यामध्ये पूर्ण समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी लोकांचा सहभाग घेऊन कार्य करण्यात येते.

४) सामूहिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये ग्रामीण लोकांची पारंपरिक जीवन पध्दती बदलून त्यांना आधुनिक जीवन पध्दती स्वीकारण्यास मदत करण्यात येते. त्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे उपलब्ध पैशात विकास करण्यासाठी मदत करण्यात येते.'[१]

**सामूहिक विकासाची उद्दिष्टे :-**

प्रत्येक माणसाची अशी इच्छा असते की, आपले जीवन शांततामय व सुखी व्हावे व आपल्याला कसल्याही प्रकारचे कष्ट पडू नयेत. भाकरीची कधीही चिंता नसावी. आजारपणात औषधे तात्काळ उपलब्ध व्हावेत. तसेच आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी त्याला समान संधी मिळावी. माणसाच्या विकासात अडथळे आणणारे पाच घटक असतात ते म्हणजे भूक, आजार, दुर्गंध, अज्ञान आणि आळशीपणा या घटकांवर मात करुन माणसाच्या विकासाचे मार्ग मोकळे करणे हे सामूहिक विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. 'राष्ट्रसंघाच्या विभागीय परिषदेने १९५४ साली सामूहिक विकासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे ठरविली.

१) सामूहिक विकासामुळे लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. तसेच विकासासाठी आवश्यक ते मित्रत्त्वाचे वातावरण तयार करण्यात यावे.

२) लोकांना काम मिळवून देणे आणि लोकांच्या आर्थिक, सामाजिक विकासासाठी प्रयत्न करणे.

३) लोकांच्या मानवी आणि मूलभूत हक्कांबद्दल आदर ठेवणे. जाती, लिंग, भाषा, धर्म व वंशाच्या आधारावर लोकांत भेद असू नये.

४) सामूहिक विकासाद्वारे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्यासाठी स्थानिक लोकांचा सहभाग मिळविणे.

५) उपलब्ध सामुग्रीच्या आधारावर लोकांचे सहकार्य घेऊन विकासाचे कार्य करणे आणि योग्य नागरिक तयार करणे.

६) आधुनिक वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञानामुळे समाजाला फायदा होईल असे कार्यक्रम हाती घेणे.

७) लोकशाही पध्दतीद्वारे माणसाच्या स्वातंत्र्याला, समाजाला मान देऊन कार्यक्रम ठरविणे.'[२]

जिल्हयाच्या दक्षिणभागातील नेत्यांनी सामाजिक कार्यकर्ते आणि नेते म्हणून राष्ट्रसंघाच्या अथवा केंब्रिज परिषदेच्या उद्दिष्टांचा विचार करता त्यानुसार सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात कार्य केले आहे, करत आहेत असे आपणांस प्रकर्षाने दिसून येते.

'ज्या ज्या थोर पुरुषांनी समाज जागृतीचे काम सुरु केले त्या सर्वांनाच समाजाने विरोध केला. त्यांचा अन्वयित छळ केला. हा पुराण काळापासून आजपर्यंतचा इतिहास आहे. त्यातून साधुसंतही सुटले नाहीत. कार्तिकी एकादशीला संत ज्ञानेश्वरांच्या समाधी दर्शनासाठी सात लाख भाविक जमतात. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' असा जयघोष करतात. त्याच ज्ञानेश्वरांना एकेकाळी कर्मठ समाजाने वाळीत टाकले होते. त्यांच्या मातापित्यांना प्रायश्चित म्हणून इंद्रायणीच्या डोहात आत्महत्या करायला भाग पाडले होते. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांना मांडे भाजण्यासाठी खपराचा तुकडाही मिळू दिला नाही. संत तुकाराममहाराजांचाही समाजाने

खूप छळ केला. त्यांच्या पाठीवर मोडेपर्यंत काठया घातल्या गेल्या. संत एकनाथांच्या अंगावर लोक थुंकले. ब्राम्हण समाजाने त्यांच्यावर बहिष्कार घातला. २५ डिसेंबरला नाताळात येशू ख्रिस्ताच्या प्रार्थनेसाठी जगातली सारी चर्चेस गर्दीने भरुन जातात. त्याच येशू ख्रिस्ताला तत्कालीन समाजाने खिळे ठोकून फासावर लटकावले. अशा अनेक विश्वप्रसिध्द महापुरुषांशी समाज क्रूरतेने वागला त्यांची ससेहोलपट केली समाजसेवेचं व्रतधारण केलेली आपण तर अतिसामान्य माणसं आहोत.[३]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात नियोजित विकासाची पावले टाकण्यास सुरुवात झाली. पंचवार्षिक योजना, समाजविकास, ग्रामीण विकास हे विषय पुढे आले. ग्रामीण भारताचा स्तर उंचावणे, खेडयात कल्याणकारी राज्याचा पाया घालणे, कृषी विकास करणे त्याद्वारे लोककल्याण करणे, ग्रामीण भारताचा चेहरा मोहरा बदलणे, लोकजीवनाचा पोत सुधारणे इत्यादी कार्य चालु झाले.'[४] हे कार्य स्थानिक कार्यकर्त्यांद्वारे स्थानिक पातळीवर केले जाऊ लागले. आत्मनिर्भयता, स्वालंबन, जनतेचा सहभाग, जनतेत जबाबदारीची जाणीव या मूल्यांचे संवर्धन होऊ लागले. सामाजिक न्याय, राजकीय लोकशाही आणि आर्थिक विकास यांचे प्रवाह भारतात शेवटच्या, खालच्या थरापर्यंत कसे पोहचवता येतील हा महत्त्वाचा प्रश्न होता. 'रक्तविहिन क्रांती होऊन सर्वांचे मंगल व्हावयाचे असेल तर अंत्योदयाची संकल्पना स्वीकारली पाहिजे व ती आचरणात आणली पाहिजे असा गांधीजींचा आग्रह होता. या अंत्योदयाच्या संकल्पनेत सर्वात दरिद्री खेडयातील, दरिद्री माणसांपर्यंत जाऊन पोहचण्याची मनिषा होती. या प्रक्रियेत केवळ ब्रिटिश राजवट आड येत नसुन भारतातील शहरे व वरिष्ठ वर्ग ग्रामीण जनतेच्या शोषणाला कारणीभुत आहेत. अशी गांधीजींची धारणा होती. दक्षिणेतील नेत्यांनी अंत्योदयाची कल्पना स्विकारुन सामान्यांपर्यंत विकास पोहचवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.[५]

'देश बांधवांना पुरेसा निवारा व अन्न मिळावे, देशाला जीवनावश्यक गरजा भागवता याव्यात या सर्व गोष्टी आम्हांला कोणाच्या दयेने नव्हे तर स्वतःच्या प्रयत्नाने मिळविण्याची इच्छा आहे. आम्हाला आमचा देश कष्ट करुन वर आणण्याची इच्छा आहे असे पंडीत नेहरु म्हणाले होते.[६] या राष्ट्रीय नेत्याच्या आव्हानानुसार अपारकष्टातून समाज उभा करण्याची धडपड तत्कालीन ज्या ज्या कार्यकर्त्यांनी केली ती धडपड जिल्हयातील नेत्यांनी आपआपल्या

तालुक्यात केली आहे. 'समाज विकास जर करावयाचा असेल तर ज्यांचा विकास करावयाचा त्या स्थानिक लोकांचा प्रत्यक्ष सहभाग मिळविल्याखेरीज विकास साधता येत नाही.'[७] या वाक्याचा विचार करता नेत्यांनी ग्रामीण विकासासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा समजून सहकारी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली आहे.

मैल ना मैल ओसाड माळरान, कोरडवाहू शेती, रस्त्यांचा अभाव, भकास व उदास चेहरे यात परिवर्तन करुन तालुकयाचा सर्वांगीण विकास घडविण्यात जनतेला हिंमत देणारे, अस्मिता जागवणारे, तिच्यातील कसब, कार्यक्षमतेला वहण, संधी मिळवून देणारे नेतृत्व, त्या भागातील सहकारी उद्योग, कृषी विकास, शैक्षणिक व सामाजिक विकास इत्यादी क्षेत्रात प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहचवते. अशा नेत्यांचे धोरणे काय आहेत, भूमिका काय होत्या, विकासाच्या दिशा काय आहेत, विकास चक्राला गती देण्यासाठी कोणते निर्णय घेतले, कोणत्या योजना राबविल्या याचे चित्र जनतेसमोर उभे राहिले तर प्रेरक समाजाला मानसिक बळ देणारे ठरेल.

तालुक्यात नेतृत्वाच्या शिरोभागी असताना कोणते धोरणात्मक निर्णय घेतले. मग त्यात साखर उद्योग, कुटिर उद्योग, दुग्ध उत्पादन, शेती विकास, कामगार कल्याण, सहकार क्षेत्र, शिक्षण, युवकांचे प्रश्न, शेतकरी स्त्रिया, मागास, उपेक्षितांचे प्रश्न व एकूण विकासाचे प्रश्न या साऱ्या क्षेत्राच्या विकास चक्राला गती (दिशा) मिळालेली आहे. सामाजिक प्रश्नांना आर्थिक प्रश्नांची उकल झाली आहे. एखादी समस्या सोडवण्याची इच्छा त्यांच्या मनात तेवत असते.

लोकमान्य टिळकांसारखे थोर नेते महाराष्ट्रात जन्माला आले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण या थोर नेत्यांनी महाराष्ट्राचा नावलौकिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढवला. त्यांनी मोलाची कामगिरी केली. ही महान परंपरा जतन करणे, वृध्दिंगत करणे हे काम आजच्या समाजातील नेत्यांचे आहे व ते सामूहिक प्रयत्नातुन करावयाचे आहे. विकासाची गती वाढवून हे राज्य प्रगत करावयाचे असेल तर यामध्ये द्रष्टया नेत्यांचा हातभार महत्त्वाचा आहे. लाखो तरुणांना, शेतकऱ्यांना या चळवळीत ओढून घेऊन विकासाला चालना देण्याचे कार्य अशा नेत्यांकडून

होणार आहे. समाजात अनेक प्रश्न आहेत ते सोडवायचे आहेत. महाराष्ट्रात शक्तिशाली राज्य बनविण्यामध्ये अशा नेत्यांचा वाटा महत्त्वाचा ठरणार आहे.

'महाराष्ट्र म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळयाला कोणत्या तऱ्हेने उब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हालवू लागेल याचा रात्रंदिवस एक सारखा विचार करुन अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रितींनी त्याला पुन्हा जिवंत करण्याचे दूर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जीवापाड मेहनत जर कोणी केली असेल तर ती प्रथमतः न्या.म.गो. रानडेंनीच हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख चिन्ह होय'.[८]

विकासाचा प्रश्न केवळ सरकारने सोडवला पाहिजे असे म्हणून चालणारे नाही. उलट हे काम सामूहिकरीत्या करण्यासाठी समाजातील संघटक क्षमता असणाऱ्या नेत्यांमार्फत अधिक प्रभावीपणे होऊ शकते. अंतर्गत मतभेद नष्ट करावे लागतील. जाती-जातीतील, भाषे-भाषेतील काही प्रश्न असतील व स्थानिक प्रश्नासंबंधी मतभेद संपवले पाहिजे या प्रश्नासाठी सरकारपेक्षा स्थानिक नेता प्रभावी भूमिका घेत असतो. विकासगंगा लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य अशा नेत्यांमार्फत होऊ शकते. यासाठी सहकार क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावू शकते. तालुक्यातील नेत्यांनी वेगवेगळया संस्था काढून या कार्यात आपले योगदान दिल्याचे दिसते.

**३.२ शेतकरी चळवळ :-**

'मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याच्या उद्देशाने पेटलेल्या तरुणांना हाताशी धरुन सावरकरांनी १९०० साली 'मित्रमेळा' नावाची संस्था स्थापन केली. तिचेच रुपांतर पुढे १९०४ साली 'अभिनव भारत' या क्रांतिकारकांच्या संस्थेत झाले. लोकमांन्य टिळकांच्या जहालवादी विचारसरणीने ते भारावले होते. त्यांनी महाराष्ट्रातील तरुणांमध्ये नव्या क्रांतीचा स्फुल्लिंग फुलवला. स्वदेशी बहिष्कार चळवळीतही त्यांनी भाग घेतला. क्रांतिकारकांचे अग्रणी म्हणून वीर सावकरांचे नाव महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासात मशहूर आहे.'[९]

आर्थिक विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या देशात विकास साध्य करण्यासाठी भूमी सुधारणांची आवश्यकता असते. सरकारच्या ध्येयधोरणातून भूमी सुधारणांना प्राथमिकता

मिळाल्याशिवाय आर्थिक विकासाला गती प्राप्त होऊ शकत नाही. प्रा. गुनार मिर्डलने म्हटल्याप्रमाणे, 'मनुष्य आणि भूमी यांच्यातील संबंधांचे संस्थात्मक आणि नियोजित पुनर्गठन म्हणजे भूमी सुधारणा, जो पर्यंत विशिष्ट धोरणात्मक प्रयत्नांची जोड मिळत नाही तो पर्यंत भूमी फायदेशीर ठरु शकत नाही.' भूमी सुधारणांचा शेतीच्या विकासाशी आणि एकूण आर्थिक विकासाशी निकटचा संबंध आहे.

शेतीच्या विकासाचा प्रश्न समोर असतो तेथे शेतीमध्ये दोन प्रकारच्या सुधारणा करण्याची गरज असते. एक म्हणजे शेतीच्या उत्पादनतंत्रात बदल घडवून आणणे यात सुधारित बियाणे, नवीन अवजारे, रासायनिक खते, ठिबक, तुषार सिंचन इ. समावेश होतो. याचा फायदा म्हणजे उत्पादन-वाढ यासाठी योग्य रचना अस्तित्वात असायला हवी, तंत्रात्मक सुधारणा बरोबर संस्थात्मक सुधारणा (Institutional changes) असतात. याच तंत्रज्ञानाचे महत्त्व दक्षिणेतील नेत्यांनी पटवून देण्याचे कार्य केले.[१०]

वर्षानुवर्षे शोषणाला बळी पडलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनावर चांगला परिणाम करणारा सामाजिक बदल ग्रामीण क्षेत्रातील बहुसंख्य जनतेला फायदेशीर ठरेल अशा तऱ्हेन समाजरचनेत बदल घडविणे शोषणाविरहितरचना, कसेल त्याची जमीन, शेतीक्षेत्राचा विकास, विषमता, असुरक्षितता, शासकीय अनुदान, कोरडवाहू शेतीला प्रोत्साहन सुधारणा करण्याचे काम जिल्हयात शेतकरी चळवळीने केल्याचे दिसून येते.

जमिनीच्या विषम वितरणात बदल घडवून आणण्याचा एक सर्वस्वी प्रयत्न भारतात करण्यात आला. 'भूदान चळवळ' या प्रणेत मानले जातात. आंध्रप्रदेशातील तेलंगणात विनोबाजींनी पदयात्रा काढली. संपूर्ण जमीन ही ईश्वराच्या मालकीची आहे. तिचा लाभ समाजाला मिळाला पाहिजे. १८ एप्रिल १९५१ या दिवशी विनोबाजींची ही चळवळ यशस्वी ठरली आणि १९५७ मध्ये ग्रामदान संकल्पना पुढे आली.[११] या राष्ट्रीय नेत्यांच्या चळवळीचा आदर्श समोर ठेवून दक्षिण नगरमधील नेत्यांनी शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न हे आपल्या सामाजिक कार्यातून सोडविण्याकरिता प्रयत्न केले.

१९५२ साली महाराष्ट्रात महादुष्काळ पडला होता. सर्व शेती धंदा आणि परिणामी ग्रामीण जीवन कोलमडले होते. ही परिस्थिती सतत महाराष्ट्राच्या वाटयाला येत होती. याचा

कायमचा बीमोड होऊन ग्रामीण भागातील शेतीचा विकास आणि त्याकरिता शेती उद्योगाला मदतनीस ठरणारी पाणीपुरवठा, पतपुरवठा परंपरागत साधनसामग्री ऐवजी शेती धंद्यात यांत्रिक सुविधांचा वापर करुन नवीन तंत्राने शेतीधंदा केला जावा व ग्रामीण कष्टकरी जीवन स्वतःच्या पायावर स्वाभिमानाने उभे राहावे या विचाराने दक्षिणेतील नेत्यांनी सामाजिक कार्यात पदार्पण केले.

महाराष्ट्रामध्ये दुष्काळ निवारण व विकास या रीतीची चळवळ कार्यरत होती. त्याचे नेते कै. दत्ता देशमुख, कै. भाईससथ्था, बापूसाहेब भापकर आदी होते. त्यांच्या पुढाकारात नगर जिल्हयात या चळवळीने विशेष जोर धरला होता.

शेतकरी म्हणून घरच्या एकूण वातावरणातून परिस्थितीची झालेली दमछाक, मध्येच सोडावे लागलेले शिक्षण यातून जी प्रेरणा मिळाली, त्यामुळे एकूणच शेतकरी समुदाय व कामगार यांना एकत्रित करुन या परिस्थितीतून सावरण्यासाठी, विकासाभिमुख प्रश्नांना चालना देऊन पुरोगामित्वाचा ध्यास घेतलेली मनोवृत्ती हे गुण अंगी आलेले प्रामुख्याने दिसून आले व काम करणाऱ्या तरुणांची एक फळी तालुक्यात जिल्हयात तयार झाली. दुष्काळातून कायमची मुक्तता होण्यासाठी नद्या अडवून त्यावर बंधारे घालून पाटपाण्याची व्यवस्था करण्याचे काम हातात घेऊन सरकारकडे त्यासाठी पाठपुरावा केला. त्याकरिता जनआंदोलनाच्या माध्यमाचा अवलंब केला. अशा पध्दतीने विशेषतः घोड धरण व कुकडी धरणाला, सीना प्रकल्प, भोसाखिंड प्रकल्पाला चालना देण्यासाठी ही फळी विशेष कार्यरत राहिली व यशस्वी झाली. भविष्याचा अचूक वेध घेऊन त्याचा पाठपुरावा करणारे व एकूणच समाजजीवनाच्या विकासाची, अस्मिततेची जाण असणारे नेतृत्व चळवळीत अग्रभागी होते.

जिल्हयात आदराने, आपुलकीने आणि आदबीने घेतली जाणारी नेत्यांची नावे कर्म बरोबर घेऊन जन्माला येणारी माणसं थोडी असतात. प्रत्येक जण स्वतःच कर्म बरोबर घेऊनच जन्माला येतो. परंतु मी माझ्यासाठी जगत असताना समाजाचं काही देणं लागतो. याची जाणीव ठेऊन व त्याच जाणिवेतून समाज ऋणातून मुक्त होण्याची प्रामाणिक तळमळ असणारी माणसं दुर्मिळच व्यक्तिगत कर्म करणं वेगळं व समाजकार्य करणं वेगळं जो स्वत:साठी राबतो कमावतो व खातो तो स्वार्थी असून तो पाप खातो, असे भगवंताने अर्जुनाला सांगितले आहे.

म्हणून माझ्यासारखे हजारो लाखो लोक या जगात आहेत. त्यांना अन्न देणारे, ममतेचा हात फिरवणारे, महाराष्ट्रात तत्त्वनिष्ठ कर्तव्यतत्पर, जनसामान्यांबद्दल आस्था असणारे सामाजिक कार्यकर्ते आहेत.

सामाजिक कार्याचा व्यासंग असणाऱ्या दक्षिणेतील नेत्यांनी राजकारणही तितक्याच तत्त्वनिष्ठेने केले आहे. कै. वसंतदादा पाटील तसेच शंकरराराव कोल्हे, बाळासाहेब विखे, भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय व सहकारी तत्त्वाचे धडे घेतले. त्यांच्या विचारांपासून व आदर्शांपासून ते कधीच ढळले नाहीत. म्हणून दक्षिणेतील नेत्यांचे कार्य फक्त तालुक्यात मर्यादित न राहता ते महाराष्ट्रात गेले. नेत्यांची तत्त्वनिष्ठा, कामाची चिकाटी, सचोटी, निःस्वार्थता, कार्यक्षमता, प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि अभ्यासूवृत्ती आदी गुण वैशिष्टयांमुळे स्वर्गीय वसंतदादा पाटलांसारख्या दिग्जांनी दक्षिणेतील नेत्यांची पारख केली.

नगर दक्षिण मध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या नेत्यांमध्ये अण्णा हजारे, नंदकुमार झावरे, वसंत झावरे, विजय औटी, बाळासाहेब हराळ, दादा पाटील शेळके, शिवाजीराव कर्डिले, अप्पासाहेब राजळे, दगडू पाटील बडे, बबनराव ढाकणे, शिवाजीराव नागवडे, बबनराव पाचपुते, बापुसाहेब देशमुख, आबासाहेब निंबाळकर, सदाशिवराव लोखंडे, राम शिंदे आदि नेत्यांचा समावेश होतो. यांनी आपआपल्या तालुकयात सामाजिक कार्याचा ठसा उमटविला. श्रीगोंदा तालुक्यात शिवाजीराव नागवडे यांनी केलेल्या कार्याबद्दल दिल्ली येथील इंडिया इंटर नॅशनल फ्रेंडशिप सोसायटीच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी दिला जाणारा राष्ट्रीय स्तरावरील विजयरत्न पुरस्कार शिवाजीराव नागवडेंना प्रदान करण्यात आला. इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशीप सोसायटीच्या वतीने दिल्ली येथे आयोजित आर्थिक विकास व राष्ट्रीय एकात्मता परिसंवादाच्या वतीने त्यावेळचे अरुणाचल प्रदेशाचे राज्यपाल माता प्रसाद यांच्या हस्ते व माजी परराष्ट्र मंत्री आर.एल. भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर १९९७ मध्ये प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास खा. रजनीताई पाटील. एम.एस. गोसावी, श्रीमती दरबारी, महेश पी. कपूर आदि मान्यवर उपस्थित होते. गौरवचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशीप सोसायटी ही स्वयंसेवी व सेवाभावी संस्था दरवर्षी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करुन त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार देते. शिवाजीराव नागवडे हे गेली ६० वर्षे श्रीगोंदा तालुक्यात, अहमदनगर जिल्हयात कार्य करत आहेत. त्यांनी घोड-कुकडी पाणीप्रश्न, सहकार क्षेत्र असेल, शैक्षणिक विकास त्याचबरोबर सामाजिक विकास घडवून आणला. ज्यांच्यासाठी त्यांनी यामधून त्यांची या संस्था उभ्या केल्या त्यामुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण झाले. त्यामुळे जीवनमान उंचावले यामधून त्यांची उल्लेखनीय कामगिरी दिसून येते.[१२]

**अहमदनगरच्या जलदायिनी :-**

अहमदनगर जिल्हयात उत्तरेकडे गोदावरी तर दक्षिणेकडे भीमा या प्रमुख नद्या वाहतात. या शिवाय दक्षिणेतून सीना, हंगा, घोड-कुकडी या नद्या वाहतात.

**सीना नदी -**

सीना नदीचा उगम नगर औरंगाबाद रस्त्यावरील जेऊर गावाजवळील ससेवाडी परिसरात आहे. या गावापासून १ कि.मी. अंतरावरील गर्भगिरी डोंगर रांगात गोमुखातून सीना नदी उगम पावते. या नदीच्या काठावरच नगर शहर वसलेले आहे. सन १५६२ मध्ये विजयनगरचा रामराजा नदीकाठी तळ देऊन बसला होता. त्यावेळी सीनानदीने रुद्रावतार धारण केल्याने ३०० घोडे, शेकडो बैल, २० सरदार व ३०००० सैन्य वाहून गेल्याचा इतिहास आहे.

सीना नदीवर पिंपळगाव माळवी येथे एक तलाव आहे. कर्जत तालुक्यात निमगाव गांगर्डा येथे सीनाधरण आहे. या धरणाची क्षमता २४०० दशलक्ष घनफूट आहे. या धरणाच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा होतो. सीना नदी पुढे चिंचोडी पाटील गावाहून बीड जिल्हयात प्रवेश करते. पुढे पुन्हा जामखेड तालुक्यात येते. अहिल्याबाई होळकरांचे चौंडी हे गाव सीना काठीच वसलेले आहे. नदीकाठी अहिल्यादेवींच्या पूर्वजांच्या समाध्या दिसतात. जवळच त्यांच्या वडिलांची माणकोजी शिंदे पाटलांची गढी आहे. त्या गढीचे आता स्मारकात रुपांतर केलेले आहे. सीना नदी तशीच पुढे उस्मानाबाद, सोलापूर जिल्हयातून वाहत कर्नाटक राज्यात प्रवेश करते. कर्नाटक राज्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यात हत्तरसंग

कुडळ या गावाजवळ सीना नदी भीमा नदीला येऊन मिळते. या ठिकाणी सुंदर शिवालयआहे. ३०० ते ३५० कि.मी. अंतर वाहणारी सीना नदी आहे.

**कुकडी-भीमा नदी -**

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण सीमेवरुन वाहणारी भीमा ही प्रमुख नदी, बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेले भीमाशंकर हे ठिकाण मंचर शहराच्या पश्चिमेस ६५ कि.मी. अंतरावर असलेल्या डोंगर झाडीत आहे. याच सहयाद्रीच्या कुशीत भीमेचा उगम होतो. त्रिपुरासुर राक्षसाच्या वधासाठी भगवान शंकरांनी भीमरुपी मोठा देह धारण केला व त्याचा वध केला. या भीमरुपी भगवान शंकराच्या घामाच्या धारांतून वाहणारा प्रवाह म्हणजेच भीमा नदी. भीमा नदी पारनेर तालुक्यातील कुकडी नदीस मिळते. ओझर लेण्याद्रीच्या परिसरात कुकडी नदी उगम पावते. निघोज येथे कुकडी नदीच्या पात्रात नैसर्गिकरीत्या रांजणखळगे असून ते एक भौगोलिक आश्चर्य आहे. या नदीस पुढे खूप उतार असल्याने ती घोडयासारखी धावते म्हणून तिला घोडनदी असेही म्हणतात. याच भीमेच्या तिरावर श्रीगोंदा तालुक्यातील पेडगावचा बहादूरगड आहे. कर्जत तालुक्यात भीमानदीकाठी अष्टविनायकांपैकी एक सिध्दटेक गणपती आहे. ही नदी पुढे वाहत जाते पंढरपूरजवळ ती चंद्राकार वाहते म्हणून तिला चंद्रभागा असे नाव पडलेले आहे.[१३]

**पाणीप्रश्न :-**

**घोड धरण -**

श्रीगोंदा तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १,६०,४८१ आहे. वरचेवर सततचा दुष्काळ पडत असल्याने त्याचे कायमचे निवारण व्हावे व जास्तीत जास्त क्षेत्र पाटपाण्याखाली यावे म्हणून प्रयत्न करण्यावर नेत्यांनी लक्ष केंद्रित केले. मुळा, कुकडी, विशाल कुकडी, सीना प्रकल्प योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रामुख्याने जोर धरुन मागणीपुढे करण्यात आली. दुष्काळ निर्मूलनाचे दृष्टीने वरदान ठरणारी ही योजना होती. या सर्व रेटयामुळे शासनाच्या वतीने १९५३ साली स.का. पाटलांनी विसापूर येथे पाटपाणी परिषद घेतली. ह.वि. पाटसकर, देवकीनंदन असे देशाचे व जिल्हयातील सर्व पुढारी व अधिकारी या बैठकीस हजर होते. या बैठकीवर सर्व सहकाऱ्यांनी शेतकरी व दुष्काळी कामगारांचा त्या काळातील लोकांचा प्रचंड

मोर्चा संघटित केला. त्यात नेतेमंडळी अग्रभागी होते. लोक दुष्काळी कामावरील हत्यारांसहीत मोर्चात सामील झाले. दत्ता देशमुख, प्र.के. अत्रे असे नेते नेतृत्वासाठी आले. एवढा मोठा समाज, लाऊडस्पीकरची सोय नव्हती, मध्ये टेबल ठेवून व त्यावर उभे राहून या पुढाऱ्यांनी भाषणे केली. महाराष्ट्रातील ग्रामीण शेतकरी, शेतमजूर हे या बंडाचे निशाण समजून मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याकडून घोडला तत्काळ मंजुरी मिळाली व वेगाने धरणाचे काम हाती घ्यावे लागले मुळा, सीना प्रकल्प, कुकडीबद्दल आश्वासन मिळाले. घोड प्रकल्प झाल्यामुळे श्रीगोंदा तालुक्यतील २४ गावे कमांडखाली आली आणि एकूणच ५,४९६ हेक्टर क्षेत्र एकटया घोडमुळे ओलिताखाली आले. कर्जत तालुक्यातील काही  गावे ओलीताखाली आली, घोड धरणाची क्षमता लक्षात घेता ती ७६२९ दशलक्ष घनफूट इतकी आहे. त्यावेळेस जर ही चळवळ झाली नसती तर क्षेत्र ओलिताखाली नसते. श्रीगोंदा, कर्जत तालुक्याचे क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर आधारल्याचे दिसून आले असते.

राजकीय नेतृत्त्वाखाली चळवळ संघटित होऊन तिचा रेटा अशा पध्दतीने वाढत होता. सन १९५४-५५ सालचा महाराष्ट्रातील कूळकायदा लढा जोराने फोफावला. त्या काळी श्रीगोंदा तालुका हे त्याचे प्रमुख केंद्र होते. सावकारशाहीविरुध्दचा लढा व या शेतकरी चळवळीचा परिणाम म्हणून सरकारला कूळकायदा पास करावा लागला.

पुढे भाषिक राज्यनिर्मिती व त्या धोरणाची परिणती म्हणून १९५६ साली मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरु झाला. गावोगावी मिळेल त्या साधनाने फिरुन जनमत संघटित करण्याचे काम सुरु झाले. दत्ता देशमुख, अमर शेख, क्रांतीसिंह नाना पाटील, त्यांच्या समवेत कार्यकर्ते सर्व तालुके पिंजून काढले लोकजागृती केली. तालुके एका नव्या जाणिवेने व विचाराने भारावून गेले होते. अगदी झपाटल्यासारखे सर्व तरुण पुरोगामी विचाराची दिशा घेऊन संघटित झाले होते. यातून शेतकरी चळवळ आणि पाणीप्रश्न सोडण्यात नेते काही अंशी यशस्वी ठरले.[१४]

**कुकडीचे शिल्पकार :-**

एखादे सार्वजनिक काम करावयाचे हे आधी मनाशी ठामपणे ठरवायचे. मग कितीही अडचणी येवोत, जिद्दीने व चिकाटीने पार पाडावयाचे. त्याचा प्रत्यय नेत्यांनी केलेल्या

कामावरुन येतो. ज्या प्रमाणे भगीरथाने स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आणली. त्याप्रमाणे नेत्यांनी विकासाची गंगा तालुक्यात आणली. ओसाड माळरानाचे नंदनवन झाले. जीवनमान सुधारण्यासाठी संघर्ष सतत करावा लागला. 'इंग्रजी राजवटीत १८८५ मध्ये विशाल कुकडी योजनेची मोजणी झाली. बिल नावाचा इंग्रज इंजिनिअर व त्याच्या इतर सहकाऱ्यांनी हे काम केले.[१५] त्यावेळेचा नकाशा पाहिला असता योजनेत आंबेगाव, खेड, मंचर, वेल्हा, शिरुर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, करमाळा या भागाचा समावेश होता. कालव्याची लांबी फक्त २८० कि.मी. पर्यंत होती.

या योजनेत १९८० नंतर बदल होऊन ती कार्यान्वित झाली. कालव्याची लांबी २६५ कि.मी. आहे. हा कालवा पारनेर तालुक्यातील कडूस, भोयरा खिंडीतून रांजणगाव मशीद मार्गे श्रीगोंदा तालुक्यातील उख्खलगाव, सुरेगाव, भानगाव, टाकळी लोणारच्या डोंगरकपारीने गेला असता, तर त्याची लांबी १० ते १५ कि.मी. ने वाढली असती. या योजनेसाठी तालुक्यातील नेत्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले. १९५७-५८ या वर्षी नेत्यांनी पुढाकार घेऊन अभियंता मायदेव व कार्यकारी अभियंता चाफेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी केली. त्यानुसार ती मंजूर झाली. खा. गा. बोगावत यांच्या प्रयत्नातून नेत्यांच्या पुढाकाराने १९६७ मध्ये विशाल कुकडी योजनेचे भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कामाला गती देण्यासाठी १९७६ मध्ये विसापूर येथे ना. विजयसिंह मोहिते पाटील, दादा पाटील शेळके,आठरे पाटील यांच्या उपस्थितीत परिषद घेण्यात आली. नंतर पुढे १९८० मध्ये कुकडीच्या पाण्याचे राजकारण सुरु झाले. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना कुकडीचे पाणी विसापूर तलावात सोडण्यात आले. तेथून पुढील तालुक्यात पाणी नेण्याकरिता हंगा जलसेतू बांधण्यात आला.

कुकडीच्या प्रकल्पाच्या माध्यमातून नगर जिल्हयातील श्रीगोंदे व कर्जत, तर सोलापूर जिल्हयातील करमाळा या तालुक्यातील लाखो एकर जमीन ओलिताखाली आणणे व शेतकऱ्यांच्या जीवनात ओलावा निर्माण करण्यासाठी कुकडी डाव्या कालव्यातील ३०.८३ कोटी रुपये खर्चाचा हंगा जलसेतू पूर्ण केला आहे. हा जलसेतू कुकडी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाचा आगळा-वेगळा नमुना तर आहेच. तसेच जिविताची हमी स्वीकारुन रात्रंदिवस

राबलेल्या हजारो मजुरांच्या घामातून मुदतीच्या आत, दर्जेदार काम करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील 'प्रसाद आणि कंपनी'च्या कामाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. डिंबे, माणिकडोह, वडज, येडगाव, पिंपळगाव जोगा आणि चिळेवाडी या सहा धरणांमधून आकाराला आलेल्या कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून २४९ किलोमीटर पर्यंत कृष्णा खोरे विकास मंडळाच्या माध्यमातून सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यात जात आहे.

पुणे, नगर दक्षिण आणि सोलापूर जिल्हयांतील दुष्काळी भागातील सुमारे दीड लाख हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याची ही योजना सन १९६० पासून राज्य सरकारने सुरु केली. पुणे जिल्हयातील आंबेगाव, जुन्नर, शिरुर हे तालुके आणि नगर जिल्हयातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत तालुक्यातील काही भागांचा समावेश असलेली ७७ किलोमीटर लांबीच्या डाव्या कालव्याला मान्यता, विसापूर तलावात पाणी सोडण्याचा व साठवण्याचा निर्णय काँग्रेसच्या राजवटीत झाला.

**कुकडीची व्याप्ती :-**

ऑक्टोबर १९७६ मध्ये कुकडी प्रकल्पाची व्याप्ती वाढविण्यात आली. ७७ मैल लांबीच्या कुकडी डाव्या कालव्याऐवजी सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यापर्यंत पाणी नेणाऱ्या २४८ किलोमीटर लांबीच्या कालव्याला मार्च १९७७ मध्ये राज्य सरकारने मान्यता दिली. डिसेंबर १९८६ मध्ये शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते कुकडी कालवा किलोमीटर ११४ मधून श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर धरणात पाणी सोडण्याचा कार्यक्रम झाला. धरणात पाणी सोडणे, किलोमीटर ९१ ते ११४, ११४ ते १६५ किलोमीटरपर्यंत पाणी सोडण्याची रात्रंदिवस मेहनत घेणारे तत्कालीन कुकडीचे कार्यकारी अभियंता सु.ल. वैद्य यांचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावा लागेल.

३० ऑगष्ट १९९४ रोजी आमदार बबनराव पाचपुते, श्रीगोंदा कारखन्याचे चेअरमन शिवाजीराव नागवडे व काँग्रेस कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने व पुढाकाराने मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते व पद्मसिंह पाटील यांच्या उपस्थितीत हंगे नदीवर पूल नसल्यामुळे विसापूर जोडकालव्यातून कुकडीच्या मुख्य कालवा किलोमीटर ११८ मधून मोहरवाडी तलावात व किलोमीटर १३२ पर्यंत पाणी सोडले. ठेकेदारांच्या वादात अनेक पुलांची कामे बंद होती.

सर्वांच्या सहकार्याने श्रीगोंदे तालुक्यात १४२ कि.मी. पाणी गेले त्यावेळी मंत्री सदाशिव मंडलिक यांनी निधी उपलब्ध करुन दिला आणि किलोमीटर १६५ पर्यंतच्या कामाला गती आली. सन १९९६ मध्ये युती शासनाचे पाटबंधारे मंत्री महादेव शिवणकर यांच्या हस्ते व प्रा. ना.स. फरांदे यांच्या उपस्थितीत १६५ कि.मी. पर्यंत पाणी सोडण्याचा कार्यक्रम झाला. याचवर्षी हंगे नदीवरील पुलाचा वापर न होता विसापूर जोडकालव्यातून खासदार बाळासाहेब विखे, संपर्कमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या रेटयाने कर्जत तालुक्यातील दूरगाव तलावात पाणी सोडण्यात आले.

सततच्या दुष्काळावर मात करण्यासाठी सन १९५२ मध्ये दत्ता देशमुख, भाई सथ्था, बापूसाहेब भापकर, आठरे पाटील, शिवाजीराव नागवडे या धुरिणांनी मुळा, कुकडीची मागणी केली. श्रीगोंदे तालुक्यातील शिवाजीराव नागवडे, शिवराम अण्णा पाचपुते, रंगनाथ तात्या पंदरकर, बाबा पंदरकर तसेच जिल्हयातील नेत्यांनी प्र.के. आत्रे यांना बोलावून मेळावे, परिषदा घेतल्या. १९६६ मध्ये कुकडी प्रकल्पासाठी राज्य सरकारने ३१.१८ कोटींच्या खर्चाला प्रशासकीय मंजुरी दिली. सन १९७२ च्या दुष्काळात करमाळा तालुक्यापर्यंत रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी तुटकतुटक काही प्रमाणात कालवा खोदाईची कामे करण्यात आली होती. पूर्वीच्या नियोजनात कुकडी प्रकल्प बारमाही होता. सन १९७८ मध्ये राज्यात पुलोद सरकार असताना केंद्रीय अर्थमंत्री शंकरराव चव्हाण यांनी कुकडी आठमाही करण्याचा निर्णय जाहीर केला होता.

कुकडी प्रकल्पाचा एवढा वस्तुनिष्ठ इतिहास सांगण्याचे प्रयोजन हेच की गेली ४०-४५ वर्षे श्रीगोंदा, कर्जत, पारनेर तालुक्यातील शेतकरी पावसाअभावी डोळयातील आसवांवर वांझोटी शेती कसत आले. दुष्काळग्रस्त माणसांचे काळा पाषाण फोडून हाडाची काडे झाली. अनेक शेतकरी, शेतमजूर कालव्याचे काम करताना प्राणालाही मुकले असे असले तरी प्रत्येक दशकात कुकडी प्रकल्पाचा एकेक टप्पा पूर्ण होत गेला.

**हंगे जलसेतू एक भूषण :-**

'श्रीगोंदा तालुक्याच्या विसापूर धरणाच्या जोड कालव्यामधून कर्जत तालुक्यातील दूरगाव तलावात पाणी सोडण्याचा यशस्वी प्रयत्न कुकडी प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी केला. अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा परिसरातील हंगा नदीवर

उभारलेल्या हंगा जलसेतूने मात्र या ठिकाणी चांगले काम झाल्याचे दिसून येते. सहयाद्रीच्या पर्वत रांगेत उगम पावणाऱ्या कुकडी, घोड, मीना, आर, पुष्पावती या नद्यांवर बांधण्यात आलेल्या माणिकडोह, येडगाव, डिंभे, वडज, पिंपळगाव जोगा धरणांमुळे ३३ टीएमसी पाणी अडविण्यात आले आहे. नव्याने चिळेवाडी धरणामुळे एक टीएमसी पाणी अडविण्यात येत असून त्याचा फायदा पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्हयातील दुष्काळी भागातील गावांना सुमारे ६८५ कि.मी. लांबीच्या कालव्याद्वारे होणार आहे. त्यामुळे या भागातील १ लाख ५६ हजार २७६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले. त्याच दृष्टीने कुकडी प्रकल्पांतर्गत येडगाव धरणापासून निघणाऱ्या कुकडी डाव्या कालव्याच्या कि.मी. ११६, ११७ मध्ये श्रीगोंदे तालुक्यातील पिंपळगाव पिसा परिसरातील हंगा नदीवर अत्याधुनिक तंत्रज्ञान, जलसेतू हाच पुढे पाणी नेण्यासाठी पर्याय होता. पण प्रचंड खर्चामुळे जलसेतूऐवजी विसापूर धरणाच्या भिंतीच्या आतील बाजूने कालवा काढल्यास खर्च कमी येईल असा प्रस्ताव निवृत्त मुख्य अभियंता एन.जी. के. मूर्ती यांनी सरकारला दिला होता. त्यासाठी तलाव दोन वर्षे रिकामा ठेवावा लागणार होता. हा पर्याय व्यवहारी व तांत्रिकदृष्टया अडचणीचा होता. सहा हजार हेक्टर क्षेत्र पाण्यापासून वंचित राहणार होते हे लक्षात घेऊन कुकडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांनी सन १९८५ मध्ये हंगे जलसेतू आवश्यक असल्याचे सरकारला पत्र दिले.

५ ऑक्टोबर १९९१ रोजी हंगे जलसेतू बांधण्यास सरकारने मान्यता दिली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन १२६० मीटर लांबीचा जलसेतू उभारण्यात आला आहे. २८ गाळे असलेल्या सेतूस पूर्वबीलन सलोह साधनकास ९ नोव्हेंबर १९९१ रोजी राज्य सरकारने मंजुरी दिली. २८ बॉक्स, २७ पिअर आणि दोन अत्यंभार असलेल्या अत्याधुनिक पध्दतीच्या पुलाचे बांधकाम हैद्राबद येथील प्रसाद आणि कंपनीने १४ ऑक्टोबर १९९६ रोजी सुरु केले. कालवा किलोमीटर ११५/५१० ते १९६/७७० मध्ये १२६० मीटर लांबीच्या आणि ३०.८३ कोटी रुपये खर्चाच्या पुलाचे काम पूर्ण करण्याचा कालावधी तीन वर्षाचा होता. प्रत्यक्षात २२ महिन्यात या पुलाचे काम पूर्ण करण्यात आले.[१६]

'श्रीगोंदा, कर्जत, करमाळा या तालुक्यातील जनतेला आणि जीवजीवांना वरदान असणाऱ्या भव्यदिव्य पुलाचा १५ क्रमांकाच्या पिअरची (खांब) उंची सर्वाधिक २८.८५ मीटर व

१८ क्रमांकाच्या पिअरची सर्वात कमी १५.३९ मीटर आहे. पुलाचे बांधकाम १९ हजार ३०० घनमीटर आहे. कॉंक्रीट बांधकाम ५३ हजार ३७४ घनमीटर खोदाईकाम १ लाख ०८ हजार ८९४ घनमीटर भराव २ लाख ६ हजार ८०८ घनमीटर असून सर्व काम पूर्ण झालेले आहे. पुलात २ हजार ५० मेट्रिक टन लोखंडाचा वापर करण्यात आला असून प्रिस्टेसर्ड हायटेन्साईल स्टील मध्ये कुकडी विभाग ७ चे अभियंता, ठेकेदार यांनी सुमारे ९८ लाख ७७ हजार रुपयांची बचत केली आहे. अभियंत्यांचे नियंत्रण व कौशल्य ठेकेदाराची कार्यपध्दती यामुळे तातडीने केबल वापरण्याची गरज पडली नाही.'[१७]

नैसर्गिक आपत्ती विचारात घेऊन बांधलेल्या या पुलावर पाणी वाहून नेणारे ३.३५ अधिक ३६१ मीटर आकाराचे दोन बॉक्स आहेत. संकल्प चित्रानुसार वहन क्षमता ५१.६४ घनमीटर प्रतिसेकंद असून, प्रत्यक्षात वहनक्षमता ४१.५९ घनमीटर प्रतिसेकंद (१५०० क्युसेस) आहे. पुलावरुन वाहनासाठी व मध्येच वाहन वळवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राघवेंद्र कुलकर्णी, उदगीरकर, मुख्य अभियंता कॅप्टन अशोक पाटील, अधीक्षक अभियंता व्यंकटराव गायकवाड, अप्पासाहेब पाटील, सो.ज.शिंदे, कार्यकारी अभियंता सु.ल.वैद्य, बी.एस.रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अभियंता बी.जे. रहाणे, ए.एस. कुलकर्णी, शिरीष कदरकर, सहाय्यक अभियंता - १, शाखा अभियंता - २ साहेबराव पडवळ, अनिलकुमार फूटाणे, दत्तात्रय इंदुलकर, कुकडी प्रकल्पाचे कर्मचारी यांच्या अथक परिश्रमातून जीवनदायी हंगे जलसेतूची उभारणी झाली आहे.

दक्षिणेतील नेत्यांनी पुलाची पहाणी करुन अधिकाऱ्यांच्या पाठीवर थाप टाकून खूप चांगले काम आहे, तुमच्या कामातून शेतक-यांना पाण्याचे दर्शन होणार आहे अशा शब्दात स्तुती केली. कुकडी पाणीप्रश्नाचा अभ्यास करताना असे जाणवते की, जिल्हयातील नेत्यांनी दूरदृष्टीने विचार करुन १९५२ मध्ये तालुक्यातील, त्यांच्या सहकार्यांनी घेतलेले मेळावे परिषदाही आज फक्त श्रीगोंदा तालुक्यालाच वरदान ठरली नसून ती पारनेर, कर्जत, करमाळा तालुक्यासही वरदान ठरलेले दिसते. यावरुन नेत्यांनी केलेले कार्य लक्षात येते.

**(कुकडी ,हंगे जलसेतू छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)**

### ३.३ श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याची स्थापना :-

आपल्या भारतालाच नव्हे तर महाराष्ट्रातही फार प्राचीन काळापासून साखरेचा उपयोग माहीत आहे. ऋग्वेदामध्ये पूजाविधी करताना नैवैद्यासाठी साखरेचा उपयोग केला जात असल्याचा उल्लेख आढळतो. मनू आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही साखरेसंबंधी पुरावे आहेत. अलेक्झांडर, चिनी राजा तायत्सुंग यांनी भारतीय साखरेचा उल्लेख केलेला आहे.

"महाराष्ट्राच्या औद्योगिक कृषी क्षेत्रात साखर उद्योग हा एक महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्थित्यांतर करणारा हा उद्योग नवसमाजनिर्मितीचे नवे दालन उघडीत आहे. हा ग्रामीण भागातील कृषी, औद्योगिक समाजरचनेच्या पुनर्बांधणीत सर्वांगीण प्रगतीचे केंद्र मानून ग्रामीण भागाचे नंदनवन करणारा हा व्यवसाय महाराष्ट्रात निश्चितच भूषणावह ठरला आहे."[१८]

"अधुनिक काळात भारतामध्ये बंगाल आणि बिहारमध्ये काही इंग्रजांनी साखर कारखाने उभारण्याचे प्रयत्न सुरु केले. महाराष्ट्रात पहिला साखर कारखाना १९२० ला अहमदनगर जिल्हयात बेलापूर येथे उभारण्यात आला."[१९] भारतामध्ये सहकारी साखर कारखान्याचा पहिला मान महाराष्ट्रास मिळाला. त्यानंतर त्याचे लोण उत्तर प्रदेश, बिहार राज्यात पसरत गेले."[२०]

"कोणत्याही नव्या उपक्रमाच्या पाठीशी आवश्यक त्या प्रेरणा, उत्साह, तो उपक्रम यशस्वी करण्याची व जोपासण्याची जिद्द सातत्याने उभी राहिल्याशिवाय तो उपक्रम रुढ होत नाही. प्रारंभ शुरासारखा केवळ आरंभी उत्साह ओतून भागत नाही. कारण तो उत्साह हळूहळू पुढे व्यवहाराच्या वाळवंटात जिरुन जातो. याची जाणीव ठेवून जिल्हयातील नेत्यांनी जे उपक्रम राबवले ते पूर्णत्वाला नेले आहेत. उपक्रमाचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला व पाठपुरावा होईल याची दक्षता घेतली आहे."

कालमानाप्रमाणे परिस्थिती सतत बदलत असते. स्वातंत्र्यानंतर देशातील समाजव्यवस्था बदलण्यासाठी शासनसंस्थेबरोबरच देशातील आग्रणी नेते, समाजधुरंधर, स्वयंसेवी संस्था यांनी कार्य चालु केले. देशातील स्वातंत्र्यपूर्व काळातच समाज उन्नती करणारे अनेक प्रकल्प, विकास योजना सुरु झाल्या. रविंद्रनाथ टागोर यांचा शांतिनिकेतन, विनोबा भावे यांची भूदान चळवळ यासारख्या योजना पुढच्या पिढीतील कार्यकर्त्यांना समाजविकासाची दृष्टी

देत होती. १९४८ मध्ये मुंबई सरकारने सर्वोदय योजना सुरु केली. लोकांमधील स्वमदत व सहकार या दोन गुणांच्या विकासाला प्राधान्य देऊन लोकांच्याच साहाय्याने विकास घडवून आणणे हे सर्वोदय योजनेचे मुख्य उद्देश होते. पद्मश्री विखे, भाऊसाहेब थोरात, बाबुराव तनपुरे, शंकरराव कोल्हे, शिवाजीराव नागवडे, आबासाहेब निंबाळकर, बापूसाहेब भापकर, दादा पाटील शेळके, बापूसाहेब देशमुख, दादापाटील राजळे हे अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील आग्रणी कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी नगर जिल्हयातच १९४९ साली उभ्या राहिलेल्या व आकाराला आलेल्या सहकारी कारखान्यामागील तत्त्वाचा प्रयोग स्वतःच्या तालुक्यात वेगळया पध्दतीने केला.

१९५२-५३ साली विसापूरला स.का. पाटलांनी मुळा-कुकडीची परिषद बोलावली होती. मोरारजी देसाई अध्यक्ष होते. या परिषदेसाठी जिल्हयातील कार्यकर्ते गेले होते. दुष्काळ प्रचंड होता. माणसांना जनावरांना प्यायला पाणी नव्हतं. श्रीगोंदा, कर्जत तालुक्यातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वांनी घोडची मागणी केली. पैसा फारसा उपलबध नव्हता. पण तरीही त्याला सरकारने मंजूरी दिली आणि शेतकऱ्यांना अन्नधान्य पिकवून जगता यावं यासाठी १९५६ साली घोडचा जन्म झाला. पाणी सुटलं घोडचा जन्म झाला. घोडचा आराखडा ब्रिटिशांच्या जुन्या आराखडयात पण होताच. घोडला पाणी आलं म्हणून मग १९५६ सालीच सहकारी साखर कारखान्यासाठी अर्ज दिला. कारखान्याच्या मागणीसाठी कम्युनिस्ट पक्षाच्या झेंडयाखाली रंगनाथ तात्या पंदरकर, कॉ. कडू, अण्णासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीत अनेक शिबिरे घेतली. आंदोलन केली. जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. पण त्याची दखल कुणीच घेतली नाही. घोडचं पाणी आठमाही मिळावं अशी तरतूद सुरुवातीला झाली, पण पुढे कारखाना काढतो, बारमाही पाणी, द्या अशी मागणी सरकारला केली, ती मान्य झाली नाही. लढयामध्ये कोणी फारस लक्ष दिले नसले तरी लढा आणि चिकाटी कार्यकर्त्यांनी सोडली नाही. अण्णासाहेब शिंदे, बी.जी. खताळ पाटील म्हणायचे ही फार आवघड गोष्ट आहे. दुष्काळाची अवस्था बिकटच होती, पाणी नाही, काम नाही अशा परिस्थितीत अहमदनगर जिल्हयाचे दक्षिण भागात श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी बु., येथे शासनाने डहाणूकरांना सुरुवातीला १५० टनाला १९५८ मध्ये खाजगी कारखान्याला परवानगी दिली. पुढे १००० टनांपर्यंत विस्तारीकरण करण्यासाठी परवाना

देऊ केला व २००० एकराची परवानगी सुध्दा देऊन टाकली. शासनाचा हा निर्णय कोणालाच मान्य नव्हता. यावर बरेच वाद-संवाद झाले. जवळ-जवळ ५-६ वर्षे त्याविरुध्द लढा चालला होता."[२१]

डहाणूकरांचा खाजगी साखर कारखाना होता. या कारखान्यावर कामगारांवर प्रचंड दडपशाही व शेतकऱ्यांची अडवणूक होती. अल्पशा खंडाने घेतलेल्या व विकत घेतलेली डहाणुकरांची खाजगी शेती होती. तालुक्यात हंगा नदीवर असणाऱ्या विसापूर तलावाचे १०० टक्के संपूर्ण पाणी एकटे डहाणूकर वापरीत असत. तशाच परिस्थितीत श्रीगोंदा तालुक्यात ऊस क्षेत्र वाढू लागले होते. १००० टनापर्यंत विस्तारीकरण करण्यास परवानगी देऊ केल्यावर डहाणूकरांनी काष्टी येथे कार्यालय उघडले होते. ते कार्यालय दोन वर्षे होते. डहाणूकरांचे अधिकारी परिसरात फिरायचे शेतकऱ्यांना सांगावयाचे १० एकर जमीन खंडाने द्या त्या बदल्यात खत, पेंड देऊ तुमची प्रगती होईल. २० वर्षाच्या खंडांचे पैसे ३० रुपये एकर या प्रमाणे १९५८-५९ मध्ये खंडाची रक्कम वाढून ती ५५ ते ६० रुपये झाली.

डहाणूकरांचे अधिकारी शेतकऱ्यांना मधाच बोट दाखवायचे, आमिष दाखवायचे, अशी कामं ते करत त्यांच्या विरोधात सायकलवरुन फिरायचे डहाणूकरांच्याच टांगा चालकाला विचारुन त्यांच्या दौऱ्याची माहिती मिळवायची आणि त्या-त्या गावात जाऊन शेतकऱ्यांना तोटयाचा व्यवहार समजाऊन सांगायचा त्याचा फायदा झाला. एका शेतकऱ्याची १५ एकर जमीन वगळता त्यांना या भागात जमीनच उपलब्ध झाली नाही. शेवटी ही मंडळी हताश झाली. पुढे १ एप्रिल १९५७ स्टेट फार्मिंगचा कायदा आला जमीन मिळत नाही म्हणून मग डहाणूकरांनी कारखाना काढण्यास असमर्थता व्यक्त केली.

साखर कारखाना काढण्याचे प्रयत्न कार्येकर्ते सहकारी यांचे सुरुच होते. पण देशात साखरेचे उत्पादन जास्त झाल्याने नवीन कारखान्यांना परवानगी द्यायची नाही, असा निर्णय स.का. पाटलांनी घेतला. दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या नावावार धरण झालं. त्याचा उपयोग शेतकऱ्यांसाठी करणार नाही असं कसं होईल. अशी भूमिका मांडली आणि यावरही वाद झाले. बेलवंडीचा जुना कारखाना होताच त्याला नवीन परवानगी नाही, असे पुढाऱ्यांच म्हणणं होत. वर्षभर वाद चालू होता. शेवटी चर्चेतून तो अधिकार दिला गेला. शेअर भांडवल गोळा करायचे

ठरले. कारखान्याचे नॉमिनेटेड बोर्ड अस्तित्वात आले. त्यावर कॉंग्रेसचे लोक घेतले. त्यावेळेस नागवडे कम्युनिस्ट पक्षात होते. पण लोकांचा विश्वास होता. आम्ही सर्व सहकारी थांबतो, बाबुराव दादा तनपुरे तेव्हा चिफ प्रमोटर होते. तेंव्हाचे जवळकर, अहमद ही अधिकारी मंडळी वादात मध्यस्थी करावयाची, समजाऊन सांगायची. आमच्यातला एक कम्युनिस्ट डायरेक्टर घ्यावा, असा आग्रह सर्व सहकाऱ्यांनी धरला तेंव्हा सर्वांनी नागवडेंना घ्यायचं ठरवलं. १९६१-६२ चा काळ असेल. पहिले सात लोकांचे बोर्ड अस्तित्वात आलं. त्यामध्ये बाबुराव तनपुरे, काशिनाथ वाणवे, रावसाहेब पंधरकर, आबासाहेब लगड, शिवाजी नागवडे, एकनाथ निंबाळकर आणि रामराव चव्हाण (औनररी सेक्रेटरी) असे सदस्य होते. कारखान्यासाठी १५ लाखाच भांडवल कमी पडले होते.[२२]

सर्व सहकारी ४ - ८ दिवस तालुक्यात फिरले व ७ लाख रुपये जमा केले. स्वतः पावत्या फाडून पैसे गोळा करायचे. लायसन्सच्या नावाखाली १९६५ साली जुना कारखाना, बंगले, जमिनीसकट १७ लाखांना विकत घेतले. तो कारखाना काही दिवस चालवला पण कारखाना जवळपास ५८ लाखापर्यंत तोटयात गेला. मोठी जिकिरीची परिस्थिती होती. १० लाखांच्या शेअर भांडवलापैकी ७ लाख सरकारने दिले होते. अशा परिस्थितीत नवीन कारखान्याचे परवान्याचे काम होत आले होते. नगरला आर.ए. झुबेरी नावाचे कलेक्टर होते ते पुढे जॉईंट रजिस्ट्रार झाले. कारखान्यासाठी सिन्नर, श्रीगोंदा आणि कर्जत अशा तीन जागा दाखविल्या. त्यापैकी सध्याची जागा मंजूर झाली. भांडवल उभ करायचे ठरले. पण पूर्वीचा म्हणजे १९६५ चा अनुभव चांगला नव्हता. राज्य सहकारी बँकही पैसे द्यायला तयार होत नव्हती. पुढे बँकाचं राष्ट्रीयकरण झाल्यानंतर युनियन बँकेकडे भांडवलासाठी प्रयत्न केले. बँकेच्या अधिकाऱ्यांनी ६ कोटी रुपये द्यायच कबूल केले. पण त्यासाठी राज्य सहकारी बँकेची 'ना हरकत प्रमाणपत्र' त्यांना हव होते, ते द्यायला राज्य सहकारी बँक तयार नव्हती. शेतकी कर्ज पुरवठयासाठी युनियन बँकेने गायतोंडे नावाचे निवृत्त अधिकारी नेमले होते. त्यांच्याकडे कारखान्याचे प्रकरण होते. शेवटी एक दिवस त्यांना घेऊन पुण्याला राज्य सहकारी बँकेत गेले. तेंव्हा श्रीमाळ म्हणून कार्यकारी संचालक काम पहात होते. सर्व गोष्टी बारीक सारीक अभ्यासायचे त्यांच्यासमोर चर्चेला बसल्यानंतर ते म्हणू लागले अजून मंजुरी नाही, ऊसाचा पत्ता

नाही, पाणी नाही, एवढामोठा कर्जपुरवठा केला, तर परतफेड होणार कशी आम्ही ना हरकत प्रमाणपत्र देणार नाही. युनियन बँकेचे गायतोंडे यांनाही ते बोलले यावरुन खूप वाद झाला. श्रीमाळ म्हणाले अशा पध्दतीने साखर कारखाना उभा राहिला तर सर्वच कारखाने राष्ट्रीयीकृत बँकांकडे पळतील तसे व्हायला नको आम्हीच कर्ज देतो, असे सांगितले आणि पुन्हा कामास सुरुवात केली.

शेअर भांडवलात १००० रुपयांपैकी १२५ रुपये शेतकऱ्यांकडून घ्यावयाचे आणि उरलेले ८७५ रुपये बँकेकडून घ्यायचे ठरले. ६० लाख रुपये गोळा झाले. पण तेवढयावर भागेना. १ कोटी ५ लाख गोळा करण्यास सांगण्यात आलं होतं. पुन्हा सुरुवात केली. भांडवल जमा केले आणि अशातच १९७० साल उजाडले आणि निवडणुकीचे वारे वाहू लागले. काँग्रेस विरुध्द कम्युनिस्ट पार्टी अशी लढत सुरु झाली. सर्वच रथी महारथी विरोधात होते. शंकरराव काळे, बाळासाहेब भारदे, अण्णासाहेब शिंदे विरोधात प्रचार करायचे मात्र शिवाजीराव नागवडेंच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य शेतकरी कामगार, शेतमजूर एकत्र आले. कारखान्यातील २ सेवानिवृत्त कामगारही पॅनेलमध्ये होते. कारखान्याच्या इतिहासात ही निवडणूक अत्यंत गाजली. बापूंच्या नेतृत्त्वाखाली बोर्ड निवडून आले. शिवाजी नागवडे, शिवराम पाचपुते, रंगनाथ पंदरकर व आदी सहकारीही त्यात वीजयी झाले. निवडणुकीत काँग्रेसचा सपशेल पराभव झाला आणि नंतर बापूंची एकमताने चेअरमन म्हणून निवड झाली.

सत्ता तर आली पण कारखाना उभा करता येणार नाही, असे आरोप झाले. धीर सोडला नाही. श्रीगोंदा स्टेशनजवळील विस्तीर्ण माळावर कारखाना उभारणीचे काम सुरु झाले "बकाऊ वुल्फ" कंपनीची ऑर्डर हाताशी होती. ती पूर्ण केली त्यावर अण्णासाहेब शिंदेंनी कौतुक केले व नंतर सहकार्य केले. काम जोमाने सुरु झाले. मशिनरी आयात करताना स्टेशनवर मशिनरी उतरुन घेणे कार्यस्थळावर वाहून आणणे, ट्रकने आलेले अवजड सामान उतरुन घेणे, फौंडेशन करुन भरुन घेणे, इमारतीचे बांधकाम मशिनरी उभारणी त्यांचे इन्शुरंन्स त्याचवेळी कामगारांसाठी नवीन घरांची बांधकामे व त्याकरिता पैशांची जमवाजमव यासाठी रात्रंदिवस कार्यकर्त्यांनी सर्व कामावर देखरेख केली. नियंत्रण ठेवले. सर्व इंजिनीअर्स व ठेकेदारांनी देखील कार्यकर्त्यांच्या कामाचे कौतुक केले.

नेत्यांच्या स्वभावाचे वैशिष्टये एकदा का एखाद्या कामाचा ध्यास घेतला की अगदी झपाटल्यासारखे ते त्यात रममाण होतात. त्यांना स्वतःचे वेगळे असे अस्तित्वच राहत नाही. प्रत्येक बाबींचा निर्णय घेताना अत्यंत काळजीपूर्वक घेऊन त्यातून सर्वसामान्यांचे कष्टकऱ्यांचे हित जास्तीत जास्त कसे जोपासले जाईल, याकडे त्यांचा अत्यंत कटाक्ष असतो. अशा परिस्थितीत अवघ्या ३४-३५लाखांच्या भांडवलावर कारखाना उभा केला. "न भूतो न भविष्यती" अशीच ही कामगिरी होती. अथक परिश्रमातून उभ्या केलेल्या साखर कारखान्याचा पहिला गळीत हंगाम १९७३ मध्ये कोणताही औपचारिक समारंभ न करता रात्री १२ वाजता सुरु केला होता. या कारखान्याने श्रीगोंदा तालुक्याचा कायापालट केला आहे. दुष्काळाच्या थपडा वारंवार खाणारा हा तालुका आज समृध्दीच्या दिशेने वेगाने जात आहे. तालुक्यातील बहुतांशी जमीन ओलिताखाली आली असल्याने इतर तालुक्यांच्या मानाने दुष्काळाचे चटके श्रीगोंदा तालुक्याला कमी बसतात. साखर कारखान्यामुळे तालुक्यातील शेतकरी ऊस लागवडीकडे वळला आणि त्यातूनच त्याच्या दारी सुबत्ता आली. यापाठीमागे नेत्यांचे परिश्रम आणि दूरदृष्टी होती. जर त्यांनी डहाणूकरांच्या कारखान्याला विरोध केला नसता, तर तालुक्यातील बहुतांशी जमीन ताब्यात घेऊन डहाणूकरांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली असती. पण नेत्यांनी हे जाणलं आणि खाजगी कारखान्याला विरोध केला.

आज श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला बौध्दिक, शैक्षणिक मार्गदर्शन करणे व स्वतःच्या प्रयत्नाने विकास घडवून आणणे, यासाठी शिक्षण व कृषी शिक्षण आवश्यक असते. हे कार्य तालुकाभर गावच्या सरपंच आणि चेअरमन पदापासून सुरु झाले. ग्रामीण समाजाचा विकास घडत असताना अनौपचारिक शिक्षणाची नितांत गरज असते. शेजारच्या बांधभाऊ शेतकऱ्याने आपल्या शेती तंत्रात काय बदल केला त्याने त्याचा काय परिणाम साधला हे दुसऱ्याच्या शेतकऱ्याला अनुकरणीय असते. शेतकऱ्यांच्या नगदी पिकाला पैसा मिळण्यासाठी त्याची प्रक्रिया होणे गरजेचे होते. शेतकऱ्याने कारखानदार होणे ही ज्या काळी हास्यास्पद गोष्ट होती. त्याकाळी कार्यकर्त्यांनी हा प्रयोग तालुक्यात सुरु केला.[२३]

( नगर दक्षिण भागातील पहिला श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे.)

"महाराष्ट्र हे औद्योगिकरण झालेले राज्य आहे. सध्या कृषी व्यवसायात अतिरिक्त श्रमसंख्या गुंतली आहे. ती औद्योगिक क्षेत्रात सामावून घेता येईल. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या अधिक असेल तर अशा देशाला व समाजाला अप्रगत मानले जाते.

साखर कारखान्यामुळे ऊसाची लागवड, रसायन उद्योग, वाहतूक व्यवसाय, शेतीतील यंत्रसामुग्री, सहकारी बँका इत्यादी अनेक व्यवसायांना सुमारे ५००० पेक्षा जास्त व्यक्तींना रोजगार उपलबध होतो. साखर उत्पादनाबरोबर विविध प्रकल्पांना ग्रामीण भागात चालना मिळते. त्यामुळे विविध प्रकारच्या सुविधा उपलबध झाल्या. रोजगार वाढले, ऊसाला योग्य भाव मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. शेतीमध्ये यांत्रिकता आली. ग्रामीण परिसरात शाळा, महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषी शिक्षण, संशोधन संस्था, वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संख्येत वाढ झाली. ग्रामीण जनतेला सुविधा मिळू लागल्या.[२४] दक्षिणेतील नेत्यांनी उभ्या केलेल्या कारखान्यात अशा प्रकारच्या अनेक संस्था उभ्या राहिल्या व रोजगार उपलब्ध झाला आहे.

"आज महाराष्ट्रात १३५ सहकारी साखर कारखाने असून नियोजित साखर कारखान्यांची संख्या १९४ होणार आहे. महाराष्ट्रात ग्रामीण परिसरात कृषी उद्योगावर आधारित साखर धंदा महत्त्वाचा आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा या प्रादेशिक विभागातील लोकांचे जीवनमान साखर उद्योगावर अवलंबून आहे. सभासदांचा ऊस एकत्रित करणे, त्यापासून साखरनिर्मिती करणे, ती बाजारात विकणे व प्रक्रियेचा आणि विक्रीचा एकूण खर्च वजा करुन राहिलेल्या उत्पन्नाचे सभासदांना वाटप करणे, हे सहकारी साखर कारखान्याचे पहिले उद्दिष्ट आहे."[२५] हे कार्य दक्षिणेतील नेते आपआपल्या तालुक्यात करत असल्याचे दिसते.

**दक्षिण भागातील तालुकानिहाय साखर कारखाने**

| अ.क्र. | तहसील | साखर कारखान्याचे नाव | सहकारी/खाजगी |
|---|---|---|---|
| १ | नगर | नगर तालुका सह. साखर का. लि. | सहकारी |
| २ | पाथर्डी | वृध्देश्वर सह.सा.का.लि. अदिनाथनगर | सहकारी |
| ३ | कर्जत | जगदंबा सह.सा.का.लि. | सहकारी |
| ४ | श्रीगोंदा | श्रीगोंदा सह.सा.का.लि. श्रीगोंदा फॅक्टरी<br>कुकडी सह.सा.का.लि. पिंपळगाव पिसा | सहकारी<br>सहकारी |
| ५ | पारनेर | पारनेर सह.सा.का.लि. देवीभोयरे | सहकारी |
| ६ | जामखेड | - | - |

**'दक्षिण भागातील तालुकानिहाय साखर कारखाने'**[२६]

## अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील तालुकानिहाय १९९० ते २००० सालातील साखर कारखाने, प्रत्यक्ष गाळप आकडेवारीत

| साखर कारखान्याचे नाव | वृध्देश्वर स.सा.का.आदिनाथ नगर, पाथर्डी | | जगदंबा स.सा.का. कर्जत | | श्रीगोंदा स.सा.का. श्रीगोंदा फॅक्टरी, श्रीगोंदा | | पारनेर स.सा.का.देवीभोयरे, पारनेर | | कुकडी स.सा.का. पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा | | नगर तालुका स.सा.का. वाळकी, ता. नगर. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तपशील सन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन | गळीत क्षमता मे.टन (प्रतिदिन) | प्रत्यक्ष गाळप मे. टन |
| **१९९०-९१** | ८०० | १८१७८५ | ८०० | २३२०३९ | २००० | ४६७६६८ | १२५० | ३०९४६२ | | | | |
| **१९९१-९२** | ८०० | १७८३०६ | ८०० | १८९२५० | २००० | ३९७५७० | १२५० | २८९४५० | | | | |
| **१९९२-९३** | २५०० | १००४२१ | ८०० | १२७२५९ | २००० | ३८१४३४ | १२५० | १५६४६५ | | | | |
| **१९९३-९४** | २५०० | ९९१९९ | ८०० | ५६६९६ | २००० | ३५८८६० | १२५० | ३१६२२ | | | | |
| **१९९४-९५** | २५०० | २०४६५० | ८०० | १८५७७९ | २००० | ४७७५०६ | १२५० | ३०४३११ | | | | |
| **१९९५-९६** | २५०० | १८९५४० | ८०० | १६५३५० | २०० | ४६९६८० | १२५० | २४८००० | | | | |
| **१९९६-९७** | २५०० | १०६००० | ८०० | १६०००० | २००० | ३४७००० | १२५० | ६१००० | | | | |
| **१९९७-९८** | २५०० | २४२००० | ८०० | बंद | २००० | ५०७००० | १२५० | बंद | | | | |
| **१९९८-९९** | २५०० | २७८४६९ | ८०० | बंद | २००० | ५४१२४८ | १२५० | १८५७०० | | | | |
| **१९९९-२०००** | २५०० | ४१०३३४ | ८०० | १८२३८२ | ३५०० | ४०५६८१ | १२५० | १८५७६० | २५०० | अद्याप उभारले नाही | २५०० | अद्याप उभारले नाही |

**'दक्षिण भागातील साखर कारखान्यांची १९९० ते २००० सालातील गळीत आकडेवारी'[२७]**

**प्रादेशिक विकास :**

"साखर उद्योगामुळे प्रादेशिक विकास झाला हे मान्य करावे लागेल. गेल्या तीस चाळीस वर्षात या उद्देशाने विविध क्षेत्राला मदत केली आहे."

१) कृषी क्षेत्र विस्तारले, कुटिर उद्योग क्षेत्र विविध अंगी झाले.

२) साखर उद्योगक्षेत्रच विविधांगी झाले.

३) ग्रामीण जनतेला वैद्यकीय, शैक्षणिक, वाहतूक सुविधा उपलब्ध झाल्या.

४) तरुणांना रोजगार मिळाला. बेकारांची संख्या कमी होण्यास मदत झाली.[२८]

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पुरविल्या जाणारे विविध सुविधांच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकरी, सभासद, कामगार यांना दिल्या जाणाऱ्या योजना व त्यामुळे होणारे फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सभासद विमा योजना :**

कारखान्याने सर्व सभासदांचा वैयक्तिक अपघात विमा योजनेअंतर्गत विमा उतरविण्याचा उपक्रम केलेला आहे व त्या विम्याच्या हप्त्याची रक्कमही प्रतिवर्षी कारखाना विमा कंपनीकडे भरीत असतो. ज्या सभासदांचे दुर्देवाने अपघाती निधन होते त्यांचे वारसदार कुटुंबीयांना या योजनेमधून आर्थिक साहाय्य मिळवून दिले जाते.

**२) सभासद व बिगर सभासदांना सुविधा :**

कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासदांना त्यांचे शेतीसंबंधात पाणी वापर, ऊस विकास व शेतीबाबत त्यावर पडणाऱ्या रोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती कारखान्यामार्फत शेतकऱ्यांच्या सहली पाठवून, शेतकरी मेळावे कृषी प्रदर्शन भरवून व चर्चासत्र आयोजित करुन व त्यामध्ये व्ही.एस.आय. व कृषी विद्यापीठामार्फत शेतीविषयक तज्ज्ञांना आमंत्रित करुन त्यांचे मार्फत माहिती देण्याचा व प्रात्यक्षिके करुन दाखविणेचा प्रयत्न केला जातो. याशिवाय सभासद शेतकरी वर्गास ट्रक, ट्रॅक्टर, ट्रॉली, बैलगाडी, बैलजोडी, इलेक्ट्रिक मोटर्स, ठिबक सिंचन, पाईपलाईन खरेदी, खते, पीक कर्ज अशा विविध कामी लागणारे कर्ज सहकारी बँक व अन्य बँकाकडून पतपुरवठा करुन देणेसाठी आवश्यक लागणारे सहकार्य व माहिती देऊन हमिपत्र देऊन कर्ज मिळवून देणेकामी मदत केली जाते. तसेच पाईपलाईन, घरबांधकाम, विहीर खोदाई इत्यादी बाबींसाठी लागणारे प्लॅन एस्टिमेंट हे

कमीत कमी खर्चात कारखान्याकडून बनवून देणेची व्यवस्था केली जाते. कारखाना परिसरातील ऊस उत्पादकांना कंपोस्ट खत, ताग-बियाणे व पिकावरील मारावयाची औषधे खात्रीशीर मिळणेकरिता कारखान्यामार्फत खरेदी करुन ती सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिली जातात.

**३) आसवनी विभाग :**

कारखान्याकडे आसवनी विभाग असून या आसवनीद्वारे मद्यार्क (स्पिरिट) व अतिशुध्द मद्यार्क (एक्स्ट्रान्युट्रल अल्कोहोल) उत्पादनाचे प्रकल्प कार्यरत आहेत. मद्यार्क व अतिशुध्द मद्यार्क उत्पादन प्रकलपाद्वारे मोलॅसेस कारखान्याकडून घेऊन त्यापासून मद्यार्क (स्पिरिट) उत्पादित केले जाते. त्यापासून कारखान्यास आर्थिक फायदा होतो.

**४) शैक्षणिक कार्य :**

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शिक्षण संस्थेची स्थापना करुन त्याद्वारे तालुक्यामध्ये बालवाडी, माध्यमिक विद्यालये, उच्च माध्यमिक विद्यालये, महाविद्यालय, तंत्र निकेतन जिल्हयातील ग्रामीण भागातील अशा सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना त्यांचे गावात व गावाजवळ उपलब्ध करुन दिले आहेत. या संस्थेमधून शिक्षण घेऊन बरेच विद्यार्थी आज चांगल्या हुद्दयावर व नामांकित कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.

**५) कामगार कल्याण योजना :**

कारखान्याने प्रातिनिधिक युनियन कार्यकारिणी सदस्य व कामगारांशी प्रथमपासून चांगल्या प्रकारची सद्भवना ठेवून सलोख्याचे संबंध ठेवले आहेत. कामगारांची कारखाना कॉलनीमध्ये राहणेची उत्तम सोय, वीजपुरवठा, आरोग्य सेवा सुविधा इत्यादी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच कामगारांचे अपघाती विमे उतरविणे, मेडिक्लेम, वेळोवेळी वाढणारे पगार, महागाईभत्ता देणे, वार्षिक पगारवाढ देणे व कामगारांचे इतर प्रश्न हे प्रातिनिधीक युनियनशी चर्चा करुन सोडविणे, कामगारांचे दृष्टीने चांगल्या बाबी व औद्योगिक शांतता राखण्याचे दृष्टीने करावयाच्या बाबी कारखाना व्यवस्थापन योग्य प्रकारे राबवीत असल्याने कारखाना व्यवस्थापन व कामगार यामध्ये चांगले वातावरण असून या कामी प्रातिनिधिक युनियन साखर कामगार युनियनचे अध्यक्ष, सरचिटणीस व कार्यकारीणीतील सर्व सदस्यांचे सक्रिय सहकार्य मिळते.

**६) कंपोस्ट खत प्रकल्प :**

कारखान्याचे आसवनीमधून बाहेर पडणाऱ्या स्पेंट बॉशची विल्हेवाट ही पोल्युशन कंट्रोल बोर्डाचे नियमानुसार व सूचनेप्रमाणे कारखान्याने 'प्रायमरी ट्रीटमेंट' म्हणून मिथेन बायोगॅस प्रकल्प उभारुन कार्यान्वित केला आहे व त्यानंतरबाहेर पडणारे अशुध्द पाण्यावर पुन्हा 'सेकंडरी ट्रीटमेंट' करणे आवश्यक असल्याने कारखान्याने पोल्युशन कंट्रोल बोर्डाचे नियमाप्रमाणे सेकंडरी ट्रीटमेंटकरीता आवश्यक लागणारी मशिनरी व इतर औजारे खरेदी केली व त्याद्वारे कारखान्यामध्ये तयार होणारे प्रेसमड, बॉयलर, राख, प्रायमरी ट्रीटमेंट नंतर बाहेर पडणारे अशुध्द पाणी व जिवाणू खतांचे शास्त्रोक्त पध्दतीने मिश्रण करुन 'कंपोस्ट खत' तयार केले जाते व ते खत शेणखत व रासायनिक खत यापेक्षा उत्तम प्रकारचे असलेबाबत वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे यांनी परीक्षण करुन निर्वाळा दिला आहे. ऊस वाढीसाठी या कंपोस्ट खताचा चांगला फायदा होत आहे.'[२९]

**कारखाना :**

'कोणत्याही वस्तूवर प्रक्रिया करण्यासाठी किंवा विक्रीच्या वस्तू बनविण्यासाठी जेथे दहा किंवा जास्त कामगार लावून यांत्रिक शक्तीच्या मदतीने काम केले जाते किंवा जेथे यांत्रिक शक्ती न वापरता वीस किंवा अधिक कामगार असतात त्या कर्मशाळेला भारतीय कारखाना अधिनियमानुसार कारखाना म्हणतात.'[३०]

नेत्यांच्या कार्यातून उभ्या राहिलेल्या सहकारी साखर कारखान्यांमुळे अनेक कर्मचारी काम करतात. पैकी इंजिनिअरींग विभागात, रसायन विभागात, आर्कशाळा, गव्हाणीवरती, स्टोअर विभागात, सुरक्षा विभागात, टाईम ऑफिस, लेबर ऑफिस, शुगर विभाग, कॅन अकौंट, कॅनसप्लाय, शेतकी विभाग, सिव्हील, आरोग्य विभाग, वाहतूक कर्मचारी, गेस्ट हाऊस, अकौंट विभाग, सेंट्रल ऑफिस, हार्वेस्टींग, बगीचा अशा विविध विभागातून कर्मचारी काम करतात. त्याचबरोबर कंत्राटी पध्दतीने कर्मचारी काम करतात आणि हजारो कर्मचारी ऊस तोडणी कामगार म्हणून काम करतात. अशा विविध माध्यमातून हजारो लोकांचा रोजी रोटीचा प्रश्न सहकारी साखर कारखान्यामुळे सुटल्याचा दिसून येतो हे सर्व होत असताना उद्योग उभा करणारे व्यक्तीचे योगदान हे प्रामुख्याने लक्षात येते.

**दुय्यम उत्पादने :**

मळी, बगॅस, स्पिरीट, अल्कोहोल, फ्युयल ऑईल, कंपोस्ट खत, राख, शेण, चिपाड/ उष्टावळ (ऊस उत्पादकाचे वाढे दूध उत्पादकाला उपयोगी ठरते.) वाढे (वाढेपासून बैलगाडीवाल्यास जादा पैसे मिळतात)

'१०० टन ऊस गाळप केल्यास त्यापासून अंदाजे २८ ते ३० टन चिपाड/भुस्सा, ४ टन मळी, ३ टन गाळलेली राड, ०.३ टन राख बाहेर पडते व यामधून दुय्यम उत्पादन करुन साखर कारखान्याची उत्पादकता सुधारते व साखर उत्पादन खर्च कमी होतो.'[३१]

यावरही अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. शेतीला खत उपलब्ध होते. क्षारयुक्त जमिनीत मळी वापरुन क्षार कमी करता येतात व जमिनीचा पोत सुधारता येतो. एकूणच शेतकऱ्यांच्या सभासदांच्या हिताच्या दृष्टीने मदत झाल्याचे दिसून येते.

**साखर धंद्याचे संकट :-**

साखर धंदा हा संकटग्रस्त व्यवसाय आहे. ऊस तोडणी व्यवस्थापन, ऊस अत्याधुनिक जाती, त्यांची लागवड न होणे, खुले आर्थिक धोरण, साखर आयात. कामगारांचे वाढलेले पगार, कामगार कायदे, साखर उतारा कमी, हेक्टर ऊस उत्पादन कमी, अनुभवी संचालक मंडळ, साखर उद्योगातील जुनाट यंत्र सामग्री, धोरणकर्ते, शेतकरी सभासद यांचा आडमुठेपणा, कर्ज, व्याज आणि या सर्व गोष्टींबरोबर नैसर्गिक आपत्ती या सर्व संकटातून कारखाना चालविणे व हजारो लोकांची जीवनरेखा म्हणून सुरक्षित ठेवणे ही अवघड गोष्ट आहे. परंतु तरीही नेत्यांनी हे कार्य तत्परतेने पार पाडले.

प्रसिध्दीपासून सातत्याने दूर असणारे, कामाचा प्रचंड आवाका, अखंड कामाची धडपड, चिकाटी, काटकसर, कोणत्याही गोष्टीचा डामडोल नाही, खोटी प्रतिष्ठा नाही, अशा प्रकारचे असणारे व्यक्तिमत्त्वे अथक प्रयत्नातून उभी केलेली चळवळ त्यामुळे तालुक्यांचा झालेला विकास सामाजिक प्रगती हे आज संपूर्ण तालुका, जिल्हा अनुभवतोय. मोठया कौशल्याने सहकारी साखर कारखाना उभा केला. त्याचा अफाट विस्तार आज झालेला दिसतोय. त्याच्या माध्यमातून आज हजारो प्रपंच आपले जीवन सुखाने आनंदाने व्यतीत करीत आहेत. सहकार क्षेत्रातील गाढे अभ्यासक, तांत्रिक ज्ञानाची सखोल माहिती भविष्याची वेध घेण्याची दूरदृष्टी, महत्त्वकांक्षा यामुळे अवघ्या सहकार क्षेत्रात अहमदनगर जिल्हयात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एक आगळे वेगळे वलय दक्षिणेतील नेत्यांचे तयार झालेले आहे.

"सहकार क्षेत्रातील नेत्यांच्या कौशल्याची खरी ओळख झाली ती कारखान्याच्या कामासंदर्भात, कारखानदारी हा दक्षिणेतील नेत्यांचा पिंडबनला असून तो त्यांच्या जीवनाचाच एक भाग झालेला आहे.

दक्षिणेतील नेते महाराष्ट्रातील साखर कारखानदारीतील एक अभ्यासू व्यक्तिमत्त्वे आहेत. कामाची चिकाटी, सचोटी, निःस्वार्थता, प्रामाणिकपणा, स्पष्टोक्तपणा. तांत्रिक अभ्यासूवृत्ती या गुणवैशिष्टयांमुळेच यशस्वी ठरले. कै. वसंतदादा पाटील, शंकरराव कोल्हे, भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय व सहकारी तत्त्वाचे धडे नेत्यांनी घेतले. त्यांच्या विचारांपासून आणि आदर्शापासून दूर गेले नाहीत. शैक्षणिक संस्थांचा विकास राजकारण आणि समाजकारण करताना त्यांनी इतरांच्या प्रपंचाचा विचार केला. गोरगरीब, दुबळया जनतेचे, शेतकरी, शेतमजूर, कामगार, बेरोजगार यांचे प्रपंच उभे केले. तालुक्यात रस्ते, पाणी, वीज, शिक्षणसंस्था, आरोग्य इ. समाजोपयोगी कामे केली.

वज्रा दवी कठोरानी मृदुनी ।।
कुसुमादीप लोकोत्तराणां ।।
चेतांसी कोहि विज्ञानतुमर्हसी ।।

अशी महापुरुषांची महानता समजावणारी एक श्रध्दा आहे. वज्राहूनही आणि मेणाहूनही मऊ असे व्यक्तिमत्त्व, फणसासारखे वरवर काटेरी परंतु आतून मृदू, मधुर, स्वार्थी सत्तेसाठी तत्त्वांशी कधीही तडजोड न करणारे, चारित्र्यसंपन्न असे हे तालुक्यातील आग्रणी नेतृत्व आहे.

### ३.४ तालुका सहकारी दूध उत्पादक संघ व संस्था :-

'दूध हे पूर्णान्न होय. त्यात पाणी, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, प्रथिने, जीवनसत्त्वे यांसारखे गुणधर्म असतात. वैदिक काळापासून हिंदुस्थानमध्ये दूधावर प्रक्रिया करण्याची कला ज्ञात होती. जगातील सर्व देशांत दुग्ध व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. अमेरिका, इस्त्रायल, डेन्मार्क, जपान, फ्रान्स, हॉलंड हे दुग्ध व्यवसायात अग्रेसर असणारे देश आहेत. तरी दुग्ध उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक आहे. भारतातील ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शाकाहारी आहे, त्यामुळे आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील दुग्ध व्यवसायाचा विकास वेगाने झाला. खाजगी क्षेत्र, सहकारी क्षेत्र, सरकारी क्षेत्रात हा व्यवसाय सुरु असून देशात नियोजनबध्द पध्दतीने दूधाचे उत्पादन, प्रक्रिया, देशांतर्गत व

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दूधाची विक्री व्यवस्था यामध्ये अमूलाग्र सुधारणा घडून आली असून देशात दूधाचा महापूर योजना राबविण्यात आली आहे. त्यामुळे देशात 'धवल क्रांती' (White Revolution) घडून आले आहे.'[३२]

'भारतात पारंपरिक पध्दतीने दूध उत्पादन केले जात असे. नियोजनकाळात सरकारने प्रयत्न करुन १९५०-५१ ते २००८-०९ या काळात लक्षणीय वाढ केली आहे. १९९० ते ९१ देशातील दूध उत्पादन ५३.९० दशलक्ष टन होते. २००० ते २००१ मध्ये ८०.६० दशलक्ष टन इतके विक्रमी झाले. भारत सरकारने दूध उत्पादन वाढावे यासाठी व्यापक स्वरुपात 'डेअरी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' १९७१ ते १९९६ या काळात कार्यान्वित केला. तो कार्यक्रम 'दूधाचा महापूर योजना' म्हणून लोकप्रिय झाला. ग्रामीण भागातील दुग्ध उत्पादनात विक्रमी वाढ झाली. याचा उल्लेख 'धवल क्रांती' असा केला जातो. हा कार्यक्रम तीन टप्प्यांत राबविण्यात आला. पहिला टप्पा १९७१ ते १९८१, दुसरा टप्पा १९८१ ते १९८५ आणि तिसरा टप्पा १९८७ ते १९९६ या कार्यक्रमात शहरी भागात दूध शीतकरण केंद्रे सुरु करण्यात आले. सहकारी दूध योजना केंद्र सुरु करण्यात आली. १९९० नंतर देशात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण अवलंब करण्यात आला आणि १९९९ मध्ये दुग्ध व्यवसाय परवानामुक्त करण्यात आला. त्यातुन दूध व्यवसायाला अधिक चालना मिळाली'[३३]

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकत असतानाच शेतीसाठी काहीतरी जोडधंदा मिळावा, यासाठी नेत्यांची कायम तळमळ असे. त्यातुनच शेतकरी कुटुंबामध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण व्हावे, यासाठी दुग्ध व्यवसाय उपयुक्त आणि पूरक ठरु शकेल असा विश्वास नेत्यांना वाटत असे. दूध धंदा शेतीस खऱ्या अर्थाने पूरक ठरावा. याबाबत तालुका पातळीवर नियोजन करण्यास सुरुवात केली, त्यादृष्टीने पावले उचलली.

महाराष्ट्र राज्याच्या विकासात साखर धंद्यानंतर दूध धंद्याचा दुसरा क्रमांक लागतो. अशा परिस्थितीत तालुक्यातील बहुतांशी शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार यांच्याकरिता जिल्हा दूध संघाच्या सहकार्याने प्रत्येक गावात दूध संस्था स्थापन करुन दूधवाढीसाठी प्रयत्न केले. त्यांचा प्रयत्नाला यश यायला सुरुवात झाली. मात्र तालुकयामध्ये चिलिंग सेंटर नसल्यामुळे तालुक्यातील दूध नगर येथील शासकीय दूध योजना येथे पाठवावे लागे. आंतर जास्त असल्यामुळे दूध खराब होणे, घट यांचे प्रमाण जास्त असे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करुन दूध संघ उभा केला. सुरुवातीला शीतरकण केंद्र येथील संकलन कमी होते. परंतु जिल्हा संघाचे मुख्य

कार्यालय जिल्हयाच्या ठिकाणी असल्यामुळे दूध उत्पादक संस्था प्रतिनिधींना वारंवार जिल्हयाच्या ठिकाणी जावे लागत असे. त्यात अनेक अडचणी येत असत. नेते मंडळी अडचणी सोडवत. कमी पडणाऱ्या पावसामुळे दक्षिणेत दूध धंदा हा प्रमुख धंदा शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन बनले. शीतकरण केंद्राची उभारणी केल्यानंतर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कृत्रिम रेतन कार्यक्रम राबवून संकरित जातीची गो-पैदास, गाव पातळीवरील दूध संस्थेची स्थापना असे विविध कार्यक्रम हाती घेतल्यामुळे दूध धंदा मूळ धरु लागला. त्यातूनच स्वतंत्र तालुका संघाची कल्पना मनात आली. त्यादृष्टीने सतत प्रयत्न करीत तालुका संघाच्या निर्मितीसाठी नेत्यांनी प्रस्ताव तयार केले. तालुक्यातील दूध उत्पादक संस्था, शासकीय अधिकारी यांच्या सहकार्यामुळे दूध संघाची स्थापना झाली. त्यानंतर तालुक्यातील दूध सतत वाढत होते व महाराष्ट्रात सुध्दा दूध वाढले असल्यामुळे दूध वितरणासाठी अनेक अडचणी येत होत्या. दूध वितरणाअभावी गरीब दूध उत्पादकांचे नुकसान होऊ नये म्हणून नेत्यांनी दिवसरात्र प्रयत्न केले. दूध वितरणाचा प्रश्न मार्गी लावला.

तालुक्यातील दूध सतत वाढत असल्यामुळे व शीतकरण केंद्रात दूध संकलन करण्यासाठी अनेक अडचणी येत. भावी काळाची गरज ओळखून संघाच्या मशिनरीच्या विस्तारीकरणाचा निर्णय हाती घेतला. त्यानंतर उन्हाळयाचे दिवस सुरु झाले. ग्रामीण भागात महाराष्ट्र विद्युत मंडळाकडून होणारे विद्युत भारनियमन तसेच अचानक खंडित होणारा विद्युत पुरवठा यामुळे दूधाचे नुकसान होऊ नये म्हणून तसेच भावी काळाची गरज ओळखून जनरेटर खरेदी केले. मशिनरी विस्तारीकरण व संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक पध्दतीमुळे संघाची बरीच आर्थिक मदत झाली. संघ स्थापन झाल्यानंतर पहिल्याच वर्षात गोरगरीब दूध उत्पादकांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणून संघाला पुरविलेल्या दूधावर प्रतिलिटर २० पैशांप्रमाणे अतिरिक्त भाववाढ रोख स्वरुपात दिली. दूध पेमेंटसाठी येणाऱ्या अडचणींबाबत लक्ष घालून शासकीय अधिकाऱ्यांशी त्याबाबत चर्चा करुन दूध पेमेंट वेळेवर मिळावे यासाठी नेतेमंडळी मुंबईला जाऊन तत्कालीन दुग्ध विकास मंत्री यांच्याबरोबर चर्चा करुन दूध पेमेंट मिळण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. त्यामुळे जिल्हयातील तालुका संघांचे पेमेंट वेळेवर होऊ लागले. तालुका दूध संघाने भावी काळाची गरज ओळखून अहमदनगर जिल्हयात ऑनलाईन कॉम्प्युटर सिस्टिमद्वारे दूध संकलन करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

दुष्काळी परिस्थितीमुळे पृष्ठ.काळात दूध दामामध्ये जो एक रुपया कमी होतो तो कमी होऊ नये यासाठी जिल्हयाचे नेतृत्व करीत यशवंतराव गडाख, बाळासाहेब थोरात, दादा पाटील शेळके

यांच्या सहकार्याने मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना दूध उत्पादकांचे प्रश्न समजून सांगितले व त्यांनी सुध्दा दुष्काळी परिस्थितीमुळे पृष्ठ. काळात एक रुपया कमी न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे दूध उत्पादकांना जिल्हयातील नेत्यांच्या प्रयत्नामुळे न्याय मिळाला. दूरदृष्टी, तसेच भावी काळाच्या गरजा ओळखणारे नेतृत्व तालुक्याला लाभल्यामुळे तसेच तालुक्यातील दूध उत्पादक संस्था यांनी केलेल्या प्रयत्नामुळे तालुका दूध संघाची भावी काळात भरभराट होत आहे.

तालुका दूध संघ होमोनायझर प्लँट तयार करुन दूध पिशवी, दूधाचे उपपदार्थ तयार करणे, तालुक्यात विविध ठिकाणी मिनी चिलींग सेंटर, तालुक्यातील दूध उत्पादकांना दूध धंद्याविषयी माहितीसाठी दूध धंद्यातील मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मेळावे आयोजित करत व विविध योजना राबविते.

एकविसाव्या शतकातील भारत देशाचा विचार केल्यास जागतिकीकरणामुळे भारतीय दुग्धजन्य पदार्थ देशाबाहेरील बाजारपेठामध्ये विकण्याची संधी प्राप्त झाली असली तरी इतर देशामध्ये उत्पादित होणारे दुग्धजन्य पदार्थ देशातील बाजार पेठेमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतात. याचा परिणाम देशांतर्गत असलेल्या दुग्ध व्यवसायावर होणार आहे. महाराष्ट्रातील बहुतेक सहकारी संस्थेची दुग्ध विक्री मुंबई येथे होत असते. मुंबई ही दूध विक्रीसाठी मोठी बाजारपेठ आहे. परंतु इतर दुग्ध विक्री करणारे मोठे उद्योजक तसेच बाहेरील देशातील दूध मुंबई मध्ये येऊ लागल्यामुळे दूध विक्रीवर त्याचा परिणाम होणार आहे. भारतीय अर्थव्यवस्था झपाटयाने शहरीकरणाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अशा परिस्थितीमध्ये दूध उत्पादक शेतकरी यांनी नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन त्यात कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त उत्पादन मिळेल याचा अभ्यास करुन शेती व्यवसाय केला पाहिजे. दूध व्यवसायामध्ये तरुणांनी उतरुन दुग्ध संस्था आधुनिक पध्दतीने केली पाहिजे. जागतिकीकरणामुळे बाहेरील दुग्धजन्य पदार्थ यांची गुणवत्ता यांचा अभ्यास करुन त्यापेक्षा जास्त गुणवत्ता उत्पादकांना मिळेल याप्रमाणे नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन दूध उत्पादन केले पाहिजे. परिणामी ग्रामीण भागाचा दुग्ध उत्पादकांचा विकास होईल.

नैसर्गिक आपत्तीमुळे दुष्काळ, जादा पावसामुळे महाराष्ट्राचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. त्यामध्ये दुग्धजन्य व्यवसायावर त्याचा मोठा परिणाम झाला. महाराष्ट्रामध्ये सहकारी दूध संस्थेप्रमाणे खाजगी दूध विक्रेते मोठया प्रमाणावर दूध धंद्यामध्ये उतरतात. त्यावर शासनाचे कोणतेही बंधन नसल्यामुळे दूध धंद्यामध्ये गुणवत्तेची स्पर्धा न होता नगाची स्पर्धा झाली. परिणामी दूध

उत्पादकांमध्ये गुणवत्तेचे महत्त्व, गुणवत्ता वाढीमध्ये सहकारी संस्था करीत असलले प्रयत्न यामध्ये अडचण निर्माण झाली. याचा परिणाम महाराष्ट्रातील सहकारी दूध धंद्यातील संकलनावर मोठया प्रमाणात झाला. बाहेरील दूध विक्रेते यांनी मुंबई व इतर मोठया शहरातील बसवलेला जम पाहता ग्रामीण भागातील दुग्ध संस्था अडचणीमध्ये येऊ शकते. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तरुण पिढीने दुग्ध व्यवसायामध्ये उतरुन आधुनिक पध्दतीने सहकारी संस्थेच्या मदतीने दूध धंदा करावा. ग्रामीण भागाचा विकास फक्त सहकारी संस्थांमधून होऊ शकतो. त्यामुळे सहकारी संस्थेचे ब्रीद वाक्य "विना सहकार नाही उध्दार" असे आहे ते खरे ठरते.[३४]

**संस्थेची स्थापना व उद्देश :-**

तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेकार यांना एक जोडव्यवसाय प्राप्त करुन देण्यासाठी तसेच तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील दूध शासकीय दूध योजना नसल्यामुळे तालुक्यांबाहेर जात होते. सदर शीतकरण केंद्र वाहतूक करण्याचे अंतर जास्त असल्यामुळे दूधाची घट, नाश पावण्याचे प्रमाण वाढलेले होते. त्याचबरोबर खाजगी दूध डेअरी, मालकांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी तालुक्यातील दूध उत्पादकांचे नुकसान कमी होण्यासाठी दूध उत्पादनाच्या सोईसाठी तालुक्यातील नेत्यांच्या प्रयत्नाने तालुका सहकारी दूध उत्पादक संघास दूध संकलन करण्यासाठी शासनाची परवानगी मिळाली.

**ऑनलाईन कॉम्प्युटरद्वारे दूध संकलन :-**

संघाने ऑनलाईन कॉम्प्युटरद्वारे दूध संकलन करण्याचे काम सुरु केले आहे. दूध पुरवठयाची गुणप्रत सह रकमेची पावती दूध उत्पादक संस्थांना दैनंदिन दिली जाते. तालुक्यातील जास्तीत जास्त संस्थांनी आपल्या दूध संस्थेवर कॉम्प्युटर बसवुन त्याद्वारे दूध संकलन करणे काळाची गरज आहे असे सांगितले जाते. संघाची प्रयोगशाळा आधुनिक पध्दतीने अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**कृत्रीम रेतन विक्री :-**

तालुक्यात चांगल्या प्रतीचे दुभत्या जनावरांची निर्मिती होण्यासाठी संघाला बायफ संशोधन केंद्र उरुळी कांचन या संस्थेचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे. तालुक्यातील दूध उत्पादकांना मार्गदर्शन मिळावे म्हणून गावपातळीवर मार्गदर्शन व प्रशिक्षण मेळावे आयोजित केले. संस्थेच्या

मदतीने कृत्रिम रेतन डोस विक्री केली असून दूध उत्पादकांकडून तसेच खाजगी डॉक्टरांकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय चांगला आहे.

भविष्यामध्ये कृत्रिम रेतन विक्री बरोबर पशु वैद्यकीय औषध त्या अनुषंगाने येणारे साहित्य "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर विक्री करण्याचा संघाचा विचार आहे. कृत्रिम रेतन विक्री या सेवेस शासकीय पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती, यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. तसेच कृत्रिम रेतन विक्री सेवा दूध उत्पादकापर्यंत पोहोचविण्यासाठी डॉक्टरांनी भरपूर सहकार्य केले.

**संगणकीकरण व इलेक्ट्रॉनिक्स :-**

दूध संघाने संगणकीकरण व इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. संघाच्या बहुतांशी प्राथमिक दूध संस्था यांच्याकडे इलेक्ट्रॉनिक्स मिल्कोटेस्टर असून त्याद्वारे गुणप्रत चेक करुन ते दूध संकलन करीत आहे. तसेच बऱ्याच संस्थांकडे गुणप्रत तपासणीसाठी इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा लघु संगणक बसविलेले आहेत. तसेच काही संस्था संपूर्ण कामकाजासाठी संगणक प्रणालीचा यशस्वीरीत्या वापर करत आहेत. संस्थेकडे असणाऱ्या विविध इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा व संगणकाची देखभाल व दुरुस्तीसाठी दूध संघात इलेक्ट्रॉनिक विभाग करण्याचा संघांचा विचार असून भविष्यात सर्व प्राथमिक दूध संस्थेचे संगणकीकरण करुन कामकाजात अधिक जलदपणा, बिनचुकता, पारदर्शकता आणणार आहे. संघाचे कार्यालयीन कामकाज संगणकामार्फत केले जात असून दुग्ध शाळेमध्ये दूध स्वीकृतीबाबतचे ॲटोमायजेशन व संगणकीकरण केलेले आहे.

**दूध व दूधापासून तयार केलेले उपपदार्थ :-**

दूध संघामार्फत दैनंदिन संकलन केले जात असून ते सर्व शासनास वितरण केले जाते. भविष्यात महाराष्ट्र शासन दूध धंद्याचे धोरण बदलत चालले आहे. अशा वेळी खाजगी डेअऱ्यांबरोबर स्पर्धा करीत सहकारी दूध संस्था टिकाव्यात व दूध उत्पादकांना त्यांच्या दूधाला जास्तीत जास्त भाव मिळावा म्हणून संघान संकलित केलेल्या दूधावर प्रक्रिया करुन त्यापासून दूध पिशवी व उपपदार्थ निर्मिती करावी लागणार आहे. सहकारी संस्था टिकण्यासाठी सध्याच्या आर्थिक धोरणात संघाला अधिक बळकटपणा येणे आवश्यक आहे. दूध उत्पादक संस्थांनी व सभासदांनी स्पर्धात्मक युगामध्ये दूध उत्पादक संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन दूध संकलन केले पाहिजे.

**कॅन :-**

जिल्हा दूध संघाकडून तालुका संघाकडे फायबर व ॲल्युमिनिअम कॅन आले आहे. संघाने नवीन फायबर कॅन खरेदी करुन दूध संस्थांना कॅन पुरविले आहे. कॅन योग्य रीतीने हाताळण्याची व स्वच्छतेची दक्षता घेण्याबाबत सुचना केली. त्यामुळे नैसर्गिकरीत्या दूध नाश होण्याचे प्रमाण कमी होवून दूधाचे संकलनात वाढ होईल.

**दूध वाहतूक :-**

संघाचे शीतकरण केंद्र येथे दैनंदिन दूध संकलन करण्यासाठी प्राथमिक दूध संस्थांनी संकलन करुन दूध पोहोच करण्याकरिता एकूण मार्गवर अंतर्गत दूध वाहतूक स्वतंत्र वाहनातून केली जात आहे. तसेच संघाने दैनंदिन दूध संकलन केलेले दूध बहिर्गत दूध वाहतूक मुंबई येथे महानंदा डेअरी, गोरेगाव, वरळी, कुर्ला, आरे येथे टँकरने पाठविले जात आहे.

सध्या तरी संघाच्या उत्पन्नाचे साधन दूध वितरणातून कमिशन हे होय. दूध विक्रीतून मिळणारे कमिशन व त्या अनुषंगाने वाढत्या महागाईनुसार वेळोवेळी होणाऱ्या खर्चात काटकसर करुन त्याचा मेळ संचालक मंडळाने घातला आहे.[३५]

तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे शीतकरण केंद्रे प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. संघाने दूध उत्पादकांकरिता सहकार प्रशिक्षण आयोजित केले होते. सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई, महाराष्ट्र राज्य यांची संघास भेट व मार्गदर्शन तसेच जे.पी. डांगे साहेब, प्रधान सचिव दुग्ध विकास, मुंबई महाराष्ट्र राज्य यांनी दूध शीतकरण केंद्राची पाहणी केली. तालुक्याचा दुरदृष्टी विचार करुन राजकारणाचे जोडे वेळोवेळी बाजूला ठेवले व सामाजिक कार्य करत असताना साखर उद्योग, दूध उद्योग यातुन तालुक्याचा विकास करण्याच्या दृष्टीने आज नेतेमंडळींचे तडफेने काम चालू ठेवल्याचे दिसते आहे व यातुनच सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास घडवत आले आहेत. परंतु तरी सुध्दा अहमदनगर जिल्हयात आणि जिल्हयाचे दक्षिण भागात सामाजिक, शैक्षणिक प्रगती होऊन सुध्दा सामाजिक अन्याय अत्याचाराच्या घटना १९९० ते २००० या काळात घडल्याच्या दिसून येतात.

**३.५ सामाजिक अन्याय व अत्याचार :-**

अहमदनगर जिल्हयात दलित अत्याचाराच्या घटना अधून-मधून घडत असतात. दलित अत्याचाराबाबत अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रात अग्रेसर ठरला आहे. जास्तीत जास्त अत्याचार हे अहमदनगर जिल्हयात घडत आहेत. १९९० ते २००० दलित अत्याचाराच्या घटना घडल्या.

सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार, जनअंदोलन, वृक्षारोपन, शैक्षणिक कार्य, व्यसनमुक्ती, पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम याबद्दल कार्य केले परंतू कधी दलित अन्यायाविरोधात आंदोलन छेडल्याचे वाचण्यात किंवा पाहण्यात आले नाही. अशा अत्याचाराविरोधात अण्णांनी आंदोलन छेडले असते तर ते आज दलित समाजाचे मसिहा बनले असते. अहमदनगर जिल्हयात आणि जिल्हयाच्या दक्षिण भागात सामाजिक अन्याय अत्याचाराच्या घटनाही १९९० ते २००० या कालावधीत घडून आल्याच्या दिसतात. थेरवडी, ता. कर्जत येथील आमदार विठ्ठलराव भैलुमे (थेरवडी) यांच्यावर सवर्णांनी केलेला हल्ला होय. बैल पोळयाच्या सणाच्या वेळी थेरवडी येथे दंगल घडून आली होती. त्यामध्ये आमदार विठ्ठलराव भैलुमे यांना मारहाण करण्यात आली होती. दक्षिण नगर जिल्हयात महिलांवर अत्याचार झाल्याचे दिसून येते, अकोले तालुक्याचे आमदार मधुकर पिचड हे पाच वेळा निवडून आले. आदिवासी, मागास, उपेक्षितांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराविरोधात त्यांनी मोर्चे, आंदोलने केली आहेत. जात म्हणजे जी कधीही जात नाही ती जात समाजात अजूनही जात पात मानली जाते. जोपर्यंत समाजाची मानसिकता जातिविरोधात तयार होत नाही तोपर्यंत जातीची दरीही वाढत जाणार आणि याच गोष्टींचा फायदा नेते घेत असतात. यामुळे पुढारी वर्गाचा फायदा होतो. थोडक्यात, सामाजिक बदल होणे गरजेचे आहे. एक देव, एक राष्ट्र, एक धर्म, एक जात, निर्माण होणे गरजेचे आहे. माणूस ही जात आणि माणुसकी हा धर्म एवढयाच दोन गोष्टींचा समाजाने विचार केला पाहिजे.

फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्रात शरमेने मान खाली घालावी अशा घटना अहमदनगर जिल्हयात घडल्या शिंदा, थेरवडी, कर्जत तालुक्यात अत्याचाराच्या घटना घडून आल्याचे आपणास दिसून येते. सामाजिक अत्याचाराच्या घटनांचे गांभीर्य आणि विविध घटकांकडून होणारा दबाव याही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर एकूणच सामाजिक व राजकीय स्थरावर अभिसरणाची आवश्यकता आहे. एखादी घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी समाजातील सर्वच घटकांनी याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. याकरिता समाजाने जातीपातीच्या भिंती गाडून टाकण्याची गरज निर्माण झाली आहे. जातिभेदाच्या विद्वेषाने बुरसटलेल्या विचारांनी सगळे तारतम्य गुंडाळून ठेवले. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अशा घटनांनी अनेक नवीन प्रश्न

निर्माण झाले आहेत. त्याची उत्तरे राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि जनतेलाही शोधावी लागतील.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जातिव्यवस्था मानू नका असा प्रचार केला जात असला तरी समाजामध्ये जातीयतेचे विष पेरले जात आहे. तरी समाजाच्या विचाराने आणि मानसिकतेने प्रगल्भ झालेली जनता मात्र याला अपवाद आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्याकडे राजकारण, समाजकारणाचे जातीच्या आणि धर्माच्या नावाने ध्रुवीकरण सुरु आहे. दुर्दैवाने याला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पक्ष व समाजकंटकांकडून केले जात आहे. समाजामध्ये सत्ता आणि पैसा या दोन्ही गोष्टींमुळे विषमता निर्माण होत आहे. त्यामुळे समाज अराजकतेकडे जात आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर त्या घटनेच्या मुळाशी न जाता केवळ औपचारिकता म्हणून राजकीय पक्ष आणि नेते आपली जबाबदारी पार पाडताना दिसतात. निदान समाजासाठी आपण काहीतरी करतोय याचे त्यांना समाधान असते. पैशापलीकडे मानवी जीवनाची काही प्रतिष्ठा असते हे या राजकीय पक्षांना व नेत्यांना कधी उमगणार हा खरा प्रश्न आहे. पोलिसांचीही यामध्ये फार मोठी जबाबदारी आहे. बऱ्याच वेळा अशा घटनांची कुणकुण पोलिसांपर्यंत पोहोचलेली असते. मात्र पोलीस त्याकडे दुर्लक्ष करतात. त्याला जातीय विषमतेबरोबर आर्थिक विषमात हे कारण आहे. धनदांडगे तसेच राजकीय दबाव यामुळेही वेळेवर कारवाई न करण्यामुळे अशा प्रकरणामध्ये नाहक निष्पाप जिवांचे बळी गेल्याच्या घटना नवीन नाहीत.

अशा घटना घडू नयेत, यासाठी समाजातील सर्वच घटकांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मानवाधिकार संघटना, इतर सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी पुढाकार घेऊन समाजप्रबोधनाचे काम हाती घ्यायला हवे. समाजव्यवस्थेतही सातत्याने हस्तक्षेप करण्याशिवाय पर्याय नाही. मानवतेला काळिमा फासणारी ही मानसिकता दूर करणे काळाजी गरज आहे. मतभेदाच्या भिंती दूर करणे व भेदाभेद न पाळणे हाच यावर उपाय आहे. मानव हीच जात आणि माणुसकी हाच धर्म हा विचार जनमाणसात रुजत नाही तोपर्यंत सामाजिक परिवर्तन होणे कठीण आहे. त्याकरिता शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेची गरज आहे. अहमदनगर जिल्हा प्रगती पथावर आहे. परंतु अन्याय अत्याचाराबाबतही पुढे आहे.

जे का रंजले गांजले ।

तयासि जो म्हणजे अपुले ।

देव तेथेची जाणावा ।

तोचि साधू ओळखावा ।।

या अर्थाचा श्लोक जोपर्यत तळागळात पोहोचत नाही तोपर्यंत सामाजिक बांधिलकी व समाज परिवर्तन होणे शक्य नाही. लोकांची मानसिकता याकरिता बदलणे गरजेचे आहे.

## अहमदनगर जिल्हयातील १९९० ते २००० या काळात घडलेल्या सामाजिक अन्याय अत्याचारांच्या घटनांची सांख्यिकीय माहिती

| गुन्हे | स्त्री/पुरुष | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ९३-९४ | ९४-९५ | ९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रेल्वे अधिनियम | पुरुष | १४ | १२० | ४६० | ३०६ | २३१ | ३१७ | १२५ | १३८ | २० | ५८ |
| | स्त्रिया | २ | - | - | - | - | २ | ० | ० | - | ० |
| | एकूण | १६ | १२० | ४६० | ३०६ | २३१ | ३१९ | १२५ | १३८ | २० | ५८ |
| मुंबई पोलिस अधिनियम | पुरुष | ७० | ५५ | ६० | - | - | ६४ | ४५ | ६८१ | ३६ | ८० |
| | स्त्रिया | ४ | - | - | ५५ | २४ | १ | ७ | ० | ५ | ० |
| | एकूण | ७४ | ५५ | ६० | | | ६५ | ५२ | ६८१ | ४१ | ८० |
| मुंबई दारुबंदी अधिनियम | पुरुष | ६२ | १९ | ३७ | ३४ | ६ | ४९ | २७ | ५४ | २६ | ५७ |
| | स्त्रिया | ४ | १ | १ | १ | - | ० | २ | ० | २ | ० |
| | एकूण | ६६ | २० | ३८ | ३५ | ६ | ४९ | २९ | ५४ | २८ | ५७ |
| क्रिमीनल प्रोसीजर कोड अधिनियम | पुरुष | - | ३१ | ३० | ४३ | ३० | ८० | १०६ | ३८४ | ६० | ३४५ |
| | स्त्रिया | - | १ | - | - | - | ११ | ४ | २३ | २८ | ३ |
| | एकूण | - | ३२ | ३० | ४३ | ३० | ९१ | ११० | ४०७ | ८८ | ३४८ |
| घरफोडी आणि चोरी | पुरुष | ४८ | १९ | ६३ | ४९ | १७ | १८४ | १४५ | १५४ | ९६ | १९५ |
| | स्त्रिया | २ | - | २ | - | - | २ | ६ | ७ | १ | ९ |
| | एकूण | ५० | १९ | ६५ | ४९ | १७ | १८६ | १५१ | १६१ | ९७ | २०४ |
| खोटे दस्तऐवज व फसवणूक | पुरुष | ३ | १ | ३ | ५ | १ | १६ | १२ | २६ | १२ | ३६ |
| | स्त्रिया | २ | १ | - | - | - | १ | ० | ० | १ | १ |
| | एकूण | ३ | २ | ३ | ५ | १ | १ | १२ | २६ | १३ | ३७ |
| खून | पुरुष | ३२ | १७ | २२ | २१ | १२ | १३६ | १४१ | १३९ | १४० | १६५ |
| | स्त्रिया | २ | १ | २ | २ | १ | १४ | १५ | १२ | ६ | ७ |
| | एकूण | ३४ | १८ | २४ | २३ | १३ | १५० | १५६ | १५१ | १४६ | १७२ |
| डाके आणि दरोडे | पुरुष | ६ | ७ | २ | २ | १६ | ४६ | ८२ | ९२ | ६९ | ९५ |
| | स्त्रिया | ० | - | - | - | - | ० | ० | ० | ३ | ९ |
| | एकूण | ६ | ७ | २ | २ | १६ | ४६ | ८२ | ९२ | ७२ | १०४ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हल्ला व दुखापत करणे | पुरुष | १ | २० | ११ | ३५ | ९ | ९६ | ८८ | ८० | ४२ | १५६ |
| | स्त्रिया | ० | - | - | - | - | ६ | १३ | १ | ६ | ३ |
| | एकूण | १ | २० | ११ | ३५ | ९ | १०२ | १०१ | ८१ | ४८ | १५९ |
| फुस लावून पळविणे, बलात्कार | पुरुष | ३ | ८ | ५ | ७ | ८ | ३८ | ३६ | ४० | २४ | ५७ |
| | स्त्रिया | १ | १ | - | - | १ | ० | १ | ० | १ | ३ |
| | एकूण | ३ | ९ | ५ | ७ | ९ | ३८ | ३७ | ४० | २५ | ६० |
| लष्करी गुन्हे | पुरुष | ३० | ३ | २ | - | १ | १ | ० | ० | २० | ० |
| | स्त्रिया | ० | - | - | - | - | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ३० | ३ | २ | - | १ | १ | ० | ० | ० | ० |
| इतर | पुरुष | २७१ | ४० | ५९ | १४३ | ८२० | २८५ | १९५ | ८ | १५३ | २०५ |
| | स्त्रिया | १५ | २ | ४ | २ | ९२ | ३१ | २४ | ० | २१ | ४४ |
| | एकूण | २६८ | ४२ | ६३ | १४५ | ९१२ | ३१६ | २२९ | ८ | १७४ | २४९ |

**अहमदनगर जिल्हयातील १९९० ते २००० या काळात घडलेल्या सामाजिक अन्याय अत्याचारांच्या घटनासंख्या '**[३६]

,

**समारोप**

राजकीय कार्यारंभ आणि त्यातून साधलेला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय विकास, १९५२ साली महाराष्ट्रात महादुष्काळ पडला होता. शेतीधंदा आणि ग्रामीण जीवन कोलमडले होते. अशा स्थितीत नगर दक्षिणेत शेतकरी चळवळ उदयास आली आणि दक्षिणेतील अण्णा हजारे, शिवाजीराव नागवडे, अप्पासाहेब राजळे, दादापाटील शेळके, दगडूपाटील बडे, बबनराव ढाकणे, बापूसाहेब देशमुख अशा अनेक नेत्यांनी जिल्हयात आणि आपल्या तालुक्यात शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न इ. साठी लढा दिला.

अहमदनगरच्या जलदायिनी (नद्या) अडवून त्यावर धरण, बंधारे घालून पाटपाण्याचा प्रश्नाकरिता नेत्यांनी लढा दिला. घोड धरण, कुकडी प्रकल्प, हंगा सेतू, सीना प्रकल्प, भोसा खिंड इ. प्रकल्प मार्गी लावले यातून दक्षिणेतील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड तालुक्यातील काही भाग हा सिंचनाखाली आला. पाथर्डी तालुक्यातील वांबोरी चारीकरिता अप्पासाहेब राजळे, राजीव राजळे, बबनराव ढाकणे या नेत्यांनी लढा दिला. तसेच नगर तालुक्यात दादापाटील शेळके, बाळासाहेब नागवडे, बाळासाहेब हराळ यांनी प्रयत्न करुन तळे, बंधारे यांच्या माध्यमातून काही प्रमाणात क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न केला.

१९५२-५३ साली विसापूरला स.का. पाटलांनी पाणी परिषद घेतली व मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी तात्काळ घोडला मंजुरी दिली. १९५६ साली घोडचा जन्म झाला. पुढे १९७६ मध्ये कुकडीची व्याप्ती वाढविण्यात आली. १९७८ साली आठमाही कुकडीचा सरकारने निर्णय घेतला. हंगासेतू, सीना प्रकल्प, भोसाखिंड, विविध योजनांच्या माध्यमातून कोरडवाहू क्षेत्र ओलिताखाली आणण्यात यशस्वी ठरलेल्या नेत्यांनी पुढे आपल्या तालुक्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांची स्थापना करण्यास पुढाकार घेतला. नगरदक्षिणेतील पहिला सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना १९७३ साली सुरु झाला. हाच आदर्श समोर ठेवून दक्षिणेतील नेत्यांनी साखर कारखाने सुरु केले, परंतु ते यशस्वी झालेच असे नाही. बदलत्या निसर्ग चक्रामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य पारंपरिक शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सरकारचे ध्येय धोरणे यातून १९९० ते २००० या काळात काही साखर कारखाने बंद दिसून येतात. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर, ऊसतोड कामगार यांचे जीवनमान विस्कळीत बनले.

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रगतीचे पाऊल पुढे टाकत असताना शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, ग्रामीण महिला, तरुण यांचे जीवनमान सुधरावे ग्रामीण लोकांचा विकास या दृष्टीने दक्षिणेतील नेत्यांनी असणारी तळमळ दिसून येते ती म्हणजे त्यांनी शेतीसाठी जोडधंदा असावा म्हणून दुग्ध व्यवसायाला चालना दिल्याचे दिसून येते व याच माध्यमातून तालुका पातळीवर सहकारी दूध उत्पादक संघ स्थापन केले व त्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध सुविधा पुरविण्यात आल्या. परंतु १९९० नंतर देशात खाजगीकरण, जागतिकीकरण सुरु झाले आणि १९९९ नंतर दुग्ध व्यवसाय परवाना मुक्त करण्यात आला. त्यातून दुग्ध व्यवसायाला चालना मिळाली परंतु खाजगी दुग्ध व्यवसायिक वाढल्याचे मोठया प्रमाणात दिसून येते. त्यामुळे सहकारी संघ अडचणीत आले. राजकारण बाजूला ठेवून पक्षमतभेद बाजूला ठेवून प्रत्येक तालुक्यात आग्रभागी असणाऱ्या नेतृत्वांनी साखर उद्योग, दुग्ध उद्योग, शेती, यातून तालुक्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. परंतु १००% क्षेत्र ओलिताखाली न आल्यामुळे तसेच नैसर्गिक आपत्ती, वेगवेगळे जीवनप्रवाह यातून राजकीय नेत्यांनी केलेल्या प्रयत्नातून समाज विकासाला हातभार लागला, परंतु आजही काही तालुके पूर्णतः विकसित झालेले दिसत नाहीत. झालेल्या सामाजिक विकासातून आर्थिक सुबत्ता, जीवनमान यात बदल दिसून येतो.

सामाजिक विकासातून आर्थिक सुबत्ता, शैक्षणिक प्रगती झाल्याचे दिसून येते; परंतु तरी सुध्दा १९९० ते २००० या काळात दलित अन्याय, अत्याचार, समाजविघातक घटना यांचेही प्रमाण मोठया प्रमाणावर दिसून येते. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती होत असताना अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात समाज विघातक कृत घडल्याचे आपणास प्रकर्षाने दिसून येते या घटनाबाबत नेते सामाजिक कार्यकर्ते उदासीन असल्याचे दिसून येते. कारण यावर ठोस पावले उचलल्याचे दिसून येत नाही.

**तळटीपा**

१) अर्जुनराव दर्शनकार, *"पंचायत राज आणि नागरी प्रशासन"*, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, १९९२, पृष्ठ. ३५.

२) कित्ता; पृष्ठ. ३५, ३६.

३) अण्णा हजारे, *"माझे गाव माझे तीर्थ"* स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशक, राळेगणसिध्दी, पारनेर, तृतीय आवृत्ती, जानेवारी २०११, पृष्ठ. - १३९.

४) आर.एम.कुरुमकर, *"मा.आ. शिवाजीराव नागवडे यांचे श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विकासातील योगदान",* टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, सादर केलेला लघुशोध प्रबंध (अप्रकाशित) एम.फिल. २००९, पृष्ठ. ८८.

५) कित्ता; पृष्ठ. ८८.

६) कित्ता; पृष्ठ. ८८, ८९.

७) कित्ता; पृष्ठ. ८८.

८) न.चि. केळकर, *"लो. बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र"*, पुर्वार्ध खंड २ रा, पुणे १९२३, पृष्ठ. ८९.

९) य.ना. कदम, *"संमग्र भारताचा इतिहास"*, फडके प्रकाशन, कोल्हापुर, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००३, पृष्ठ. ८९.

१०) विजय कविमंडन, *"कृषी आणि ग्रामीण अर्थशास्त्र"*, मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०१२, पृष्ठ. - ९९.

११) कित्ता; पृष्ठ. - ११८.

१२) दै. सार्वमत, वसंतराव देशमुख (संपा.), अहमदनगर आवृत्ती, दि. ०२/१०/१९९७, पृष्ठ. ६.; आर.एम.कुरुमकर, उपरोक्त, पृष्ठ. ९१, ९२.

१३) www.ahmednagar.nic.in/gazetter/gen.geography, page - 5.; सु.ना.म्हस्के, *"नगर गौरव"*, रेखा सु. म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथमआवृत्ती, २००९, पृष्ठ. ३८.३९.

१४) शिवाजीराव नागवडे यांची मुलाखत. दि. १६/१०/२०१३.

१५) दै. गावकरी गौरव विशेषांक, अनिरुध्द देवचक्के (संपा.), नगर आवृत्ती, दि. ०२/०२/२००४, पृष्ठ. ६.

१६) दैनिक सकाळ, अनंत दिक्षित (संपा.), नगर आवृत्ती, दि. २४/०८/१९९८, पृष्ठ. ५.

१७) कित्ता; पृष्ठ. ८.

१८) ए.बी. सवदी, "<u>*द मेगा स्टेट महाराष्ट्र*</u>", निराली प्रकाशन, दहावी आवृत्ती २००७,पृष्ठ. १३.१२

१९) कित्ता; पृष्ठ. १३.१२

२०) कित्ता; पृष्ठ. - १३.१३

२१) दै. गावकरी विशेषांक, अनिरुध्द देवचक्के (संपा.), नगर आवृत्ती, दि. १९ फेब्रुवारी १९९९, पृष्ठ. ५.

२२) कित्ता; पृष्ठ. ६.

२३) शिवाजीराव नागवडे यांची मुलाखत, दि. १६/१०/२०१३.

२४) ए.बी. सवदी, <u>*"द मेगा स्टेट महाराष्ट्र",*</u> निराली प्रकाशन, पुणे, २००८, पृष्ठ. १३.३.

२५) कित्ता; पृष्ठ. १३.१९

२६) "<u>*जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा",*</u> अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० ते २०००, पृष्ठ. २२१, २२२.

२७) कित्ता; पृष्ठ. २२२.

२८) ए.बी. सवदी, उपरोक्त, पृष्ठ. १३.२०.

२९) शि.ना.नागवडे, (प्रकाशक), <u>*"दि श्रीगोंदा सह.साखर कारखाना वार्षिक अहवाल, श्रीगोंदा",*</u> १९९५, पृष्ठ. ५,७.

३०) लक्ष्मणशास्त्री जोशी, "<u>*मराठी विश्वकोश खंड -३"*</u>, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मंबई, पुर्नमुद्रण २०००, पृष्ठ. ७०५.

३१) ए.बी. सवदी, उपरोक्त, पृष्ठ. १३.३१.

३२) के.एम. भोसले, के.बी. काटे, बी.एच. दामजी, <u>*"कृषीव्यवसाय"*</u> फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००९, पृष्ठ. १३०.

३३) कित्ता; पृष्ठ. १३२, १३३.

३४) कार्यकारी संचालक, *"श्रीगोंदा तालुका सह. दुध उत्पादक संघ",* वार्षिक अहवाल, २००४-०५, पृष्ठ. ६,७. उपरोक्त, आर.एम. कुरुमकर, पृष्ठ. १२०, १२२.

३५) कार्यकारी संचालक, उपरोक्त, पृष्ठ, ९, ११.; आर.एम.कुरुमकर, उपरोक्त, पृष्ठ. १२३, १२५.

३६) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन",* अहमदनगर, उपरोक्त, ११९० ते २०००.

# प्रकरण - ४

# अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील आर्थिक स्थिती

## प्रकरण - ४

## अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील आर्थिक स्थिती

### आर्थिक इतिहास :-

'स्थूलमानाने गतकालातील अर्थव्यवस्थांचा अभ्यास म्हणजे आर्थिक इतिहास. निरनिराळया अर्थव्यवस्थांचा विकास, कुंठितता किंवा ऱ्हास, त्यांच्यामधील वेगवेगळया समूहांचे क्षेत्र आणि आर्थिक संघटना व कार्यसिध्दी यांमधील परस्परसंबंध इ. विषयांवर आर्थिक इतिहासकाराचे लक्ष केंद्रित झालेले असते. आर्थिक इतिहास लिहिताना सामाजिक व राजकीय घटनांकडेही दुर्लक्ष करुन चालत नाही. असे असले तरी, अर्थव्यवस्थेची उत्क्रांती, स्थिती व लय यांचे एकूण ऐतिहासिकरीत्या विश्लेषण, त्यांचे समाजातील विविध गटांच्या कल्याणावर होणारे परिणाम यांचाच प्रामुख्याने आर्थिक इतिहासात विचार केला जातो. आर्थिक इतिहासाचे क्षेत्र हे अर्थशास्त्राच्या क्षेत्राहून काहीसे भिन्न आहे. अर्थशास्त्र हे समाजाच्या चालू आर्थिक प्रश्नांचा ऊहापोह करते, तर आर्थिक इतिहास गतकालातील आर्थिक घटनांचे परिशीलन करतो.'[१] आर्थिक इतिहासाच्या व्याख्येवरुन अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील सहकारी संस्था, उद्योगधंदे, शेती व्यवसाय यावरुन दक्षिण भागातील आर्थिक स्थिती लक्षात येते.

### ४.१ सहकारी चळवळ / सहकारी संस्था :-

**प्रस्तावना**

'सहकार म्हणजे शांतीमय प्रचंड क्रांती'
सहकारी चळवळ ही लोकशाही मनोवृतती तयार
करण्याची शाळा ।।
सहकार ही ज्ञानप्रेरक शक्ती आहे. ।।
संस्थेच्या प्रमुखांची प्राज्ञता, त्यांच्या सहकारी
संचालकांची सूज्ञता, वर्गवारी सेवकांची तज्ज्ञता,
सभासदांची कृतज्ञता आणि जना जनार्दनाची
समयज्ञता हे सहकारी संस्थेचे पंचीकरण आहे.'[२]

सहकारी चळवळ ही प्रामुख्याने जनतेची चळवळ आहे. सामाजिक, आर्थिक, भूमिकेतून तिचे कार्य चालते. अर्थात, आजपर्यंतच्या कालखंडात सहकाराकडे पाहण्याची दृष्टी यात अनेक

परिवर्तने झालेली आढळतात. त्यामुळेच आजही सहकारी तत्त्वज्ञान, संघटन सजीव गतिशील राहू शकले आहे.

'सहकार म्हणजे मानवाच्या अधिकतम कल्याणाच्या दृष्टीने स्वावलंबन व पारस्पारिक मदतीच्या तत्त्वावर आधारलेली स्थिती की जेथे सभासद स्वेच्छेने आपल्या सर्वासामान्य उद्देशाच्या पूर्तीसाठी समतेच्या भावनेन एकत्र येतात'. सव्वाशे वर्षाहून अधिक काळ अस्तित्वात असलेल्या सहकारी चळवळीने जवळजवळ सर्व विश्व व्यापलेले आहे.

सहकाराचा उगम इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या उत्तरार्धात झाला असे मानले जात असले तरी मानवी सहकारी प्रवृत्ती, प्राचीन व मूलभूत आहे असे म्हणता येईल.

'मिल या विख्यात अर्थशास्त्रज्ञाने आपल्या प्रिन्सिपल्स् ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या ग्रंथात म्हटले आहे.

'सहकार हे एक उत्तम उद्दिष्ट आहे. परस्परविरोधी हितासाठी झगडणाऱ्या वर्गातील संघर्ष दूर करुन सर्वांच्या फायद्यासाठी स्नेहपूर्ण स्पर्धेची कास धरुन मानवी जीवनाला योग्य पुनराकार देण्याचा सहकार प्रयत्न करतो'[३].

वन्यावस्थेत राहणाऱ्या मानवापासून ते आजच्या आधुनिक समाजात राहणाऱ्या मानवापर्यंत दैनंदिन जीवनात पदोपदी संघर्षासमान किंबहुना अधिकच सहकाराचा परिस्थितीजन्य गरजेपोटी तीव्रतेने प्रत्यय येतो.

१८४४ मध्ये इंग्लंडमध्ये रॉश्डेल येथे सर्वसामान्य कष्टकरी विणकरांनी जीवनावश्यक वस्तू स्वस्त व रास्त दरात मिळाव्यात म्हणून ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली व अत्यंत अल्प नफा ठेवून विविध गरजेच्या वस्तू विकण्यास सुरुवात केली. सहकारी संस्थांच्या इतिहासातील ही आद्यसंस्था म्हणता येईल. सहकाराची नवी दृष्टी प्राप्त झालेल्या सर्वसामान्य व्यक्तींनी आपली प्रत्येक अडचण सोडविण्यासाठी व गरज भागविण्यासाठी विविध स्वरुपांच्या सहकारी संस्था स्थापन केल्या त्यातूनच सहकारी संस्थांचे व सहकारी क्षेत्राचे साम्राज्य उभे राहिले. औद्योगिक क्रांतीचे जे काही फायदे समाजाला झाले त्यापैकी सहकारी चळवळीचा उगम हे औद्योगिक क्रांतीचे मिळालेले वरदानच आहे.

'विना सहकार नाही उध्दार' व 'एकमेकां साहाय्य करु अवघे धरु सुपंथ' ही वाक्ये आपल्याला परिचित आहेत. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीसही सामान्य जीवन जगता यावे, ही सहकाराची

प्रमुख भूमिका आहे. एक काठी पटकन तुटते, पणे अनेक काठया एकत्र केल्या तर प्रत्येक काठीचीच ताकद वाढते, या न्यायाने एक व्यक्ती वैयक्तिकरीत्या दुर्बल असेल, त्या व्यक्तीमध्ये अनेक त्रुटी किंवा कमतरता असतील, भांडवल नसेल, काही कौशल्ये अथवा गुण नसतील, म्हणून ती व्यक्ती समाजातला दुर्बल घटक असेल, पण जेव्हा समान उद्दिष्टाने प्रेरित होऊन अनेक दुर्बल व्यक्ती संघटित होतात व एखादे कार्य करण्यास प्रेरित होतात तेव्हा त्यांचे सामर्थ्य अपराजित असते. एकमेकांच्या गुणांनी, सक्षमतेने दुर्बलतेवर मात केली जाते व सहकार्याच्या भावनेने काम पूर्ण होते. समान उद्दिष्टाने संघटित झालेल्या या व्यक्तींमध्ये उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव नसतो. प्रत्येक व्यक्तीला सन्माननीय वागणूक दिली जाते. सहकारी संस्थेत कोणीही मालक नसतो व कोणीही नोकर नसतो. सर्वजण संस्थेचे सभासद असतात. लोकशाही मार्गाने सर्व निर्णय घेतले जातात व निर्णयाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व सभासद एकमेकांना जबाबदार असतात. सामूहिक जबाबदारीची जाणीव जोपासली जाते. सहकारी संस्था आपल्या कामकाजावर मर्यादित नफा मिळवतात. नफ्यापेक्षा सेवा व सभासदांच्या गरजांची पूर्तता करण्यास प्राधान्य दिले जाते. या भूमिकेमुळेच सर्वसामान्य व्यक्तींनाही सहकारी संस्थांचा आधार विश्वसनीय ठरतो.

**सहकाराची व्याख्या :-**

'अनेक विचारवंतांनी, सहकारी कार्यकर्त्यांनी व राजकीय नेत्यांनी 'सहकार' हा शब्द विविध संदर्भात वापरलेला आहे. संस्थेच्या स्वरुपाप्रमाणे, कार्याप्रमाणे व विविध देशांत सहकारी चळवळीची वाढ व विकास ज्या स्वरुपात झाली, त्याचाही प्रभाव 'सहकार' या शब्दाची व्याख्या करताना विविध विचारवंतांवर पडलेला आहे.'

'Co-operation' या शब्दाची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील Co-operare या शब्दामध्ये सापडते. Co-operare या लॅटिन शब्दाचा अर्थ 'एकत्र काम करणे असा आहे. 'सहकार' या शब्दाची फोड केली असता 'सह' म्हणजे सर्वांनी एकत्र मिळून केलेले, असा अर्थ होतो व 'कार' म्हणजे कार्य अथवा काम.'[४]

**१) सी.आर.फे.**

'सहकारी संस्था म्हणजे दुर्बलांनी निःस्वार्थ भूमिकेतून संयुक्तरीत्या व्यापार करण्यासाठी स्थापन केलेली संघटना होय. या संस्थेच्या कामकाजात व संस्था चालविण्याच्या जबाबदारीच्या प्रमाणात सभासदांना लाभांश मिळेल असे गृहीत धरलेले असते.'

**२) कॅलव्हर्ट**

'जेव्हा माणूस म्हणून अनेक व्यक्ती समानतेच्या तत्त्वावर एकत्र येऊन स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संघटना स्थापन करतात तेव्हा त्या संघटनेस सहकारी संघटना असे म्हणतात.'

**३) हेरिक**

'सहकार म्हणजे ऐच्छिकरीत्या गरीब व्यक्तींनी एकत्र येऊन एकमेकांचे भांडवल व साधनसामग्री फायदेशीररीत्या परस्परसामंजस्याने वापरण्याची कृती होय.'

**४) प्रो. लॅम्बर्ट**

'स्वतःची उद्दिष्टे सफल करण्यासाठी व्यक्तींच्या समूहाने स्थापन केलेली व नियंत्रित केलेली, लोकशाही पध्दतीने चालविलेली, सभासदांच्या व समाजाच्या हिताची जपणूक करणारी संस्था म्हणजे सहकार होय.'

**५) डब्ल्यू. डी.वटकोन**

'सहकार म्हणजे एकात्मता, लोकशाही, समता व स्वातंत्र्य या तत्त्वांवर आधारलेली सामाजिक संघटना होय'

**६) वैकुंठलाल मेहता**

'समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यकतींनी ऐच्छिकरीत्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय.'[५]

भारताच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र अशा दोन क्षेत्रांमध्ये विभागणी करता येते. परंतु या दोन क्षेत्रांबरोबरच सहकार क्षेत्रही भारतात मोठया प्रमाणावर विकसित झाले.

सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला, दुर्बल व्यक्तींना, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींना सक्षम, सबल व समर्थ बनविणे हे सहकाराचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सहकारी संस्थांच्या सभासदांमध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही. सर्वांना समान दर्जा व समान वागणूक दिली जाते.

सहकारी तत्त्वप्रणालीची माहिती होण्यासाठी 'सहकार' म्हणजे स्वावलंबन व परस्पर साहाय्य यांच्या मदतीने समतेच्या व समानतेच्या तत्त्वांवर, अल्प प्रमाणात नफा मिळवणारी, सेवाभावाने प्रेरित झालेली सभासदांची ऐच्छिक व आर्थिक संघटना होय.'

**भारतातील सहकार चळवळ : प्रारंभ व विकास :-**

'१८९५ साली सर फ्रेडरिक निकोलसनने सहकारी पतपेढयांचा भारतात प्रथम पुरस्कार केला आणि त्यांनतर सहकारी चळवळीचा विकास हे सहकारी धोरण म्हणून अलग झाले.

जगातील अन्य देशांतील सहकारी चळवळींप्रमाणेच भारतीय सहकारी चळवळीचा जन्मही दुर्बलांच्या एकजुटीतून, अडचणींचा परिहार करण्याच्या प्रयत्नांतून झाला. सहकाराला 'आपत्तींची आपत्ये' असे संबोधले जाते. निरनिराळया देशांत निर्माण झालेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आपत्ती व संकटातून सहकाराचा जन्म झाला. भारतात सहकाराचा उगम शेतकऱ्यांच्या दारिद्रयातून, दुष्काळग्रस्त व रोगग्रस्त परिस्थितीतूनच झालेला आहे. सदैव निकृष्ट राहिलेली शेती व क्षीण होत चाललेले कुटिरोद्योग यामुळे ग्रामीण जनता कर्जाच्या खाईत बुडून गेली होती. शेतीप्रधान भारत हा महाजनांच्या विळख्यात सापडला होता. 'कर्जात जन्म, कर्जात जीवन आणि कर्जात मृत्यू' असे भारतीय शेतकऱ्यांचे वर्णन यथार्थपणे केले जात होते. ब्रिटिश राजवटीत ही प्रक्रिया अधिकच वेगाने चालू होती. या वास्तविकतेचा परिणाम दक्षिण भारतातील असंतुष्ट कर्जबाजारी शेतकऱ्यांवर झाला. परिणामतः 'रोखे फाडीची मोहीम' सरकारला १८७९ मध्ये मंजूर करावी लागली. १८८३ चा 'जमीन सुधारणा कायदा' (लॅण्ड इम्प्रूव्हमेंट ॲक्ट) व १८८४ चा 'शेतकी कर्ज कायदा' (ॲग्रिकल्चरल लोन्स ॲक्ट) सरकारने अमलात आणला. त्याआधी १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलिफ ॲक्ट शेतकऱ्यांना सूट देण्यासाठी मंजूर करण्यात आला.

सर निकोलस यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळेच १९०२ साली 'सहकारास' कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले. इंग्लंडमधील फ्रेंडली सोसायटीज् ॲक्टच्या धर्तीवरच हा कायदा करण्यात आला व तो मार्च १९०४ रोजी संपूर्ण हिंदुस्थानात अमलात आला.'[६]

**महाराष्ट्रातील सहकार चळवळ :-**

'स्वतंत्र महाराष्ट्रात गेली पंचवीस वर्षे विचारात घेता महाराष्ट्राची सहकारी क्षेत्राची घोडदौड स्पष्टपणे नजरेत भरते. १९६० च्या सुमारास महाराष्ट्रात अंदाजे ३,००,००० सहकारी संस्था होत्या त्यामध्ये वेगाने वाढ होऊन आज त्यांची संख्या दुपटीपेक्षाही जास्त म्हणजे अंदाजे १ कोटी ४०

लाखपर्यंत पोहोचली आहे. १९६० मध्ये राज्यातील सहकारी संस्था देशातील एकूण संस्थांचा एकदशांश भाग होत्या. परंतु देशाच्या तुलनेने महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या संख्येत अधिक वेगाने वाढ होऊन आज राज्यात देशातील एकूण सहकारी संस्थांपैकी सुमारे १९ टक्के संस्था सामावल्या आहेत असे दिसते. सुरुवातीला सहकारी संस्थांचे मिळून सुमारे ४० लाख सभासद होते. आज त्यांची संख्या अंदाजे ४ कोटी पर्यंत पोहोचली आहे. १९६० च्या सुमारास या संस्थांजवळ असणारे ३३० कोटी रुपयांचे खेळते भांडवल आज ६५,००० कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे.'[७]

'देशातील सहकारी क्षेत्राची वाटचाल ही आधुनिक भारतातील नेत्रदीपक घटना आहे. सावकारांकडून कर्जदार शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबावी म्हणून सुमारे शंभर वर्षापूर्वी ब्रिटिश सरकारने कायदा संमत केला होता. ती भारतातील सहकाराची सुरुवात होती असे म्हणता येईल. सहकारी संस्थांचा पहिला कायदा भारतात १९०४ साली संमत झाला. १९१२,१९१९,१९२५ या वर्षामध्ये त्यात सुधारणा झाल्या. गेल्या सुमारे ६०-७० वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्रात नामदार गोखले तात्यासाहेब केळकर, वैकुंठबाई मेहता, दे.गो.कर्वे, विठठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ अशा व्यक्तींचे समर्थ नेतृत्व सहकारी चळवळीस लाभले. प्रवरानगर - लोणी येथे सहकारी क्षेत्रातील देशातील पहिला साखर कारखाना १९४८ साली काढण्याचे क्षेयही राज्यास मिळाले.[८] विकासात सर्वांना समान हक्क देणारी, लोकशाही तत्त्वांचे पालन करणारी, दुर्बल घटकांना वरदान असणारी सहकारी चळवळ ही भारतातील गौरवपूर्ण घटना आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, नागरी सहकारी बँका यांच्या रुपाने राज्यातील ही सहकारी चळवळ भारतात आघाडीवर आहे.

गेल्या पावशतकात सहकाराचा आकृतिबंध विस्तृत पायावर विस्तारित झालेला आढळून येतो. १९६० मध्ये एकूण सहकारी संस्थांपैकी सुमारे ६० टक्के वाटा शेतकरी सहकारी पतसंस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचा होता. सहकारी चळवळ म्हणजे शेतकऱ्यांना कर्ज देणारी संस्था एवढेच त्याचे स्वरुप होते. परंतु पुढे हे चित्र बदलले. बँकिंगबरोबर उत्पादन सेवा अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकाराने शिरकाव केला व आपला ठसा उमटविला. खेडयातील प्राथमिक सहकारी संस्थांच्या बरोबरीने आज नागरी बँका, पतसंस्था, पणन, साखर उत्पादन, सूत गिरणी, विणकाम, घरबांधणी, डेअरी, औद्योगिक सहकारी बँक, उपसा सिंचन, मच्छिमार, मजूरसेवा, मुद्रण अशा कितीतरी क्षेत्रांमध्ये काम करीत आहेत. शेतकी सहकारी पतसंस्थांचे एकुणातील प्रमाण आज कमी

होऊन ते २८ टक्क्यांवर आले आहे. राज्यातील सहकारी चळवळीचे विविधीकरण झाले आहे व ती आता अतिधक स्थिर पायावर उभी आहे असे म्हणता येईल. राज्यातील प्रत्येकाचा या ना त्या रुपाने सहकारी संस्थेशी संबंध येतो. व संस्थेच्या कामकाजात स्वत:भाग घेण्याची प्रत्येकास संधी मिळते. मग ती पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक किंवा घरबांधणी संस्था किंवा इतर कोणतीही संस्था असो. १९७० नंतर व्यापारी बँकानीही सहकारी बँकाच्या विकासास हातभार लावला आहे. सहकारी क्षेत्रास भांडवल पुरवून, कर व नोंदणी शुल्कात सवलती देऊन शासनानेही या क्षेत्रांच्या विकासास अग्रक्रम दिला आहे. सरकारचे अनुकूल धोरण, सबसिडी, तारणाऐवजी व्यक्तींच्या उपक्रमशीलतेवर भर, कर्ज, उत्पादन, विक्री यांची घातलेली सांगड अशा कारणांमुळेच सहकारी क्षेत्राने आज एवढी मजल मारली आहे. अशिक्षित निराधार व्यक्ती, समाजातील दुर्बल घटक यांना सहकारी क्षेत्र हे वरदान ठरले आहे.

'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशात अग्रेसर आहे. विविध आर्थिक क्षेत्रांमध्ये सहकारी चळवळीने यशस्वीपणे पदार्पण केले आहे. महाराष्ट्रातील काही सहकारी संस्थांनी केलेली प्रगती अत्यंत स्पृहणीय व नेत्रदीपक असून या चळवळीचे कार्य इतर राज्यांतील सहकारी संस्थांना अनुकरणीय आहे. सहकारी संस्था या व्यावसायिक संघटना असल्या तरी सामाजिक बांधिलकी व समाजपरिवर्तनाचे उदिष्ट त्यांच्यासमोर असते. व्यवसाय तत्त्वे व सहकारी संस्था यशस्वी करण्याचे कार्य अत्यंत कठीण आहे. सहकारी चळवळीला अनेकविध अडचणींतून मार्ग काढून आपले कार्य करावयाचे आहे. हितसंबंधी लोकांपासून तिचे संरक्षण करुन समाजातील दुर्बल घटकांच्या व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी सहकारी चळवळ समर्थ बनविणे आवश्यक आहे व या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील चळवळीचे कार्य अभिमानास्पद आहे.

शेतीविकासामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने केलेले कार्य नेत्रदीपक आहे. शेतीसाठी आवश्यक असणारा सर्व प्रकारचा भांडवलपुरवठा मोठया प्रमाणावर सहकारी संस्थांनी उपलब्ध करुन दिलेला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडविलेल्या आहेत. शेती कर्जपुरवठा क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अग्रणी आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने राज्याच्या विशेषत: ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुरुवातीला ही चळवळ प्रामुख्याने कृषी पतपुरवठयाच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. त्यानंतर ही चळवळ

शेतमालप्रक्रिया, शेतमाल पणन, ग्रामीण भागातील उद्योग, ग्राहक भांडारे, सामाजिक सेवा, आदींसारख्या इतर क्षेत्रात वेगाने पसरली.[९]

**१) सहकार चळवळीचे आर्थिक स्वरुप :-**

सहकार हे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे अंग आहे. लोकांच्या आर्थिक विकासाचे ते एक माध्यम म्हणून ओळखले जाते.

अ) अर्थपध्दती, आ) एक क्षेत्र, इ) एक चळवळ असे तिहेरी आढळते. ज्याप्रमाणे भांडवलशाही, साम्यवाद व समाजवाद हया अर्थपध्दती आहेत, त्याच प्रमाणे सहकार हीसुध्दा एक अर्थपध्दती आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र व मिश्र क्षेत्र अशी क्षेत्रे आढळतात, तसेच सहकार क्षेत्र चौथे महत्त्वाचे क्षेत्र होय. भारतामध्ये तर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत सहकारक्षेत्राचा मोठा वाटा आहे. भारतातील साखर उद्योग हा सहकार क्षेत्राच्या ताब्यात आहे. भारताच्या ग्रामीण भागातील कर्जपुरवठासुध्दा सहकारी क्षेत्राच्या हातात आहे. अनेक अन्य व्यवसाय-उद्योग सहकारी क्षेत्रामध्ये आहेत. यावरुन सहकाराचे आर्थिक स्वरुप स्पष्ट होते. भारतामध्ये तर सहकार ही एक आर्थिक चळवळ बनली आहे. भारत हा ग्रामीण भागात वसला आहे आणि या ग्रामीण भगाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकाराची चळवळ राबविली जात आहे, म्हणून सहकाराची एक अर्थव्यवस्था, एक क्षेत्र व एक चळवळ ही तीन रुपे महत्त्वाची आहेत.

**२) सहकार चळवळीचे सामाजिक स्वरुप :-**

समाजाच्या उन्नतीचे माध्यम म्हणूनही सहकाराचे हे सामाजिक स्वरुप लक्षात घेतले पाहिजे. काही सहकारतज्ज्ञांच्या मते सहकार ही आर्थिक चळवळ नसून ती एक सामाजिक चळवळ आहे. कारण सहकार हे मुळात सामाजिक गरजेतून उदयास आले आहे. म्हणून समाजाच्या प्रबोधनाचे व विकासाचे कार्य सहकारामुळे गतिमान झाले आहे. समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सहकारामुळे सुरु झाली आहे. सहकारामध्ये धर्म, पंथ, जात, वर्ग, लिंग हे सर्व भेद बाजूला सारुन सर्व सभासदांना समपातळीवर वागणूक दिली जाते. त्यामुळे सामाजिक विषमता व स्पृश्यास्पृश्यता कमी होण्यास मदत झाली आहे. लोकशाही कारभारामुळे सर्वांना व्यवस्थापनात सहभागी होण्याची समान संधी प्राप्त होते. समाजातील दुर्बल घटकांना सहकारामुळे संरक्षण मिळाले आहे. समाजातील सर्व भेद विसरुन लोक एकत्र आल्याने समाजात एकसंधता व सामंजस्य निर्माण झाले आहे. सामाजिक

सलोखा वाढला आहे. म्हणून सहकार ही समाजाची एक जीवनपध्दती बनली. त्यातून समाजाच्या सांस्कृतिक विकासासाठी पोषक वातावरण तयार होण्यास मदत झाली.

**३) सहकार चळवळीचे शैक्षणिक स्वरुप :-**

सहकाराला आज शैक्षणिक प्रसाराचे प्रभावी साधन समजले जाते. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, आदिवासी, लहान कारागीर, खेडूत, मागासवर्गीय, दुर्बल घटक, महिला या सर्वांच्या दृष्टीने सहकार हे शैक्षणिक प्रसाराचे साधन आहे. सहकारी संस्थांमुळे शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. सहकाराच्या विस्तारामुळे प्रौढ शिक्षणालासुध्दा चालना मिळाली आहे. दुर्गम, डोंगराळ, आदिवासी, दूरच्या भागात जिथे सहकारी संस्था पोहचल्या आहेत, तिथे शिक्षणाचा प्रसार झाला आहे. साक्षर होणे, शिक्षण घेणे ही महत्त्वाची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय सहकारी चळवळीला दिले जाते. सहकाराला शैक्षणिक स्वरुप आहे.

**४) सहकार चळवळीचे संघटनात्मक स्वरुप :-**

सहकार हा एक संघटन प्रकार म्हणून ओळखला जातो. सहकारी संस्था हे त्याचे स्वरुप आहे. व्यापार-उद्योग करण्यासाठी एकल व्यापारी संस्था, भागीदारी संस्था, संयुक्त भांडवली कंपनी, सहकारी संस्था व सार्वजनिक उपक्रम असे पाच संघटन प्रकार आहेत. तेव्हा व्यापार, उद्योग, सेवाउद्योग करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. त्यांच्यामध्ये पतपुरवठा सहकारी संस्था, सहकारी बँका, ग्राहक सहकारी संस्था, खरेदी विक्री सहकारी संघ, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी वाहतूक संस्था, सहकारी मजूर संस्था, दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था, पीक संरक्षण सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, पाणीपुरवठा सहकारी संस्था, कृषी विपणन सहकारी संस्था, बलुतेदार सहकारी संस्था आदी संघटनात्मक प्रकारांमध्ये सहकाराचे स्वरुप आढळते.

सहकाराचे हे संघटनात्मक स्वरुप व्यक्तीचे संघटन, ऐच्छिक संघटन, लोकशाही संघटन व उद्योगकर्त्यांचे संघटन अशा प्रकारेसुध्दा दिसून येते. समान उद्दिष्ट व समान गरजा यांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने एकत्रित येऊन लोकशाही पदतीने सहकारी संस्था चालविल्या जातात. या संघटनात्मक स्वरुपावरुन सहकाराची ओळख होते.

**सहकाराची व्याप्ती :-**

**१) कृषी क्षेत्र :**

सहकाराचा सर्वात जास्त विस्तार कृषी क्षेत्रात झाला आहे. भारतातसुध्दा सहकाराने कृषी क्षेत्र सर्वात जास्त व्यापले आहे. शेतीसाठी पीक-कर्ज, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज, बी-बियाणे, खते, कीटकनाशके, पाणीपुरवठा, शेतमाल वाहतूक, आदींची सुविधा पुरविण्यासाठी विभिन्न प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पतपुरवठयापासून पीक संरक्षणापर्यंत विविध सेवा सहकारी संस्थांमार्फत उपलब्ध होतात. म्हणून भारतात तरी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सहकार वरदान ठरले आहे.

**२) उत्पादनप्रक्रिया क्षेत्र :-**

कृषीमालावर आधारित उत्पादन व प्रक्रिया करण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. साखर उत्पादनासाठी तर भारतातील सहकारी क्षेत्र जगात प्रसिध्द आहे. सूतगिरण्या, तेलगिरण्या, दूधप्रक्रिया संस्था, खत कारखाने, कीटकनाशके निर्मिती, शेती उपयोग साधने, सहकारी शेती, भात गिरण्या, आदी बाबतीत असंख्य सहकारी संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात.

**३) लघुउद्योग क्षेत्र :-**

ग्रामीण उद्योग व लघुउद्योग क्षेत्रातसुध्दा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. कर्जपुरवठा करण्याबाबतसुध्दा सहकारी बँका व नागरी सहकारी बँका ग्रामीण व लघुउद्योगांना सवलती देतात.

**४) बँकिंग क्षेत्र :-**

ग्रामीण भागात जिल्हा सहकारी बँकांमार्फत सहकार बँकिंग क्षेत्रात कार्य करताना दिसते. विशेषतः बँकिंग क्षेत्र सहकाराने काबीज केलेले आहे. मोठमोठया शहरांमध्ये नागरी सहकारी बँका व्यापक प्रमाणावर कार्य करीत आहेत.

**५) ग्राहक क्षेत्र :-**

ग्राहकांना गृहोपयोगी व जीवनावश्यक प्रकारच्या वस्तू पुरविण्यासाठी ग्राहक सहकारी भांडारे व संस्था कार्य करताना दिसून येतात. शेती अवजारे, पेट्रोल, डिझेल इत्यादी विकण्यासाठी सहकारी संस्था दक्षिण भागातील तालुक्यात स्थापन झालेल्या आहेत.

**६) सेवा क्षेत्र :-**

विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठीसुध्दा सहकार संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यामध्ये पीक संरक्षण, पाणीपुरवठा, साठवणूक, कृषीमाल, खरेदीविक्री, बँकिंग इत्यादी क्षेत्रांतील सहकारी संस्थांचा समावेश होतो.

**७) नागरी क्षेत्र :-**

सहकाराने काही बाबतीत नागरी क्षेत्र बरेच व्यापले आहे. विशेषतः गृहनिर्माण, सदनिका मालक सहकारी संस्था, पगारदारांच्या पतसंस्था, नागरी पतसंस्था इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

**८) सहकार शिक्षण :-**

सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर व राज्य पातळीवर संस्था/प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. केंद्र सरकारने पुणे येथे वैकुंठ मेहता सहकारी व्यवस्थापन संस्था स्थापन केली आहे, तर महाराष्ट्रात सहकाराचे प्रशिक्षण देणारी दोन महाविद्यालये व तेरा प्रशिक्षण केंद्रे आहेत. सहकार खात्यामार्फत ती चालविली जातात.

**९) अन्य क्षेत्रे :-**

चित्रपटनिर्मिती, पुस्तक प्रकाशन, सहकारी मुद्रण, सहकारी इस्पितळ, सहकारी वनीकरण, औद्योगिक संस्था, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, औद्योगिक वसाहती. मजूर संस्था या क्षेत्रांमध्येसुध्दा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

'शेतकी पतपेढी हा सहकारी चळवळीचा भारतातील पाया होय. या देशात ग्रामीण आणि शेतकी अर्थव्यवस्था मजबूत करावयाची असेल, तर आपणास सहकारी संघटनेचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. त्यामुळेच लक्षावधी खेडयांत पसरलेल्या कोटयावधी सामान्यजनांचे हित होणार आहे.'[१०]

- वि.स.पागे

माजी सभापती - विधान परिषद

'संस्था तोटयात नसावी हा मुद्दा सर्वसामान्य आहे. संस्था अर्थक्षम असली पाहिजे हा आग्रह ही मी समजू शकतो. परंतु संस्थेच्या अर्थक्षमतेच्या आग्रहात सहकार सार्थ राहत नाही, याचे भान विसरले जाते. ग्रामनिष्ठा व ग्रामकुटुंब भावना यावर ग्रामीण सहकाराची इमारत उभी राहू शकते. त्या निष्ठा वा ती भावना ग्रुप सोसायटयांना वा संस्थांना लाभू शकत नाही. सहकारी संस्थेच्या अर्थलाभासाठी सहकारी तत्त्वाला निरर्थ ठरविणे हे अत्यंत अयोग्य आहे'.[११]

- बाळासाहेब भारदे

माजी सभापती - विधानसभा

'सहकारी लोकराज्य भारतात निर्माण व्हावे असा दृष्टिकोन भारतातील तीन मोठया समाजचिंतकांनी स्पष्टपणे मांडला आहे. क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय, शुध्द चरित्र्याचे सेवाभावी विनम्र वैकुंठभाई मेहता, देशातील श्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ हे ते तिघे समाजचिंतक होत.'

- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

'भारतातील ७० हजार खेडयांतून वास्तव्य करीत असलेल्या सामान्यजनांच्या हिताचे एकमेव प्रगत साधन म्हणून आपण सहकारी अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहोत, तिचा सतत विकास व्हावा म्हणून प्रयत्नशील आहोत, ती विविधांगी व्हावी म्हणून हरतऱ्हेचे नवनवीन उपक्रम हाती घेत आहोत. त्या प्रयत्नांतून कास्त्रकाराला कारखानदार करणारा पहिला सहकारी साखर कारखाना वैकुठभाई मेहता यांची प्रेरणा व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे अथक प्रयत्न व सव्यासाची समर्थ मार्गदर्शन यामुळे प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे पाटील उभा करु शकले. या गोष्टीला पन्नास वर्षे होऊन गेलीत. काळागणिक सहकारी चळवळीचा प्रवाह सर्वस्पर्शी होत आहे.'

- यशवंतराव मोहिते

माजी सहकार व अर्थमंत्री

महाराष्ट्र राज्य.

'सहकार हा सहजीवनाचा आत्मा आहे व सहजीवन हा मानवी जीवनाचा आत्मा आहे. शुचिता, समभाव व निरपेक्ष सेवाभाव यांच्या त्रिवेणी संगमातून सहकार जन्मास येतो.'

- सुविचार

'समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी ऐच्छिकरीत्या स्थापन केलेली संघटना म्हणजेच सहकार होय.'

- श्री. वैकुंठलाल मेहता

"Co-operation is better way of life and infact it is an inevitable way when we live in cowder couumity."[१२]

- Pandit Jawaharlal Nehru

**सहकारी संस्थांचे प्रकार -**

सहकार हे देशाच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रामध्ये अर्थव्यवस्थेतील सरकारची भूमिका महत्त्वाची समजली जाते. भारतामध्ये तर सहकारी क्षेत्राचा सर्वांगीण विकास झालेला आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रांत सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. प्रारंभी सहकारी संस्था ग्रामीण व कृषीक्षेत्रात स्थापन झाल्या. त्यामुळे ग्रामीण भगातील सर्व व्यवसाय क्षेत्रांमध्ये सहकारी संस्था आढळतात. नंतरच्या काळात नागरी भागातसुध्दा काही नागरी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. सहकारी क्षेत्राचे जाळे व्यापक व विस्तारित असे बनले आहे. त्यामुळे सहकारी संस्थांचे प्रकारसुध्दा भिन्न-भिन्न आढळतात.

**१) पतपुरवठा सहकारी संस्था :-**

ग्रामीण व नागरी भागात पतपुरवठा करणाऱ्या संस्थांचा हया प्रकारात समावेश होतो. ग्रामीण भागातील प्राथमिक कृषी पतपुरवठा, सहकारी संस्था, नागरी सहकारी पतसंस्था, बिगर कृषी सहकारी पतसंस्था, पगारदारांच्या सहकारी पतसंस्था, इत्यादी संस्था या प्रकारात अंतर्भूत होतात. ग्रामीण भागातील या कृषी पतसंस्था शेतकऱ्यांना पीककर्ज देण्याचे कार्य करतात. नागरी पतसंस्था बिगर कृषी कारणांसाठी कर्जपुरवठा करतात. सभासदांना अल्प व मध्यम मुदतीची कर्ज देणे या संस्थांचे ठळक वैशिष्टय आहे. सेवा

सहकारी संस्था, विविध कार्यकारी संस्था किंवा साधनसंपत्ती संस्था या नावाने सुध्दा हया संस्था दक्षिणेतील नेत्यांनी स्थापन केल्या आहेत. सर्वाधिक या संस्थाची स्थापना केल्याचे दिसते.

**२) सहकारी पणनसंस्था :**

यामध्ये शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांचा समावेश होतो. सहकारी विपणन संस्था, खरेदी-विक्री सहकारी संस्था, इत्यादी संस्थांचा या प्रकारात अंतर्भूत होतात. शेतमालाची खरेदी-विक्री करणे हे या संस्थांचे प्रमुख कार्य आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालास बाजारपेठ व योग्य भाव मिळवून देणे हे या संस्थांचे वैशिष्टय होय. गाव, तालुका व जिल्हा पातळयांवर या संस्था कार्य करतात

**"पणनसंस्था संख्या व सभासद १९९०-२०००"**

| सन | नगर | | पाथर्डी | | जामखेड | | कर्जत | | श्रीगोंदा | | पारनेर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | सभासद | संस्था | सभासद | संस्था | सभासद | संस्था | सभासद | संस्था | सभासद | संस्था | सभास |
| १९९०-९१ | १ | ४०६५ | १ | ४३२६ | १ | ६६१ | १ | २२६७ | १ | १४७४ | १ | ४९७ |
| १९९१-९२ | १ | ४११२ | १ | ४३२९ | १ | ६६० | १ | २३१२ | १ | १/१४८५ | १ | ४९० |
| १९९२-९३ | १ | ४२३७ | १ | ४३६२ | १ | ७६९ | १ | २४९४ | १ | १५१६ | १ | ५१७ |
| १९९३-९४ | १ | ४५६५ | १ | ४३६२ | १ | ७७२ | १ | २५६५ | १ | १५१७ | १ | ५१९ |
| १९९४-९५ | १ | ४५६० | १ | ४९८७ | १ | १११२ | १ | २५६५ | १ | १५१७ | १ | १/५१६ |
| १९९५-९६ | १ | ४५८८ | १ | ४९९८ | १ | ११३५ | १ | २५९५ | १ | १५४५ | १ | ५३५ |
| १९९६-९७ | १ | ५०१० | १ | ५०१९ | १ | ११८५ | १ | २६०८ | १ | १६८० | १ | ७४५ |
| १९९७-९८ | १ | ५०३५ | १ | ५१०७ | १ | १२३० | १ | २५९८ | १ | १८९२ | १ | १०२० |
| १९९८-९९ | ३ | ५०९४ | १ | ५१९४ | ३ | १४२७ | १ | २५६९ | २ | २१६७ | २ | ११२२ |
| १९९९-२००० | १ | ४९११ | १ | ५२०६ | ३ | १६८७ | १ | २५५७ | २ | १५७२ | ३ | ११३३ |

**'पणनसंस्था संख्या व सभासद '**[१३]

वरील तक्त्यावरुन अ. नगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील १९९० ते २००० सालातील तालुकानिहाय पणनसंस्था संख्या, सभासदसंख्या लक्षात येते. संस्थामध्ये वाढ झालेली नसली तरी सभासद संख्येत मात्र वाढ झालेली दिसून येते.

**३) सहकारी बँका :-**

या प्रकारामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँक व नागरी बँका यांचा प्रामुख्याने समावेश होतो. कर्ज देणे, ठेवी स्वीकारणे, ग्राहकांना बँकिंग सेवा पुरवणे ही या बँकांची ठळक कार्ये आहेत. ग्रामीण भागातील ठेवी गोळा करणे, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे, सहकारी संस्थांना पतपुरवठा करणे ही या बँकांची वैशिष्टये आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँका मुख्यत्वेकरुन ग्रामीण भागात आपला शाखाविस्तार करतात. तर नागरी बँका शहरांमध्ये आपल्या शाखा उघडतात.

**४) प्रक्रिया सहकारी संस्था :-**

कृषीमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांचा या प्रकारात समावेश होतो. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरणी, तेलगिरणी, भातगिरणी इत्यादी संस्था शेतकऱ्याच्या मालावर प्रक्रिया करुन त्या शेतमालाची योग्य किंमत मिळवून देणे हे या संस्थांचे मुख्य कार्य आहे. आपल्या मालावर आपणच उत्पादनप्रक्रिया करुन तो विकणे व त्याद्वारे प्रक्रिया करणाऱ्या मध्यस्थांचे उच्चाटन करणे ही या संस्थांचे वैशिष्टये आहेत.

**५) गृहनिर्माण सहकारी संस्था :-**

आपल्या सभासदांसाठी घरबांधणी करणे व घरबांधणीसाठी कर्ज उपलब्ध करुन देणे हे या गृहनिर्माण संस्थांचे मुख्य कार्य आहे. नागरी भागातील लोकांच्या निवासाचा प्रश्न सोडविणे हे या संस्थांचे वैशिष्टय आहे. या मध्ये गृहनिर्माण सहकारी संस्था, गृहतारण सहकारी संस्था, भाडेकरु मालकीहक्क गृहनिर्माण संस्था, भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था, इत्यादी संस्थांचा समावेश होतो.

**६) ग्राहक भांडारे :-**

सहकारी वस्तू भांडार, सहकारी ग्राहक संस्था, विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार, सहकारी अल्पोपहार गृहे, इत्यादी संस्थांचा या प्रकारात समावेश होतो. ग्राहकांना गृहोपयोगी व दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरवणे हे या ग्राहक संस्थांचे कार्य आहे. ग्राहकांची दर्जाबाबत, किमतीबाबत व पैशाबाबत होणारी फसवणूक टाळणे हे या संस्थांचे मुख्य वैशिष्टय आहे.

**७) औद्योगिक सहकारी संस्था :-**

यामध्ये औद्योगिक उत्पादन संस्था व कामगारांच्या औद्योगिक संस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो. लघुउत्पादन, वीणकर, सुतार, वनकामगार इत्यादी लोक एकत्र येऊन अशा औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करतात. आपल्या मालास बाजारपेठ मिळावी व योग्य किंमत मिळावी हे या संस्थांचे वैशिष्टय होय. सभासदांच्या मालाची जुळणी करणे, उत्पादनांची विक्री करणे व तत्सम आनुषंगिक सेवा पुरविणे हे या संस्थांचे कार्य होय.

**८) सिंचन व पाणीपुरवठा सहकारी संस्था :-**

उपसा जलसिंचन व पाणीपुरवठा संस्थांचा याप्रकारात समावेश होतो. या संस्था ग्रामीण भागात आढळतात. आपल्या शेतीला पाणीपुरवठा होण्यासाठी शेतकरी एकत्र येऊन अशा संस्था स्थापन करतात. सभासदांच्या शेतीसाठी पाणीपुरवठा करणे हे या संस्थांचे मुख्य कार्य आहे. पाणीवाटपाची व्यवस्था व योग्य नियोजन करणे हे या संस्थांचे वैशिष्टय आहे.

**९) सामाजिक सहकारी संस्था :-**

यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, धार्मिक इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांचा समावेश होतो. रुग्णसेवा सहकारी संस्था, शिक्षण सहकारी संस्था, सांस्कृतिक विकास सहकारी संस्था, राहणीमान सुधारणा सहकारी संस्था इत्यादी संस्थांचा अंतर्भाव या प्रकारात होतो. नागरिकांना सामाजिक सेवा पुरविणे हे या संस्थांचे कार्य आहे. समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास घडविणे ही या संस्थेची वैशिष्टये आहेत.

**अ) सहकार चळवळीचे आर्थिक विकासातील योगदान :-**

**१) सावकारशाहीच्या पाशातून शेतकऱ्यांची सुटका :-**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा विकास मोठया प्रमाणात झाल्यामुळे शेतकऱ्यांना अवाजवी दराने कर्जाच्या जाळयात अडकवून ठेवणाऱ्या सावकारांच्या दृष्टचक्रातून शेतकऱ्यांची सुटका झाली आहे. शेतकऱ्यांना शेती विकासासाठी केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठयापैकी ५० टक्के हून अधिक वाटा केवळ सहकारी संस्थांचा आहे. त्यामुळे भारतातील कुठलाही सर्वसामान्य शेतकरी हा प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेचा सभासद व लाभार्थी निश्चितपणे आहे. त्यांच्या शेती विकासासाठी व शेती-पीक

तारणावर त्यांना पुरेसा कर्जपुरवठा होतो. हा महत्त्वाचा लाभ सहकारी चळवळीमुळे मिळाला.

**२) कर्जपुरवठयाचा योग्य विनियोग :-**

सहकारी पतपुरवठा संस्था केवळ वाजवी दराने कर्जपुरवठा करतात. एवढेच नव्हेतर दिलेले कर्ज खरोखरच शेतीसाठी वापरले किंवा नाही यावर कडक नियंत्रण ठेवतात. बरेचसे कर्ज हे बी-बियाणे, खते म्हणजे वस्तुस्वरुपात दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले आहे व शेतकऱ्यांची आर्थिक क्षमताही वाढल्याचे दिसून येते. सावकार शेतकऱ्यांना सतत कर्जात अडकवून ठेवीत. उलट सहकारी संस्था त्यांची कर्जातून लवकर मुक्तात करुन त्याची आर्थिक पत वाढवितात. हा महत्त्वाचा लाभ सहकारी चळवळीमुळे झाल्याचे दिसून येते.

**३) शेतमालाची योग्य किंमतीने विक्रीची व्यवस्था :-**

ग्रामीण भागात शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारात आणून त्याची मोठया प्रमाणात विक्री करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यशील आहेत. काही अपवाद वगळता शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळू लागला आहे व त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर कृषी उत्पन्न समित्या स्थापन झाल्या असून, शेतमालाच्या विक्रीची सोय चांगली झाली आहे. सहकारी खरेदी-विक्री संघामार्फत शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत येतो व योग्य भावाने शेतमालाची विक्री करण्याची व्यवस्था केली जाते. सहकारी संस्थांमुळेच शेतमालाला बाजारपेठ प्राप्त झाली आहे. अन्यथा खाजगी व्यापारी कमी भावाने मालाची खरेदी करुन आर्थिक शोषण करीत असत. आता मात्र शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत नाही.

**४) वाजवी दराने कर्जपुरवठा :-**

शेतीचा विकास होण्यासाठी व अधिकाधिक शेतमालाचे उत्पन्न होण्यासाठी शेतकऱ्यांना सहकारी बँका, भूविकास बँकांच्या मार्फत अत्यंत वाजवी दराने कर्जपुरवठा होतो. शेतकऱ्यांना कर्ज फेडता यावे म्हणून सुलभ हप्त्याने कर्जपुरवठा केला जातो.

**५) शेती विकासात तंत्रज्ञानाचा वापर :-**

सहकारी पतपुरवठा संस्था या केवळ शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत नाहीत तर ग्रामीण कृषी तंत्रज्ञानासंबंधी शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणतात व साहजिकच नवीन कृषी तंत्रज्ञानाचा लाभ होऊन अधिकाधिक कृषी उत्पादन वाढल्याचे आपणास दिसून येते. सहकारी चळवळीचे हे महत्त्वाचे योगदान समजायला हरकत नाही.

**आ) सहकारी चळवळीचे सामाजिक विकासातील योगदान :-**

सहकारी चळवळ ही केवळ आर्थिक विकासाची नसून ती सामाजिक आणि आर्थिक उन्नतीचा राजमार्ग आहे. या चळवळीमुळे व्यक्तीमध्ये एकात्मता, बंधुभाव आणि समानता या मानवी मूल्यांची जोपासना होते. सहजीवनाच्या विकासाचा तो एक लोकशाही मार्ग समजण्यात येतो. सहकारी संस्थेच्या कार्यपध्दतीत परस्परसाहाय्य व स्वावलंबन यांवर भर दिला जातो व अनिष्ट प्रवृत्तींवर मात केली जाते. व्यक्तीव्यक्तींमधील जातिभेद व अर्थभेद संपविण्यात सहकारी चळवळींचा महत्त्वाचा वाटा आहे. सर्वांचे समान आर्थिक हित साधले जाते. याशिवाय सहकारी संस्थांमधील सभासदांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होते व त्यातून समाज चरित्रसंपन्न बनविण्यास मदत होते. सहकारी चळवळीचे अभ्यासक उल्फ यांनी लिहिले आहे की, 'सहकार आळशी माणसाला उद्योगी बनविल, उधळपट्टी करणाऱ्यांवर अंकुश ठेवील व अशिक्षितांना सुशिक्षित बनविल.'

**इ) शैक्षणिक विकासातील योगदान :**

सामाजिक, आर्थिक फायद्यांबरोबरच सहकारी चळवळीने शैक्षणिक व राजकीय फायदेदेखील प्राप्त होतात. विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन जिल्हा सहकारी बोर्ड तसेच राज्य सहकारी संघामार्फत किंवा सहकारी प्रशिक्षण महाविद्यालयांमार्फत केले जाते. सहकारी संस्थेच्या सभासदांना आर्थिक व्यवहाराचे व कार्यपध्दतीचे प्रशिक्षण या संस्थांमार्फत दिले जाते. कर्जाचा वापर, खतांचा वापर, शेती तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जाते. म्हणूनच 'सहकारी चळवळीचे तज्ज्ञ डॉ. डार्लीन म्हणतात की, 'प्राथमिक सहकारी संस्था म्हणजे ग्रामीण अर्थव्यवहाराचे शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळाच आहेत' अनेक सहकारी कारखान्यांच्या परिसरात वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करुन त्या त्या भागातील शिक्षणाची सोय केली जाते.[१४]

**ई) राजकीय विकासातील योगदानः**

सहकारी चळवळीमुळे लोकशाहीचा पाया भरभक्कम होतो. त्यातून राजकीय नेतृत्व निर्माण होते व राजकीय संस्थांना सहकारी संस्थांचे कार्यकर्ते मिळतात. म्हणून सहकारी चळवळीमुळे समाजकारण, अर्थकारण व राजकारण यांमध्ये सुसूत्रता येण्यास मदत होते. सर्व क्षेत्रांचा समान विकास होऊ शकतो.

स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये महाराष्ट्रात जी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, भौतिक जडणघडण झाली, त्यामध्ये सहकाराचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. सहकार चळवळीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथमपासून अग्रेसर आहे. प्रवारानगर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील सहकारी साखर कारखाना हा भारतातील सहकारी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना होय, तर अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील सर्वातमोठी बँक म्हणून प्रसिध्द आहे. सहकारी चळवळ अहमदनगर जिल्हयाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. संपूर्ण जिल्हयातील नेत्यांनी उभ्या केलेल्या व त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या संस्थांवरुन जिल्हयातील एकूण सहकारी संस्था, त्यासंस्थांमार्फत केलेले कर्ज वितरण कृषी व्यवसायाचा झालेला विकास व दक्षिणनगर मधील प्रगती लक्षात येते.

'अहमदनगर जिल्हयात सन २००० अखेर सर्व प्रकारच्या मिळून एकूण ७८४३ सहकारी संस्था आहेत, त्यापैकी १२१४ प्राथमिक कृषी सहकारी संस्था, ९४५ बिगर कृषी पतसंस्था, ४८ पणन संस्था, १५ सहकारी साखर कारखाने, ५ दूध संघ, २२८५ दुग्ध सहकारी संस्था आहेत. या सर्व सहकारी संस्थांनी ३११५.५३ कोटी कर्ज वितरित केले पैकी प्राथमिक कृषी सहकारी संस्थांनी अल्प, मध्यम, दीर्घ मुदतीची एकूण २२२.२७ कोटी रुपये कर्ज वितरित केली वर्षाअखेर या संस्थांकडे ३७६.९९ कोटी रुपये कर्ज थकबाकी आहे.[१५]

**सन १९९० ते २००० सालातील दक्षिण नगरमधील तालुकानिहाय विविध प्रकारच्या सहकारी संस्था ३१ मार्च २००० पर्यंत**

| अ.क्र. | तहसील | १९९० - ९१ | १९९१ - ९२ | १९९२ - ९३ | १९९३ - ९४ | १९९४ - ९५ | १९९५ - ९६ | १९९६ - ९७ | १९९७ - ९८ | १९९८ -९९ | १९९९ -२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर | ६८० | ७३९ | ८१७ | ८९५ | ९८८ | १०१३ | १०५८ | १०७९ | ११२८ | ११६६ |
| २ | पाथर्डी | १७७ | १८१ | १९९ | २३३ | ३०२ | ३६९ | ३७८ | ४११ | ४४८ | ४६९ |
| ३ | जामखेड | १३५ | १४३ | १५५ | १६९ | २०२ | २३७ | २५१ | २६२ | २८० | २९१ |
| ४ | कर्जत | २६४ | २७० | ३०३ | ३३० | ४४३ | ५१६ | ५३२ | ५५७ | ५८७ | ६७५ |
| ५ | श्रीगोंदा | १९६ | २१० | २३९ | २९७ | ४५९ | ५३७ | ५७१ | ६०५ | ६४० | ६६४ |
| ६ | पारनेर | २८५ | ३०४ | ३२९ | ३५९ | ४३६ | ५०८ | ५२५ | ५७४ | ६१३ | ६३६ |

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील सहकारी संस्थांचा तालुकानिहाय अभ्यास करत असताना १९९० ते २००० सालातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची तालुकानिहाय वाढ व विकास वरील तक्त्यावरुन स्पष्ट होतो. दक्षिणेतील नेत्यांनी स्थापन केलेल्या संस्था नेत्यांच्या वाढत्या वयाबरोबर कशा विकसित होत गेल्या हे लक्षात येते. स्थापन केलेल्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून कर्जवितरण करुन ग्रामीण भागाच्या विकासाला मोठा हातभार लावल्याचे निदर्शनास येते. सदर प्रबंधात इतर सर्व सहकारी संस्थांऐवजी अभ्यासाच्या सोयीसाठी प्राथ. कृषी संस्थांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**१) 'प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे कार्य - १९९१ ते २०००' :**

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भगातील प्राथमिक कृषी सहकारी संस्थांची तहसीलनिहाय संख्या, एकूण खातेदारांची संख्या , लहान खातेदार, मोठे खातेदार, संस्थेचे भागभांडवल, शासकीय भागभांडवल, राखीव निधी, संस्थेने घेतलेले कर्ज, संस्थेचे खेळते भांडवल व एकूण वाटप केलेले कर्ज व येणे कर्ज यावरुन दक्षिण भागातील सहकारी संस्था त्यांची आर्थिक स्थिती पुढील तक्त्यावरुन लक्षात येते.[१६]

## तक्ता क्र. १
## सन १९९१-९२

**(रुपये हजारात)**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०६ | ४९,१०२ | ४७,५०२ | २०४९० | १७५०२ | ९५०५ | १९८४६ | ६५८ | ४७०३ | ८६१०८ | ११९१५८ | १३४६३ | ९१२९९ | २५५१६ | ९५५०९ |
| २ | पाथर्डी | ८० | ४०६७२ | ४०५५० | १६८१४ | १५३१७ | ८४१९ | १५००५ | १५९ | २७५० | ५०५८६ | ७८७६७ | ८६०३ | ५०८०८ | १६६२८ | ६९२३८ |
| ३ | जामखेड | ४३ | २८३७४ | १७४३१ | १२३६८ | ४२०६ | ८५७ | ४१०८ | ८१ | १७५ | ६७७६ | १६७०६ | १५१५ | ७१९२ | ६२२२ | १४६८३ |
| ४ | कर्जत | ६५ | ४८६४२ | ३०७५२ | ११७९० | १५२६८ | ३६९४ | १३३४९ | ९३ | १२६३ | ३३४४९ | ६७२४५ | ४१८३ | ३२२६५ | १०८९५ | ५९९७८ |
| ५ | श्रीगोंदा | ७७ | ५५३६८ | ५२८२० | १९४२८ | २५११३ | ८२७९ | ३४३११ | ५८५ | १८९६१ | ७२०८४ | २०७६४६ | ११३०४ | ७३४८४ | ३२४९० | १५१३३३ |
| ६ | पारनेर | ९९ | ५५३३५ | ४५०४१ | १८७९५ | १९६६५ | ६५८१ | १५०७२ | ११० | २७८९ | १०१५५९ | १२०१३९ | १६३८९ | ७०८९५ | २१८७२ | १०५९९७ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. २**
**सन १९९२-९३**

**(रुपये हजारात)**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०६ | ५१७६४ | ५०१२० | २१९१७ | १८७०७ | ९४९६ | २०४६० | ६५२ | ४९३५ | १८७३२ | १५०४९९ | ३९१६ | १८०१२ | २२५२४ | ९७७१८ |
| २ | पाथर्डी | ८० | ४०८७८ | ४०४२७ | १९०१९ | १५३५६ | ६०५२ | १६३७३ | १४७ | ३४८१ | १४०३६ | ८९७५६ | १२९१८ | १०५११४ | १५७४६ | ५९६०६ |
| ३ | जामखेड | ४३ | २५११० | १८१३५ | ७६७७ | ८०२८ | २४३० | ४३५८ | ७८ | १७१ | ३२५३ | १९९८३ | १७५६ | ६४४० | ६९३२ | १७२६७ |
| ४ | कर्जत | ६५ | ३८७७३ | ३१९०० | १०८४५ | १६४८४ | ४५७१ | १४१३२ | १८ | १४५२ | १६४३८ | ७९२५३ | १८८१ | १६१६९ | ७४५० | ६२२४३ |
| ५ | श्रीगोंदा | ८६ | ५६९४५ | ५४७२९ | २१४०९ | २३१४० | १०१८० | ३६९४७ | ५८५ | २१४७२ | ९०८३८ | २६१०७१ | ४८१३ | ६७४५२ | १९१०१ | १८७२७२ |
| ६ | पारनेर | ९९ | ५५४७३ | ५२१४५ | २१३९८ | २०३९७ | १०३५० | १८६९० | ८३ | ३३५३ | ३५१४७ | १४२१५० | ११०४५ | ३६३६८ | २९३१७ | १११०२८ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ३**
**सन १९९३-९४**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०६ | ५२७८० | ५१५६२ | २२३०० | १९३९६ | ९८६६ | २२२७६ | ५६० | ४०३८ | ५०६९३ | १६८००० | ७८६४ | ३७६१० | २२२०१ | १८८६६३ |
| २ | पाथर्डी | ८० | ५५६१३ | ५५४२५ | १२९६९ | २३५६६ | १८८९० | १७५५९ | ५४ | ३३०१ | ५१०१९ | ११४९२१ | ५९४२ | ४८५७९ | २०१४४ | ५३३२१ |
| ३ | जामखेड | ४३ | ३९५४० | २६६०४ | ११८५५ | ११४५७ | ३२९२ | ४६७३ | ६८ | १७६ | ७२६२ | २५७७६ | १९२६ | ८७१६ | १७९३५ | १९५१६ |
| ४ | कर्जत | ६५ | ४३०२३ | ३३०३१ | ११४७६ | २०९८४ | ५७१ | १५८९३ | १७ | १६१८ | ३८४६० | १०५१३२ | ३८८१ | ३५०५० | ९६७२ | ८२४८५ |
| ५ | श्रीगोंदा | ८९ | ५८०८१ | ५४७२९ | २४३७२ | २३६०६ | ६७५१ | ४२०३२ | ५८५ | १७६५८ | ८४३३५ | ३०९६६९ | १३०६० | १११६१६ | २२४२४ | २११४९६ |
| ६ | पारनेर | ९९ | ५६५८१ | ५४१७२ | २१८९६ | २१०४६ | ११२३० | २०८५२ | ८० | ३६३८ | ६४१४८ | १५०२१३ | १६०१९ | ६७०५९ | ३२६५४ | ११९६९१ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ४**

**सन १९९४-९५**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०७ | ५३२३६ | ५३०९१ | २३८१३ | २११२७ | ८१५१ | २४३५४ | ५४९ | ४१९६ | ६९९२८ | १९६४१६ | ११७७९ | ७५१७२ | २२७५२ | १३२७४२ |
| २ | पाथर्डी | ८० | ५५८२६ | ६५६७३ | २२९१० | २३५६२ | १९२०० | २०९१९ | ५० | १६६१६ | ४८५७९ | १४१८३० | ५८०४ | ४८५७९ | २५९१० | १०४००३ |
| ३ | जामखेड | ४३ | ३९५४० | २८६१० | १२९९३ | १२३२५ | ३२९२ | ५५६७ | ६८ | १९७ | १४७७० | ३५५२१ | २४३० | १३८९० | ८१३५ | १८५९९ |
| ४ | कर्जत | ६६ | ४३६७८ | ३३१९२ | ११५४३ | २१०७८ | ५७१ | १९४८६ | १५ | १८०६ | ५४६१६ | १२७२१६ | ४८८१ | ५५१६९ | १०२१३ | १००५६९ |
| ५ | श्रीगोंदा | ९३ | ६०६८६ | ४८९७३ | २६५९६ | १९९५१ | २४२६ | ५४४१५ | ५८५ | २०१५२ | १९२७०९ | १४८५३३ | १५५५५ | २२०४७६ | २४१८५ | ३३९५५२ |
| ६ | पारनेर | ९९ | ५६५८१ | ५४६७० | २२००६ | २११९८ | ११४६६ | २४०६४ | ६६ | ४७४१ | ८९४६३ | १७७६२२ | २१४२५ | ९७९६३ | ३७९६४ | १४३९२२ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ५**
**सन १९९५-९६**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०७ | ६२७८० | ५२५७६ | २४२९० | २३६९५ | ४५९१ | २५४६९ | ५८८ | ४१९६ | ६९९२८ | १८६५२१ | ९२७३ | ४३३८४ | २१५०९ | १२५२५८ |
| २ | पाथर्डी | ८० | ६५४२५ | ६६३७६ | २२९१० | २३३४१ | २०१२५ | २१८०५ | ५३ | १६६१६ | ४८५७९ | १५०७७८ | ५८४० | ४३०९९ | ३०१४० | ९४४७९ |
| ३ | जामखेड | ४३ | ३९४५ | ३२९८३ | १४३०० | १४८५३ | ४१०० | ७५९६ | ६० | १९७ | १४७७० | ३४६१० | ३३५० | २११४८ | १०२०० | २९०५१ |
| ४ | कर्जत | ६६ | ६१६६९ | ३४४१४ | १४१०८ | १७६२७ | २६७९ | २११२५ | १५ | १८०६ | ५४६१६ | ११७२२३ | ३६४८ | ३७९१३ | ८७७८ | ८९१३९ |
| ५ | श्रीगोंदा | ९५ | ६०६८४ | ५३२६४ | २८९९९ | १९८२८ | ४४३७ | ५९९२० | ५८५ | २०१५२ | १९२७०९ | ४४२८३३ | ११४२५ | ११६४८३ | २६०५३ | ३४६६२९ |
| ६ | पारनेर | १०० | ७४३९५ | ५६९८८ | २२८३१ | २३६९१ | १०४६६ | २५५८५ | ७ | ४७४१ | ८९४६३ | १७५०७० | २२५४० | ७२६६९ | ३८५६० | १४१०२२ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ६**

**सन १९९६-९७**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०७ | ६३८९१ | ५७४३२ | २४९१४ | १७६०२ | १४९१६ | २७४२७ | ५२४ | ४७३५ | १३२९८२ | २००८९४ | ११४५२ | ७१५४१ | १९०७७ | १३०९३८ |
| २ | पाथर्डी | ८० | ६६३७६ | ४५७७२ | २२४५९ | २२३०७ | १००६ | २४४१२ | ५१ | ३८५२ | ११२०७१ | १६९५२८ | ९७८८ | ७१२४० | २९२३९ | १२५३६४ |
| ३ | जामखेड | ४४ | ३९२५८ | ३४४२६ | १५५०० | १८९२६ | ९ | ७६८४ | ६० | १९९ | ४५००० | ५९८६४ | ५३५० | ५४५५३ | ११४०० | ५४५०८ |
| ४ | कर्जत | ६६ | ६१६६९ | ३४५९७ | १४३५१ | १७३९६ | २८५० | २९१३५ | १५ | २०७२ | ८५१४१ | १३४७५१ | ११२३८ | ७९६१७ | १६००० | १००७२२ |
| ५ | श्रीगोंदा | ९५ | ५७०९९ | ५५९७३ | ३००२३ | २१३८२ | ४५६८ | ६५३७२ | ५८५ | ४९२०१ | ३०१०५७ | ४९५१९८ | १७०८१ | १८२४४१ | ३१०१५ | ३६०७३३ |
| ६ | पारनेर | १०० | ७४३९५ | ६३५११ | २५०८५ | २४६१४ | १३८१२ | २८९१५ | ४७ | ५९७० | १३०४६१ | १९२९३२ | २३१८९ | ८३२८५ | ३८९७२ | १४३७८८ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ७**

**सन १९९७-९८**

**(रुपये हजारात)**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | १०७ | ६३८९१ | ५७९५१ | २५२९५ | १७७१६ | १४९४० | ३१५२१ | ५१९ | ४९२४ | १७७६९७ | २५५५६७ | ११२८७ | १०६९४१ | २०१८६ | १६९४०४ |
| २ | पाथर्डी | ८० | ६९९२१ | ४४४६९ | २२७५२ | १७४०८ | १३१४ | २७३८९ | ३९ | ४३४८ | १६६४३८ | २२३२०९ | १०१९० | ६८२४२ | १७४७९ | १५५९१० |
| ३ | जामखेड | ४४ | ४४७१७ | ३४४२६ | १७९०० | १३२०७ | ३३१९ | ८६७९ | ६० | १९९ | ३४५०३ | ५८२०१ | १३६८७ | २३९८३ | २१२९६ | ४९२४० |
| ४ | कर्जत | ६६ | ६१६६९ | ३५२८० | १४३८९ | १७६१४ | ३२७८ | ३०१३५ | १४ | २९७० | १२५०९८ | १८६९५६ | ४८६५ | ७६७८२ | ७१५५ | १४२६३८ |
| ५ | श्रीगोंदा | ९८ | ७०८५२ | ५७८७८ | ३२८९० | २२३५० | २६३८ | - | ५८५ | ५९३०५ | ३७५३८७ | ५८७९७८ | १८१७७ | १७०१४५ | ३५८८४ | ४२२१७५ |
| ६ | पारनेर | १०१ | ८४०४९ | ६३५११ | २५०८५ | २४६१४ | १३८१२ | - | ४७ | २५५०८ | १९२६४६ | ३६०५०१ | २८०९५ | १७८००८ | ३९५७२ | २०४४२४ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ८**

**सन १९९८-९९**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | ११३ | ७६४०२ | ५९४९८ | २६५६५ | १७८४९ | १५०८४ | ३६०४६ | ५१३ | ५३५६ | २२६७११ | २९७४०८ | १५७४० | २५३६७२ | २१४२३ | १५१७९६ |
| २ | पाथर्डी | ८३ | ६९९२१ | ४०३३३ | २०९१० | १६०८९ | ३३३४ | ३२९८८ | ३१ | ५६२३ | २७८३१४ | ३१७१२५ | १००२३ | १४३२९८ | १७१४६ | २४३९२४ |
| ३ | जामखेड | ४५ | ४६३०४ | ३४७१८ | १२५३० | १४८९६ | ७२९२ | ९२१७ | ३८ | २३४ | ५९५८७ | ३४०८९ | ६७५० | ४३०७८ | १४२०० | ७०६७१ |
| ४ | कर्जत | ६६ | ७३९१७ | ४०६१२ | १७२४२ | १८९१९ | ४५५१ | ३११५५ | ० | ३८५१ | १५७९६६ | २३९९६६ | ६३५३ | ७४४७५ | ७५४५ | १७७५९४ |
| ५ | श्रीगोंदा | ९८ | ५८९६० | ५९०३० | ३३१०५ | २०४८२ | ५४४३ | ७९५५२ | ५८४ | ७९३९० | ४४६५६३ | ६८८१५८ | २०५९८ | २१६९०९ | ४५५३८ | ५००४२४ |
| ६ | पारनेर | १०३ | ८४०४९ | ६४४९८ | ३३१०० | २३९८४ | ७४१४ | ६६८१३ | ३० | ८४४५ | २४१७५५ | ३२४१७९ | ३५१८३ | १४६७६२ | ४२२९२ | २७६७५१ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

**तक्ता क्र. ९**

**सन १९९९-२०००**

| अ. क्र. | तालुका | संस्थांची संख्या | एकूण खातेदारांची संख्या | सभासद | | | | भाग भांडवल | स्तंभ ९ पैकी सहकारी भाग भांडवल | राखीव आणि इतर निधी | संस्थांनी घेतलेले एकूण कर्ज | खेळते भांडवल | एकूण दिलेली कर्जे अल्प, मध्यम व दीर्घ | | येणे कर्ज अल्प, मध्यम व दीर्घ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | लहान खातेदार सभासद | मोठे खातेदार सभासद | इतर सभासद | | | | | | कर्जदार | कर्जाची रक्कम | बाकी असलेले सभासद | कर्जाची रक्कम |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **१७** |
| १ | नगर | ११३ | ७६४०२ | ६०६७४ | २६७३२ | १७५०९ | १६४३३ | ३८७०२ | ५१० | ७२७६ | २३९२२९ | ३०९७०९ | १३९४२ | ७८८२८ | २१९१६ | २१५९९९ |
| २ | पाथर्डी | ८३ | ६९९२१ | ४१६४३ | २६१९४ | १३६१६ | १८३३ | ३९९८८ | ३९ | ५९०२ | २४९७८९ | ३०१०९९ | ११६६९ | १००४०९ | १७६२२ | २४२५५६ |
| ३ | जामखेड | ४६ | ४६३०४ | २९१८६ | ११४३६ | १०६९१ | ७०५९ | १०७४३ | ३९ | ६४३ | ६४६०७ | ८५८५१ | ४०९७ | १९८६५ | १६५०० | ७४२२९ |
| ४ | कर्जत | ६६ | ७३९१७ | ४१४०५ | २०४०२ | १७१०५ | ३९९८ | ३१७४२ | ० | ३९७३ | १६५५३० | २४२५०९ | ५२८१ | ३५२३४ | १०३८६ | १८६२४६ |
| ५ | श्रीगोंदा | ९९ | ६८९६० | ६०१३९ | ३३१३९ | २२४०८ | ४५९२ | १०५०५६ | ५८५ | ८३९६८ | ४५४४१५ | ७४२८०५ | २१३९२ | १३५८१३ | ४६५३९ | ५१५६४५ |
| ६ | पारनेर | १०४ | ८४०४९ | ६५८५६ | ३३७९४ | २४८२१ | ७२४१ | ३९३१७ | ४२ | ३१३२९ | ३३४६७१ | ४३१९७७ | ४१३७० | ८१६९५ | ५२३१९ | ३५५५९६ |

आधार - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

प्राथमिक कृषि सहकारी संस्थाचा १९९० ते २००० या सालातील प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे ग्रामीण भागातील कार्य पाहिले, तर 'एक गाव - एक संस्था' या प्रमाणे संस्थांच्या संख्येत वाढ किंवा प्रगती दिसून येत नाही. परंतु एकूण खातेदारांची वाढ लक्षात येते तसेच जिल्हा सहकारी बँकेकडून संस्थेने घेतलेले कर्ज, खेळते भांडवल यात वाढ दिसून येते. तसेच संस्थेने वाटप केलेले अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जदार संस्था व कर्जाची रक्कम यात वाढ झाली तसेच कर्ज वितरण होत असतानाच थकबाकीदार सभासद संख्या व त्यांच्याकडे येणे असलेली रक्कम यातही वाढ होत गेली आहे. कर्जवितरण व शेतीविकासाबरोबर वाढती थकबाकी व त्यातून संस्थेचे वसुली प्रमाण शेतकऱ्यांकडून होणारी कर्जपरतफेड दिरंगाई लक्षात येते.[१७]

**४.२ उद्योगधंदे :**

महाराष्ट्राचे जलद गतीने औद्योगिकरण होत गेल्यास कृषी व्यवसायाचे आधुनिकीकरण घडवून आणण्यास मदत होईल. सध्या कृषी व्यवसायात अतिरक्त श्रम संख्या गुंतली आहे, ती औद्योगिक क्षेत्रात सामावून घेता येईल. महाराष्ट्र हे भारतामधील एक महत्त्वाचे औद्योगिक राज्य आहे. मुंबईला 'भारताची औद्योगिक राजधानी' असे म्हटले जाते. महाराष्ट्रात परंपरागत कृषी उत्पादनावर आधारित साखर व कापड गिरण्यांचा विकास झालेला आहे. त्याचप्रमाणे रसायन, पेट्रोलियम, धातू उद्योग, परिवहन सामग्री यांचाही विकास झाल्याने औद्योगिकरणाचा वेग वाढलेला आहे. एखादया राज्याचा विकास होण्याकरिता पायाभूत गोष्टींची आवश्यकता असते. या दृष्टीने महाराष्ट्रातील विविध ओद्योगिक विकास महामंडळे, मुंबई एक अंतरराष्ट्रीय बंद, वाहतूक व संदेशवहणाच्या आधुनिक सुविधा, वित्तीय संस्था व महामंडळे, पाणी, वीज, रस्ते इत्यादींच्या सुविधा, मुंबई, ठाणे, पुणे सारखी औद्योगिकदृष्टया महत्त्वाची शहरे राज्याच्या औद्योगिक विकासामधील मोलाचा वाटा उचलीत आहेत.

'आर्थिक घडामोडीच्या संदर्भात विशिष्ट पध्दतीने उत्पादनप्रक्रिया राबवण्याच्या व्यवस्थेला फॅक्टरी सिस्टम (कारखाना पध्दत) असे म्हणतात.' फक्त उत्पादन करण्यासाठी बांधलेल्या इमारतीमध्ये आवश्यक ती यंत्रे आणि अन्य सुविधा पुरविलेल्या असतात. त्या इमारतींना कारखाना (फॅक्टरी) असे म्हणतात. कामगार आपली घरे सोडून त्या ठिकाणी मोठया संख्येने एकत्र जमतात व उत्त्पादनप्रक्रियेत आपले काम पार पाडतात. पारंपारिक अशा घरगुती उत्पादन व्यवस्थेची जागा या कारखाना (फॅक्टरी) व्यवसायाने घेतली, म्हणजे ती औद्योगिकरणाची प्रक्रिया मानली जाते. [१८]

'उद्योग' या संज्ञेत प्रचलित अर्थाने अनेक आर्थिक व्यवहारांचा समावेश होतो. परंतु औद्योगिक अर्थशास्त्रात उद्योग या शब्दला मर्यादित अर्थ आहे. या संदर्भात म्हणजे ज्या उत्पादनसंस्थांत नैसर्गिक साधनसामग्रीवर प्रक्रिया करुन उपभोग्य किंवा पुढील उत्पादनप्रक्रियेस उपयुक्त असा एकच प्रकारचा माल निर्माण केला जातो, अशा उत्पादन संस्थांचा समूह उद्योग या संज्ञेत उपभोग्य व उत्पादक वस्तूंचे उद्योग, कुटिरोद्योग, लघुउद्योग व हस्त व्यवसाय यांचा समावेश होतो. त्याचबरोबर या व्यापक वर्गीकरणातील प्रत्येक प्रकारच्या उद्योगातसुध्दा अनेक उद्योग आहेत. उद्योग म्हणजे एकाच प्रकारच्या वस्तू निर्माण करणाऱ्या अनेक उत्पादन संस्थांचा समूह होय.[१९]

**महाराष्ट्राचा औद्योगिक विकास :-**

'औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे, असे अभिमानाने सांगण्यात येते, कारण महाराष्ट्राची लोकसंख्या देशाच्या ७% असली, तरी देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २०% उत्पादन महाराष्ट्रात होते. देशातील एकूण उत्पादक भांडवलाच्या २३ % उत्पादन मूल्याच्या २७% आणि एकूण मालाच्या २४% वाटा महाराष्ट्राचा आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख उद्योग म्हणजे कापड, रसायने व रासायनिक पदार्थांचे उत्पादन, औषधे सर्वसाधारण आणि विद्युत अभियांत्रिकी, वाहतूक व वाहतूकींची उपकरणे, साखर कारखाने, तेलशुध्दी कारखाने, प्लास्टीक, मुद्रणालय, काच, साबन, इलेक्ट्रॉनिक हे होत. याशिवाय खादयवस्तू व रबरीवस्तू हे दोन उद्योग महाराष्ट्रामध्ये महत्त्वाचे आहेत. कापड गिरण्यांचा उद्योग महाराष्ट्रामध्ये फार पूर्वीपासून असून एकंदर उद्योगामध्ये त्याचे स्थान पहिले आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील वैशिष्टय म्हणजे सहकारी उद्योगांच्या बाबतीत महाराष्ट्राने देशापुढे ठेवलेला आदर्श'[२०]

**महाराष्ट्रातील उद्योगधंदयाचे प्रकार :-**

१) कृषी उत्पादनावर आधारित उद्योग यामध्ये कापड उद्योग, साखर उद्योग, तेलगिरण्या, तंबाखू प्रक्रिया उद्योग यांचा समावेश होतो.

२) खनिज उत्पादनावर आधारित उद्योग यामध्ये लोहपोलाद उद्योग, सिमेंट उद्योग, खनिजतेल, यंत्रउद्योग यांचा समावेश होतो.

३) वन उत्पादनावर आधारित उद्योग यामध्ये लाकूड कापण्याच्या गिरण्या, कागद कारखाने, आगपेटयांचे कारखाने, औषधे खेळांचे साहित्य, फर्निचर निर्मिती उद्योग यांचा समावेश होतो.

४) प्राणिज उत्पादनावर आधारित उद्योग यामध्ये कातडी उद्योग लोकरी कापडाच्या गिरण्या, रेशीम उद्योग, दूधापासून पदार्थ बनविणे यांचा समावेश होतो.

अहमदनगर शहरापासून १२ ते १५ कि.मी. अंतरावर नगर-नाशिक रोडवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने क्षेत्रात किर्लोस्कर बोअरींग, गरवारे नायलॉन, इंडीयन सिमलेस, क्रॉम्पटन ग्रिव्हज, रॅलीज इंडीया, इंडीया फोर्जिंग, चाकण ऑईल मोल, सहयाद्री स्ट्रक्चरलस, बुटस इंडीया इ. कंपन्यांनी उत्पादन सुरु केले होते. या सर्व कारखान्यात स्थानिक कुशल व अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध झाला होता. १९९९ अखेर ७४३ नोंदणीकृत उद्योगधंदे कार्यान्वित होते. त्यातील कामगारांची संख्या २३५५३ इतकी होती.

साखर उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हयात १४ सहकारी कारखाने कार्यान्वित होते. ऊस क्षेत्रात वाढ झाल्याने साखरेचे उत्पादनात वाढ झालेली दिसते. कारखान्यातून साखर उत्पादनाव्यतिरिक्त देशी दारु, कागद, मद्यार्क, वगैरे उत्पादने केली जातात. साखर कारखान्यामुळे अनेक छोटया मोठया उद्योगांची वाढ होऊन ग्रामीण भागात अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

जिल्हा उद्योग केंद्र ग्रामीण व कुटीर उद्योगांच्या विविध योजना राबविण्यासाठी तसेच उद्योजकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हयात मे १९७८ मध्ये उद्योग केंद्र स्थापन करण्यात आले. लघु उद्योग घटकांची नोंदणी, प्राथमिक सुविधा, कच्चा माल उपलब्ध करुन देणे सहकारी औद्योगिक वसाहतींना अर्थ साहाय्य करणे, नवीन उद्योगांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे, बाजारपेठ मिळविण्यासाठी केंद्रामार्फत मदत केली जाते.[२१] विविध उद्योगधंद्याचे प्रकारानुसार दक्षिणेत उपलब्ध कच्चा शेतमालापासून जिल्हयात उद्योगधंदे कार्यान्वित दिसतात. तसेच या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे. परंतु दुष्काळी परिस्थिती पाहता दक्षिणेतील फक्त नगर, पारनेर या दोनच तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक वसाहत विकसित झालेली आहे. इतर तालुकयात साखर उद्योग त्यावर आधारित व्यवसाय आढळून येतात. पाहिजे त्या प्रमाणात उद्योगधंदे दक्षिणेत विकसित झालेले नाहीत. त्यामुळे औद्योगिक विकास हा झालेला दिसून येत नाही. याचाच परिणाम रोजगारावर झालेला आहे. २००० नंतर पारनेर तालुक्याच्या सुपा-वाघुंडे, नगर-पुणे मार्ग या परिसरात नुकतीच एम.आय.डी.सी. सुरु झाली आहे. त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे.

त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत झाली. शेती व्यवसाय हा तर नगरदक्षिण भागाचा प्रमुख व्यवसाय असल्याचे दिसते.

### ४.३ शेती व्यवसाय :-

'जगातील प्रत्येक देशात शेती हा महत्त्वपूर्ण व्यवसाय आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांशिवाय इतर अनेक बाबतीत माणूस शेतीवर अवलंबून असतो. भटके जीवन संपुष्टात येवुन स्थिर स्वरुपाच्या स्थायी जीवनाचा प्रारंभ केवळ शेतीमुळे झाला. भटक्या स्थितीतील मानवीसमूह अन्नसंकलन, शिकार, मासेमारी करण्यासाठी भटकत असत. परंतु अशा स्थितीतही समुहातील स्त्रिया, लहानमुले, वृध्द, आजारी व्यक्ती काही दिवस झाडांच्या आडोशाला किंवा गुहेत, खडकांच्या कपारीत राहत असत; अशा वास्तव्याच्या काळात केलेल्या निसर्ग निरीक्षणातून शेतीचा शोध लागला. इतस्ततः पडलेल्या फळांमधील बिया, वनस्पतींच्या फांद्या, मुळे यातूनच काही काळाने नवीन रोपे उगवतात व कालांतराने पूर्ण वाढतात. असे महत्त्वाचे निरीक्षण स्त्रियांनी केले. वास्तव्याच्या ठिकाणी काही जागा स्वच्छ करुन त्यांनी बिया रोवून लावल्या तर त्यातून त्याच प्रकारची वनस्पती उगवते असे दिसून आले. स्त्रियांनी शेतीचा शोध लावला हे आता सिध्द झाले आहे.'[२२]

'भारतासारख्या खंडप्रायदेशास कृषी संस्कृतीचा फार मोठा इतिहास आहे. शेती हा भारताचा कणा आहे. जरी राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा कमी झाला असला तरी अजूनही खूप मोठया लोकसंख्येचा तो शाश्वत मूलाधार आहे. शेती क्षेत्राकडून उद्योगांना अनेक प्रकारचा कच्चामाल प्राप्त होतो. वस्त्रोद्योग व साखरउद्योग हे कृषीमाल आधारित उद्योग भारतात भरभराटीस आले आणि गेल्या काही वर्षात अन्नप्रक्रिया उद्योगसारखे नवीन उद्योगही आघाडीवर आले आहेत. भारताच्या निर्यातीतही कृषिउत्पादने अग्रस्थानी आहेत. भारत अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला असला तरी वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करणे आव्हानात्मक ठरते आहे.'[२३] अन्न सुरक्षा, शेतीतील नवीन तंत्रे, प्रयोग यामुळे दक्षिणेतील शेतीक्षेत्रातही तालुकानिहाय आमूलाग्र बदल झाले आहेत.

'विसाव्या शतकाच्या अंतिम चरणात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये मोठे बदल घडून आले. साधारणतः १९८५ नंतर वेगाने घडून आलेल्या या बदलांना 'जागतिकीकरण' (Global isation) म्हटले जाऊ लागले. त्यामुळे देशांच्या अर्थव्यवस्था प्रभावित झाल्या. 'अॅडम स्मिथ' यांच्या

काळापासून मुक्त व्यापाराच्या तथाकथित लाभांचा जो हिरिरीने पुरस्कार केला जात होता. त्याचेच आधुनिक रुप म्हणजे जागतिकीकरण होय'[२४]

१९९० पासून भारतासारख्या काही मोजक्या देशांनी जो वेगाने विकास केला त्याचे श्रेय जागतिकीकरणाला दिले जाते. जागतिकीकरणामुळे विदेशी भांडवलाचा प्रवाह मुक्तपणे येत आहे. वस्तू व सेवांची मुक्त आयात-निर्यात प्रगत देशांमधील अनेक आधुनिक दर्जेदार वस्तू विकसनशील देशातील नागरिकांना सहज मिळू लागल्या. विदेशी कंपन्यांशी सहयोग करण्याला चालना मिळाली. आधुनिक तंत्रज्ञान लागू केल्यामुळे उत्पादकतेमध्ये वाढ झाली. आयात निर्यातीवरील बंधने कमी होताच जागतिक व्यापारात आणि विविध देशांच्या व्यापारात लक्षणीय वाढ झाली. या विविध कायदयांबरोबर जागतिकीकरणामुळे शेती व ग्रामीण विकास यांच्यावर परिणाम झालेले दिसून येतात. शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ, शेतजमिनीचा पर्यायी वापर (निवासी जागा, रस्ते, शाळा, दवाखाने इ.) शेतमालाच्या नियंत्रणाचा प्रश्न यामुळे ग्रामीण जनतेला तंत्र विकसित करता येईल असे नसून आदिवासींना जागतिकीकरणाचा अवलंब करणे शक्य नाही त्यामुळे शेती विकासात काही अंशी बदल दिसून येतात.[२५]

शेती हा मानवाचा सर्वात प्राचीन व्यवसायापैकी एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. 'कृष' म्हणजे नांगरणे या शब्दापासून कृषी हा शब्द बनला आहे. जमीन नांगरुन त्यात धान्य पेरणे व त्याची काळजी घेणे, त्यापासून धान्य मिळविणे म्हणजे शेती होय. मानवाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारे अन्नधान्य, डाळी, भाजीपाला, फळे, पुरविण्याची जबाबदारी शेती क्षेत्रामार्फत समर्थपणे सांभाळली जाते. त्याच बररोबर उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल शेतीतून प्राप्त होतो. मानवी संस्कृतीच्या उत्पत्तीपासून भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनात शेतीची फार महत्त्वाची भूमिका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. महाराष्ट्रातील ६०% जनता प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे.'[२६]

शेती व्यवसाय हा तर नगर जिल्हयाचा प्रमुख व्यवसाय असल्याचे दिसते. पावसाचे पाणी, विविध प्रकारची सिंचन व्यवस्था यातून विविध प्रकारची पिके घेतली जातात. यामध्ये प्रामुख्याने ऊस, ज्वारी, गहु, बाजरी, फळबाग व इतर पिके घेतली जातात. ऊस उत्पादनावर आधारीत साखर उद्योग हा दक्षिण भागाचा प्रमुख व्यवसाय आहे.

**भूमी उपयोजन (Land Utilization) -**

जमीन ही एक नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. यांच्या पूर्ततेसाठी मानव जमिनीचा उपयोग करतो. जमीन योग्य प्रकारे वापरुन त्यावर मानवाचा विकास अवलंबून आहे. 'कोणत्याही प्रदेशातील जमिनीचा वेगवेगळया हेतूंनी केला जाणारा वापर म्हणजेच भूमी उपयोजन होय.'[२७]

अहमदनगर जिल्हयाचे दक्षिण भागातील तालुकानिहाय एकूण १) भौगोलिक क्षेत्र, २) जंगलव्याप्त क्षेत्र, ३) शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र यामध्ये बिगर शेती वापराखालील जमीन, पडीत लागवडी लायक नसलेली जमीनीचा समावेश आहे. ४) पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेली जमिन यामध्येलागवडी लायक पण वापरात नसलेली, गुरे चराऊ जमीन, झाडा-झुडपाखालील जमिनीचा समावेश आहे. ५) पडीत जमीन यात चालू पड, इतर पड जमीन क्षेत्रफळ दर्शविते, लागवडीखालील एकूण क्षेत्र अशी सविस्तर माहिती पुढील तक्त्यामध्ये उपलब्ध आकडेवारीनुसार जमिनीचा वापर दर्शविला आहे.[२८]

**जमिनीचा वापर**

**(क्षेत्र '००' हेक्टर)**

| अ.क्र. | तालुका | वर्ष | एकूण भौगोलिक क्षेत्र | जंगल व्याप्त क्षेत्र | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेली जमीन | पडीत जमीन | लागवडी खालील क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर | १९९०-९१ | १५०३ | १३२ | २८ | १९७ | ७८ | ११८१ |
| | | १९९१-९२ | १५०३ | १३२ | २८ | १२७ | ७६ | १२१० |
| | | १९९२-९३ | १५०३ | १३२ | २४ | १२७ | ७६ | ११५३ |
| | | १९९३-९४ | १५०३ | १३२ | ४८ | ११५ | २९ | १४०३ |
| | | १९९४-९५ | १५०३ | १३२ | ४८ | १२७ | ११५ | ११६५ |
| | | १९९५-९६ | १५०३ | १३२ | २८ | १२५ | ०७ | १३०७ |
| | | १९९६-९७ | १५०३ | १३२ | १६१ | १५ | १२६ | १११९ |
| | | १९९७-९८ | १५०२७२ | १३१६५ | ४८४७ | १२४६६ | १६९३३ | १०८५४५ |
| | | १९९८-९९ | १५०२७२ | १३१६५ | ४८४७ | १३००८ | ७१०५ | १३४४०२ |
| | | १९९९-२००० | - | - | - | - | - | - |
| २ | पाथर्डी | १९९०-९१ | ११९९ | १२ | - | - | १८१ | १२६८ |
| | | १९९१-९२ | ११९९ | १०८ | २३ | २३ | १७ | ११८६ |
| | | १९९२-९३ | ११९९ | ५६ | - | - | - | १०५५ |
| | | १९९३-९४ | ११९९ | ६४ | १४ | १४ | ५ | ११९३ |
| | | १९९४-९५ | ११९९ | ४५ | १२ | १२ | १०२ | १०२२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५-९६ | ११९९ | ६४ | ०९ | ०९ | १३२ | १००७ |
| | | १९९६-९७ | ११९९ | ६४ | ३४ | ३४ | १०३ | १०१५ |
| | | १९९७-९८ | ११९९४५ | ६५२५ | १७९२ | १४१० | ४२५० | ११०७१८ |
| | | १९९८-९९ | ११९९४५ | ६५२५ | १८४० | १४१० | ४१२८ | ११०६६७० |
| | | १९९९-२००० | - | - | - | - | - | - |
| ३ | जामखेड | १९९०-९१ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | ९६ | ६३२ |
| | | १९९१-९२ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | ६० | ८७० |
| | | १९९२-९३ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | १३ | ७५८ |
| | | १९९३-९४ | ८७६ | ३८ | ५४ | ८९ | ०० | १०४३ |
| | | १९९४-९५ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | ४९ | ९६९ |
| | | १९९५-९६ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | १२ | ७५४ |
| | | १९९६-९७ | ८७६ | ३८ | ४४ | ८८ | १५ | ७५४ |
| | | १९९७-९८ | ८७६२७ | ३७७२ | ५३९४ | ८७६४ | १२६९ | ७४२९२ |
| | | १९९८-९९ | ८७६२७ | ३७७२ | ५३९७ | २५८३ | ८२६६ | ७२८४० |
| | | १९९९-२००० | ८७६ | - | - | - | - | - |
| ४ | कर्जत | १९९०-९१ | १४९२ | १३१ | १९६ | ७३ | ११० | १०२९ |
| | | १९९१-९२ | १४९२ | १३१ | १६७ | ७३ | १५७ | १०१४ |
| | | १९९२-९३ | १४९२ | १३१ | १६७ | ६४ | १८३ | ९९१ |
| | | १९९३-९४ | १४९२ | १३१ | १७० | ७० | ६१ | ११८८ |
| | | १९९४-९५ | १४९२ | १३१ | १६३ | १६७ | ६५ | १०१५ |
| | | १९९५-९६ | १४९२ | १३१ | १६३ | १६७ | ५९ | १०२५ |
| | | १९९६-९७ | १४९२ | १३१ | १६३ | १६८ | ६५ | १०११ |
| | | १९९७-९८ | १४९१९७ | १३०६८ | १६९९२ | ६७४५ | २४७६ | ११५९१५ |
| | | १९९८-९९ | १४९१५७ | १३०६८ | १६९९२ | ६७४५ | ८७४१ | १०८०४६ |
| | | १९९९-२००० | १४९२ | - | - | - | - | - |
| ५ | श्रीगोंदा | १९९०-९१ | १६०५ | १६२ | १६० | ६० | ३० | १२५३ |
| | | १९९१-९२ | १६०५ | १६२ | १६० | ६० | २९ | १२४८ |
| | | १९९२-९३ | १६०५ | १६२ | १६८ | ६४ | ६० | १२३४ |
| | | १९९३-९४ | १६०५ | १६२ | ३३ | २५ | २४० | १२५१ |
| | | १९९४-९५ | १६०५ | १६२ | १८ | ६३ | २६५ | १११४ |
| | | १९९५-९६ | १६०५ | १६२ | १८ | ९० | २३९ | ११०६ |
| | | १९९६-९७ | १६०५ | १६२ | १८ | ९० | २३७ | ११४४ |
| | | १९९७-९८ | १६०४८१ | १६२१० | २७१५ | ९०६७ | १८१२७ | ११८१६४ |
| | | १९९८-९९ | १६०४८१ | १६२१० | २७१५ | ९६०९ | २३५५२ | १३७३८७ |
| | | १९९९-२००० | १६०५ | - | - | - | - | - |
| ६ | पारनेर | १९९०-९१ | १८६८ | १६२ | २३१ | ४२ | ९६ | १४१३ |
| | | १९९१-९२ | १८६८ | १६२ | २३० | ४१ | ९५ | १४१३ |
| | | १९९२-९३ | १८६८ | १६२ | २५९ | ९२ | ७४ | १५०३ |
| | | १९९३-९४ | १८६८ | १६२ | २४६ | ८८ | १६ | १७१७ |
| | | १९९४-९५ | १८६८ | १६२ | २०८ | ७६ | ५६ | १३९० |
| | | १९९५-९६ | १८६८ | १६२ | २०७७ | ७८ | ६१ | १३७७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९६-९७ | १८६८ | १६२ | २४५ | १२४ | १०५ | १२८३ |
| | | १९९७-९८ | १८६७९० | २३५१५ | २३६७१ | ७०८९ | ३२०१ | १३६२१२ |
| | | १९९८-९९ | १८६७९० | २३५१५ | २३६९६ | ८२७८ | ३६८५ | १३६१८७ |
| | | १९९९-२००० | १८६८ | - | - | - | - | - |

जमिनीचे वापरानुसार वर्गीकरण तक्त्यावरुन नगर दक्षिणेतील एकूण भौगोलिक क्षेत्र तालुकानिहाय व त्यातून एकूण लागवडीखालील क्षेत्र अभ्यास करता तालुकानिहाय लागवडीखालील क्षेत्रात १९९० पासून उपलब्ध आकडेवारीवरुन घट दिसून येते. त्यामुळे शेतीविकास कमी जाणवतो. उत्पादन कमी झाल्याचे दिसते.

**पीक पध्दती, पिकांखालील क्षेत्र :-**

'अहमदनगर जिल्हयात खरीप, रब्बी, उन्हाळी असे तीन कृषी उत्पादनाचे हंगाम प्रचलित असून खरीप हंगामात बाजरी, खरीप ज्वारी, तांदूळ, चारापिके, कडधान्ये, गळीताची पिके घेतली जातात. रब्बी हंगामात गहू, ज्वारी, हरभरा अशी पिके घेतात, तर ओलिताची व्यवस्था असणाऱ्या क्षेत्रात उन्हाळी भूईमूग, मका, भाजीपाला पिके घेतली जातात. ऊस हे नगदी पीक मोठया प्रमाणात घेतले जाते.[२९] दक्षिणेतील निरनिराळया प्रमुख पिकांखालील क्षेत्र पुढील तक्त्यातून दर्शविले आहे.

**तालुकावार निरनिराळया पिकांखालील क्षेत्र**

**(क्षेत्र हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | तालुका | वर्ष | गहु | ज्वारी | बाजरी | एकूण कडधान्य | ऊस | एकूण फळे व भाजीपाला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर | १९९०-९१ | ६४७० | ७१८३१ | १२९२३ | ९११५ | १६७७ | ११७७ |
| | | १९९१-९२ | ६२६६ | ६४४४१ | २३०८७ | १०२३५ | १४५९ | १५५४ |
| | | १९९२-९३ | ९४१२ | ७१५७८ | १७२१९ | ९७६६ | २६४३ | १९०५ |
| | | १९९३-९४ | ६८२० | ८०७३२ | १९३३६ | १६५६३ | ९३५ | १०६७ |
| | | १९९४-९५ | ३२८१ | ७०६८६ | १७३७३ | ७५९० | ९३५ | ११४९ |
| | | १९९५-९६ | ५८१५ | ७१८८१ | १६२१५ | १२१३ | ५४८ | ११७० |
| | | १९९६-९७ | ३९२२ | ७६३४७ | १२४४५ | ८१८७ | १६२३ | ५८५ |
| | | १९९७-९८ | २३४ | ६०७२२ | १६८९० | ८२७२ | ५८४ | १९७५ |
| | | १९९८-९९ | २३ | ७४७७९ | १००४० | ३८३२ | ५६३७ | १५२७ |
| | | १९९९-२००० | ४४१५ | ६११४० | १८३२५ | १३८१४ | ४७० | १२२५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पाथर्डी | १९९०-९१ | २२१७ | ३१०१९ | ५२१८३ | ६५०० | २५८८ | ७२५ |
| | | १९९१-९२ | ६३६७ | ३७९३६ | ५४२३६ | ७३३४ | १४७४ | ७९६ |
| | | १९९२-९३ | ४८०६ | ४४९२७ | ५६०५० | ८११८ | ९०१ | १२९८ |
| | | १९९३-९४ | २७७१ | ५२२६५ | ३९८५२ | ८३५७ | १००५ | ११६९ |
| | | १९९४-९५ | ५६४५ | १३०६७ | ५१५५७ | ५५८४ | १०२४ | ८५३ |
| | | १९९५-९६ | १७६६ | ३२३७३ | ४९८४३ | ७९९४ | ९११ | ८१८ |
| | | १९९६-९७ | २५९८ | ३२५७८ | ५२४९१ | ६२२० | ११२१ | ५८३ |
| | | १९९७-९८ | २५५५ | ५२२५१ | ४९७५९ | ८३४७ | ८१७ | ९६७ |
| | | १९९८-९९ | ४८०५ | ४०८५४ | ४५१६१ | ४७२३ | २८१० | ९५४ |
| | | १९९९-२००० | १४६६ | ३२०७७ | ५०९९५ | ४९३९ | २७१४ | १५५० |
| ३ | जामखेड | १९९०-९१ | १३२४ | ३८०१२ | ५२८० | ४४०५ | ७४० | ४३३ |
| | | १९९१-९२ | १००० | ५५६२० | ९४१७ | ५७०३ | ६४१ | ४१६ |
| | | १९९२-९३ | ९१४ | ५०३२७ | १२७०५ | ९१९३ | ११५८ | ४६० |
| | | १९९३-९४ | ९१३ | ६१३३७ | १२७९२ | ७६६६ | ३१५२ | ४७८ |
| | | १९९४-९५ | ८९३ | ५३३७२ | १४८७१ | ९८५९ | १३७६ | ६५६ |
| | | १९९५-९६ | ७९६ | ४९६५५ | ११२१५ | १८६० | ३९० | ३४३ |
| | | १९९६-९७ | १६१५ | ५८००६ | ११९१८ | १२७० | ३७१ | ३१९ |
| | | १९९७-९८ | ६१५ | ४५२६० | १६३३२ | २४९३ | १६५ | २८५ |
| | | १९९८-९९ | ९१० | ५६२५९ | ७५३८ | २६८१ | १३६७ | ३७४ |
| | | १९९९-२००० | १३२० | ४५५३६ | १४६३७ | २११७ | २९५ | ३१८ |
| ४ | कर्जत | १९९०-९१ | २०२१ | ७७३२३ | ४३०० | ४९३७ | २०४० | ७८० |
| | | १९९१-९२ | २६९६ | ६९५३५ | ६०२८ | ८३२६ | २३८२ | ८१० |
| | | १९९२-९३ | ४०७० | ६०९८७ | १०८११ | ७८५६ | १५०५ | ६७० |
| | | १९९३-९४ | ५११० | ८१५३८ | १०२११ | ७५५२ | १३२४ | ७३७ |
| | | १९९४-९५ | २५४० | ७१६८८ | ८२११ | ८१६८ | १२५२ | ८२१ |
| | | १९९५-९६ | २४२२ | ७००४ | ९१०१ | ६८८८ | १४३० | ९६७ |
| | | १९९६-९७ | ३५११ | ७२३८५ | ९११० | ९००३ | १३१० | ८९१ |
| | | १९९७-९८ | ३०११ | ८८३०३ | ८२२५ | ७१३६ | ० | १२६४ |
| | | १९९८-९९ | ४०१० | ६८१६४ | ६३६० | ११९१७ | २२६५ | ९१२ |
| | | १९९९-२००० | २९२४ | ७८५७० | ८९४० | ९८५७ | २५८८ | १५४५ |
| ५ | श्रीगोंदा | १९९०-९१ | ८४८० | ९०४५० | ३१९० | ३९५७ | ५१८० | १७९२ |
| | | १९९१-९२ | ७८५० | ८०४४३ | ४२५० | ६०५० | ४८०० | १९२० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९२-९३ | १९३५ | ९६५५६ | ९०५६ | ४४१७ | ३८६० | ८९२ |
| | | १९९३-९४ | ६१८५ | ८७०२० | ५०१० | ५६५६ | ४०९२ | १०५४ |
| | | १९९४-९५ | ३५९१ | ७२८५ | ४८१० | ६५८५ | ५७८० | १६०५ |
| | | १९९५-९६ | २२८० | ७४४६ | ४८५० | ७८८७ | ६३५० | १४९४ |
| | | १९९६-९७ | ११३६४ | ७०३५० | ४२९३ | ८४१३ | ५२६७ | ४४७६ |
| | | १९९७-९८ | ११११८ | ६९२७५ | ८३०५ | ७४१३ | १२६५ | ४१३३ |
| | | १९९८-९९ | १८१३५ | ८७८१२ | १८०५ | ५१८५ | ६३७५ | २९१२ |
| | | १९९९-२००० | १२२५० | ७११७५ | ३८८४ | ५५ | ७४४० | ४८९६ |
| ६ | पारनेर | १९९०-९१ | ३५१८ | ६५६२३ | ४४०४७ | १२७७८ | १२७४ | ३९४४ |
| | | १९९१-९२ | ३९४८ | ७५६४८ | ४५०८० | १३७५० | १२५० | ३८८७ |
| | | १९९२-९३ | २७८९ | ५६८२२ | ५८८३६ | १५०९९ | १२४८ | ३८४० |
| | | १९९३-९४ | ५९०३ | ९२००६ | ३७४७६ | १८५१९ | ७६१ | ४११८ |
| | | १९९४-९५ | ६५२७ | ९४८९७ | ३८४४२ | १४३३६ | २६१० | ३८८२ |
| | | १९९५-९६ | ६८८५ | ५५९४० | ३८५६० | १४२१९ | १३६६ | ३३८७ |
| | | १९९६-९७ | ४९२९ | ७५१३२ | २२१३८ | १३५३५ | १७१० | २९७४ |
| | | १९९७-९८ | १३९३५ | ११८६० | १६७६० | १८९३९ | ० | ४०६५ |
| | | १९९८-९९ | ४९२९ | ९२१७८ | ३३३४५ | १५००१ | १५९७ | १५२७ |
| | | १९९९-२००० | ३२ | ७३९३० | ३४४४९ | २३१ | १६२६ | ६७१५ |

**जलसिंचन -** 'पाणी ही एक महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. मनुष्य, पशू, पक्षी, यांना पाण्याशिवाय जगता येत नाही. त्यामुळेच पाण्याला जीवनाची उपमा दिली जाते, शेतीसाठी पाणी हे जीवनसत्वाचे काम करते. पाणी म्हणजे शेतीचा रक्तपुरवठा आहे. पाणीपुरवठयाच्या सोयींना शेतीच्या रकतवाहिन्या म्हटले जाते. शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. ज्या भागात पावसाचे पाणी कमी आहे, तेथे सातत्याने दुष्काळास तोंड द्यावे लागते. पावसाचा अनियमितपणा आणि पावसाचे कमी प्रमाण याचा शेतीवर विपरीत परिणाम झालेला आहे.'[३०]

'अहमदनगर जिल्हयाचे एकूण लागवडीलायक क्षेत्रापैकी जे क्षेत्र ओलिताखाली आहे त्या क्षेत्राची तालुकानिहाय दक्षिणेतील आकडेवारी पुढील तक्त्यानुसार दर्शविली आहे.'[३१]

## विविध साधनांचे ओलिताखालील क्षेत्र

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | तालुका | वर्ष | ओलिताखालील क्षेत्र | | ओलिताखालील निव्वळ क्षेत्र | ओलिताखालील एकूण क्षेत्र | एकूण लागवडीखालील क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पृष्ठ.भागीय | विहिरी | | | | |
| १ | नगर | १९९०-९१ | ३६८ | २०९७० | २१३३८ | २५६०९ | १२०४४४ | २१.२६% |
| | | १९९१-९२ | ५२५ | २०७२० | २१२४५ | २३८८९ | - | - |
| | | १९९२-९३ | ५२५ | २२२७९ | २२८०४ | २५४२१ | ११५३३१ | २२.०४% |
| | | १९९३-९४ | ६४ | १२८९५ | १२९५९ | १४९२६ | १४०३१८ | १०.६४% |
| | | १९९४-९५ | ० | १०८६० | १०८६० | १२७२७ | १०५७८८ | १२.०३% |
| | | १९९५-९६ | ९१७ | १३०३३ | १३९५० | १६५१० | १०३०३३ | १६.०२% |
| | | १९९६-९७ | ७०० | १५००० | १५७०० | १६१७६ | १११८७२ | १४.४६% |
| | | १९९७-९८ | ० | १७२९८ | १७२९८ | २०१४९ | १०४५१८ | १९.२८% |
| | | १९९८-९९ | ३५९४ | ६०५८ | ९६५२ | ११२०४ | १३४४०२ | ८.३४% |
| | | १९९९-२००० | ३३५ | २०१२९ | २०४६४ | २३४३० | १२४६८ | १९.४५% |
| २ | पाथर्डी | १९९०-९१ | ६१५ | १४७४० | १५३५५ | १७५४९ | १२६७६२ | १३.८४% |
| | | १९९१-९२ | २८५५ | ८४३२ | ८४३२ | ९४०० | - | - |
| | | १९९२-९३ | - | ६०४९ | ६०४९ | ६०४९ | १०९५२४ | ०५.७३% |
| | | १९९३-९४ | १६८ | ६४७३ | ६६४२ | ९७६१ | ११९३४५ | ८.१८% |
| | | १९९४-९५ | ५६८ | ३९९९ | ४५६७ | ७१०२ | १०१२८२ | ७.०१% |
| | | १९९५-९६ | ५६० | ५२३६ | ५७९६ | ८५३४ | ११८४०७ | ७.२१% |
| | | १९९६-९७ | १३० | ८२०६ | ८३३६ | ९९५६ | १०१५१५ | ९.८१% |
| | | १९९७-९८ | ४०० | ८०८२ | ८४८२ | १२८६० | १०५२५३ | १२.२२% |
| | | १९९८-९९ | १३० | १८९०१ | १९०३१ | १९०३१ | १०४८५६ | १८.१५% |
| | | १९९९-२००० | ६६९ | १०५१४ | १११८३ | १४४३० | ९७६५० | १४.७८% |
| ३ | जामखेड | १९९०-९१ | १५० | १५८९० | १६०४० | १८३१० | ९०४०७ | २०.२५% |
| | | १९९१-९२ | १५०० | ८२६८ | ९७६८ | ११३९३ | - | - |
| | | १९९२-९३ | १५०६ | ४०८० | ५५८६ | ८०५६ | ७५७५७ | १०.६३% |
| | | १९९३-९४ | २५७ | ९९७६ | १०२३३ | १२५६६ | १०४३३१ | १२.०४% |
| | | १९९४-९५ | ७८ | १०६८१ | १०७५९ | १३२३९ | १०९२२३ | १२.१२% |
| | | १९९५-९६ | ० | ८४५९ | ८४५९ | १२४९३ | ९६९६१ | १२.८८% |
| | | १९९६-९७ | १५२५ | ६२६९ | ७७९४ | १२१६४ | ७५४३८ | १६.१२% |
| | | १९९७-९८ | २३७७ | ६३८० | ८७५७ | १२२०० | ९६२२५ | १२.६८% |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९८-९९ | ८४४० | १३३८० | २१८२० | २४१४९ | ७२८४० | ३३.१५% |
| | | १९९९-२००० | १२९० | ६८४० | ८१३० | १०४०० | ७५४६० | १३.७८% |
| ४ | कर्जत | १९९०-९१ | ९०३९ | ११३३२ | २०३७१ | २३१०० | १०९०५६ | २१.१८% |
| | | १९९१-९२ | ४०३९ | ११३७० | १५४०९ | १८४८१ | - | - |
| | | १९९२-९३ | ४०३९ | ११३८३ | १५४२२ | १६९०९ | ७६२६२ | २२.१७% |
| | | १९९३-९४ | ० | ९३९४ | १५०५९ | १६०५९ | ११८८१६ | १४.९०% |
| | | १९९४-९५ | ० | १३७५९ | १३७५९ | १६२७७ | १०९१६ | १४.९१% |
| | | १९९५-९६ | ० | १८३७५ | १८३७५ | २०८९३ | १११०७५ | १८.१८% |
| | | १९९६-९७ | ० | ११२६९ | ११२६९ | १७३२५ | १०१०९६ | १७.१४% |
| | | १९९७-९८ | ० | १५३१८ | १५३१८ | २०९६७ | ११६९५१ | १७.९८% |
| | | १९९८-९९ | ४००० | १२७५० | १६७५० | १७६२९ | १०८००४६ | १६.३२% |
| | | १९९९-२००० | १३५२ | १९३५५ | २०७००७ | २४९४८ | ११२०२३ | २२.२७% |
| ५ | श्रीगोंदा | १९९०-९१ | १२५७१ | १७६३२ | ३०२०३ | ३५१६३ | १३२३१२ | २६.५८% |
| | | १९९१-९२ | १११४० | २३६९८ | ३४८३८ | ३६९७८ | १२६९६२ | २९.१३% |
| | | १९९२-९३ | १६७४० | १४५६२ | ३१३०२ | ३३६२२ | १२३३८२ | २७.२६% |
| | | १९९३-९४ | १५६७० | १६४५६ | ३२१२६ | ३४३०४ | १२५०५७ | २७.४८% |
| | | १९९४-९५ | १५४२५ | २५९४६ | ४१३९८ | ४४३१८ | ११८११९ | ३७.५२% |
| | | १९९५-९६ | १६४१० | २६६६६ | ४३०७६ | ४५९२६ | ११६४३१ | ३९.४४% |
| | | १९९६-९७ | ८१८० | २५५५ | ३३७३५ | ४८६०० | ११४३८८ | ४२.४९% |
| | | १९९७-९८ | १५५९० | ३५८९० | ५१५७० | ५५३३१ | १३०२९ | ४२.५२% |
| | | १९९८-९९ | १२८९५ | २३७०० | ३६५९५ | ४२६३५ | १३७३३८७ | ३१.०३% |
| | | १९९९-२००० | २६२५ | ३५४७५ | ३८१०० | ६०७८६ | ११४४७८ | ५३.७०% |
| ६ | पारनेर | १९९०-९१ | ३९७ | १७५०३ | १७९०० | २४३७७ | १७९४८९ | १३.५८% |
| | | १९९१-९२ | - | २२९८० | २२९८० | ३००३२ | १७५३३३ | १७.१३% |
| | | १९९२-९३ | ६८३४ | १२३७९ | १९२१३ | ३११५१ | १५०२७४ | २०.७३% |
| | | १९९३-९४ | ८०२८ | ८६०१ | १६६२९ | २४६४८ | १७१७०४ | १४.३५% |
| | | १९९४-९५ | ५८५६ | १०५०५ | १६३६१ | २४५४० | १७८५३४ | १३.७५% |
| | | १९९५-९६ | ३६९७ | १५३० | ५२२७ | १२०८६ | १८०९७२ | ६.६८% |
| | | १९९६-९७ | २२८५ | ९४९२ | ११७७७ | २१९३८ | १२८३३८ | १७.०९% |
| | | १९९७-९८ | ९०३४ | १४३१३ | २३३४७ | १६०७५ | १६१४२८ | ९.९६% |
| | | १९९८-९९ | ३००५ | ४५५१ | ७५५६ | १२३४५ | १५७७८८ | ७.४६% |
| | | १९९९-२००० | २०३३ | १५६३४ | १७६३७ | २७६६१ | १४५३४३ | १९.१७% |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, दक्षिण भागातील ओलिताखालील क्षेत्रापैकी श्रीगोंदा व कर्जत तालुक्याचे क्षेत्र जास्तीत जास्त टक्के दिसून येते तर पाथर्डी व नगर तालुक्याचे प्रमाण कमी दिसते. यावरुन दक्षिणेतील तालुके हे दुष्काळी तालुके व पावसाच्या पाण्यावर अवलंबून दिसतात. जिल्हयाच्या दक्षिण भागातील शेतीव्यवसाय अभ्यासत असताना प्रमुख पिके लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र, ओलिताखालील विविध प्रकल्पाच्या माध्यमातून आलेली जमीन आणि एकूण ग्रामीण जीवनमान १९९० नंतर जागतीकीकरण व त्याचा शेती व्यवसायावर झालेला परिणाम लक्षात येतो. अभ्यासावरुन असे म्हणता येईल की शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी वाढती महागाई तांत्रिकीकरण, सिंचन व्यवस्था, नैसर्गिक आपत्ती यातून शेतीव्यवसायात प्रगती कमी प्रमाणात दिसून येते.

**समारोप -**

राजकीय, सामाजिक कार्य व त्यातून तालुक्याचा झालेला उत्कर्ष सत्य स्वरुपात मांडत असतानाच महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि जिल्हयाच्या दक्षिण भागातील सहकार चळवळ त्यांच्यातील सहभागी नेते मंडळी, तालुकानिहाय विविध प्रकारच्या सहकारी संस्था, प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे कार्य सभासद संस्था, कर्जवाटप, यांचा सविस्तर अभ्यास केला आहे. तसेच जिल्हयातील उद्योगधंदे औद्योगिक विकास, शेतीव्यवसाय प्रमुख पिके लागवडीखालील क्षेत्र, तसेच सिंचन ओलिताखालील क्षेत्र व त्यावरुन घेतली जाणारी पिके आणि दुष्काळी परिस्थिती तसेच ग्रामीण जीवनमान व त्यातून आलेली आर्थिक सुबत्ता येण्यास झालेली मदत, रोजगार उपलब्धता, साखर कारखाने, उपलब्ध कच्च्या मालाची निर्मिती याचा सखोल अभ्यास केला आहे. यातून ग्रामीण जनतेचे जीवनमान समाधानकारक झाल्याचे दिसून येते.

राजकीय नेत्यांनी विविध संस्थाच्या माध्यमातून भूषविलेली पदे व स्थापन केलेल्या सहकारी संस्था यातून सामाजिक विकास साधत असतानाच आर्थिक सुबत्ता आली पाहिजे, ग्रामीण जीवनमान बदलले पाहिजे या दृष्टीने विविध सहकारी संस्था, पतसंस्था स्थापन केल्या व त्यामार्फत कर्जपुरवठा करण्याचे काम केले यातून शेतकरी व शेतीविकास होण्याच्या दृष्टीने परिश्रम घेतले. यातून सहकारी कारखानदारीमार्फत विकास करण्याकरिता मदत केली. परंतु वि.का. सोसायटी मार्फत १९९० ते २००० या काळात वाटप केलेले कर्जे पाहता त्यांची परतफेड करण्यात सभासद

शेतकरी अपयशी ठरले याचे मुख्य कारण म्हणजे शेतीव्यवसायाचा घडून आलेला विकास दिसून येतो. ओलिताखालील क्षेत्र, नैसर्गिक आपत्ती आणि पारंपारिक शेती हे होत.

१९९० ते २००० या काळात दक्षिण नगर भागात औद्योगिक विकास झालेला नाही. नगर, पारनेर हे दोन तालुके सोडता इतरत्र सहकारी साखर कारखाने सोडता इतर औद्योगिक विकास हा संस्थ गतीने दिसून येतो. त्यामुळे रोजगार उपलब्धता नाही. आर्थिक विकासदर मध्यम गरीब गरीबच राहिलेत, तर श्रीमंत श्रीमंतच बनल्याचे जाणवते आहे. आर्थिक स्थितीचा अभ्यास पाहता दक्षिणेतील स्थिती ही समाधानकारक वाटते. या आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक विकास सामान्य कुटुंबाचा झाला पाहिजे या दृष्टिकोनातून नेत्यांनी प्रयत्न केले आहेत. आपल्या तालुक्यात शैक्षणिक संस्थांची स्थापना करुन शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील दिसतात.

## तळटिपा

१) लक्ष्मणशास्त्री जोशी(संपा.), *"मराठी विश्वकोश खंड- २"*, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पुर्नमुद्रण, २०००, पृष्ठ. २०३.

२) आनंद यादव, *"सामाजिक जाणिव अधिष्ठाण अभ्यासक्रम"*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुनर्मुद्रण २०११, पृष्ठ. २१.

३) कित्ता; पृष्ठ. २१.

४) कित्ता; पृष्ठ. २१.

५) कित्ता; पृष्ठ. २३.

६) कित्ता; पृष्ठ. २३.

७) कित्ता; पृष्ठ. २५.

८) कित्ता; पृष्ठ. २५.

९) कित्ता; पृष्ठ. ३९.

१०) कित्ता; पृष्ठ. ३१.

११) कित्ता; पृष्ठ. ३१.

१२) कित्ता; पृष्ठ. ३२.

१३) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० ते २०००.

१४) आनंद यादव, उपरोक्त, पृष्ठ. ४३.

१५) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९०-२०००, पृष्ठ. १६

१६) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९० ते २०००.

१७) कित्ता; १९९०-२०००, पृष्ठ. ८८

१८) दत्तात्रय पाष्टे, *"डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १"*, डायमंड पब्लीकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पृष्ठ. ८११.

१९) लक्ष्मणशास्त्री जोशी(संपा.), उपरोक्त, पृष्ठ. - ७९३.

२०) लक्ष्मणशास्त्री जोशी(संपा.), *"मराठी विश्वकोश खंड - ३"* उपरोक्त, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पुर्नमुद्रण, २०००, पृष्ठ. - १३०.

२१) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९, पृष्ठ. - १४, १५.

२२) विजया साळुंके, *"उष्ण प्रदेशिय कृषी भूगोल"*, डायमंड प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, जुलै २०१०, पुनर्मुद्रण - २०११, पृष्ठ. १४.

२३) कित्ता; पृष्ठ. १५३.

२४) विजया कविमंडन, *"कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र"*, मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०१२, पृष्ठ. - ५०५.

२५) कित्ता; पृष्ठ. ५०८, ५१०.

२६) माधव बिराजदार, *"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था"* विद्या प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून २०१२, पृष्ठ. ८७.

२७) कित्ता; पृष्ठ. ८८.

२८) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९० ते २०००.

२९) कित्ता; पृष्ठ. ९.

३०) माधव बिराजदार, उपरोक्त, पृष्ठ. ११७.

३१) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा"*, उपरोक्त, १९९० ते २०००.

# प्रकरण - ५

# अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिणेतील शैक्षणिक स्थिती

## प्रकरण - ५

## अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिणेतील शैक्षणिक स्थिती

### ५.१ प्रस्तावना :-

### शिक्षण :-

'शिक्षणाचा उदय प्रागैतिहासिक काळात झाला. सुरुवातीच्या काळात कुटुंब हे शिक्षणाचे केंद्र व आई वडील, विशेषतः आई हे बालकाचे गुरु होत. पुढे हळूहळू जीवन व्यवहाराच्या कक्षा बदलत वाढत गेल्या व आई वडिलांना चरितार्थासाठी घराबाहेर वेळ काढावा लागला. त्यामुळे मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांना वेळ मिळेनासा झाला. पुढे 'उपजीविकेपुरते शिक्षण' हा विचार बदलून लिहिणे, वाचणे व अंकज्ञान असे स्वरुप शिक्षणाला प्राप्त झाले. हे नवे स्वरुपही आई वडिलांना झेपेनासे झाले. त्यामुळे शिक्षण देणाऱ्या वेगळया यंत्रणेची गरज भासू लागली. त्यातूनच शाळा ही संस्था उदयास आली.'[१]

दक्षिणेतील नेते मंडळी 'असामान्य व्यक्तिमत्त्वाचे' कर्तृत्व संपन्न पुरुष आहेत. आपल्या सामाजिक ध्येयासाठी संपूर्ण जीवन चंदनासारखे झिजवले. पण हे प्रचंड कार्य करीत असताना शिक्षणातील सामर्थ्याकडे त्यांनी कधी दुर्लक्ष केले नाही. 'शिक्षण हे समाज परिवर्तनाचे मूलगामी व प्रबळ साधन असते.' या विचारांवर त्यांची अढळ निष्टा आहे. सामाजिक सुधारणा घडवून आणावयाची असेल, तर समाजाचे 'धर्मविषयक अज्ञान नष्ट झाले पाहिजे, समाजाला खरा धर्म शिकविला पाहिजे. त्यासाठी सर्वच स्तरावरील सामाजिक घटकांना शिक्षणाचा हक्क मिळाला पाहिजे.

सामाजिक सुधारणा करत असताना घोड, कुकडी, सीना, भिमा पाणीप्रश्न असेल, सहकारी साखर कारखान्याची स्थापना करत असताना झालेला विरोध किंवा शत्रुत्व हे रुढी आणि अज्ञान यातून उगम पावते आणि ते शत्रुत्व जोपर्यंत आपली जनता अडाणी राहील, तोपर्यंत नष्ट करता येणार नाही. यासाठी शिक्षण संस्था स्थापून अज्ञान नष्ट करण्यासाठी कृतिशील प्रयोगच अमलात आणला. या कार्यातील सुरुवात समाजातील उपेक्षित, अस्पृश्य समाजासाठी होती.

राजा राममोहन रॉय यांच्या मते 'समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी 'शिक्षण' ही गुरुकिल्ली आहे.'[२]

'महात्मा ज्योतिबा फुले यांनी दलित मुलांच्या शिक्षणासाठी शाळा काढण्याचे प्रयत्न केले होते. इ. स. १८४८ मध्ये पुण्यात शाळा सुरु केली. १८५१ मध्ये मुलींच्यासाठीही शाळा काढली होती. या वर्गाला विद्या दिली पाहिजे, याच ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षणापासून वंचित असलेल्या, अस्पृश्य मानलेल्या समाजासाठी शाळा सुरु केल्या. महात्मा फुले यांच्यानंतर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितांच्या, उपेक्षितांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केला. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादींनी प्रयत्न केले. या सर्व थोर पुरुषांच्या शिक्षण संस्थांच्या कार्याचा मुख्य भर समाजातल्या सर्वसामान्य लोकांसाठी जनतेच्या प्रगतीसाठी, उद्धारासाठी होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९२४ साली सातारा येथे स्पृश्य-अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठी मिश्र वसतिगृह सुरु करुन शिक्षण क्षेत्रात सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य सुरु केले. पुढे त्यांनीच स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या वतीने महाराष्ट्रभर मागास, पीडित, उपेक्षित अशा गोरगरीब मुलामुलींना शिक्षण देण्याचे पवित्र कार्य सुरु ठेवले आहे.' महर्षी शिंदे म्हणतात, 'लोकांच्या उद्धारासाठी नुसती शिक्षण संस्था, मग कितीही मोठया प्रमाणावर असो स्थापून चालावयाचे नाही, तर त्यामध्ये जिवंत व्यक्तिगत पुढाकार तयार झाला पाहिजे. लोकांच्या जीवितामध्ये क्रांती व विकास घडवून आणला पाहिजे.'[३]

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीवर शिक्षण प्रसाराच्या कार्याला प्रचंड गती प्राप्त झाली. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उदार आणि दूरदृष्टीच्या धोरणामुळे आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलामुलींना मोफत शिक्षण मिळू लागले. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून बहुजन समाजाच्या तळागाळातून राजकीय नेतृत्व उदयाला येऊ लागले. सहकारी चळवळीबरोबरच शिक्षण संस्थांचे जाळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये निर्माण झाले. विद्येच्या प्रचाराची तळमळ असणाऱ्या अनेक ध्येयवादी कार्यकर्त्यांच्या त्यागातून संस्था उभ्या राहिल्या. या शैक्षणिक चळवळीने आज महाराष्ट्राचा संपूर्ण चेहरा मोहरा बदललेला दिसतो. महात्मा फुले, छत्रपती शाहू,, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा घेऊन स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिणेतील नेत्यांनी सुरु केलेल्या शिक्षण संस्थेचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे.

'अहमदनगर जिल्हयाचा दक्षिण भाग सतत दुष्काळी म्हणून ओळखला जात होता. दुःख, दैन्य, दारिद्रयाशी झुंजत, रडत-रखडत लोक जगत होते. शिक्षणाअभावी अज्ञान, अंधश्रद्धेचा विळखा कायमचाच होता. माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणापासून मुलं वंचित होती. इच्छा असूनही मुलांना मोठया शहरात पाठवून शिक्षण द्यायला पालक असमर्थ होते. मुलींच्या शिक्षणाचे तर नावच नाही. त्यामुळे समाजजीवनात चैतन्य असे उरलेच नव्हते. अशा परिस्थितीत नेत्यांनी सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून रोवली आणि कारखान्याशी संलग्न शिक्षण संस्थेची स्थापना त्या माध्यमातुन शैक्षणिक विकासास प्रारंभ केला. नेत्यांनी जे कार्य हाती घेतले तेच कार्य अखंडपणे चालू ठेवण्याच्या दृष्टीने पुढे शिक्षण संस्था स्थापन करुन शाखाविस्तार केला आणि या शिक्षण संस्थेबरोबरच शिक्षणाचे नवे वारे वाहू लागले. शेतकरी, दीन-दलितांच्या मुला-मुलींना गावातच माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध झाली.'[४]

आज संपूर्ण दक्षिणेमधील तालुक्यामध्ये इंग्लिश मिडीयम स्कूल, प्राथमिक, माध्यमिक विद्यालये, पॉलिटेक्निक, कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कृषी विद्यालय या विविध शाखांमधून हजारो मुले-मुली शिक्षण घेत आहेत. त्यातूनच विकासाचे एक नवे पर्व सुरु झाले. विचारवंताच्या क्षमतेने समाजाच्या व राष्ट्राच्या मूलभूत प्रश्नावर विचार करणाऱ्या नेत्यांनी शेतकरी, शेतमजुरांना उद्योग - व्यापारात सहभाग मिळावा, त्यातुन कृषी, औद्योगिक क्रांती साकार व्हावी या हेतूने विचारपूर्वक सुरु झालेल्या सहकार चळवळीने शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले, लक्ष्मी प्रसन्न झाली. मात्र या लक्ष्मीच्या जोडीला सरस्वतीची उपासना नसेल तर सारेच व्यर्थ कारण -

सहकार उध्दरेत जनःज्ञान उध्दरेत आत्मन

सहकारी चळवळीतून समाजाचा विकास होईल परंतु ज्ञानाने माणसाचा विकास होईल. माणसाचा आत्मिक विकास झाला की, पर्यायाने समाज आणि राष्ट्राचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. या तत्त्वावर उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्था आज काम करीत आहेत.

पिढयानपिढया अज्ञानांधःकाराच्या आणि जातिभेदाच्या कर्दमात रुतून बसलेल्या समाजासाठी स्वतःची शिक्षण प्रणाली नेत्यांनी राबविली. सर्व सुधारणांचा पाया शिक्षणच आहे. तेव्हा ते समाजाला दिले पाहिजे, मग बाकीच्या सुधारणा आपोआपच होतील. या विचारसरणीतून प्रथम शिक्षणाकडे लक्ष दिले. बहुजन समाजाविषयी तळमळ, अहर्निश कार्य करण्याची चिकाटी शांत

स्वभाव, शुध्द चारित्र्य, विचार, उच्चार व आचार यातील एक वाक्यता विचारपूर्वक हाती घेतलेले कार्य तडीस नेण्यासाठी करावे लागणारे अपार कष्ट व त्याग करण्याची तयारी या नेत्यांच्या गुणातच शिक्षणाचे मूल्य दडले आहे.

'जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपुले ||
साधु तोची ओळखावा | देव तेथेची जाणावा ||
हे जीवनमुल्य नेत्यांनी कृतीत आणले |

**महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार :-**

'शिक्षणाशिवाय माणूस अपूर्ण असतो. शिक्षणामुळे डोळसपणा येतो. परंतु हा डोळसपणा स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या नशिबात नव्हता. शिक्षणासंबंधीचा हक्क केव्हा हिरावून घेण्यात आला. याची इतिहासात नक्की नोंद नाही. उच्चवर्णीय ब्राम्हणांनी मात्र स्त्री-शूद्रातिशूद्र तथा अस्पृश्यांना जीवनविषयक सर्व हक्क नाकारले होते ही वस्तुस्थिती होती. तिला पुराव्याची गरज नाही. शिक्षण घेऊन शहाणे व्हायचे नाही. संस्कृतचे पठण करायचे नाही, धार्मिक ग्रंथ वाचायचे नाही, मंदिरात प्रवेश करायचा नाही, पाणवठयाला शिवायचे नाही. वरिष्ठ जातीच्या लोकांना स्पर्श करायचा नाही, सांगितलेले काम ऐकायचे, मन मारुन जगायचे, हे सर्व सहन करावे लागायचे ते केवळ शिक्षणाचा अभाव असल्यामुळे हे चित्र जोतिरावांच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा ते म्हणाले होते की,

विद्येविना मती गेली | मती विना नीती गेली |
नीतीविना गती गेली | गतीविना वित्त गेले ||
वित्ताविना शुद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले |||

याचा अर्थ असा की, शिक्षणाशिवाय माणूस डोळे असून आंधळा, कान असून बहिरा आणि तोंड असून मुका असतो. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी त्यांची अवस्था असते. शिक्षणापासून वंचित करण्यात आल्याने त्यांची अवस्था मुक्या प्राण्यासारखी होती. ते अज्ञान, अंधश्रद्धा, गुलामगिरीच्या डोहात गटांगळया खात होते. अज्ञानाच्या झोपेतून उठविण्याचा प्रयत्न, मागास उपेक्षितांना शिक्षणाचा संस्कार केला. म्हणूनच महर्षी वि. रा. शिंदे, राजर्षी शाहूमहाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, सयाजीराव गायकवाड, बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेकांनी शिक्षणाकडे लक्ष दिले.'[५]

वरील समाजसुधारकांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य लक्षात घेऊन ग्रामीण भागातील बहुजन समाजाकरिता शैक्षणिक चळवळीचे कार्य नेत्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्था म्हणून दिसून येते. यांचाच वारसा घेऊन त्यांच्या विचारावर ग्रामीण भागात संस्था स्थापन करुन गोरगरीब मागास उपेक्षित, अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय करुन दिली. त्यांच्या संस्थामधून झालेला शैक्षणिक विकास आणि कार्याचा आढाव पुढीलप्रमाणे घेता येईल.

**अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिणेतील नेत्यांचे शिक्षणविषयक विचार :-**

'आमचे शिक्षण कमी झाले. त्याची खंत निश्चित आहे, परंतु शिक्षण कमी झाल्याने जीवनात अयशस्वी झालो असे मुळीच नाही. शिक्षण कमी झाल्याची खंत आहे. परंतु जीवनाकडे बघण्याची दृष्टी, शाळेबाहेरच्या जगातसुद्धा शिक्षण घेता येते, त्यातूनच माणूस शिकतो. शेती करुन सामाजिक कार्यातून शैक्षणिक विकास केला. यातच त्यांच्या विचाराचा मोठेपणा दिसून येतो. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट गाठायचे, असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात पोहोचली नाही तर विकासाचा असमतोल निर्माण होतो. शिक्षण हे व्यक्तीच्या परिवर्तनाचे साधन आहे.'[६] 'हिमालयातील गंगा समाजाच्या खोलापर्यंत पोहचली पाहिजे म्हणजे ती लोकोपयोगी बनते. त्याप्रमाणे ज्ञानाची गंगा समाजाच्या खोलापर्यंत पोहचली पाहिजे म्हणजे ती सर्वांना कल्याणकारक होईल.'[७] या यशवंतराव चव्हाणांच्या विचाराशी नेत्यांचे साधर्म्य दिसते. ज्याप्रमाणे हिमालयात उगम पावलेली गंगा लोकांच्या दृष्टीने उपयुक्त आहे. तशीच ज्ञानगंगा ही समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचली पाहिजे, यावरुन त्यांच्या शैक्षणिक विचारांचे आकलन होते. शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. तसेच व्यक्तीचे आचार-विचार आणि संस्कार यामध्ये देखील वस्तुनिष्ठता येते. शिक्षण ही समाजविकासाची प्रक्रिया आहे आणि शिक्षणामुळेच सामाजिकीकरण होण्यास मदत मिळते. शिक्षण हे लोकोपयोगी कार्य आहे.

शेतकऱ्यांच्या मुलामुलींना चांगले शिकावे, या भागाचा विकास करावा, विशेषतः गोर-गरिबांच्या मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, असा विचार त्यांच्या मनात सतत घोळत होता. आपण स्वतः जरी शिकू शकलो नाही, तरी आपल्या नंतरच्या पिढयांनी खूप शिकावे, म्हणून त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, या विचारामधून नेत्यांनी शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला.

शिक्षणाशिवाय विकास होणार नाही, या ग्रामीण भागातील जनतेचा विकास केवळ शिक्षणामुळेच होऊ शकतो आणि शिक्षणामुळे त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण होऊन बदलाचे वारे वाहतील, असे नेत्यांना मनोमन वाटत होते. राजकीय, सामाजिक कार्याची माळ गळयात पडली आणि तेथून पुढे सामाजिक कार्यात पूर्णपणे गुंतून पडले ते आजतागायत ते शैक्षणिक कार्यात तालुक्यात अग्रेसर आहेत.

अर्वाचीन काळात मानवाची ऐहिक सुखसमृद्धी आणि सर्वांगीण प्रगती हे ज्ञानाचे महत्त्वाचे प्रयोजन असल्याची आपल्याला जाणीव झाली. ज्ञान हे सामाजिक धन आहे आणि म्हणून ते सगळयांना मिळाले पाहिजे, असा आग्रह वाढला. त्यातून  सार्वत्रिक शिक्षणाची कल्पना पुढे आली. विचार स्वातंत्र्य हेच सामाजिक प्रगतीचे मूळ असल्याने ज्ञानक्षेत्र स्वतंत्र, स्वायत्त आणि निर्मळ असण्याची आवश्यकता वाटू लागली. आधुनिक जीवनातील ज्ञान हे प्रचंड सामर्थ्य ठरले. त्यामुळे शिक्षण आणि समाज यांच्या एकमेकांवर होणाऱ्या परिणामाची दखल घेणे अटळ झाले.

समाज आणि शिक्षण अन्योन्याश्रयी म्हणजे एकमेकावर अवलंबून असतात. ते परस्परांवर परिणाम करतात. आपल्या भोवतालच्या जीवनाचे आकलन करणे आणि ते उपयुक्ततेच्या कसोटीवर बदलणे, यासाठी माणसाजवळ स्वत्वाची जाणीव होते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारित आणि विकसित करण्याचे शिक्षण एक साधन आहे. ते सामाजिक परिवर्तनाचे हत्यार आहे. म्हणून दक्षिणेतील नेत्यांनी शिक्षण संस्थेच्या स्थापनेस आणि विकासास महत्त्व दिले.

शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या आत्मविकासाचे साधन नसून ते देश नि समाज विकासाचे साधन आहे. ही जाणीव निर्माण करुन दिली. शिक्षणविषयक जाणीव निर्माण न झाल्यामुळे भारतीय समाज खितपत पडला होता. बहुजन समाजाची प्रगती करायची असेल तर त्यासाठी शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही. शिक्षण हा सांस्कृतिक मुक्तीचा मूलमंत्र आहे.

आध्यात्मवादी शिक्षणशास्त्रज्ञ हेगेलच्या मते, 'व्यक्तीत्वावरुन (Individuality) सर्वव्यापी तत्वाकडे मनुष्याचे मत ज्या योगे नेले जाते ते खरे शिक्षण'[१] ही हेगेलची विचारसरणी नेत्यांनी मान्य करुन तिला तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या साच्यात चपखलपणे बसवले. शिक्षण हे व्यक्तीच्या आत्मिक विकासाचे साधन आहे, असे मानतात.

'ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे मानवाला ज्ञानात्मक सामर्थ्य मोठया प्रमाणात लाभते. परंतु या सामर्थ्याचा मानवाने व्यक्तिशः व सामुदायिकरीत्या उपयोग करणे, शेवटी त्याच्या ध्येयावर व मूल्यावरच निर्माण करणे अवलंबून असते. चांगुलपणा अज्ञानाची जोड लाभल्यास ते वाया जाईल. त्याचप्रमाणे ज्ञानाला मूल्यांचा कुश नसला तर ते धोकादायक ठरेल म्हणून शिक्षणात 'विज्ञान व तंत्रज्ञान' यातून ज्ञान व सामर्थ्य प्राप्त होते हे मान्य करुन, शिवाय शिक्षणातून नीती व धर्म यांची शिकवण घ्यायला हवी म्हणजे मूल्ये व धर्मदृष्टी या दोहोंचा व्यक्तिगत व सामाजिक जीवनात विकास होईल.'[१०]

समाजाला योग्य दिशा दयावयाची असेल, समाजात एकात्मतेची, राष्ट्रीयतेची गरज असेल तर ते काम शिक्षणाशिवाय शक्य नाही. शिक्षणामुळे अनेक क्षेत्रात परिवर्तन घडून आले आहे. अनेक शिक्षण संस्थांचे यामध्ये योगदान आहे. अनेक शिक्षण संस्थांचे यामध्ये योगदान आहे. शिक्षणामुळे विचारांची देवाण-घेवाण होते. समाजपरिवर्तन हे शिक्षणामुळे होत असते. शिक्षणातील विचारामुळे जुन्या, बुरसटलेल्या विचारांना तिलांजली देता येते. नवीन, आधुनिक विचारांची जोपासना चांगल्या विचारांमुळे होते. वैज्ञानिक क्षेत्रात अनेक प्रकारे प्रगती झाली असल्याचे दिसून येते. त्यामुळे आज अनेक ठिकाणी एमआयडीसी स्थापन झाल्या आहेत. त्यामुळे रोजगाराला चालना मिळाली आहे. लोकांचा आर्थिक स्तर उंचावत आहे. सर्व क्षेत्रात प्रगतीची कवाडे उघडण्यास मदत झाली आहे. शिक्षणामुळे आपापसातील मतभेद दूर होण्यास मदत झाली आहे. मनाच्या भिंतीतील दरी कमी होत गेली. परंतु अजूनही आम्ही उच्चशिक्षित असलो तरी आपली इतर जाती-जमाती विषची आपुलकी निर्माण होणे गरजेचे आहे. त्यातच समाजाचे पर्यायाने देशाचे हित आहे. या करिता एकदेव, एक भाषा, एक धर्म, एक आचार, एक विचार, अशी गरज आहे. म्हणजे समाज हा एकसंध झाल्याशिवाय राहणार नाही. या विचाराने दक्षिणेतील राजकीय सामाजिक नेते कार्यरत होताना दिसत आहेत. आज अहमदनगर जिल्हयाच्या या शिक्षणविषयक विचारांच्या कार्यातून विविध शिक्षणसंस्था निर्माण होऊन शैक्षणिक स्तर उंचावण्याचे कार्य करीत आहेत. या शिक्षणसंस्थांची आकडेवारी दाखवणारा तक्ता पुढीलप्रमाणे.

**अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक संस्था, शिक्षकांची व विद्यार्थ्यांची संख्या (११९० ते २०००)**

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचा प्रकार | | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. | पूर्वप्राथमिक शाळा | संस्थांची संख्या | २ | २ | २ | - | १०५४ | १०५४ | २५६३ | २६३३ | ३९९१ |
| | | एकूण शिक्षक | ७ | ८ | १४० | १००८ | १०८७ | १०८७ | २५५४ | २७५६ | २८७२ |
| | | विद्यार्थी संख्या | ४०० | ४५५ | ३८१ | २५७१८ | २९०८२ | २९०८२ | १३४८१५ | ११०८८४ | १०९८५३ |
| ब. | प्राथमिक शाळा<br>१) एक शिक्षकी शाळा | संस्थांची संख्या | ६७० | ६०७ | २९७ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण शिक्षक | ६६१ | ६०६ | ३६१ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | विद्यार्थी संख्या | २६८६० | २११५१ | १०६१८ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | २) कनिष्ठ प्राथमिक शाळा | संस्थांची संख्या | १३२३ | १४०९ | १७७६ | २०८० | २२२० | २२८३ | २३५५ | २३९७ | २४०२ |
| | | एकूण शिक्षक | ५३७० | ५५३७ | ६२९२ | ६६६१ | ६९२९ | ७०४१ | ७६२० | ८०२२ | ८१७८ |
| | | विद्यार्थी संख्या | २११९२८ | २२८१७३ | २४९५५९ | २६४१०० | २७०३१८ | २८८१३६ | ३०१८७७ | २९७७२३ | ३०४९५० |
| | ३) उच्च प्राथमिक शाळा | संस्थांची संख्या | ६२० | ६२८ | ६१४ | ६३७ | ६२८ | ६२१ | ६११ | ६३० | ६३८ |
| | | एकूण शिक्षक | ५०३५ | १५८१ | ५१७२ | ५१४४ | ४९८० | ४९९४ | ५०१० | ५४०१ | ५२१४ |
| | | विद्यार्थी संख्या | १८७९९९ | १९५७७६ | १९८५९९ | २०४३२० | १९९७४२ | २०६८११ | २०३१५१ | २०७०४६ | १९७१५६ |
| क. | माध्यमिक शाळा | संस्थांची संख्या | ३२२ | ३५५ | ३६८ | ४०७ | ४२३ | ४३८ | ४६६ | ४७३ | ४८१ |
| | | एकूण शिक्षक | ५११४ | ४९३८ | ५१२२ | ५४०९ | ५९६३ | ५८४७ | ५९६४ | ५९७५ | ६१२९ |
| | | विद्यार्थी संख्या | १६४१२१ | १६०८३३ | १६६८९८ | १७६२०९ | १९२७३० | १९६३०६ | १८५२८० | २०३५२३ | २१३२७१ |
| ड. | उच्च माध्यमिक शाळा | संस्थांची संख्या | ६४ | ९० | ९७ | १०२ | ११७ | ११६ | १२३ | १२८ | १२७ |
| | | एकूण शिक्षक | २५११ | ३२२४ | ३२८४ | ३७१५ | ४०९० | ३९१४ | ४४६३ | ४४३१ | ४५२४ |
| | | विद्यार्थी संख्या | ८४७२७ | ११३०९७ | १२३५३८ | १३००८९ | १४५०६७ | १५१३७० | १८८३२४ | १५९४६५ | १६०९४२ |
| इ. | सामान्य शिक्षणाचे महाविद्यालय<br>(कला, शास्त्र, वाणिज्य) | संस्थांची संख्या | १९ | २२ | २२ | २२ | २५ | २७ | ४८ | ४८ | ४८ |
| | | एकूण शिक्षक | १२२१ | १४३४ | १४५८ | १४७३ | १५९९ | १५५१ | १६८७ | १६५१ | १६३८ |
| | | विद्यार्थी संख्या | ३६३९२ | ४३९८० | ४०२२५ | ४४१२२ | ५०३१८ | ५०८४९ | ४८८७४ | ४५५८० | ४८५२० |

**'अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक संस्था, शिक्षकांची व विद्यार्थ्यांची संख्या'**[११]

वरील तक्त्यावरुन अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक संस्था, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा सामान्य शिक्षणाचे महाविद्यालय संस्थांची संख्या, एकूण शिक्षक, विद्यार्थी संख्या यामध्ये दरवर्षी वाढ झालेली दिसून येते यावरुन जिल्हयाची शैक्षणिक प्रगती व चढता आलेख दिसून येतो. तसेच जिल्हयात व्यवसाय शिक्षणही दिले जाते. त्या शाळांची संख्या विद्यार्थी संख्या मुले/मुलींचे प्रमाणे पुढील तक्त्यावरुन दिसून येते.

**'अहमदनगर जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन (कनिष्ठ विद्यालये व तांत्रिक शाळा)'**

| अ.क्र. | वर्ष | ९१-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ९३-९४ | ९४-९५ | ९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाळांची संख्या | ५६ | ४५ | ४५ | ४९ | ४९ | ५० | ५३ | ५३ | ५२ | ५२ |
| २ | पटावरील संख्या मुले | ५०८८ | ४७६२ | ५९८९ | ५६५५ | ५६२५ | ४७३० | २१०४ | २४५३ | २८६१ | ६७२८ |
| | मुली | ३२८ | ४०० | ४७४ | ५५१ | ३८० | ३९२ | ४२७ | ४१० | ५४१ | ९१७ |
| ३ | एकूण विद्यार्थी | ५४१६ | ५१६२ | ६४६३ | ६२०६ | ६००५ | ५१२२ | २३३१ | २८६३ | ३४०२ | ७६४५ |

**'अहमदनगर जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन कनिष्ठ विद्यालये व तांत्रिक शाळा संख्या'**[१२]

वरील तक्त्यावरुन जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन तांत्रिक शाळा कनिष्ठ विद्यालये यांची संख्या एकूण विद्यार्थी मुले / मुली यांचे प्रमाण लक्षात येते हे प्रमाण संस्थांच्या संख्येच्या तुलनेत कमी जास्त झाल्याचे दिसून येते.

**'अहमदनगर जिल्हयातील तालुकानिहाय प्रौढशिक्षण केंद्र व प्रौढ व्यक्तींची संख्या'**

| अ.क्र. | तालुका | | ९१-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ९३-९४ | ९४-९५ | ९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | - | - | - | - | - | - | २२२८ | २२२८ | २२२८ | ३२८ |
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | - | - | - | - | - | - | २२२७६ | २२२७६ | २२२७६ | १६२६५ |
| २ | पाथर्डी | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | - | - | - | १५० | - | - | १९४१ | १९४१ | १९४१ | २४५ |
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | - | - | - | ४५०० | - | - | १९९६० | १९९६० | १९९६० | ११६८० |
| ३ | जामखेड | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | ४०० | - | - | - | - | - | १६४४ | १६४४ | १६४४ | २४३ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | ११९८२ | | - | - | - | - | १६२५४ | १६२५४ | १६२५४ | ११३०६ |
| ४ | कर्जत | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | २६० | ४६० | - | - | - | - | १५०९ | १५०९ | १५०९ | २८६ |
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | ७८०० | १३८०० | - | - | - | - | १७१९४ | १७१९४ | १७१९४ | १३६१६ |
| ५ | श्रीगोंदा | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | १०० | २४० | - | - | - | - | १७३६ | १७३६ | १७३६ | २८६ |
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | ३००० | ७२०० | - | - | - | - | १७४१८ | १७४१८ | १७४१८ | १३६१६ |
| ६ | पारनेर | प्रौढ शिक्षण केंद्राची संख्या | १०० | १६० | - | - | - | - | १४०२ | १४०२ | १४०२ | २४१ |
| | | प्रौढ व्यक्तींची संख्या | ३००० | ४८०० | - | - | - | - | १४०९७ | १४०९७ | १४०९७ | ११३७१ |

**'तालुकानिहाय प्रौढशिक्षण केंद्र व प्रौढ व्यक्तींची संख्या'**[१३]

वरील तक्त्यावरुन उपलब्ध महितीनुसार प्रौढशिक्षणकेंद्राची संख्या व प्रौढ व्यक्तींची संख्या १९९० ते २००० या कालावधीत स्थिरता दिसून येते. मात्र २००० साली केंद्राचे संख्येत घट झाल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे प्रौढव्यक्ती प्रमाण कमी झाले आहे.

### अहमदनगर जिल्हयातील अदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहे - विद्यार्थी संख्या १९९०-२०००

| | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **आदिवासी आश्रमशाळा संख्या** | १५ | १५ | १५ | १५ | उ. ना. | २० | २० | २८ | १४ | १४ |
| **आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या** | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ.ना. | ५०४७ | ६०९८ | ४६६६ | ८२० | ८२० |
| **मागासवर्गीय वसतिगृहे** | ११३ | ११३ | ११३ | ११३ | १०५ | १२५ | १२५ | १२५ | १०२ | १०२ |
| **वसतिगृह विद्यार्थी** | ५२४९ | ५२४९ | ५२४९ | ५२४९ | ५१०७ | ५१०७ | ५१०७ | ५०१० | ५०१० | ५०१० |

**'जिल्हयातील अदिवासी आश्रमशाळा, वसतीगृहे व विद्यार्थी संख्या'**[१४]

वरील तक्त्यावरुन अहमदनगर जिल्हयातील अदिवासी आश्रमशाळा व शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे व वसतिगृहातील विद्यार्थी संख्या १९९० ते २००० या कालखंडातील संख्या लक्षात येते.

## **१९९१ च्या जनगणनेनुसार तालुकावार साक्षरता'**

**जिल्हा - अहमदनगर**

| अ.क्र. | तालुका | साक्षरांची संख्या (हजारात) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | नगर | ८७ | ५१ | १३८ | ९२ | ६५ | १५७ | १७९ | ११६ | २९५ |
| | | ७९.३४ | ४९.६२ | ६९.९६ | ९१.४९ | ७४.५९ | ८३.६२ | ८५.१५ | ६१.७७ | ७३.७३ |
| २ | पाथर्डी | ४८ | २३ | ७१ | ७ | ४ | १२ | ५५ | २७ | ८३ |
| | | ६९.११ | ३३.८२ | ५१.७६ | ८६.४५ | ५७.७५ | ७२.८८ | ७१.०२ | ३६.२८ | ५४.०१ |
| ३ | जामखेड | ३३ | १६ | ५० | ० | ० | ० | ३३ | १६ | ५० |
| | | ६७.६६ | ३४.६८ | ५१.५१ | ० | ० | ० | ६७.६६ | ३४.६८ | ५१.५१ |
| ४ | कर्जत | ५२ | २८ | ८० | ० | ० | ० | ५२ | २८ | ८० |
| | | ६७.६६ | ३८.०९ | ५३.३४ | ० | ० | ० | ६७.६६ | ३८.०९ | ५३.३४ |
| ५ | श्रीगोंदा | ६४ | ३६ | १०० | ८ | ५ | १३ | ७१ | ४१ | ११२ |
| | | ७१.२० | ४१.८८ | ५६.९० | ०२.५४ | ५९.२४ | ७१.३८ | ७२.२६ | ४३.४७ | ५८.२४ |
| ६ | पारनेर | ६३ | ३६ | ९९ | ० | ० | ० | ६३ | ३६ | ९९ |
| | | ७२.७० | ४०.७० | ५६.४६ | ० | ० | ० | ७२.७० | ४०.७० | ५६.४६ |

**'१९९१ च्या जनगणनेनुसार तालुकावार साक्षरता टक्केवारी'**[१५]

टिप - १) आकडे पूर्णांकात केल्याने बेरजा जुळणार नाहीत. २) कंसातील आकडे साक्षरतेची टक्केवारी दर्शवितात.

३) एकूण लोकसंख्येतून ० ते ६ वयोगटांची लोकसंख्या वगळून साक्षरता काढली आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार तालुक्यात साक्षरता ग्रामीण व नागरी भागातील पुरुष व स्त्रिया यांचे साक्षरेतेचे प्रमाण व टक्केवारी लक्षात येते. आणि नागरी भागात साक्षरतेचे प्रमाण जास्त दिसून येते आणि एकूण स्त्री पुरुष साक्षरतेचे प्रमाण पाहता पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण जास्त दिसून येते.

### ५.२ शैक्षणिक संस्थांची स्थापना :-

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात असणारे तालुके सतत दुष्काळी तालुके म्हणून ओळखले जातात. दुःख, दारिद्रय, दैन्य, शेतकरी, शेतमजूर, मागास, उपेक्षित मुला-मुलींना आपल्या तालुक्यातच नव्हे तर गावात प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी. माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणापासून ग्रामीण भागातील मुलं-मुली वंचित राहू नयेत. इच्छा असूनही मुलांना मोठया शहरात पाठवून शिक्षण द्यायला पालक असमर्थ होतात. मुलींच्या शिक्षणाचे तर नावच नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाकरिता शिक्षण संस्थेची सहकारी साखर कारखान्याच्या, स्थानिक संस्थांच्या माध्यमातून स्थापना केली आणि त्यांचा विस्तार हळूहळू वाढत गेला.

**संस्थेचे उद्देश :-**

१) शैक्षणिक संस्थांना आर्थिक साहाय्य करणे आणि शैक्षणिक संस्था, वैद्यकीय संस्था, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीसाठी संस्था स्थापन करुन त्या चालविणे.

२) शिक्षणनिधी म्हणून जमविलेल्या व येथून पुढे जमलेल्या निधीचा शैक्षणिक कार्यासाठी वापर करणे.

अ) शाळा, वृद्धाश्रम, बालवाडी, वसतिगृह, उच्च शिक्षणासाठी शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, सैनिकी शाळा, शारीरिक शिक्षण केंद्र आदि व तत्सम शैक्षणिक संस्था, साहित्यिक, शास्त्रीय, तांत्रिक, औद्योगिक उन्नतीसाठी स्थापन करणे, त्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या नेमणुका करणे त्या चालविणे.

ब) सामाजिक व आर्थिक परिस्थितीने असाहाय्य व मागास, उपेक्षित समाजाच्या स्थितीत परिवर्तन करणे, त्याची बौध्दिक, नैतिक, सामाजिक, शैक्षणिक पातळीत प्रेरणा करुन प्रगती व सुधारणा करणे. उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करणे आणि ही उद्दिष्टे साध्य करणेचे दृष्टीने उपयुक्त, संशोधनात्मक, प्रगतिकारक संस्था केंद्र व त्यासारख्या इतर संस्था काढणे.

क) संभाषणे आयोजित करणे, वाचनालये व वाचन केंद्र काढणे, जाहिराती, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, पुस्तके संपादित किंवा मुद्रित करणे.

ड) शाळा, कॉलेज, शैक्षणिक केंद्र, तालिम, मल्लयुद्ध केंद्र व वसतिगृह, आश्रमशाळा, वाचनालय, सांस्कृतिक केंद्र वगैरे उपयुक्त संस्था स्थापन करणे, त्यासाठी इमारती बांधणे अथवा संस्थांना मदत करणे.

ई) अनाथ, गरिबांसाठी रुग्ण साहाय्यक केंद्र व त्यासारख्या संस्था चालविणे.

फ) उद्दिष्ट साध्य करणेसाठी या हेतूने व दृष्टीने वर्गणी, देणग्या, दान, कोणत्याही व्यक्ती, संस्था, निमसरकारी संस्था अगर सरकारकडून स्वीकारणे.

ग) उद्दिष्टे व कार्यसिद्धीकरिता तज्ज्ञ व्यक्ती व संस्थांचे साहाय्य स्वयंस्फूर्तीने वा अन्य रीतीने घेणे.

ह) संस्था, वसतिगृह, शाळा, कर्मचारी, विद्यार्थी केंद्र इत्यादींच्या सुविधेसाठी बचतींच्या उद्देशाने स्टेशनरी व धान्य किराणा, भुसार मालाचे विक्री केंद्र, गिरण, छापखाना व इतर उपयुक्त केंद्र प्रामुख्याने संस्थेच्या उपयोगासाठी, बचत व खर्च भागविण्याचे उद्देशाने चालविणे.

वरील उद्देश डोळयासमोर ठेवून दूरदृष्टी विचारातून ग्रामीण भागात शैक्षणिक संकुल उभे करणे, जिमखाना, ग्रंथालय, विद्यालय, महाविद्यालय, तंत्र-निकेतन, कृषी पदवी, वसतिगृहे स्थापन करण्याच्या दृष्टिकोनातून नेत्यांनी आपआपल्या तालुक्यात शिक्षण संस्था स्थापन करुन शिक्षणाचे जाळे निर्माण केले आहे.[१६]

सामाजिक कार्यासाठी श्रमदान करुन समाजातील घटकांना त्यात सहभागी करुन घेणे म्हणजेच जनतेला त्याचे महत्त्व पटावे यात नेत्यांची खूप दूरदृष्टी होती. आपण ज्या समाजाचा एक भाग आहोत त्या समाजाचे आपण काही देणे लागतो हा विचार नेत्यांनी समाजाकरिता स्थापन केलेल्या संस्थांमधून दिसून येतो. समाजाचा सहभाग महत्त्वाचा मानून सामाजिक कामाची प्रेरणा त्यांनी दिली म्हणूनच त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. यामागे उद्देश एकच आहे की, तालुक्यातील मुलामुलींना चांगल्या शिक्षणाची संधी मिळून प्राथमिक शाळेपासून ते उच्च शिक्षणापर्यंत गुणवान, हुशार, सुसंस्कृत मुले घडावित असा आहे.

स्वातंत्र्य मिळून बराच काळ लोटला तरी दक्षिणेकडील तालुक्यात पाहिजे तशी उच्च शिक्षणाची सोय नव्हती. या भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी घेण्यासाठी नगर, पुणे या जिल्हयाच्या ठिकाणी जावे लागायचे. त्यासाठी काही विद्यार्थी शिक्षण अर्ध्यावरच सोडायचे. परिणामी

विद्यार्थी हुशार असून देखील शिक्षणापासून वंचित रहायचे, त्यामुळे अनेक हुशार विद्यार्थ्यांना अनेक संधीना मुकावे लागायचे. परिणामी शिक्षणापासून दूरवणारी ही पिढी पाहून नेते अस्वस्थ होत. त्या दृष्टीने विचार केला, संस्थांची स्थापना केली. महाविद्यालये सुरु केले आणि तालुक्यांच्या इतिहासात उच्च शिक्षणाची दरवाजे बहुजन समाजाच्या मुला-मुलींना खुली झाली. शिक्षण विकासाचे एक नवे पर्व ग्रामीण भागात सुरु झाले.

अहमदनगर जिल्हयामधील विविध भागातील अनुसूचित जाती, जमाती व मागासवर्गीयांच्या विकासासाठी जे अजूनही शिक्षणाच्या सुविधेपासून वंचित आहेत, शिक्षणाची गंगा अजूनही म्हणावी तितकी ज्यांच्या दारात गेली नाही, अशा मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृह सुरु केले व ग्रामीण भागातील मुलांचा उच्च शिक्षणाचा प्रश्न सोडविला आणि महाविद्यालयांच्या माध्यमातून तालुक्याची शैक्षणिक प्रगतीकडे वाटचाल सुरु झाली.

कमीतकमी विद्यार्थी संख्येवर सुरु झालेली महाविद्यालये आज विविध प्रकल्प राबविणारे उपक्रमशील महाविद्यालय म्हणून नावारुपाला आले आहेत. दक्षिण भागातील तालुक्यांत महाविद्यालयांच्या भव्य इमारती, सुसज्ज क्रीडा संकुल ग्रंथालय, संगणक विभाग, मुलांचे वसतिगृहाबरोबरच मुलींचे अद्ययावत वसतिगृहे उभी आहेत. शिक्षणाबरोबर साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, कृषिविषयक चळवळीत महाविद्यालये अग्रेसर आहेत. लोकसाहित्य परिषद, कृषि मेळावा व कृषि प्रदर्शने, वाणिज्य परिषद, स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव विद्यार्थ्यांना आणि समाजाला दिशा देणारे अनेक उपक्रम महाविद्यालयांनी यशस्वीपणे राबविले.

ज्या मातीत महाविद्यालये उभी राहिली त्या मातीचा विसर महाविद्यालयाला कधी पडला नाही. चार भिंतीच्या आतील पुस्तकी शिक्षणाबरोबरच सभोवतीच्या समाजालाही उपयोगिता मूल्य पुरविण्याचे काम महाविद्यालये सतत करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून आज सर्वच क्षेत्रात ज्ञानाचा प्रंचड विस्फोट होत असताना आमचा शेतकरी मागे राहू नये, शेतीला ज्ञानाची जोड मिळावी म्हणून 'बाजार माहिती केंद्र' सुरु केले आहे. परिसर व समाजविकासाचा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून माती परीक्षण, पाणी परीक्षण, कृषी-तंत्रज्ञान केंद्र महाविद्यालयांत कार्यरत आहेत.

सामान्य परिस्थितीत सुरु झालेल्या महाविद्यालयांचे रुपांतर आज एका सुसज्ज अशा शैक्षणिक संकुलात झाले आहे. यासाठी संस्थेचे सर्व विश्वस्त, हितचिंतकाच्या सहकार्याने, विद्यापीठ अनुदान मंडळ, केंद्र सरकार आणि लोकवर्गणीतुन कामे उभी राहिली. अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली

सातत्याने प्रयत्न करुन पश्चिम विभागीय (महाराष्ट्र, गुजरात, गोवा) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नवव्या योजनेंतर्गत अनुदान मिळविले. माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम दक्षिण नगर जिल्हयातील महाविद्यालयांत सुरु झाले. हे सर्व महाविद्यालयांनी सामाजिक परिस्थितीची जाणीव आणि कर्तव्याचे भान ठेवून विचारपूर्वक प्रयत्नातून सुरु केले आहे. कारण विचारपूर्वक प्रयत्नातून झालेले समाजपरिवर्तन सर्व कल्याणकारी आणि दीर्घकाळ टिकणारे असते.

महात्मा गांधी नेहमी म्हणत, समाजहितासाठी काम करणारी कुठलीही संस्था असो, ती किती मोठी झाली हे महत्त्वाचे नाही, तर त्या संस्थेने आपल्या बरोबर किती माणसांना आणि समाजाला मोठे केले हे सर्वांत महत्त्वाचे आहे. या दृष्टिकोनातून महाविद्यालयांकडे पाहिले तर महाविद्यालयांनी नेहमीच इमारतीच्या उंचीपेक्षा त्या इमारतीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची उंची वाढावी यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहेत.

बलशाली भारत व उद्याची आदर्श नागरिकांची पिढी घडविण्यासाठी विद्यार्थीदशेतच सुसंस्कार व्हावेत, स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी आघाडीवर रहावा यासाठी तालुक्यात कमीतकमी मुलांवर सुरु केलेल्या महाविद्यालयांतून आज हजारो विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान या तीन शाखांमधून पदवीपर्यंतचे शिक्षण घेत आहेत. यातून नेत्यांची दूरदृष्टी दिसून येते. शाळा, महाविद्यालये ही समाजविकासाची केंद्र बनली पाहिजेत, हा विचार डोळयासमोर ठेवून विविध उपक्रमांद्वारे काम करीत असताना अध्यक्ष नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून प्रोत्साहन देत असतात.

'२१ व्या शतकात नेत्यांना खरे दुःख आहे ते येणाऱ्या पिढीतील वैचारिक कमतरतेचे म्हणून ते नेहमी म्हणतात, आजच्या तरुणांनी बदलत्या परिस्थितीचा विचार करुन, पराभूत मनोवृत्ती टाकून दिली पाहिजे. भव्य दिव्य अशा स्वप्नांच्या मागे धावले पाहिजे. त्यासाठी उन्हातान्हात राबणाऱ्या कपाळावरुन गळणाऱ्या त्यागी तरुणांच्या पाठीवरुन नेते नेहमी कौतुकाचा हात फिरवतात. शिक्षणाद्वारे ज्ञानाला विज्ञानाची जोड देऊन स्वकष्टाने ज्ञानार्जन करुन देशाचा उत्तम नागरिक बनण्यासाठी भूगोलाचे भान आणि डोळयापुढे घडणाऱ्या इतिहासाचे ज्ञान आत्मसात करणारा विद्यार्थी घडवित असताना महाविद्यालयांत पदवी शिक्षणाबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले जातात. या अभ्यासक्रमात स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण, त्यासाठी आर्थिक मदत कशी व कोठून उपलब्ध करायची, येणाऱ्या संभाव्य अडचणींची सोडवणूक याबद्दल सविस्तर मार्गदर्शन

अभ्यासक्रमातून देण्यात येते. याचा फायदा घेऊन अनेक विद्यार्थी आज स्वतःच्या स्वतंत्र उद्योग व्यवसायात भक्कमपणे उभे आहेत.'[१७]

महाविद्यालयांनी स्पर्धा परीक्षांसाठी खास मार्गदर्शन केंद्र सुरु केले असून, तज्ज्ञ शिक्षकांच्या मदतीने तसेच विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे महाविद्यालयांतील विद्यार्थी उच्च पदावर शासकीय सेवेत कार्यरत आहेत.

**संगणक प्रशिक्षण संस्था :-**

खेडयातल्या विद्यार्थ्यांनाही संगणकाचे ज्ञान देण्यासाठी अद्यायावत संगणक प्रशिक्षण केंद्रे (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) सुरु केली. गतिमान युगाचा व तंत्रशिक्षणाचा विचार करुनच या देशाचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी युवकांना संगणक ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले होते. याची आठवण म्हणून २१ व्या शतकात सर्वांना संगणक ज्ञान गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रामधील प्रगती जसी दिवसेंदिवस वाढत आहे, तसे आजच्या या आधुनिक काळात संगणकाचे महत्त्व वाढत असून संगणकाने मानवाच्या जीवनात आमूलाग्र असे बदल केले आहे. संगणक ही काळाची गरज असून संगणक शिक्षण न घेणारा माणूस भविष्यात अशिक्षित म्हणून ओळखला जाईल.

नेत्यांनी संगणक शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे आपल्या भागातील विद्यार्थी संगणक शिक्षणामध्येसुद्धा मागे राहता कामा नये, या दृष्टीने त्यांनी संगणक प्रशिक्षण संस्था महाविद्यालयांत सुरु केली. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संगणक शिक्षण घेता यावे असा उद्देश त्यामागे होता. या संगणक प्रशिक्षण संस्थेसंबंधी माहिती देताना महाविद्यालयांचे प्राचार्य म्हणतात की, 'आमच्या संगणक प्रशिक्षण संस्थेत प्रथम कमी संगणक असून हया संगणक प्रशिक्षण संस्था आज अनेक संगणकांनी सुसज्ज अशा स्वतंत्र कॉम्प्युटर लॅबमध्ये बदललेली आपणास दिसते. हे सर्व नेत्यांमुळे घडून आलेले परिवर्तन असून, त्यांच्या विचारांमुळे आम्ही एवढी प्रगती करु शकलो.

स्वतः कमी शिक्षण घेतलेले नेते सर्व प्रकारच्या शिक्षणासंबंधी जागरुक आहेत, हे त्यांनी स्थापन केलेल्या संस्थावरुन दिसते. स्त्रिया, उपेक्षीत, मागास आणि बहुजन समाज यांच्यामध्ये कर्मवीरांनी ज्ञानाची लालसा निर्माण केली आणि ती पूर्ण करण्यासाठी प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतच्या शिक्षणाची यंत्रणा त्यांनी उभी केली. यात कर्मवीरांच्या विचारांप्रमाणे नेत्यांनी देखील दक्षिण भागातील तालुक्यातील उपेक्षित मागास आणि बहुजन समाजातील मुला-मुलींच्या

शिक्षणासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयापर्यंतच्या शिक्षणाची सोय केली. त्याबरोबर तंत्रनिकेतन, शिक्षणाची यंत्रणा उभी करुन शिक्षण विकासाला चालना दिली.

**ग्रंथालय :-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देत असताना विद्यार्थ्यांकरिता सुसज्ज भव्य असे पुस्तकाचे भांडार असावे, ही खंत नेत्यांना सतत वाटत होती. म्हणून त्यांनी विविध इमारती उभ्या केल्या. त्यात प्राधान्याने ग्रंथालयांचा समावेश केला. ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था चालविणे, टिकविणे अवघड आहे. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची मानसिकता विचारात घेऊन त्यांना चांगला नागरिक शिक्षकच बनवू शकतात. त्यासाठी अध्यापकांनी बाहेर जास्त काम करण्याऐवजी ज्ञानमंदिराच्या चार भिंतीमध्ये अधिक काम करण्याची गरज आहे.

विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी वाचन व्यासंग निर्माण करावा व ग्रंथ हेच गुरु मानून संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम करावे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक मदतीने बांधण्यात आलेले स्वतंत्र ग्रंथालये पूर्णपणे संगणकीकृत आहे. ग्रंथालयात स्वतंत्र विभाग असून त्यामध्ये स्वतंत्र पुस्तक कक्ष असून पदवीपर्यंतच्या शैक्षणिक पुस्तकाबरोबरच स्पर्धा परीक्षा, कथा-कांदबरी, संदर्भ ग्रंथ, संगणक अशी हजारो पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर स्वतंत्र नियतकालिका विभाग, मुला-मुलींचे स्वतंत्र वाचन कक्ष वाचन कक्षामध्ये किमान एका वेळेस १०० विद्यार्थी-विद्यार्थीनी बसू शकतील अशी सुविधा, त्याच बरोबर ग्रंथपाल कक्ष अशा विविध सोयी सुविधेने उपयुक्त अशी ग्रंथालये महाविद्यालयांनी सुरु केलेली आहेत.

**क्रीडा संकुल :-**

महाविद्यालयांची स्थापना झाली. परंतु विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात क्रीडा संकुले नव्हते. तालुक्यातील विद्यार्थी क्रीडा क्षेत्रामध्ये मागे राहू नये म्हणून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अध्यक्षांकडे मागणी केली. महाविद्यालयाच्या जागेमध्ये भव्य असे क्रीडांगण तयार केले. याच क्रीडांगणावर एन. सी. सी. परेड, क्रिकेट, व्हॉलीबॉल अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जात होते. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयांचे विद्यार्थी जिल्हा पातळी, राज्य पातळीवर चमकले. शासनाने बदलते क्रीडा धोरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरु लागले आहे. विद्यार्थी कबड्डी, खो-खो याच बरोबर लांब उडी, उंच उडी, क्रिकेट कुस्तीमध्ये मोठया प्रमाणावर भाग घेऊ लागले.

'महाविद्यालयांच्या क्रीडा संकुलासाठी केंद्र सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाने निधी मंजुर केला. उर्वरित रक्कम संस्थेच्या सहाकार्याने लोकवर्गणीतून अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात आले. हे क्रीडा संकुल छात्रांतर्गत (इन डोअर स्टेडियम) असून यामध्ये बहुउद्देशीय क्रीडा हॉल, बास्केट बॉल, टेबल टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन आणि मर्दानी खेळाचे साहित्य / सुविधा उभारण्यात आलेली आहे. असे भव्य क्रीडा संकुल उभे करुन शिक्षणाबरोबर म्हणजे पुस्तकी ज्ञानाबरोबर क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी चमकला पाहिजे,याकरिता ही संकुले उभी केले आहेत.

**वसतिगृह :-**

ग्रामीण भागातील महाविद्यालय कुठल्याही सोयी सुविधांपासून पाठीमागे राहू नयेत. गरीब, शेतकरी, मागासवर्गीय कुटुंबातील मुलामुर्लीना उच्च दर्जाचे शिक्षण घेता यावे, तसेच मुलांची होणारी शैक्षणिक हेळसांड थांबविण्यासाठी मोठया प्रमाणात प्रतिकूल परिस्थितीत अल्प रक्कम घेऊन वसतिगृह चालविले. महाविद्यालयांत मुलींचे सर्व सोयी सुविधांनी युक्त असे ग्रामीण भागातही वसतिगृहे चालविले आहेत. मागेल त्या विद्यार्थ्याला वसतिगृहामध्ये प्रवेश दिला जातो. या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देत असताना शिक्षणाबरोबर साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, कृषि विषयक चळवळींमध्ये महाविद्यालये अग्रेसर आहेत.

आज सत्ता, संपत्ती, विलासाच्या वाढत्या भोगलालसेने सामाजिक मूल्ये, समाजरचना खिळखिळी होत असताना उद्याच्या भविष्यकाळाला आकार देण्यासाठी मनावर योग्य संस्कार करणारे राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम महाविद्यालये आयोजित करतात. त्यामध्ये स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार, कृषी प्रदर्शन मेळावा, साहित्य संमेलन, वाणिज्य परिषद, लोक साहित्य परिषद असे समाजाला दिशा देणारे विविध कार्यक्रम महाविद्यालयांनी यशस्वीपणे राबविले आहेत.

**संमेलन :-**

मराठी भाषेने आपल्याला पालवले, पोसले. मराठीने आपल्याला सन्मान दिला. तिची विविध रुप, वळण आपण आपल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला. तरी मराठीचे पूर्णार्थाने दर्शन घडत नाही. अमृताशी पैज जिंकणाऱ्या मराठी भाषेचे, मराठी माणसाचे दर्शन घडावे. एकत्रित येऊन काही चांगले घडावे, घडवावे या सद्‌हेतूने साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

सहकाराने आज महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला आहे. आर्थिकदृष्टया समाज श्रीमंत बनला. परंतु आचार विचार आणि सांस्कृतिकदृष्टया मात्र तो दरिद्रीच राहिला. ग्रामीण जीवनात झालेले परिवर्तन हे केवळ भौतिक सुखसाधनांच्या अंगाने अनुकरणात्मक स्वरुपाचेच झाले आणि हाच विकास, हीच सुधारणा असे समजणाऱ्या ग्रामीण समाजाला निश्चित मूल्यविचार देण्यासाठी समाजपरिवर्तनाला अनुकूल वातवारण व पोषक मनोभूमिका तयार करण्यासाठी साहित्याचा आनंद आणि परिवर्तनाच्या व्यापक उद्देशाने संमेलनाचे आयोजन केले होते.

शाळा, महाविद्यालये ही सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची केंद्रे बनली पाहिजेत. हे आज घडते का ? उलट मूठभर पेटलेले विद्यार्थी हजारोंच्या स्वप्नांची मिरवणूक काढत आहेत. अशा वेळी तरुण मनातला जोर मनगटात एकवटून उद्याची स्वप्ने मुठीत आणण्यासाठी नवचेतनेची बीजे युवामनात पेरुन ग्रामीण युवकांनी गतिचक्रावरुन उडया घेऊन प्रचंड उर्जा निर्माण करावी. त्या उर्जेतून उद्याचा उज्ज्वल भविष्यकाळ घडविणारे तरुण निर्माण करण्यासाठी शिक्षण केंद्रे ही विचारांची व्यासपीठे बनली पाहिजेत आणि हे काम वाचन आणि संस्काराने घडू शकते. त्या दृष्टीने साहित्य संमेलनांचे महत्त्व आहे.

साहित्याची व्याख्याच मुळी 'सह घेऊन जाते, ते साहित्य' स-हितता शिकविते ते साहित्य, माणसाला मानणारे, माणूस समजून घेणारे तसेच माणसालाच 'माणूस' समजावून देणारे साहित्य सभोवतालच्या वास्तवाची, विचारांची, निसर्गाची ओळख करुन देत असते, ते साहित्य, संस्कार घडवीत असते.

महावृक्षाच्या अत्युच्च शेंडयाला वाऱ्या वादळाची पहिली विधायक चाहूल लागत असते आणि त्याच्या आश्वासक इशाऱ्याकडे लक्ष देऊन रानावनातील समस्त वृक्षसृष्टी आपले जीवन वर्तन घडवित राहते. समाजजीवनामध्ये साहित्यिकांचे स्थान हे महावृक्षाच्या तोडीचेच आहे.

सांस्कृतिकदृष्टया स्थिर असलेल्या समाजामध्ये साहित्य संमेलनांच्या माध्यमांतून साहित्यिक, विचारवंत यांनी आपले विचार मांडले. त्यातून परंपरेच्या चौकटीत बंदिस्त असलेले समाजजीवन बदलून समाजाला सांस्कृतिक, वाङ्मयीन दिशा मिळाली आणि हे ग्रामीण साहित्य संमेलन जनजागरणाबरोबरच ज्ञानजागरणाचा एक अविस्मरणीय सोहळा ठरले.

**कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळावे :-**

स्वातंत्र्याच्या सुवर्णामहोत्सवानिमित्त शैक्षणिक उपक्रमांबरोबरच दक्षिणेकडील तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रगत कृषिज्ञान व तंत्रज्ञानाची माहिती करुन देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयांनी कृषि प्रदर्शन आयोजित केली होती. ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांपर्यंत प्रगत तंत्रज्ञान पोहचावे या उद्देशाने ही प्रदर्शने आयोजित केली होती.

कृषि व्यवसायातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आणि डंकेल प्रस्तावाच्या स्वीकृतीमुळे देशातील शेतकऱ्यांना प्रगतीसाठी नवीन दालन निर्माण झाले आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या कृषि संलग्न क्षेत्रातील सर्वंकष विकासासाठी कृषि मेळावे फायदेशीर ठरले. तालुक्यातील कुकडी, घोड, सीना, भिमा प्रकल्पांमुळे व विविध बंधाऱ्यामुळे जमीन ओलिताखाली आली याचा सारासार विचार करुन आपण शेतकऱ्यांचे काही देणे लागतो म्हणून शैक्षणिक विकासाबरोबरच शेतीज्ञान व तंत्रज्ञान मिळण्याकरिता कृषि प्रदर्शने व शेतकरी मेळाव्यांचे आयोजन केले होते.

कृषि प्रदर्शनांच्या माध्यमातून निर्यातक्षम फुले, फळे, शेती, व्यावसायिक वनशेती, विपणन व्यवस्था, पशुपालन विकास, सिंचन व्यवस्थापन इत्यादी विषयी माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. कृषि प्रदर्शनांमध्ये सहकारी व निमसरकारी कृषि संस्था, सिंचन व्यवस्था, उत्पादक संस्था, कृषि विद्यापीठ, कृषि संलग्न व्यवसाय संस्था सहभागी झाल्या.

अहमदनगर जिल्हयातील दक्षिणेकडील तालुक्यातील शेतकरी सहभागी झाले होते. शेती अवजारे निर्माण करणाऱ्या संस्था, दुकानदार मोठया प्रमाणावर सहभागी झाले ही प्रदर्शने अविस्मरणीय ठरली.

**विज्ञान मंडळ :-**

जीवनाच्या प्रगतीसाठी, प्रबोधनासाठी गणिताचे अनन्य साधारण महत्त्व आहे. गणित विषय समजण्यासाठी तर्कशास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना ज्ञान मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी संगणक बनेल. ज्या अनुभूतीतून शिक्षक घडला त्यापेक्षाही विद्यार्थी मोठा कसा होईल हे पाहणे गरजेचे आहे.

नवनव्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची बुद्धी कुशाग्र कशी होईल. जेणेकरुन त्यांचे भविष्य उज्ज्वल कसे होईल हे पाहण्याकडे लक्ष केंद्रित करुन अशा उपक्रमांमधून दक्षिणेतील नेत्यांनी याच विचारातून महाविद्यालयांत विविध अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आग्रही भूमिका घेऊन वास्तवात

आणली आहे. याच हेतूने शेतकरी मेळावे व कृषि प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले होते. देशातील, राज्यातील, तसेच तालुक्यातील तरुणवर्गाला सद्यस्थिती तसेच भविष्यातील प्रश्न आणि रोजगार याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. युवकांची व समाजाची होणारी दिशाभूल, शिक्षणातून आत्मविश्वास प्राप्त केलेल्या सुशिक्षितांनी शास्त्रशुद्धपणे शेतीकडे लक्ष दिले, तर पुढाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडण्याची वेळ येणार नाही व शहराकडे धावणारे लोकांचे लोंढे थांबण्यास मदत होईल. नोकरीसाठी शिक्षण असा आपल्याकडे चुकीचा अर्थ लावला जातो. देशातील भौगोलिक परिस्थिती, हवामान, पाणी याचा शास्त्रशुद्ध उपयोग करुन उत्पादन घेतले, तर आपण प्रगती करु शकतो.

शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करुन शेती फायद्याची कशी करता येईल. शेतीला जोडधंद्याची जोड दिल्याशिवाय ती किफायतशीर होणार नाही. आधुनिक शेतीविषयक तंत्रज्ञानाची गंगा शेतकऱ्यांपर्यंत पोहचावी व त्या तंत्रज्ञानाचा त्याला उपयोग व्हावा या हेतूने नेते सतत प्रयत्नशील राहिले. आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे म्हणून त्याचाच एक भाग म्हणजे कृषी प्रदर्शने व शेतकरी मेळावे होय. एकूणच शैक्षणिक कार्य करत असताना महाविद्यालये आणि हया शिक्षण संस्था जनतेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी असे विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयांतर्फे केले जाते.

कृषि, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये देशपातळीवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना 'इंटरनॅशनल इंटिग्रेशन ॲण्ड ग्रोथ सोसायटीच्या वतीने विकासरत्न पुरस्कार देण्यात येतो.' ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाच्या विविध संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल नेत्यांचा सन्मान करण्यात आला होता.

२५-३० वर्षांपूर्वी प्रतिकूल परिस्थितीत ग्रामीण भागात सुरु झालेल्या महाविद्यालयांची प्रगती पाहताना माणूस भारावून जातो. शहरात अनुकूल परिस्थितीत शिक्षण संस्था चालविणे सोपे असते. परंतु ग्रामीण भागात अनेक अडचणींवर मात करुन सर्व सोयी सुविधांयुक्त संस्था उभी करणे व चालविणे अवघड काम आहे. परंतु महाविद्यालयांचे प्राचार्य आणि संस्थांचे अध्यक्ष यांच्या अथक प्रयत्नातून या महाविद्यालयांची खूप भरभराटी झाली. महाविद्यालयांच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत महाविद्यालयांनी विविध सामाजिक, शैक्षणिक, कृषिविषयक कार्यक्रम आयोजित करुन समाजाला

एक नवी दिशा (गती) देण्याचे काम केल्याचे दिसून येते हे सर्व घडत असताना नेत्यांचे अथक प्रयत्न लक्षात येतात.

सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून दक्षिणेकडील तालुक्यातील ग्रामीण भागासाठी शिक्षणाची सोय करावी म्हणून नेत्यांनी शिक्षण संस्थांना मान्यता आणल्या. शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी वाहावी यासाठी नेत्यांनी शिक्षणरुपी बागा लावल्या. त्या बागांमध्ये लावलेले रोपटे म्हणजे विविध शाळा, महाविद्यालये हे होय. तालुक्यांतील विद्यार्थ्याला फक्त महाविद्यालयीन शिक्षण देऊन चालणार नाही तर विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे म्हणून नेत्यांनी प्रयत्न केले.

संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी व सामान्यांच्या मुलांसाठी तांत्रिक शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय वसंतदादा पाटील यांच्या काळात झाला. ज्याची फळे आज उभा महाराष्ट्र चाखत आहे. यावरुन असे दिसून येते की, नेत्यांच्या कार्यात असणारी दूरदृष्टी जाणवते. तालुक्यातील विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये डॉक्टर, इंजिनिअर, वकील बनला पाहिजे म्हणून नेत्यांनी शैक्षणिक सुविधा मोठया प्रमाणावर पुरविल्यांचे दिसते. शैक्षणिक, सहकारी, सामाजिक संस्थांचा अभ्यास करताना असे जाणवते की, 'नेता ही व्यक्ती नसून ती एक मोठी संस्थांच आहे.' हे त्यांनी स्थापन केलेल्या संस्थांवरुन दिसुन येते.

विविध शाखांच्या माध्यमातून दक्षिणेकडील तालुक्यात रोपटे लावले आहेत. या संस्थांमध्ये शेकडोंच्या संख्येने शिक्षक आणि हजारोंच्या संख्येने विद्यार्थीरुपी फुले बहरली आहेत. तालुक्यातील स्थापन केलेल्या संस्थांकडे पाहताना संख्यात्मक न पाहता गुणात्मकदृष्टया पाहिले जाते. या संस्थांतील विविध शाखांचे निकाल गगनाला भिडणारे आहेत. त्याचे एकमेव कारण नेत्यांनी केलेल्या गुणी शिक्षकांची पारखी निवड सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडायचे असेल, तर त्यांनी शिक्षणाची कास धरली पाहिजे ,यासाठी नेत्यांनी अथक परिश्रम घेतले.

ग्रामीण भागातील अज्ञानी लोकांमध्ये असलेल्या प्रचंड शक्तीला ज्ञानाने जागृत करण्याचे कार्य शिक्षण संस्थांनी केले. आज विद्यालयाकडे पाहताना डोळे दीपल्याशिवाय राहत नाहीत. सर्व विद्यालयाच्या इमारती सुसज्ज व सुविधायुक्त आहेत. विद्यालयांमध्ये सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, प्रशासकीय कार्यालय या सर्व सुविधा विद्यालयामध्ये दिसून येतात.

संस्थेच्या सर्व विद्यालयांतून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असताना फक्त शैक्षणिक विकास नको, तर ज्ञानाबरोबर शरीरसंपदा हवी म्हणून सर्व विद्यालयांमध्ये क्रीडांगणे उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये सहभागी होऊन त्याचे चांगले फलित मिळण्यासाठी सर्व संस्थांनी सर्व विद्यालयांना क्रीडांगणे व क्रीडासाहित्य घेण्यास मदत केली. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात संस्थेचे विद्यार्थी तालुकापातळीवर जिल्हा, राज्यपातळीवर चमकले आहेत.

शासनाचे बदलते क्रीडा धोरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरु लागले आहे. विद्यार्थ्यांचा खेळाकडे  पहाण्याचा दृष्टिकोन बदलू लागला आहे. विद्यार्थी कबड्डी, खो-खो, लांब उडी, क्रिकेट, कुस्तीमध्ये भाग घेऊ लागले आहेत. विद्यालयांला मिळालेल्या अनुदानापैकी दरवर्षी १५ हजार रुपये क्रीडा विभागावर खर्च केला जातो.

सर्व संस्थांनी बौद्धिकदृष्टयाही नेत्रदीपक यश संपादन करताना आजपर्यंत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. त्याचबरोबर मुलांचा सांस्कृतिक विकास विविध कार्यक्रमाद्वारे केला जातो. विद्यालयांनी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, वार्षिक पारितोषक वितरण समारंभ, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा विविध कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध प्रेरणादायक कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यालयांनी क्रीडाक्षेत्रात सतत प्रगती करत सांघिक, तसेच वैयक्तिक स्पर्धेत तालुका, जिल्हा तसेच विभागपातळीवरही तसेच विद्यार्थ्यांनीही आपले यश संपादन केले आहे.

'इवलेसे रोप लाविले द्वारी | त्याचा वेलू गेला गगनावरी || या उक्तीप्रमाणे दक्षिणेकडील तालुक्यांपुरता तरी या संस्थांचा वटवृक्ष झाल्याचे दिसते. विशेष म्हणजे या शिक्षण संस्थांमधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबर स्त्रियांना काम करण्याची संधी देऊन जणू महिलांच्या विकासाला प्रेरणाच दिलेली आहे. दक्षिणेकडील प्रत्येक तालुक्यातील विद्यालयाने यशाकडे झेप घेतली आहे. उदात्त विचाराचे निःपक्षपाती व थोर मनाचे शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने शिक्षणातून सदाचार आणि करुणा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नातून एक आदर्श भारतातील विद्यार्थ्यांत विद्या, प्रज्ञा, करुणा, शील आणि मैत्री ही पाच तत्त्वे अंगी बाणवून त्याचे चारित्र्य घडवून एक राष्ट्रीयतेचे नि मानवतेचे अज्ञानतम दूर करण्याचे उदात्त कार्य करण्याचा प्रयत्न शिक्षण संस्था करीत आहे.

**शिक्षण संस्था :-**

महात्मा गांधीचे स्वप्न होते की या भारतातील एकही तरुण उच्च शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ६७ वर्षे पूर्ण झाली आहेत. आपण आपल्या देशाचा स्वातंत्र्य दिन साजरा करतो. या ५०-६० वर्षात आपल्या भारत देशाने काय कमविले व काय गमविले याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक नेत्यांनी आपले प्राण गमाविले आहेत. त्यामध्ये पंडित नेहरु, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक यांच्या नावाचा उल्लेख करणे गरजेचे आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला आपण स्वतंत्र झालो पण हे स्वातंत्र्य टिकविणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी शिक्षणाची गरज वाटू लागली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्वे, आगरकर यांच्यासारखी मंडळी पुढे आली आणि शिक्षणाचे महत्त्व पटवुन दिले. कर्मवीरांनी 'रयत शिक्षण संस्था' काढली आणि त्यांचा आदर्श घेऊन ग्रामीण मागासलेला भाग शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी नेत्यांनी दक्षिणेतील शिक्षण संस्था सुरु केली.

'एकीकडे सरकार सार्वत्रिक शिक्षण म्हणून सांगत तर दुसरीकडे ग्रामीण भागातील अनाधिकृत शाळा बंद करण्याचे आदेश देत होते. ग्रामीण भागातील प्रत्येक युवक युवतीला शिक्षण मिळाले पाहिजे.'

शिक्षण संस्थेचा मोठया प्रमाणावर विकास झाला आहे. संस्थेच्या तालुक्यात आणि तालुक्याबाहेर माध्यमिक विद्यालय सुरु आहेत. ग्रामीण भागातील मुलं-मुली शिक्षण घेऊ शकत नव्हती म्हणून गाव तिथे माध्यमिक विद्यालय स्थापन करुन घरोघरी ज्ञानगंगा पाठविण्याचे कार्य संस्थेमार्फत केले आहे. या संस्थेच्या माध्यमातून आज कितीतरी विद्यार्थी आपआपल्या गावामध्ये शिक्षण घेत असल्याचे दिसते. विशेष करुन तालुक्यातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत ही नेत्यांची कल्पना होती. कारण 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' एक मुलगी शिकली तर ती दोन घराला पुढे नेते म्हणून स्त्री शिक्षणावर जास्त भर दिला.

शिक्षण संस्थेमार्फत तालुक्यात आणि तालुक्याबाहेर ज्ञानाची गंगोत्री वाहण्याचे पवित्र कार्य केले. अशा या ज्ञानरुपी गंगेमध्ये हजारो गोरगरिबांची मुले मुली शिक्षण घेत आहेत. तर शेकडो सुशिक्षित तरुणांना पवित्र कार्यामध्ये काम करण्याची संधी उपलब्ध झाली. प्रत्येक गावातील तळागाळातील माणूस सुधारल्याशिवाय गाव सुधारणार नाही ही भावना डोळयासमोर ठेवून तालुक्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याचे मोलाचे काम केले. तालुक्यातील ठराविक मोठी

खेडी सोडल्यास लहानशा खेडयामध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. शेजारच्या मोठया गावात जाऊन मुलींना शिक्षण घेणे शक्य नव्हते. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शाळा सोडून देत असत. परंतु माध्यमिक शिक्षणाची ही अडचण ओळखून तालुक्यात गावोगावी विद्यालय स्थापन केली.

शिक्षणाविषयी असणारी जाणीव त्यांच्या आयुष्यात वारंवार उफाळून आल्यासारखी दिसते. कमी शिक्षण घेतलेल्या या व्यक्तींना शिक्षणाबद्दल वाटणारी ओढ विलक्षण आहे. सततचा ध्यास, आणि इतर कामाबरोबरच शिक्षण सर्वांसाठी गावोगावी असावे, असे मनात चालणारे सततचे विचार यामधूनच दिसून येतात. दर्जेदार समाजाच्या बांधणीसाठी शिक्षण आवश्यकच आहे. शिक्षणामधुन सुसंस्कृत विचारांची पिढी उदयास यावी. या पिढीने आपले नवीन विचार समाजास द्यावेत. विचारी समाजाची बांधणी शिक्षणामधूनच होते. उच्च प्रतीचे ज्ञान घेऊन भविष्यकाळामध्ये आपल्या परिसरातूनही नामवंत तज्ज्ञ निर्माण व्हावेत. त्यांनी आपल्या समाजाची चांगली सेवा करावी अशी दक्षिणेतील नेत्यांची इच्छा होती. 'शिक्षणामुळे माणूस हा केवळ, सुशिक्षित नव्हे तर सुसंस्कृत आणि विचारी बनला पाहिजे.' म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून केवळ सुशिक्षित पिढीच घडवण्याचा उद्देश नाही तर सुसंस्कृत समाजाचे स्वरुप ते बघतात. शिक्षण हे सुसंस्कृत जीवनाचे साधन आहे. त्याचबरोबर विचारशक्ती वाढवायलाही ते मदत करते. विचार करायला शिकवण्याची दृष्टी शिक्षणामधून लाभावी. शिक्षणामधून सुजाण, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक तयार व्हावा ही नेत्यांची संस्था चालवताना तळमळ असल्याचे दिसते.[१८]

समाजाला दिशा लाभावी, परिवर्तनाची गरज समाजाला आहे हे परिवर्तन शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकते. देशाला आणि समाजाला दिशा देऊन अखंड प्रेरणास्रोत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे, असे नेत्यांना सतत वाटे. नव्या स्पर्धेच्या युगात जर पुढे जायचे असेल, तर ज्ञानची क्षितिजे आणि कक्षा विस्तारल्या तरच आपण स्पर्धेत राहू म्हणून ज्ञानार्जन हे सामाजिक बांधिलकीचे साधन असावे, असे नेत्यांना वाटते. नैतिक अधिष्ठान हे शिक्षणामधूनच निर्माण होते.

'ज्या गावामध्ये विद्यालय नाही तेथेही मुलींचे शिक्षण बंद होते. ज्या गरीब कुटुंबामध्ये कौटुंबिक जबाबदारी सांभाळण्यासाठी उणीव असेल, आई वडील दोघेही पोट भरण्यासाठी कामावर जात असतील, तर त्याही कुटुंबामधील अगदी प्राथमिक अवस्थेत मुलीला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे तिला बाजूला टाकण्याची दृष्टी आजही आपल्याकडे ठिकठिकाणी पहायला मिळते.

त्यामुळे फार मोठा वर्ग या ज्ञानाच्या व प्रगतीच्या वाटेवरुन बाजूला राहिलेला महाराष्ट्रामध्ये पहायला मिळतो. जगातल्या ज्या ज्या देशामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आत्मविश्वास निर्माण करणारी स्त्री उभी राहिलेली आहे, ती सगळी राष्ट्रे समृद्धीच्या बाबतीत पुढे गेलेली आहेत आणि ज्या समाजामध्ये स्त्री मागे राहिलेली आहे तिला मागे ठेवलेले आहे, तिला ज्ञानापासून वंचित ठेवले आहे. तिच्यातल्या गुणांची आणि आत्मविश्वासाची ओळख तिला जाणीवपूर्वक होऊ दिलेली नाही ते सगळे समाज आणि ती राष्ट्रे मागे राहिली आहेत.'[११]

म्हणून आपण काही परिवर्तन करण्याचा विचार करतो, समाज समृद्धीच्या रस्त्यावर नेण्याचा विचार करतो, शक्तिशाली समाज बनवण्याच्या संबंधीचा विचार आपण करतो असे नेत्यांनी स्थापन केलेल्या संस्थांवरुन आणि कार्यावरुन दिसून येते.

विविध शाखांची स्थापना करुन बलशाली भारत व उद्याची आदर्श नागरिकांची पिढी घडविण्यासाठी विद्यार्थीदशेतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला शिक्षणाची पुरेशी सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. स्पर्धेच्या युगात देशाची भरमसाठ वेगाने वाढ व्हावी त्याकरिता विद्यार्थ्यांवर विद्यार्थीदशेतच सुसंस्कार व्हावेत म्हणून 'गंगा आली रे अंगणी या ध्येयाने सर्वसामान्य माणसाच्या अंगणापर्यंत ही ज्ञानगंगा नेत्यांनी पोहचवून गोरगरीब कुटुंबातील मुलांना ज्ञानाची कवाडे उघडी करुन त्यांची ज्ञानाची तहान भागविण्याचा प्रयत्न केला आहे.'

शिक्षण संस्थेच्या सर्व विद्यालयाने सर्वांगीणदृष्टया प्रगतीकडे वाटचाल चालविली आहे. विद्यालयांच्या निकालाची उत्कृष्ट परंपरा आहे. विद्यालयातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेताना त्यांच्या प्रगतीकडे संस्थेनी विशेष लक्ष दिलेले दिसून येते. विद्यालयांतील विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक त्याचबरोबर सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातात. संस्थेच्या विद्यालयाकडे पाहिले तर प्रशस्त इमारत सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. होतकरु कष्टाळू शिक्षक वर्ग सर्वांना वेळोवळी प्रोत्साहन व मार्गदर्शन करणारे कार्यकुशल मुख्याध्यापक यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे.

'समाज आणि शिक्षण हे परस्परपूरक प्रवाह आहेत. शिक्षणामुळे समाजाला प्रतिष्ठा प्राप्त होते. चारित्र्यसंपन्न नागरिक निर्माण व्हावेत म्हणून शिक्षण दिले जाते. त्यासाठी शाळेची उभारणी केली जाते. कोटयावधी रुपये खर्च केले जातात आणि लोकांचे प्रबोधन केले जाते. शाळा आणि समाज यांचे संबंध अत्यंत घनिष्ठ आहेत. ज्या ठिकाणी भावी पिढयांना तयार करण्यात येते त्या

ठिकाणी समाजाच्या गरजांचा अग्रक्रमाने विचार केला जातो. अभ्यासक्रमाची रचना करताना समाजाच्या गरजांचा विचार करावाच लागतो. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे त्याच्या स्थैर्यासाठी त्याला समाजाचे अधिष्ठान अत्यंत आवश्यक आहे. शाळेतून ज्याप्रमाणे समाज निर्मितीसाठी बालकांवर संस्कार केले जातात त्याप्रमाणे समाजामुळे शाळेला स्थैर्य लाभते.'[२०] वरील उद्दिष्टाप्रत शिक्षण संस्थेने कार्य केलेले दिसते.

नेत्यांची साधी राहणी उच्च विचारसरणीचा अवलंब करण्याच्या आग्रहाने त्यांच्या कार्याचा नंदादीप शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सतत तेवतच राहिला आहे. स्नेहपूर्ण जोतीचा मंद, शीतल प्रकाश पसरावा तसा प्रत्यय नेत्यांच्या कार्याने साधला गेला. महात्मा गांधी, महात्मा फुले, छत्रपती शाहू, डॉ. पाईक असलेल्या जीवन हे सर्वार्थाने कृतार्थ असे राहिले. निःस्पृहता आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी समाजाबरोबरच तालुक्याचे शैक्षणिक विकासाचे ध्येय समोर ठेवून ते पूर्णत्वास नेण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले.

'शिक्षण हा मूलतः गतिशील विषय असल्याने त्याच्या स्वरुपात सारखे बदल होत असतात. त्यामुळे शैक्षणिक पुनर्रचनेची प्रक्रिया सतत चालूच असते. नवनवे संशोधन नवनव्या ज्ञानाच्या शाखांना जन्म देत राहते. त्यामुळे नव्या ज्ञानाच्या शिक्षणाच्या संकल्पनेत समावेश करणे आवश्यक असते. यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक असते. तसेच राजकीय व्यवस्थेत बदल झाल्याने देखील शिक्षणाची पुनर्रचना करावी लागते.'[२१]

महिलांना जास्तीत जास्त शिकवून विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालवले आहेत. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी.' एक मुलगी शिकली तर दोन घरी दिवा लावते म्हणून स्त्री शिक्षणावर जास्त भर दिला आहे.

शिक्षणाच्या विविध पातळी आहेत. परंतु नेत्यांनी शैक्षणिक कार्य करत असताना पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या सुविधा त्यांनी उपलब्ध करुन दिल्याचे दिसते. शिक्षण घेऊन स्वावलंबी आणि कार्यक्षम नागरिक बनले पाहिजेत ही या मागची दृष्टी आहे. उच्च शिक्षणासाठी जास्त पैसा खर्च केल्याचे दिसून येते. सामाजिक परिवर्तनामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची दिसते.

शैक्षणिक संस्थांच्या समोर नित्य उद्‌भवणाऱ्या अडचणींना वाचा फोडणे, त्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न करीत राहणे हे कार्य आजही सुरु आहे. नेत्यांची शिक्षणक्षेत्राकडे पाहण्याची

आजची दृष्टी अधिक व्यापक विस्तारित, मूलगामी व कालमान परिस्थितीशी संवादी अशी असल्याचे जाणवते. स्वातंत्र्य, समता व लोकशाही या मूल्यांवर अधिष्ठित असणारा, जातीधर्म, निरपेक्ष एकात्म जीवन जगणारा, विकासाची नियोजनबद्ध वाटचाल करणारा नव समाज घडवावयचा असेल, नवोत्पन्न प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी जनतेला सिद्ध करावयाचे असेल, संचित ज्ञानात झालेली व होत असलेली प्रचंड वाढ आणि बदलत्या लोकजीवनाचा, त्याच्या वाढत्य गरजांशी सांधा जोडावयाचा असेल तर त्याचे एकमेव साधन म्हणून आज शिक्षणाकडे पाहणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शिक्षण संस्थेचे संचालन करीत असलेले दिसते. शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असणारे विविध घटक, त्या घटकांतील परस्परसंबंध, शिक्षणाचा आशय, अध्यापन-अध्ययन पद्धती इत्यादी विषयी सतत चिंतन सुरु असते.

शैक्षणिक संस्थेची प्रशासकीय चौकट आणि अध्यापकांच्या मर्यादा या दोहोंचे भान ठेवून हे दोन्ही घटक सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाच्या प्रक्रियेचा उपयोग कसा व कितपत करु शकतील, याकडे ते सतत लक्ष देत असतात. परिस्थितीच्या मर्यादा सांभाळून शैक्षणिक संस्थेने विविध योजना राबविल्या व त्यासाठी शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या अन्य संस्था व व्यक्ती यांचे सहकार्य घेतले. अनुभवातून पुढील मार्ग शोधण्याचा त्यांचा प्रयत्न अविरत असतो. परिवर्तनशील शैक्षणिक तत्त्वज्ञानाची मांडणी कशी करता येईल यावर त्यांचे चिंतन चालू असते.

नेत्यांचा शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. तसेच एका निष्ठेपायी ते शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. या निष्ठेतूनच ते शिक्षणक्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना मार्गदर्शन करतात. 'शिक्षण संस्थेच्या विकासात संस्थेचे सभासद, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक आणि नागरिक या सर्वांचा हातभार लागला तर ती संस्था आपल्य आदर्शप्रत निश्चित वाटचाल करु शकेल.' त्या दृष्टीने विविध घटक संस्थेच्या विकासात सहभागी होऊ शकतात. नेत्यांची शिक्षण क्षेत्राविषयीची आस्था व त्यांची कार्यशैली याचा परिचय स्थापन केलेल्या संस्था आणि त्यांच्या विविध शाखा व शाखांमधून राबविले जाणारे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम यामधून दिसून येते. कारण रक्तदान शिबिर, साहित्य संमेलन, कृषि प्रदर्शन, कृषि मेळावा, लोकसाहित्य परिषद असे विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

मनुष्य वृद्धपकाळाकडे गेला की तो जाणिपूर्वक आपला कारभार आवरता घेऊ लागतो. थकल्याची जाणिव जशी त्याला होती तसेच त्याचे किती दिवस उरलेत, याची जाणीव समाजाला

होत असते. परंतु ही परिस्थिती या नेत्यांनी समाजासाठी स्थापन केलेल्या संस्थाच्याबाबत होत नाही. संस्था व कामाची व्याप्ती व उलाढाल वाढत जाते. उत्तरोत्तर अशा संस्थांचे स्थैर्य वाढत जाते. नेत्यांच्या बाबत काढलेल्या संस्था स्थिरावलेल्या दिसतात व वाढत्या वयात त्यांचा संपर्क व कार्यक्षमता घटन्यापेक्षा किंबहुना वाढलेली आहे.

'खेडयाकडे चला' हा महात्मा गांधीनी दिलेला मंत्र अंगीकारुन नेत्यांनी ग्रामीण भागातील जनतेसाठी आजन्म समाजसेवेचे व्रत धारण केलेले आहे. आज सत्ता, संपत्ती, विलासाच्या वाढत्या भोगलालसेने सामाजिक मूल्ये, समाजरचना खिळखिळी होत असताना उद्याच्या भविष्यकाळाला आकार देण्यासाठी मनावर योग्य संस्कार करणारे राष्ट्रीय व सामाजिक कर्तव्याची दीक्षा घेऊन 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचनम्' या वचनाप्रमाणे काम करणाऱ्या सर्वांनाच सदैव कौतुकाच्या आणि आदराच्या भावनेने वागवले.

**५.३ रयत शिक्षण संस्था :-**

'भाऊराव पायगौंडा पाटील यांना सामान्यतः कर्मवीर भाऊराव पाटील असे संबोधिले जाते. 'कर्मवीर' म्हणजे सतत कार्यरत असणारे व्यक्तिमत्त्व भाऊरावांना ही पदवी कोणत्याही शासनाने दिलेली नाही. भारतीय प्रजासत्ताकाचे राष्ट्रपिता गांधीजी जसे 'महात्मा' म्हणून ओळखले जातात, टिळकांना जसे 'लोकमान्य' म्हटले जात चित्तरंजनदास यांचा उल्लेख 'देशबंधू' असा केला जात असे, तशीच भाऊराव पाटील यांना महाराष्ट्रातील बहुजन समाजाने 'कर्मवीर' ही पदवी प्रदान केली'[२२]

कर्मवीर पाटील हे महाराष्ट्राचे एक आदरणीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी हरिजनोध्दाराचे कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा तर विशेत्त्वाने उल्लेख केला जातो. स्त्रियांच्या शिक्षणाचा हिरिरीने पुरस्कार केला. त्यांच्या कार्याचा राजकारणावरही अप्रत्यक्ष परिणाम घडून आला. शिक्षणक्षेत्रातील कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सुरु केलेल्या शैक्षणिक कार्याला अत्यंत लहान प्रमाणावर प्रारंभ केला. आज त्यांचे हे कार्य एखाद्या विराट वृक्षाच्या फांद्यांप्रमाणे पसरले आहे. प्राथमिक पातळीपासून उच्च शिक्षणापर्यंत संपूर्ण शिक्षण मोफत देता येणे शक्य आहे, हे भाऊरावांनी सिध्द करुन दाखविले आहे.[२३]

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दृष्टीने रयत शिक्षण संस्था हे केवळ सेवेचे साधन नव्हते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तो विस्तारित भाग होता. भाऊरावांच्या चैतन्याचा समूर्त अविष्कार म्हणजे

रयत शिक्षण संस्था, संस्थेची सेवा करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या, रयतेच्या आणि कामगारांच्या सेवेमध्ये त्यांनी आपल्या आयुष्याचे सार्थक मानले आणि हे कार्य त्यांनी रयत शिक्षण संस्थेमार्फत केले. ही संस्था १९१९ साली जन्माला आलेली असली तरी ती सरकार दरबारी नोंदली गेली १९३५ मध्ये संस्थेची लेखी घटना आणि नियम तयार केले. ही संस्था भाऊरावांनी स्थापन केली. त्यांनीच तिचे संगोपन केले.[२४]

कर्मवीर भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सर्वजातींच्या व धर्मांच्या विद्यार्थ्यांना प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर वसतिगृहे सुरु केली. १९१९ ते १९३५ या काळात भाऊरावांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे कार्य अल्प खर्चात विद्यार्थ्यांची राहण्या-जेवण्याची सोय करणारी वसतिगृहे चालविण्यापुरतेच मर्यादित होते.

**अहमदनगर जिल्हयातील कार्य :-**

'भाऊरावांनी आपल्या शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला तो १९१९ च्या सुमारास सातारा येथून १९१८ च्या 'मॉन्टेंग्यू-चेम्सफोर्ड' सुधारणानंतर पारंपारिक जाति-बलुतेदारी-बौध्द समाजास या चाकोरीतून बाहेर पडण्याची आणि राजकीय क्षेत्रातसुध्दा प्रवेश मिळण्याची शक्यता निर्माण झाली. स्पर्धेवर आधारित आधुनिक समाजात पाऊल टाकण्याची संधी पुढे आली. परंतु त्यावेळी बहुजनसमाज खेडोपाडी राहात होता. जातिव्यवस्थेच्या जाखडात पूर्णतया आवळलेला होता. बहुजन समाज व स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या.

भाऊरावांनी कार्य सुरु करण्याच्या आगोदरच्या कालखंडात रानडे, आगरकर, कर्वे यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी नगर विभागात मुख्यत: ब्राम्हण समाजात सामाजिक सुधारणा व शिक्षण प्रसार यांसारखे कार्य सुरु कले होते. पण खेडोपाडी बहुजन समाजापर्यंत पोहोचण्याची जरुरी त्यांना भासली नाही.'[२५]

कर्मविरांनी ग्रामीण भागात शिक्षणाची चळवळ उभी केली आणि अहमदनगर जिल्हयात या कार्यास प्रारंभ केला. १९४८ साली कर्मवीर नगर येथे आले. आणि त्यांनी नगर येथे मिटींग घेतली. हिराबाई भापकर अध्यक्ष होत्या. भाऊराव पाटील, बाबुराव जगताप, कर्वे यांची सभास्थळी भाषणे झाली. भाऊरावांनी भाषणात सांगितले की, नगर जिल्हयात शिक्षणाचे काम फार मागास आहे. शेतकऱ्यांची मुलं अडाणी आहेत. त्यांना शिक्षण दिलं पाहिजे, त्यासाठी जर कोणाला शाळा काढायची असेल तर सभा संपल्यावर भेटावं त्या वेळेस बापूसाहेब भापकर, कर्मवीर, दलित मित्र

दादासाहेब काशीराम पाटील भेटले आणि कर्जत येथे हायस्कूल सुरु करावयाचे आहे. अण्णांना ते पटलं दुसऱ्या दिवशी अण्णा कर्जतला गेले आणि हायस्कूल काढायचे जाहीर केले. १३/०६/१९४९ रोजी महात्मा गांधी विद्यालय कर्जत हे नगर जिल्हयात संस्थेचे पहिले हायस्कूल सुरु केले.[२६]

कर्मवीर भाऊराव पाटलांबद्दल कित्येक वर्षे कुतूहल वाटत असे पूर्वी शिक्षण घेण्यासाठी नगर, पुणे शहरात जावे लागत असे. ग्रामीण भागात शिक्षणाची चळवळ उभी केली, शिक्षणाचा वटवृक्ष उभा करताना लक्षाधिशाची कास न धरता ग्रामीण भागातील लाख घरांना पदस्पर्श करुन त्यांच्याकडून अक्षरशः रुपया-रुपया जमा केला. संपूर्ण नगर जिल्हा पायाखाली घातला. त्या काळात ग्रामीण जनतेशी आणि विशेषतः शेतकऱ्यांशी संबंध आला. स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र पुढे आला. बहुजन समाजाची परिस्थिती सुधारावी. ग्रामीण भागात सुशिक्षित कार्यकर्त्यांची फळी तयार व्हावी, यासाठी अण्णांनी अक्षरशः जिवाचे रान केले.

आजच्या पेक्षा अण्णांच्या काळात शेतीची परिस्थिती अत्यंत बिकट असतानाही ग्रामीण जनतेच्या सहकार्यातूनच विद्यालये उभी राहिली पाहिजेत, अशी संकल्पना करुन ती प्रत्यक्षात आणली. नगरला आल्यानंतर अण्णा बापूसाहेब हिराबाई भापकर यांच्या घरी थांबत असत. बापूसाहेब भापकरांनी नगर जिल्हयामधील ग्रामीण जनतेमध्ये आदराचे स्थान प्राप्त केले आहे.[२७]

नगर जिल्हा पूर्वीपासून पुरोगामी चळवळीचे केंद्र समजले जाते. कोल्हापूर स्वाभिमानी राजे चौथे छत्रपती श्री. शिवाजीमहाराज यांचा नगरला ब्रिटिशांकडून खून झाला. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण मंडळाच्या छत्राखाली नगर जिल्हयामध्ये वसतिगृह आणि शैक्षणिक कार्याला सुरुवात झाली होती. त्याला छत्रपती श्री शाहूमहाराज यांनी उदार अंतःकरणाने मदतीचा हात पुढे केला होता. या संस्थेमध्ये नगर जिल्हयातील सर्व मराठी समाजाचे मान्यवर एकत्रित झाले होते. असे असतानाही नगर जिल्हयात सर्वात मोठया प्रमाणावर रयत शिक्षण संस्थेचा व्याप वाढला कारण भाऊरावांच्यावरील व त्यांच्या कार्याबद्दल समाजाला व मान्यवरांना वाटणारा विश्वास प्रकट होत होता. बापूसाहेब भापकर, दादापाटील, पद्मश्री विठ्ठलराव विखे, भास्कररावजी गलांडे पा. बाबुमियाँ बँडवाले, आबासाहेब निंबाळकर, पी.बी. कडूपाटील, ॲड. रावसाहेब शिंदे, शंकररावजी काळे, दत्ता देशमुख, अण्णासाहेब शिंदे, शिवराम अण्णा पाचपुते, शंकरराव कोल्हे अशा अनेक मान्यवरांनी जिल्हयात रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेकरिता भाऊरावांना मदत केली.

'ग्वाल्हेरच्या शिंदेमहाराजांनी भाऊरावांच्या झोळीत अक्षरशः शेकडो एकर जमीन व लक्षावधी रुपयांची मिळकत टाकली ही अण्णांच्या कामाची पावतीच समजली पाहिजे. शिंदे सरकारचे त्यावेळचे मुख्यत्यार चांदेकर यांच्याकडून सव्वारुपया भाडयाने वाडा घेतला व जून १९५३ पासून महादजी शिंन्दे विद्यालय सुरु केले. पुढे जिवाजीराव शिंन्देमहाराजांची व कर्मवीर अण्णांची भेट झालीमहाराजांनी संस्थेसाठी खालील वाडे दिले.

१) राजवाडा दि. ०१/०७/१९५४

२) कचेरीवाडा दि. १६/०८/१९५५

३) जळकावाडा दि. १६/०८/१९५५

४) भैरुबाची बखळ दि. १६/०८/१९५५

५) बोलू सिधनकरचा वाडा दि. १६/०८/१९५५.

६) नगरखाना दि. १८/०८/१९५५.

७) राजवाडयाची राहिलेली २६ खण जागा दि. १९/०८/१९५५.

याशिवाय १९५४ ते १९५६ या कालावधीत श्रीगोंदा तालुक्यातील सुमारे ८०६ एकर जमीनही बक्षीस म्हणून देण्यात आली.'[२८] जामगाव ता. पारनेर येथील प्रचंड भिंतीसह उभा असलेला राजवाडा ५०० एकर जमीन रयत शिक्षण संस्थेचा प्रचंड विस्तार वाढला. या शिवाय इतर ठिकाणीसुध्दा अन्य दानशुराकडून व खंडाने वडाळा महादेव येथे १५५ एकर, प्रवरानगर, कोळपेवाडी, कर्जत अशा अनेक ठिकाणी हायस्कूल्स काढली. जमीन व शिक्षणाचे नाते निर्माण केले.

शेतीची अवस्था अत्यंत कनिष्ठ दर्जाची हाती. ग्रामीण भागातील सुशिक्षितांचा ग्रामीण भागाची सुधारणा करण्याकरिता उपयोग होत नव्हता. शेतकऱ्यांची प्रतिष्ठा वाढली तर देशाची प्रतिष्ठा वाढेल हा विचारसुध्दा कुणाला शिवत नव्हता. विद्यार्थी आणि शेतकरी एकत्र काम करीत आहेत हे पाहून कोणालाही आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नसेल. इंग्रजांच्या काळात शेतकऱ्यांचा स्वाभिमान ढळला होता. शेतकऱ्यांना स्वाभिमानी बनविले. घराघरात ज्ञानाचा दिवा लावून ग्रामीण समाजाचा दैववाद, निराशावाद, आणि नशीबवाद अण्णांनी घालविले. ग्रामीण भगातील युवकांना हाताशी धरुन परिवर्तन घडवून आणले. खडकाळ नापीक भाग सुपीक करता येतो अशी खेडयतील शेतकऱ्याला नवीन दृष्टी देऊन अण्णांनी खेडयताील जीवनमान बदलण्यात मदत केली.

विद्यार्थ्यांबरोबर शेतकऱ्यांना स्वावलंबन शिकवले. मूलोद्योग शिक्षणासाठी खादी विणकामाबरोबर शेती उद्योग शिक्षण सुरु केले. ग्रामीण शिक्षणाबरोबर शेतकरी केंद्रबिंदू मानून त्यांच्या भोवती गुंफले गेले होते. अण्णांच्या वैचारिक भूमिका आज दुर्दैवाने कमी होत चालल्या आहेत. ग्रामीण भगात जवळ जवळ प्रत्येक दोन-तीन गावे मिळून हायस्कूल आणि ५-१० गावात कॉलेज स्थापन झाले आहे. शेती बेसीक असलेल्या माध्यमिक शाळा व महाविद्यालये हाताच्या बोटावर मोजण्याइतपत आहेत.

जामगाव, ता. पारनेर येथील संस्थेचे शेती बेसीक ट्रेनिंग कॉलेज आहे. 'कमवा आणि शिका' या मंत्राप्रमाणे विद्यार्थी पैशाची भीती न बाळगता शिक्षणासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवून शिक्षण घेत. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भगातील मुख्य अर्थार्जनाचे साधन असलेल्या शेतीला व धंद्यातील श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले. खंडाने जमिनी घेतल्या त्यात विहिरी खोदल्या, बंडींग केले आणि शेती उत्तम धंदा आहे हे दाखवून दिले. शैक्षणिक कार्य म्हणजे हिमपर्वताचा छोटासा भाग आहे. घराघरातून पैसा, धान्य मिळवून जिल्हयातील सहकाऱ्यांच्या मदतीने विविध शाखा उभ्या केल्या.'[२९]

श्रीगोंदा येथे श्री जिवाजीराव शिंदेमहाराज यांच्याकडून मिळालेली जमीन व इतर मालमत्तेचा चांगला विनियोग करुन येथे २२ एकर जमिनीवर 'कमवा आणि शिका' ही योजना राबवून उन्हाळयात धान्य गोळा करुन विद्यार्थी व संस्थेची शेतकरी कुळे यांच्यामध्ये एक नवीन नाते निर्माण केले आहे. केवळ शेतकऱ्यांच्या उध्दाराकडेच नव्हे तर ग्रामीण भागातील शेतकरी महिलांकडे अण्णांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. स्त्रीशिक्षणाबाबत त्यांचे विचार अत्यंत पुरोगामी तर होतेच; परंतु सुशिक्षित स्त्री बेडर झाली पाहिजे, धाडसी बनली पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी अनेकांवर संस्कार तर केलेच; याशिवाय जीवनात कसे वागावे म्हणजे माणूस सुशिक्षित होतो याचे मार्गदर्शनही योग्य वेळी केले.

तसे पाहिले तर आजही शेतीची ७०% कामे महिलाच करतात. अण्णांची स्त्रीशिक्षणाबद्दलची दृष्टी व तळमळ ग्रामीण भागातील स्त्रियांपर्यंत पोहोचली, तरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या शेतीची प्रगती होऊ शकेल. अण्णांच्या ग्रामीण विकासाच्या आणि शैक्षणिक कार्याचा शोध घ्यायचा असेल, तर नगर जिल्हयातील कार्य शोधून जमणार नाही. तर त्यांनी निरनिराळया समाजासाठी वेगवेगळया कार्यपध्दती अमलात आणल्या. सामाजिकदृष्टया मागासलेल्या हरिजन

आणि रामोशी लोकांच्यासाठी सहकारी गृहरचना संस्था, शेतीला जोडधंदे मिळावेत म्हणून विविध भागांमध्ये अण्णांनी राबविले.[३०]

रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहाची स्थापना करुन वसतिगृहात सर्व धर्म व जातींची मुले एकत्र रहात काम करत, जेवत. वसतिगृहातील राहणीमान हे मुलांच्या घरच्या परिस्थितीशी मिळते जुळते असे. अशा रीतीने प्राथमिक शाळेपासून ते महविद्यालयापर्यंतचे मोफत व वसतिगृहयुक्त शिक्षण मागास व गरीब जनतेपर्यंत भाऊरावांनी पोहचविले हे त्यांच्या शैक्षणिक कार्याचे खास वैशिष्टे आहेत. स्थापन केलेल्या विविध शैक्षणिक संस्था व त्यांचा विस्तार पुढील प्रमाणे-

(नगर दक्षिणेतील रयत शिक्षण संस्थेचे पहिले महात्मा गांधी विदयालय कर्जत छायाचित्र परिशिष्टामध्ये दर्शविले आहे )

**'अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालय स्थापना'**

**१) नगर -**

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | न्यू इंग्लिश स्कूल, वाळकी | १९५८ | ५ ते १० | |
| २ | छत्रपती शिवाजी विद्यालय, अकोळनेर | १९५९ | ५ ते १० | |
| ३ | कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, सारोळा कासार. | १९५९ | ५ ते १० | १२ वी विज्ञान |
| ४ | श्रीसंतुकनाथ इंग्लिश विद्यालय जेऊर | १९५९ | ५ ते १० | |
| ५ | न्यू इंग्लिश स्कूल, चिचोडी पाटील | १९६० | ५ ते १० | |
| ६ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालय, नगर | १९६० | ५ ते १० | |
| ७ | न्यू इंग्लिश स्कूल, हिंगणगाव | १९६४ | ५ ते १० | |
| ८ | श्री. अंबिका विद्यालय, केडगाव | १९६९ | ५ ते १० | |
| ९ | न्यू इंग्लिश स्कूल, भिंगार | १९७० | ५ ते १० | |

**२) कर्जत -**

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | दादा पाटील महाविद्यालय, कर्जत | १९६४ | | कला, वाणिज्य, विज्ञान |
| २ | महात्मा गांधी विद्यालय, कर्जत | १९४९ | ५ ते १० | विज्ञान १२ वी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | जगदंबा विद्यालय, राशिन, कर्जत | १९५६ | ५ ते १० | |
| ४ | न्यू इंग्लिश स्कूल, कोंभळी | १९६४ | ५ ते १० | |
| ५ | न्यू इंग्लिश स्कूल, चापडगाव | १९६४ | ५ ते १० | |
| ६ | सौ. सोनाबाई नामदेवराव सोनमाळी कन्या विद्यामंदिर, कर्जत | १९७१ | ५ ते १० | |
| ७ | न्यू इंग्लिश स्कूल, टाकळी खंडेश्वरी | १९७१ | ५ ते १० | |
| ८ | न्यू इंग्लिश स्कूल, शिंदे | १९७१ | ५ ते १० | |

## ३) पारनेर -

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | जनता विद्यामंदिर, कान्हूरपठार | १९५१ | ५ ते १० | १२ वी विज्ञान |
| २ | महात्मा फुले विद्यालय, भाळवणी | १९५९ | ५ ते १० | |
| ३ | जनसेवा विद्यालय, वडझिरे | १९५९ | ५ ते १० | |
| ४ | साईनाथ हायस्कूल, आळकुटी | १९५९ | ५ ते १० | कला, वाणिज्य, विज्ञान १२ वी |
| ५ | न्यू इंग्लिश स्कूल, सुपा | १९५९ | ५ ते १० | |
| ६ | धर्मनाथ विद्यालय, जवळे | १९६१ | ५ ते १० | |
| ७ | न्यू इंग्लिश स्कूल, हंगे | १९७१ | ५ ते १० | |
| ८ | महाराजा माधवराव शिंदे ज्युनि. कॉलेज ऑफ एज्युकेशन (डी.एड्), जामगाव, पारनेर | १९५५ | D.Ed. | |

## ४) पाथर्डी -

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | न्यू इंग्लिश स्कूल, कोरडगाव | १९६१ | ५ ते १० | |
| २ | छत्रपती शिवाजीमहाराज हायस्कूल, मिरी, पाथर्डी | १९६० | ५ ते १० | |

### ५) श्रीगोंदा -

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगांदा | १९८२ | | कला, वाणिज्य, विज्ञान |
| २ | महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा | १९५३ | ५ ते १० | १२ वी विज्ञान |
| ३ | कोळाईदेवी विद्यालय, कोळगाव | १९५६ | ५ ते १० | १२ वी कला |
| ४ | जनता विद्यालय, काष्टी | १९५६ | ५ ते १० | १२ वी कला |
| ५ | सरस्वती विद्यालय, विसापूर | १९५९ | ५ ते १० | १२ वी वाणिज्य, विज्ञान |
| ६ | छ. शिवाजी विद्यालय, बेलवंडी | १९६० | ५ ते १० | १२ वी कला |
| ७ | छ. शिवाजी विद्यालय, घोगरगाव | १९६१ | ५ ते १० | १२ वी वाणिज्य |
| ८ | पंडित जवाहरलाल नेहरु विद्यालय, आढळगांव | १९६५ | ५ ते १० | |
| ९ | न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव, श्रीगोंदा | १९७१ | ५ ते १० | |

### ६) जामखेड -

| अ.क्र. | शाळेचे नाव | स्थापना | माध्यमिक | उच्च माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| १ | खर्डा इंग्लिश स्कुल, खर्डा | १९५२ | ५ ते १० | वाणिज्य |
| २ | छ. शिवाजी विद्यालय, जवळे | १९६० | ५ ते १० | |
| ३ | श्री नागेश विद्यालय, जामखेड | १९६१ | ५ ते १० | |
| ४ | अरण्येश्वर विद्यालय, आरणगाव | १९६८ | ५ ते १० | विज्ञान (शेती) |
| ५ | पंचक्रोशी विद्यालय, नायगाव | १९८७ | | |

**'तालुकानिहाय रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शाखांची यादी'**[३१]

वरील तक्त्यावरुन तालुकानिहाय रयत शिक्षण संस्थेचे विद्यालय, महाविद्यालय, स्थापना व विस्तार लक्षात येतो. यावरुन पाथर्डी तालुका सोडता इतर सर्वत्र मोठया प्रमाणात विस्तार झाल्याचे दिसते.

### समारोप -

दक्षिणेतील नेतेमंडळी 'समान्य व्यक्तिमत्त्वाचे' आहेत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक विकास कार्याबरोबर दक्षिण भागाचा शैक्षणिक विकास झाला पाहिजे. सहकारी चळवळीतून समाजविकास होईल; परंतु ज्ञानाने माणसाचा विकास होईल. माणसाचा आत्मिक विकास झाला की पर्यायाने समाज आणि राष्ट्राचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. या करिता शैक्षणिक संस्थांची

साखर कारखान्यांच्या माध्यमातून स्थापना केली. विकासासाठी शिक्षणाची गंगोत्री आणून येथील बहुजन समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे, हा ध्यास नेतेमंडळींनी स्थापन केलेल्या विविध संस्थांमधून दिसून येतो. ग्रामीण भागात गावोगावी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून, इतर शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक दर्जा वाढवून विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास झाला पाहिजे. शेतकरी कुटुंबातील मुले उच्च विद्याविभूषित झाल्याचे दिसून येते. सदर प्रकरणामध्ये १९९० ते २००० या कालावधीतील जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक संस्था, शिक्षक, विद्यार्थी संख्या यांची प्रगती अभ्यासली आहे. त्याच बरोबर जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन (तांत्रिक शाळा) यांचाही अभ्यास केला आहे. त्याचबरोबर तालुकानिहाय प्रौढशिक्षण केंद्र व व्यक्तींची संख्या तसेच १९९१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे तालुकानिहाय प्रमाण अभ्यासले आहे.

रयत शिक्षण संस्थेचे नगर दक्षिण भागातील शैक्षणिक कार्य सहभागी नेत्यांचे योगदान, तसेच दक्षिण नगरमधील प्रशिक्षण विद्यालय, स्थापना यांचा तालुकानिहाय सखोल अभ्यास केला आहे. यातून नगर दक्षिणेतील शैक्षणिक संस्थांची प्रगती व कार्य लक्षात येते. झालेला विकास शैक्षणिक सुविधा घडून आलेला बदल प्रकर्षाणे जाणवतो आहे. या बदला बरोबर दक्षिणेत पारंपारिक शिक्षण मोठया प्रमाणात दिसून येते. परंतुअभियांत्रिकी, मेडीकल, कृषी या शैक्षणिक संस्थाच्या स्थापना झालेल्या नाहीत. त्यामुळे आजही दक्षिणेतील विद्यार्थ्यांना प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालयीन शिक्षण, डि.एड्., बी.एड्., कृषी पदविका, आय.टी.आय. या सारखे व्यवसायिक शिक्षण हे तालुक्यात उपलब्ध आहे. मात्र, उच्च शिक्षणाची प्रगती कमी दिसून येत आहे. यावरुन नेत्यांनी जिल्हयात केलेला सामाजिक, आर्थिक विकास आणि शैक्षणिक कार्य लक्षात येते व यातूनच १९९० ते २००० या काळातील विकास, प्रगती लक्षात येते.

## तळटीपा

१) विजया वाड(संपा.), "*मराठी विश्वकोश खंड - १७*", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २००७, पृष्ठ. ८४०.

२) एन. एस. तांबोळी, व्ही. पी. पवार, "*इतिहास*", धैर्य प्रकाशन, द्वितीय आवृत्ती जुन २००७, पृष्ठ. ६, ४.

३) शंकरराव कदम, महर्षी वि. रा. शिंदे, "*साहित्य आणि कार्य*", स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००० पृष्ठ. २१३, २१४.

४) दै. गांवकरी विशेषांक, अनिरुध्द देवचक्के (संपा.), नगर आवृत्ती, २ फेब्रुवारी २००४, पृष्ठ. १२.

५) दा. धो. काचोळे, "*फुले-आंबेडकर*", संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृष्ठ. ४६, ४७.

६) बापूसाहेब देशमुख यांची मुलाखत, दि. २८/०२/२०१३.

७) ग. वि. कायंदे, "*यशवंतराव चव्हाण*", चैतन्य पब्लीकेशन, पृष्ठ. १३६.

८) बापूसाहेब देशमुख यांची मुलाखत, दि. २८/०३/२०१३.

९) शंकरराव कदम, वि. रा. शिंदे, उपरोक्त, पृष्ठ. २२१.

१०) कित्ता; पृष्ठ. २२२.

११) "*जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन*", अहमदनगर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० ते २०००, पृष्ठ. १७५.

१२) कित्ता; पृष्ठ. १८१.

१३) कित्ता; पृष्ठ. १८१.

१४) "*जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन*", उपरोक्त, १९९०-२०००, पृष्ठ. १७५.

१५) कित्ता; पृष्ठ. १७४

१६) श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, श्रीगोंदा, घटना, १९/०१/१९८०, पृष्ठ ३,४.

१७) दैनिक सकाळ, दि. २२/०४/१९९९.

१८) बापूसाहेब देशमुख यांची मुलाखत, दि. २८/०३/२०१३.

१९) शरद पवार, "*महाराष्ट्र : एक दृष्टिकोन*", चैतन्य प्रकाशन, बारामती, १९८९ पृष्ठ. १७४.

२०) विश्वंभर कुलकर्णी, सुधा काळदाते *"उद्योन्मुख भारतीय समाज संस्कृती आणि शिक्षण"*, श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ. २६१.

२१) कित्ता; पृष्ठ. १३१.

२२) ए.व्ही. मॅथ्यू. *"कर्मवीर भाऊराव पाटील"*, रयत शिक्षण संस्था, (प्रकाशक), १९८८, प्रथम आवृत्ती, पृष्ठ. १.

२३) कित्ता; पृष्ठ. २.

२४) कित्ता; पृष्ठ. ३६८.

२५) *"कर्मवीर भाऊराव पाटील जनमशताब्दी स्मरणिका"*, रयत शिक्षण संस्था, (प्रकाशक), उत्तर विभाग, अहमदनगर, १९८७-८८, पृष्ठ. २३.

२६) कित्ता; पृष्ठ. ३२.

२७) *"रयत शिक्षण पत्रिका"*, अनिल पाटील, (प्रकाशक), जानेवारी ते मार्च २०१३, पृष्ठ. ११.

२८) *"कर्मवीर भाऊराव पाटील जन्मशताब्दी स्मरणिका"*, उपरोक्त, १९८७-८८,पृष्ठ. ५२.

२९) *"रयत शिक्षण पत्रिका"*, अनिल पाटील,(प्रकाशक), उपरोक्त, जानेवारी ते मार्च २०१३, पृष्ठ. १३.

३०) कित्ता; पृष्ठ. १४.

३१) *"कर्मवीर भाऊराव पाटील जन्मशताब्दी स्मरणिका"*, उपरोक्त, १९८७-८८, पृष्ठ. ६७.

# प्रकरण - ६

# उपसंहार

**प्रकरण - ६**

**उपसंहार**

**प्रस्तावना :-**

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा (१९९० ते २०००) कालखंडातील अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध प्रबंधाच्या आधारे करण्यात आलेला आहे. थोडक्यात मानवी जीवनाची समग्र वाटचाल म्हणजे इतिहास. व्यक्ती, समाज, स्थल आणि काल या चार आधारस्तंभावर इतिहास आधारलेला असतो. 'मानव' हाच इतिहासलेखनाचा अभ्यास विषय असतो. मानवाने केलेल्या प्रगतीचा अथवा अधोगतीचा लेखाजोखा सांगणारी काहाणी म्हणजे इतिहास होय. 'इतिहास म्हणजे त्या त्या कालखंडातील त्या त्या लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक विचारांचे आशा-आकांक्षांचे, घडामोडीचे नि-स्थितीचे प्रतिबिंब असते'[१] वेगवेगळया कालखंडात वेगवेगळे महापुरुष निर्माण होत असतात व आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्या-त्या कालखंडावर ठेऊन जात असतात. म्हणूनच तर कार्लाईल महापुरुषांच्या चरित्रांनाच इतिहास असे म्हणतो. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन महापुरुष त्या-त्या काळात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तथा आर्थिक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न करीत असतात.

संशोधनाची ओळख यामध्ये संशोधनाची गरज, उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, सहाय्यभूत माहिती संकलन मांडण्यात आली आहे. त्याचबरोबर अहमदनगर जिल्हयांची संक्षिप्त माहिती मांडण्यात आली आहे. त्यामध्ये जिल्हयाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, तालुकानिहाय प्रशासकीय विभाग, लोकसंख्या, ऐतिहासिक, धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे, जिल्हयातील समाजजीवन वैशिष्टे, सामाजिक परिवर्तन व भौतिक प्रगती स्पष्ट करण्यात आली आहे. त्याबरोबर जिल्हयाची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक, ऐतिहासिक, पार्श्वभूमीचा समावेश करण्यात आलेला आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थिती अभ्यासली आहे. यामध्ये राजकीय नेते, राजकीय संस्था आणि नेत्यांचा राजकीय कार्यारंभ आणि त्यातून साधलेला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक विकास यांचा सखोल आढावा घेण्यात आलेला आहे. गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवरील विविध संस्था, संघटना, पक्ष यांच्या माध्यमातून

राजकीय कार्य करीत असताना सामाजिक विकासाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. गावच्या सरपंच, चेअरमन पदापासून ते साखर कारखान्याचे अध्यक्ष, आमदार, खासदार, राज्यपातळीवरील, देशपातळीवरील विविध पदापर्यंत काम करत आहेत. त्यांच्या माध्यमातून विकास साधला जात आहे.

जिल्हयातील कम्युनिस्ट चळवळ आणि सहभागी नेते यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. कम्युनिस्ट नेते बाबासाहेब ठुबे यांचेही पारनेर तालुक्यातील कार्य महत्त्वाचे आहे. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील तालुकानिहाय राजकीय, सामाजिक नेते त्यांचे राजकीय कार्यारंभ, यश-अपयश भूषविलेली विविध पदे, आणि त्यातून केलेले सामाजिक कार्य याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक विकासाचा चढता आलेख दिसून येतो. त्याच बरोबर दक्षिण भागातील १९९० ते २००० काळातील ग्रामपंचायत, प्राथमिक कृषि सहकारी संस्था, पंचायत समिती, जिल्हा परिषद त्यांचे अध्यक्ष, सहकारी साखर कारखाने, जिल्हा सहकारी बँक चेअरमन, यांनी केलेले विकास कार्य व त्यातून घडून आलेला बदल त्याचबरोबर १९९० ते २००० या काळातील दक्षिण भागातील तालुकानिहाय आमदार (विधानसभा सदस्य) यांचे पक्ष व त्यातून साधलेले विकास, नगर दक्षिण लोकसभा खासदार त्यांचे पक्ष त्यांनी साधलेला विकास, यांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. दक्षिणेतील नेते सामाजिक कार्य करत असताना राजकीय अपयश आले तरी विकास कार्यावर स्थिर दिसून येतात. किंवा विचारापासून दूर गेलेले नाहीत. एकूणच दक्षिणेतील राजकीय नेते त्यांची कारकीर्द स्थापन केलेल्या राजकीय संस्था यश-अपयश यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. सामाजिक कार्यकरत असताना नेतेमंडळींना पराभव पत्कारावा लागला. तरी सुध्दा जनतेने दिलेला कौल मान्य करत नव्या जोमाने कामाला लागत व तालुक्यात विकास कामांचा डोंगर उभा केला आहे. याचा एकूणच आढावा राजकीय स्थिती या तिसऱ्या प्रकरणात मांडण्यात आला आहे. सत्तेचा वापर केवळ स्वत:साठी न करता आपण समाजाचे काही देणे लागतो या न्यायाने रात्रंदिवस कष्ट करुन समाज विकास करण्याकरिता झटले आहेत व त्यातूनच तालुक्याचा विकास साधण्याचे काम केले आहे. यातूनच सामाजिक लक्ष्य साधले जात आहे. समाजातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दक्षिण नगर जिल्हयाचा चेहरामोहरा बदलून गेला आहे.

प्रकरण तीनमध्ये सामाजिक कार्य व त्यातून दक्षिण भागातील तालुक्यांचा उत्कर्ष स्पष्टपणे व सत्य स्वरुपात मांडला आहे. जिल्हयातील शेतकरी चळवळ सहभागी नेते मंडळी व त्यातून पुढे

निर्माण झालेली सहकार चळवळ व पाणीप्रश्न यांचाही आढावा घेण्यात आला आहे. नगरदक्षिणेतील जलदायिनी त्यांच्या माध्यमातून साधलले विकास कार्य, सन १९५२-५३ साली स.का. पाटलांनी विसापूर येथे मुळा कुकडी परिषदेचा आढावा घेण्यात आलेला आहे. कर्जत, श्रीगोंदा तालुक्याचा पाणी प्रश्न कुकडी प्रकल्प, हंगे जलसेतू, सीना प्रकल्प, वांबोरी चारी असे विविध पाणीप्रश्न व चळवळ यांचा सविस्तर अभ्यास केला आहे. दक्षिणेतील नेत्यांनी जलप्रकल्प उभे करुनही दक्षिणेतील बराचसा भाग हा आजही दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो, यामध्ये पाथर्डी, नगर व जामखेड या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त भागाचा आढावा घेतला आहे. जलप्रकल्पाच्या माध्यमातून ओलिताखाली आलेला भाग सोडता दक्षिणेतील इतर क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर आधारलेले दिसून येते. तरी सुध्दा दक्षिण भागात पाण्याचा प्रश्न थोडया फार प्रमाणावर सुटला आहे. परंतु माळढोक प्रश्न एम.आय.डी.सी., साकळाई योजना जर पूर्ण झाल्या तर दक्षिण नगर जिल्हयाचा चेहरा मोहरा बदलू शकेल. परंतू दक्षिणेकडील पुढाऱ्यांनी जर नेटाने वरील प्रश्न सोडविले तर निश्चितच दक्षिण नगर जिल्हयाचे चित्र पालटू शकेल.

काही प्रमाणात पाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. त्यांच्या शेतात व्यापारी पिके घेतली जातात. यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून येते. परंतु काही भागात राजकीय मतभेदांमुळे पाणीप्रश्न तसाच राहिला आहे. त्यामुळे त्यांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागते. लोकांना सतत आश्वासने देत राहायचे आणि ती पाळावयाची नाहीत असेच दृश्य दक्षिण नगर जिल्हयाच्या बाबतीत दिसून येते. यामुळे हातात सत्ता असताना सुध्दा काही फलित झाल्याचे दिसून येत नाही. परिणामी, याचा परिणाम जनमाणसावर झाल्याचा दिसून येतो.

अहमदनगर जिल्हा राजकीय हेवेदाव्यांमध्ये गुरफटला असला तरी विविध विकासकामांसाठी राजकीय नेत्यांनी राजकीय क्षेत्राचा वापर केल्यामुळे कुकडी जलप्रकल्पासारखे अनेक असाध्य प्रकल्प साध्य केलेले आहेत. तरीही दक्षिण अहमदनगर आज बऱ्याचअंशी दुष्काळाच्या सावटाखाली दिसून येतो. त्यास केवळ नेते जबाबदार आहेत असे म्हणून चालणार नाही. तर त्यास तेथील प्रतीकुल भौगोलिक परिस्थितीही तितकीच कारणीभूत असलेली दिसून येते. थोडक्यात, राजकारण बाजूला सारुन जर विकास कामे केली तर समाज सुखी झाल्याशिवाय राहणार नाही.

जलप्रकल्पाचा आधार घेत तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र लक्षात घेता दक्षिणेतील नेत्यांनी ऊस उत्पादन क्षमता लक्षात घेऊन आपल्या तालुक्यात सहकारी साखर कारखाने स्थापन केल्याचे दिसते. शेतकऱ्यांची, ग्रामीण जनतेची कामधेनू या नात्याने साखर कारखाने उत्कृष्ट चालविण्याचे प्रयत्न संचालक मंडळ आजही करत आहे. परंतु १९९७ ते १९९९ या कालावधीत जगदंबा सहकारी साखर कारखाना कर्जत, आणि १९९७ ते १९९८ या काळात पारनेर सह. सा. कारखान्याचे गाळप बंद दिसून येते. इतर दक्षिणेतील सर्व साखर कारखाने १९९० ते २००० या काळात सुस्थितीत दिसून येतात व यातून शेतकऱ्यांचा विकास साधण्याचे काम साखर उद्योगाच्या माध्यमातून केल्याचे दिसते. हे सर्व करीत असताना गोरगरीब सामान्य शेतकऱ्यांच्या शेतीला जोडधंदा म्हणून सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना केली व जोडधंदा दुग्धव्यवसाय सुरु करण्याचे काम केले व त्यातून सामाजिक विकासाला चालना मिळालेली दिसते. बरेच क्षेत्र ओलिताखाली न आल्यामुळे जगदंबा व पारनेर साखर कारखाने बंद करावे लागले होते. ऊसाची उपलब्धता इतर खर्च, व्यवस्थापनाला आलेले अपयश प्रतिकुल भौगोलिक परिस्थिती तसेच भ्रष्टाचार ही कारखाने बंद पडण्यामागील प्रमुख कारणे आहेत. ऊसाचे क्षेत्र कमी असल्यामुळे कारखाने बंद पडले. त्यांच्यावर अवसायनात येण्याची वेळ आली आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास होत असतानाच १९९० ते २००० या काळात जिल्हयात सामाजिक अन्याय अत्याचार घटना घडल्याच्या दिसून येतात. यात दक्षिण भागाचा समावेश आहे. त्यामुळे सामाजिक विकास एकीकडे होत असताना समाजाला काळिमा फासणारे घटना घडून गेल्याचे दिसते. या घटनांबाबत राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते उदासिन दिसून येतात. याचे एक उदाहरण म्हणून आपणास कर्जत येथील मा. आमदार विठ्ठलराव भैलुमे (थेरवडी) यांच्यावरील सवर्णांनी केलेला हल्ला होय. बैल पोळयाच्या वेळी झालेली दंगल ही याची उदाहरणे आहेत. दक्षिण नगरमध्ये मागास व उपेक्षित, वंचित स्त्रियांवर अत्याचार झाल्याचेही दिसून येते. अकोला तालुकयातून आ. मधुकर पिचड हे पाच वेळा निवडून आले. आदिवासींवर, मागास वंचितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात त्यांनी मोर्चे काढले आहेत. जात म्हणजे जी कधीही जात नाही ती जात. समाजात अजूनही जात-पात मानणारे आहेत. जोपर्यंत समाज एकसंध होत नाही, एकरुप होत नाही तोपर्यंत पुढारी वर्ग याचा फायदा घेतल्याशिवाय राहणार नाही. थोडक्यात, समाजाने मानसिकता बदलणे गरजेचे आहे. यातच समाजाचे भले होईल.

प्रकरण चारमध्ये अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील आर्थिक स्थिती यामध्ये सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, सहकारी संस्थेचे कार्य तालुकानिहाय सहकारी पणनसंस्था संख्या, सभासद संख्या, दक्षिण नगरमधील तालुकानिहाय विविध प्रकारच्या सहकारी संस्था त्यांची आकडेवारी, प्राथमिक, कृषी, सहकारी संस्थांचे कार्य, तालुकानिहाय पतपुरवठा यामध्ये संस्थांनी घेतलेले कर्ज, खेळते भांडवल, एकूण दिलेली कर्ज अल्प, मध्यम, दीर्घ, येणे बाकी याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हयात सहकार चळवळीची मुहूर्तमेढ पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९४९ साली रोवली व प्रवरा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. सहकाराशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नाही हे या सहकारी चळवळीने दाखवून दिले "विना सहकार नाही उद्धार" या वचनाची प्रचिती आपल्याला सहकार चवळीतून दिसून येते.

दक्षिण नगर मधील उद्योगधंदे त्यांचा विकास त्या माध्यमातून झालेला भौतिक बदल यांचा आढावा घेतला आहे. उद्योगधंदे अभ्यासताना नगर दक्षिण भागात महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळामार्फत पारनेर, नगर तालुका सोडता इतर भागाचा औद्योगिक विकास झालेला दिसत नाही. परंतु २००० नंतर पारनेर तालुक्याच्या सुपा-वाघुंडे परिसरात एम.आय.डी.सी. सुरु झाली आहे. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. शेतीव्यवसाय हा तर नगर दक्षिण भागाचा प्रमुख व्यवसाय असल्याचे दिसते. तालुकानिहाय जमिनीचा वापर पावसाच्या पाण्यावर आधारित आहे. यातून उत्पादित प्रमुख पीके, पीकपध्दती, पिकाखालील क्षेत्र ऊस, कापूस, इतर पिके, फळबाग घेतली जातात. ऊस उत्पादनावर आधारित साखर उद्योग हा शेती व्यवसायाचा व शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. यातून नगर दक्षिण भागाचा आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक विकास झाल्याचे दिसते. ज्या ज्या ठिकाणी एम.आय.डी.सी. सुरु आहे त्या त्या भागाचा मोठया प्रमाणावर विकास झाल्याचे आपणास दिसून येते. त्या ठिकाणच्या, जवळपासच्या खेडयापाडयातील लोकांना रोजगार मिळाल्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावले आहे. परंतु ज्या ठिकाणी रोजगार उपलब्ध नाही, अशा लोकांना शेतीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांचे शेतीवरील उत्पन्न कमी असल्याने त्यांचा आर्थिक स्तर हा खालावलेला दिसून येतो. या गोष्टीला राजकारण आणि राजकीय पुढाऱ्यामधील आपापसातील हेवे-दावे, वरचढपणा या गोष्टी जबाबदार आहेत.

प्रकरण पाचमध्ये अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक संस्था आणि तालुकानिहाय शैक्षणिक स्थिती अभ्यासली आहे. उत्तर नगर जिल्हयात प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेनंतर लोणी प्रवरा परिसरात विविध शैक्षणिक कोर्सेस सुरु केले आणि शिक्षणाचे जाळे पसरले. म्हणून अ.नगर जिल्हयात शैक्षणिक संस्था मोठया प्रमाणावर निर्माण झाल्या. दक्षिणेत १९९० ते २००० या वर्षात शिक्षण संस्था मोठया प्रमाणावर नसल्यामुळे शिक्षणाचे जाळे पसरले नाही. परंतु २००० सालानंतर शैक्षणिक संस्था निर्माण होऊन शिक्षणाचे जाळे खेडया पाडयापर्यंत पोहोचले. परंतु शिक्षणाच्या बाबतीत १९९० ते २००० पर्यंत पुढाऱ्यांतील न्यूनगंड असल्यामुळे शिक्षणाची गंगा गोरगरिबांच्या दारात पोहोचला नाही, असे म्हटले तरी अवाजवी ठरु नये. उत्तरेकडे बाळासाहेब थोरांतांनी अमृत वाहिनी शिक्षण संस्थेचे मोठया प्रमाणावर जाळे पसरले आहे. हजारो विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. त्यामानाने दक्षिणेच्या पुढाऱ्यांनी शिक्षणाकडे कमी लक्ष दिल्यामुळे शिक्षणाच्या बाबतीत फार मोठया प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार होऊ शकला नाही. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक विकास झाला पाहिजे या दृष्टीने 'समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण ही गुरुकिल्ली आहे.' राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या सर्व थोर पुरुषांच्या विचारांशी सांगड घालत दक्षिणेतील नेत्यांनी तालुका-निहाय स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी साखर कारखाने इ. माध्यमातून शैक्षणिक संस्था स्थापन केल्याचे दिसून येते. विकासासाठी शिक्षणाची गंगोत्री आणून येथील बहुजन समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे, हा ध्यास नेतेमंडळींनी घेतल्याचा दिसून येतो. १९९० ते २००० या काळात अनेक शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या आहेत. त्याच्या माध्यमातून खेडयापाडयापर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचली. अनेक राजकीय नेत्यांनी आपल्या साखर कारखान्याच्या माध्यमातून शैक्षणिक संस्था विकसित केल्या. शिक्षणाची संधी प्राप्त झाल्यामुळे तळागळातील मुले शिकू लागली, शैक्षणिक विकास मोठया प्रमाणावर झाला.

स्वतःचे शिक्षण कमी असले तरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून गावोगावी विद्यालये सुरु केली आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटील यांना मदत करुन शैक्षणिक संस्थांमधून शिक्षणाचा दर्जा व विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास साधण्याचे काम केले आहे. यातून नेत्यांचे शिक्षणविषयक विचार लक्षात येतात. शिक्षण कमी असले तरी जीवनात अयशस्वी झालो असे नाही. महाराष्ट्रामध्ये कर्मवीर भाऊराव

पाटलांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्थेची अनेक विद्यालये, महाविद्यालये नगर जिल्हयात मोठया प्रमाणात आहेत. नगर जिल्हयात रयत शिक्षण संस्थेच्या शाळा खूप आहेत. त्या माध्यमातून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन पदवीधर झाले आहेत.

शिक्षण अर्ध्यावर सोडून शेती करत असताना समाजाच्या दुःखाकडे नेत्यांनी पाहिले आणि यातूनच नेत्यांनी राजकीय, सामाजिक कार्यात झोकून दिले. औपचारिक शिक्षण जरी नेत्यांना घेता आले नसले तरी जीवनाच्या शाळेत जे शिक्षण घेतले ते निश्चितच स्पृहनीय ठरले आहे. तालुक्याची प्रगती पाहताना लक्षात येते की जनतेचा उत्कर्ष साधण्यात नेत्यांच्या कार्याचा महत्त्वाचा वाटा आहे. दक्षिण भागातील ऊसाचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यातून ऊस उत्पादनाचे नियोजन करण्याचे काम सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून केले आहे. उत्पादित ऊस तालुक्यातील कारखान्यात गाळप करुन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक दिसून येते. ऊसाच्या उत्पादनामुळे अहमदनगर जिल्हा मोठया प्रमाणावर साखर उत्पादन करणारा जिल्हा ठरला आहे. साखर कारखान्यांत सन २००० नंतर मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. साखर कारखान्याच्या बाबतीत उत्तर नगर जिल्हा पाण्याच्या उपलब्धतेमुळे आघाडीवर आहे. पावसाचे प्रमाण जास्त तसेच मुळा धरण, तसेच प्रवरा, गोदावरी, मुळा या नद्यांच्या पाण्याच्या उपलबधतेमुळे उत्तर नगर जिल्हयात ऊसाचे उत्पादन फार मोठया प्रमाणावर होते. त्यामुळे साखर उत्पादनाला कारखान्यांमुळे चालना मिळाली आहे. पण या उलट परिस्थिती आपल्याला दक्षिण नगरमधील तालुक्यांत दिसून येते. कुकडी डावा कालव्याच्या आसपास पाण्याीच उपलब्धता असल्यामुळे तेथील क्षेत्र ओलिताखाली आले आहे. त्या पट्टयात ऊसाचे प्रमाणा मोठया प्रमाणावर आहे. परंतु कर्जत- अंबालिका, पारनेर - पारनेर सहकारी कारखाना या कारखान्यांना राजकीय आश्रयाच्या अभावामुळे बंद ठेवावे लागले आहे. राजकारणातील हेवे दावे, सत्ता आपल्या हाती ठेवण्याची स्पर्धा, व्यवस्थापनाचा अभाव, तसेच भ्रष्टाचार या गोष्टी कारखाने बंद पडण्याची वेळ आली आहे. तसेच सहकाराच्या नावाखाली व्यक्ती प्रेरित प्रवृत्ती चालल्याचे आसपास अलिकडच्या काळात दिसून येते. राजकीय राजाश्रय लाभल्याशिवाय तसेच राजकारण्यामधील उदासिनता, भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झाल्याखेरीज हा प्रश्न सुटणे कठीण आहे. त्यासाठी त्यांच्या वृत्तीत बदल करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांकडे ऊस उत्पादनामुळे पैसा खेळू लागला आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. मुलांच्या शिक्षणाची होणारी हेळसांड थांबली त्यामुळे शेतकऱ्यांची मुले उच्च विद्याविभूषित होऊन

आपआपल्या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहेत. दक्षिणेतील नेत्यांनी केलेल्या प्रत्येक क्षेत्रातील कार्याचा महत्त्वाचा परिणाम आहे. नेत्यांनी तरुणवयात समाजसेवेसाठी उडी घेतली. स्वतःच्या तरुण साथीदाराच्या साहाय्याने आपल्या तालुक्यातील लोकांना समाजसेवेची, राष्ट्रप्रेमाची, उच्चविचारांची ओंजळ कायमचीच देऊ केली आहे.

मुले उच्चशिक्षित असल्यामुळे अनेक ठिकाणी त्यांना नोकऱ्या मिळू शकल्या. त्यांचे राहणीमान उंचावले. त्यांना सामाजिक जबाबदारीचे भान आले. त्यांच्यात राष्ट्रीय प्रेमाची जाणीव निर्माण झाली. त्यांच्यात उच्च विचार निर्माण होऊ लागले.

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक पार्श्वभूमी स्वातंत्र्यसंग्रामातील नेत्यांचे योगदान, सहकार चळवळीतील नेत्यांचे योगदान व सामाजिक बांधिलकी इ. तत्त्वांचा विचार करण्यात आला आहे. व्यक्तीला जीवन जगण्यापेक्षा सामाजिक तत्त्वांचे प्रत्यक्ष आचरण करणे अत्यंत आवश्यक आहे. नेत्यांनी सामाजिक जीवनात तत्त्वांचे काटेकोर पालन केल्याचे दिसून येते. जीवनमूल्ये ही कुटुंब, समाज, गाव, राष्ट्र आणि विश्व यांचा पाया आहे. नेत्यांनी जीवनमूल्ये पाळली म्हणून आदर्श ठरले आहेत. आपण राहात असलेल्या समाजात आपण समाजाचे काही देणे लागतो ही भावना वाढीस लागली. आपण आपला समाज, आपला देश याविषयी आत्मीयतेची भावना वाढीस लागली. देशासाठी प्राण देणाऱ्या, देशाची समाजसेवा करणाऱ्या नेत्यांना आदर्श मानण्यात येऊ लागले.

नेत्यांच्या जीवनात जी जीवनमूल्ये दिसतात ती आधुनिक जगात अत्यंत महत्त्वाची आहेत. जीवनविषयक तत्त्वे प्रामुख्याने खऱ्या राष्ट्रप्रेमाची सामाजिक बांधिलकीशी व कृतिशीलतेशी अतूट नाते दाखवते. जीवनात शाश्वत आदर्श राष्ट्र, समाज, शेतकऱ्यांशी, कामगारांशी कायम जोडलेली नाळ तुटू दिलेली नाही. नेत्यांनी सामाजिक चळवळीत तरुण वयातच सहभाग घेतला आणि तरुणवयातच देशाबद्दल, समाजाबद्दल वाटणारे राष्ट्रप्रेम लक्षात येते. शिक्षणामुळे समाजजीवनात फार मोठया प्रमाणावर बदल झाल्याचे दिसून येते. समाज एका विचाराने बांधला गेला. तसेच त्यांच्या मनावर चांगले विचार रुजले गेल्याचे दिसून येते.

सामाजिक कार्य करत असतना शेतकऱ्यांचे दु:ख, दारिद्रय याविषयी नेत्यांच्या मनात संवेदना निर्माण झाली. बहुजन समाजातील सर्व घटकांना चांगले जीवनमान उपलब्ध करुन देण्यासाठी एक एक पाऊल योग्य विचारांनी उचलले यातूनच विचारांचे द्रष्टेपण समजते. मनामध्ये

कोणतीही खंत वाटू न देता जीवनात यशस्वीपणे वाटचाल केली. जीवनातल्या प्रत्येक समस्येवर उपाय शोधले. सतत समाजविकासाकरिता संघर्ष करीत राहिले. म्हणून सामाजिक विकासात यशस्वी ठरले आहेत. शिक्षणाची सुविधा ग्रामीण भागातील गावोगावी पोहचविण्याचे काम केले. मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट खूप महत्त्वाचे आहेत. बहुजन समाजाच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी माध्यमिक, उच्च माध्यमिक, विविध शाखा उभ्या करण्याचे काम या शिक्षणमहर्षींनी केले. समाजात विषमतेची दरी दूर करण्याचे काम शिक्षणाने केले. त्यामुळे समाजात एकतेची लाट निर्माण झाली. समाज एकसंध राहण्यास वाव मिळाला. सामाजिक एकी निर्माण झाली. अनेक राजकीय नेत्यांनी शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहोचवली, त्यामुळे शहरात शिक्षणासाठी न जाता खेडयापाडयात तरुण वर्ग सर्व प्रकारचे शिक्षण घेऊ लागला.

सहकारक्षेत्रात नेत्यांनी उभे केलेले काम म्हणजे सहकारी साखर कारखाना, तालुका दूध संघ, खरेदी विक्रीसंघ, देखरेख संघ, सहकारी सोसायटी या संस्था स्थापन करण्यामध्ये घेतलेला पुढाकार आणि नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था सुस्थितीत चालविण्याचे कार्य चालू आहे. सहकाराच्या माध्यमातून समाजाचा दक्षिण भागाचा विकास कसा होईल हे लक्षात घेऊन सतत प्रयत्न केले. स्थापन केलेल्या विविध छोटया मोठया संस्थामध्ये सर्व बहुजन समाजाला प्रतिनिधित्व मिळवून दिले. त्याचबरोबर विकास कामात तालुक्यातील वेगवेगळया स्तरावरील लोकांना सामावून घेतले. शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून वेगवेगळया प्रबोधनात्मक गोष्टी केल्याचे दिसून येते.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासावरुन असे लक्षात येते की, अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील नेत्यांनी ज्या सामाजिक कार्याला सुरुवात केली ती सातत्याने चालू ठेवलेली आहे. सत्तेचा वापर केवळ स्वतःचा स्वार्थासाठी न करता समाजातील सर्व घटकातील लोकांना बरोबर घेऊन तालुक्याचा आणि एकूणच दक्षिण भागाचा विकास साधण्याचे काम केले आहे. दक्षिण भागाच्या १९९० ते २००० या कालावधीत राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास साधण्याचे काम केल्याचे दिसून येते. या शोध प्रबंधातून एवढेच जाणवते की, दक्षिण भागातील जनता, समाज यांचा विकास साधून ताठमानेने जनतेला जीवन जगण्यास व समाजविकास व देशप्रगती साध्य करणे, नेत्यांनी जे कार्य केले ते सामाजासाठी गोरगरीब लोकांसाठी, शेतकऱ्यांसाठी, शेतमजुरांसाठी कार्य केल्याचे दिसते. परंतु ते पूर्णतः यशस्वी झाले असे नाही. एकंदरीत विचार करता १९९० ते २००० या काळात अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागाची स्थिती समाधानकारक जाणवते.

**निष्कर्ष -**

१) अहमदनगर जिल्हयाला आणि दक्षिण भागातील तालुक्यांना ऐतिहासिक, धार्मिक वारसा मोठया प्रमाणावर असल्याने त्यांच्यात सामंजस्यता जोपासून समरसता वाढीस लागली.

२) अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात भौगोलिक व धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे तेथील आर्थिक उलाढालीत भर पडली. लोकांना रोजगार मिळाला.

३) अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय चळवळ घडून आली व या चळवळीतून नेत्यांनी राजकीय, सामाजिक कार्यातून विविध संस्था स्थापन केल्या व यातून ग्रामीण जनतेच्या विकासाला मदत झाल्याचे दिसून येते. यातूनच सहकारी चळवळीचा उदय झाला.

४) दक्षिण भागातील १९९० ते २००० या काळात नेत्यांना राजकीय अपयश आले तरी खचून न जाता नव्या जोमाने आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले आहे.

५) दक्षिणेतील नेत्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत पक्षांशी एकनिष्ठ राहून वेळप्रसंगी पक्ष बदल करुन समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. राजकारणात मोठ-मोठी पदे भूषवूनही राजकीय शिंतोडा उडाला तरीसुध्दा आपले कार्य एकनिष्ठेने केले आहे. थोडक्यात पक्षनिष्ठेपेक्षाही सामाजिक विकासाला प्राधान्य दिले.

६) जिल्हयाच्या दक्षिण भागात शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न यावर आंदोलन झाले व त्यातून शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागले. काही जलप्रकल्प उभे राहिले, यातून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यास मदत झाली. सहकार चळवळीतून सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. यामुळे आर्थिक स्तर उंचावण्यास काही प्रमाणात मदत झाली.

७) जिल्हयाच्या दक्षिण भागातील नेत्यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार व शेतीविषयक योगदान निश्चितच मोठे प्रेरणादायी असले तरी समाजाच्या सर्व स्तरापर्यंत त्यांना शक्य न झाल्यामुळे जनसामांन्यांचा पूर्णतः विकास झालेला दिसून येत नाही.

८) समाजात शांती आणि क्रांती घडवून आणण्याचे कार्य दक्षिणेतील नेत्यांनी केले आहे. यातूनच सामाजिक बांधिलकी जोपासलेली दिसते.

९) अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात उद्योगधंद्यांना कमी प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. परंतु आर्थिक सुधारणांसाठी आवश्यक अशा सहकारी बँका, सहकारी पतपुरवठा संस्था यांच्या प्रयत्नातून मात्र ग्रामोद्योगाला प्रोत्साहन मिळाले.

१०) अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळ आणि साखर उद्योग यांच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, ग्रामीण जनता, मागास, उपेक्षित, वंचित यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्राने बदल घडवून आणले.व त्यातून  सामाजिक बांधिलकी जोपासली.

११) सहकार चळवळ, शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न यातून उभे राहिलेले प्रकल्प या माध्यमातून तालुक्यातील ओलिताखाली आलेल्या शेतीव्यवसायाला काही प्रमाणात चालना मिळाली व त्यातून दुग्धव्यवसायासारखे जोडधंदे यशस्वी ठरले. यातूनच शेतकरी आर्थिकदृष्टया विकसित झाले.

१२) शेतकरी, कामगार, मागास, उपेक्षित, वचित, स्त्रिया, मजूरवर्ग यांना विविध संस्था महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरल्या आहेत. त्यातून काही प्रमाणात प्रगती होण्यास मदत झाली आहे.

१३) जिल्हयाच्या दक्षिण भागातील शैक्षणिक प्रसार करण्यासाठी पारंपारिक व्यवसाय शिक्षणाला प्राधान्य दिले.

१४) समाजातील काही प्रमुख व्यक्तींनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व कृषी क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण केलेले दिसते.

# <u>संदर्भग्रंथ सूची</u>


## अ) प्राथमिक साधने -

### १) मराठी :

१) *"जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा",* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० ते २०००.

### २) इंग्रजी :

1) Gazetteer of India, Maharashtra State, Gazetteer Decan, 1885.

### ३) अहवाल

१) "कर्जत तालुका दृष्टीक्षेप", शासकिय रिपोर्ट, तहसीलदार कर्जत, वर्ष १९९८.

२) कार्यकारी संचालक, अहमदनगर जिल्हा दुध संघ वार्षीक अहवाल, अहमदनगर, वर्ष १९९९-२०००.

३) कार्यकारी संचालक, श्रीगोंदा तालुका सहकारी दुध उत्पादक संघ वार्षीक अहवाल, श्रीगोंदा, वर्ष २००४-०५.

४) "जामखेड तालुका दृष्टीक्षेप", शासकिय रिपोर्ट, तहसीलदार जामखेड, वर्ष १९९८.

५) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रिपोर्ट, अहमदनगर, वर्ष १९९०-२०००.

६) प्रादेशिक सह. संचालक, (साखर संघ) अहवाल, अहमदनगर, वर्ष १९९८-९९.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रिपोर्ट, अहमदनगर, वर्ष १९९०-२०००.

८) 'श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल', नागवडे शि.ना. (प्रकाशक), वर्ष १९९५.

९) 'श्रीगोंदा तालुका दृष्टीक्षेप', शासकिय रिपोर्ट, तहसीलदार श्रीगोंदा, वर्ष २००५-२००६.

१०) 'श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था', घटना, १९ जानेवारी १९८०.

### ४) मुलाखती

१) देशमुख बापूसाहेब, कर्जत, दिनांक २८/०३/२०१३

२) नागवडे शिवाजीराव, श्रीगोंदा, दिनांक १६/१०/२०१३

३) पाचपुते बबनराव, काष्टी - श्रीगोंदा, दिनांक २२/१२/२०१३

४) शेळके दादा पाटील, अहमदनगर, दिनांक ०८/०९/२०१३

**<u>ब) दुय्यम साधने -</u>**

**१) <u>मराठी (प्रकाशित):-</u>**


१) कदम य. ना.,"समग्र भारताचा इतिहास", फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००३.

२) कदम शंकरराव, महर्षी शिंदे वि. रा., "साहित्य आणि कार्य", स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०००.

३) कविमंडन विजय, "कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र", श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०१२.

४) कार ई. एच., अनु - लेले वि. गो. - "इतिहास म्हणजे काय" ? कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६१.

५) काचोळे द. धों., "फुले -आंबेडकर", संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, १ जुलै २००४.

६) कुलकर्णी विश्वंभर, काळदाते सुधा, "उद्योन्मुख भारतीय समाज संस्कृती आणि शिक्षण", श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००७.

७) केळकर न. चि., "लो. बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र", पुर्वार्ध खंड २ रा, पुणे, १९२३.

८) कोठेकर शांता, "इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान", साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००५.

९) जोशी सुरेश, भारदे बाळासाहेब (संपा.) "अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम (१८१८-१८४७)", अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, प्रथमावृत्ती, ऑगष्ट १९९३.

१०) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) "मराठी विश्वकोश खंड - १", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६, पुनर्मुदण, २०००.

११) जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपा.) "मराठी विश्वकोश खंड - २", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पुर्नमुद्रण, २०००.

१२) जोशी लक्ष्मणशात्री (संपा.) "मराठी विश्वकोश खंड ३", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पुर्नमुद्रण, २०००.

१३) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) "मराठी विश्वकोश खंड १४", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८९.

१४) तांबोळी एन. एस., पवार व्ही. पी., "इतिहास", धैर्य प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, जुन २००७.

१५) दर्शनकार अर्जुनराव, "पंचायतराज आणि नागरी प्रशासन", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, वर्ष १९९२.

१६) दास्ताने संतोष, "महाराष्ट्र २००३", दास्ताने रामचंद्र,(प्रकाशक), सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती २००३.

१७) दिक्षित राजा, जोशी अरूण, ठाकूर निलीमा, "ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत", य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०१०.

१८) देशमुख रामचंद्र नी., "आपला अहमदनगर जिल्हा", कल्पना प्रकाशन, नांदेड, सुधारित आवृत्ती, २०११.

१९) नेवासकर अशोक, "श्रीगोंदा तालुक्याची ऐतिहासिक पाहणी", अहमदनगर, डिसेंबर १९६९.

२०) नेवासकर अशोक, "कर्जत तालुक्याची ऐतिहासिक पाहणी" , अहमदनगर, डिसेंबर १९६९.

२१) नेवासकर अशोक, "जामखेड तालुक्याची ऐतिहासिक पाहणी" , अहमदनगर, डिसेंबर १९६९.

२२) पवार शरदराव,"महाराष्ट्र : एक दृष्टीकोन", चैतन्य प्रकाशन, बारामती, १९८९.

२३) पळशीकर सुहास, बिरमल नितीन (संपा.)"महाराष्ट्राचे राजकारण", प्रथम आवृत्ती, २००४.

२४) पाटील एस. के. व इतर "महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९४.

२५) पाष्टे दत्तात्रय, "डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १", डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७.

२६) बिराजदार माधव, "महाराष्ट्राची अर्थव्यवस्था", विद्या प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जून २०१२.

२७) भोसले के. एम., काटे के. बी., दामजी बी. एच., "कृषी व्यवसाय", फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००९.

२८) मढिकर दिलीप रावसाहेब, "क्रांतिसिंह नाना पाटील जीवन आणि कार्य", ललितराज प्रकाशन, नोव्हेंबर २००५.

२९) मॅथ्यू ए. व्ही., "कर्मवीर भाऊराव पाटील ", रयत शिक्षण संस्था, (प्रकाशक), प्रथम आवृत्ती, १९८८.

३०) म्हस्के सुनिल नाथा, "नगरगौरव", रेखा सुनिल म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथम आवृत्ती, २००९.

३१) यादव आनंद, "सामाजिक जाणिव अधिष्ठाण अभ्यासक्रम", यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुनर्मुदण २०११.

३२) रेगे मे. पुं.(संपा), 'मराठी विश्वकोश खंड १६', सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९९९.

३३) वाड विजया (संपा.) "मराठी विश्वकोश खंड १७", सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००७.

३४) सवदी ए. बी., "द मेगा स्टेट महाराष्ट्र", निराली प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, २००५.

३५) सवदी ए. बी., "द मेगा स्टेट महाराष्ट्र", निराली प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती, २००७.

३६) साळुंके विजया, "उष्ण प्रदेशिय कृषी भूगोल", डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जुलै २०१०, पुनर्मुद्रण २०११.

३७) हजारे अण्णा, "माझे गांव माझे तीर्थ", स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, तृतीय आवृत्ती, जानेवारी २०११.

**२) इंग्रजी :-**

1) www.ahmednagar.nic.in/gazcttear.

**३) नियतकालिके व वृत्तपत्रे :-**

१) दै. गांवकरी, 'ज्ञानदीप गौरव अंक', अनिरुध्द देवचक्के, (संपा.), नगर आवृत्ती, १९ फेब्रुवारी १९९९.

२) दै. गांवकरी,' गौरव विशेष अंक', अनिरुध्द देवचक्के, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक ०२/०२/२००४.

३) दै. सकाळ, अनंत दिक्षित, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक २४/०८/१९९८.

४) दै. सकाळ, अनंत दिक्षित, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक २२/०४/१९९९.

५) दै. सकाळ, बाळ ज. बोठे, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक २३/०८/२००७.

६) दै. सार्वमत, वसंतराव देशमुख, (संपा.), नगर आवृत्ती,दिनांक ०२/१०/१९९७.

७) ज्ञानदेव गायकवाड, (संपा.), "गोंदन", ७ वे ग्रामीण साहित्य संमेलन, श्रीगोंदा, वार्षिक अंक, १९९८-९९.

**क) दुय्यम साधने**

**(अप्रकाशित):-**


१) कुरूमकर आर. एम., "मा. आ. शिवाजीराव नारायणराव नागवडे (बापू) यांचे श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विकासातील योगदान", टिळक महाराष्ट्र, विद्यापीठ, पुणे, येथे सादर केलेला एम. फिल लघुशोध प्रबंध, २००९.

२) कुरूमकर एन. पी., "स्वा. सैनिक बाबुमियॉ बँडवाले यांचे जीवन व कार्याचा चिकित्सक अभ्यास", यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे सादर केलेला एम. फिल. लघुशोध प्रबंध, २००९.

३) दारकुंडे व्ही. के.,"दादापाटील राजळे यांचे जीवनकार्य एक चिकित्सक अभ्यास", टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, येथे सादर केलेला एम. फिल., लघुशोध प्रबंध, २००९.

४) भापकर आर. बी., "बापूसाहेब भापकर यांचे जीवनकार्य एक चिकित्सक अभ्यास", टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, येथे सादर केलेला एम. फिल., लघुशोध प्रबंध २००९.

# परिशिष्टे

# १) प्रश्नावली

## (अ)

१) संपुर्ण नाव : ------------------------------------------------------------------

शिक्षण :

२) रहिवास :

अ) आपले साधारण वास्तव्य कोठे असते?

ब) तालुक्यापासून गावाचे अंतर.

क) जिल्हयापासून गावाचे अंतर

ड) दळण-वळणाचे साधन.

३) आपल्या तरुणपणातील आदर्श कोण?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

४) विवाहाविषयी :

अ) पत्नीचे नांव : -------------------------------------------------------------

ब) पत्नीबाबतचे विचार : -----------------------------------------------------

क) पत्नीचा सामाजिक कामात हातभार मिळाला का? -----------------------------

५) तुमच्या जीवनावर कोणाचा कशाचा प्रभाव आहे?

अ) व्यक्ती नांव -

ब) विशेष व्यक्ती -

क) प्रश्न/समस्या -

ड) स्वयंसेवी संस्था - नांव ---------------------------------- कालखंड ---------

ई) सहकारी चळवळ - नांव --------------------------------- कालखंड ---------

च) वृत्तपत्र / पुस्तके ------------------------------------------------------------

छ) कुटुंबाची परंपरा : ---------------------------------------------------------

ज) इतर अन्य : -------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

६) तुमच्या सुरुवातीच्या चळवळी सांगा?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

७) सामाजिक कार्य करताना उद्देश काय? आलेल्या अडचणी सांगा?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

८) कार्य करताना तत्त्वाशी काही तडजोड करावी लागली का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

९) तुम्ही दिलेल्या विविध देशांच्या/राज्याच्या भेटीगाठी.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१०) तुम्हाला मिळालेले पुरस्कार/सन्मान.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

११) विशेष पदावर झालेली निवड.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१२) तुमच्या अंतकरणाला भावलेली जीवनातील एखादी घटना/गोष्ट सांगा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१३) कार्याच्या दृष्टीने मनात असणारी खंत स्पष्ट करा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१४) लेखन/ साहित्य वाचन यामध्ये आवड आहे का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१५) स्वतःचे असे काही प्रसिध्द झाले आहे का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१६) सामाजिक, राजकीय जीवनावर प्रकाश झोत टाकू शकाल का?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१७) राजकीय जीवनाविषयी :

अ) आपला सध्याचा पक्ष

ब) सध्याच्या पक्षात केंव्हा प्रवेश केला.

क) पक्षातील वाद

ड) पक्ष बदलला का

ई) पक्ष बदलण्याची कारणे.

च) सध्याच्या पक्षात का आहात त्याची कारणे -

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१८) समाजकारणात व्यक्तीने कशाला महत्त्व दिले पाहिजे?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१९) समाजकारणात व्यक्तीने कशाला महत्त्व दिले पाहिजे?

अ) नेत्याशी व्यक्तीगत संबंध -

| | | | |
|---|---|---|---|
| सर्वाधिक महत्त्वाचे | अंशतः महत्त्वाचे | विशेष महत्त्वाचे नाही | अजिबात महत्त्व नाही |

ब) राजकारणात स्वतःचे भक्कम स्थान -

क) खाजगी व व्यवसायिक गडगंज मिळकत -

ड) समाजसेवा -

इ) पक्षावरील निष्ठा -

ई) याबाबत अन्य विचार

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२०) अ) पक्षाने भरविलेल्या शिबिराला हजर राहिला काय? होय/नाही

ब) अशा शिबिराने काय साधले -

१) पक्षाची ध्येय धोरणे माहिती झाली.

२) पक्षाच्या तात्त्वीक बैठकीवर दृढविश्वास वाढला.

३) तुमच्या आशा आकांक्षाची परिपुर्ती पक्षाकडून / नेत्याकडून झाली.

४) इतर काही ५) काहीही नाही.

२१) ग्रामीण भागातील उच्च जातीचे, जमिनदार यांचा राजकारणातील दबदबा वधारला आहे काय?

१) नाही २) थोडाफार ३) पुष्कळ

२२) आपण जी कामे करता तेथे आदर्शाबाबत आपली भूमिका काय?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२३) ग्रामीण विकासाची कामे :

१) समाजउन्नती

२) संस्थात्मक उभारणी

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२४) शेतकऱ्यांबाबत विचार सांगा? त्यांच्या समस्या स्पष्ट करा?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२५) ग्रामीण समाजाबद्दल विचार सांगा?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२६) दलित समाजाबद्दल मत सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

२७) इतर मागास जातीबाबत विचार सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

२८) भूमिहिन शेतमजुर / जोशी / स्क्रॅप कागद गोळा करणारी माणसं, भूमीहिन पण ग्रामीण जीवनात त्याबाबत विचार / येगदान.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

२९) निराधार स्त्रिया / वृध्द याबाबत कार्य काय?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३०) बेरोजगार / काम न करणारा तरुण वर्ग याबाबत विचार सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३१) घोड कॅनॉल / कुकडी कॅनॉल सीना प्रकल्पासंदर्भात आपले मत सांगा ?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३२) वीजेच्या संदर्भात मत सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३३) खंडकरी शेतकरी याबाबत मत सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३४) आपल्या विरुध्द निवडणूक लढविणाराची नावे सांगा?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३५) निवडणुकीत उभे राहिले, पडले काही निराशा आली का?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

३६) विधानसभा सदस्य म्हणून कामगिरी सांगा?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

३७) आपल्या राजकीय / सार्वजनिक कार्याविषयी माहिती सांगा?

**सहकारी संस्थेतील कार्य :**

| संस्थांची नावे | पदे | कार्यकाल | त्यामधील कार्य थोडक्यात |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**स्थानिक स्वराज्य संस्था :**

| संस्थांची नावे | पदे | कार्यकाल | त्यामधील कार्य थोडक्यात |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**विधानसभा :**

| संस्थांची नावे | पदे | कार्यकाल | त्यामधील कार्य थोडक्यात |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**अन्य संस्था :**

| संस्थांची नावे | पदे | कार्यकाल | त्यामधील कार्य थोडक्यात |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

३८) आज समाजाचे मुख्य प्रश्न कोणते आहेत? अनुक्रम द्या?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

३९) समाज विकासाचा कोणता कार्यक्रम आपण सध्या राबवत आहात? राबवणार आहात? राबवले आहेत?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४०) धार्मिक / आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले का?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४१) शेतकरी मेळावा / तज्ज्ञांचे कार्यक्रम तुम्ही घेतले का?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४२) लोक आपल्याकडे गाऱ्हाणी / प्रश्न कसे आणतात?

१) प्रत्यक्ष भेट घेतात.

२) पत्राद्वारे

३) दुसऱ्या नेत्यामार्फत

४) कुटुंबाकडून

५) इतर

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४३) लोकांच्या गाऱ्हाण्यांसाठी त्यांना भेटण्यासाठी, बैठकांना हजर राहण्यासाठी लोकांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी रोज किती वेळ खर्च करता?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

४४) लोकांशी आपण कशा प्रकारे संबंध साधता?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

४५) लोक तुमच्याशी कोणत्या प्रश्नाबाबत नियमित चर्चा करतात? लोकांच्या मागण्या काय असतात?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

४६) समाजासाठी खरोखर तळमक असणारे नेते किती टक्के असतील.

५% १०% २०% ३०% ४०% ५०%

४७) तुमच्या कार्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला. मग नोकरी देताना आपण गैरफायदा लाभ घेतला का?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

४८) कामगार कल्याणासाठी विशेष कामगिरी सांगा?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

४९) केलेल्या कार्यात कर्मचाऱ्याकरिता कल्याणकारी योजना सांगा?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

५०) आपण शिक्षण संस्था काढल्या त्यामागचा उद्देश काय?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

५१) या ज्या शिक्षण संस्था आहेत त्याबाबत तुम्ही समाधानी आहात का? त्यांची गुणवत्ता सुधारण्याबाबत तुमचे विचार सांगा?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

५२) महिला शिक्षणशास्त्र महविद्यालयामागचा उद्देश काय?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५३) आपल्या कार्याला ज्या मर्यादा आल्या तया कोणत्या?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५४) संख्यात्मक विकास होत आहे. गुणात्मक नाही असे आपणाला वाटते का? त्याची कारणे सांगा?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५५) गुणवत्ता न येण्याची कारणे काय?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५६) तालुक्याची पूर्वीची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सांगा?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५७) तालुक्याची आजसी सामाजिक, आर्थिक परिस्थितीतील बदल चित्र स्पष्ट करा?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

५८) आज आपण अत्यंत तडफेने काम करतात? भावी पीढीबद्दल आपले मत काय?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------


## २) नकाशे

### अहमदनगर जिल्हयाचा नकाशा





**(www.ahmednagar.nic.in यांच्या सौजन्याने)**

# -: नगर तालुका :-




**(नगर तालुका, तहसिल कार्यालय, महसूल विभाग यांच्या सौजन्याने)**

# -: पाथर्डी तालुका :-





(म्हस्के सुनिल नाथा, "<u>नगरगौरव</u>", रेखा सुनिल म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथम आवृत्ती, २००९. यांच्या सौजन्याने)

# -: पारनेर तालुका :-





(म्हस्के सुनिल नाथा, "<u>नगरगौरव</u>", रेखा सुनिल म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथम आवृत्ती, २००९. यांच्या सौजन्याने)

# श्रीगोंदा तालुका नकाशा





**(श्रीगोंदा तालुका, तहसिल कार्यालय, महसूल विभाग यांच्या सौजन्याने)**

# -: कर्जत तालुका :-




**(कर्जत तालुका, तहसिल कार्यालय यांच्या सौजन्याने)**

# -: जामखेड तालुका :-



**(जामखेड तालुका, तहसिल कार्यालय यांच्या सौजन्याने)**

## छायाचित्रे

### अहमदनगर भुईकोट किल्ला



### चाँदबिबी महाल



**सौजन्य :- श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा ग्रंथालय विभाग**

## निघोजचे रांजन खळगे





**सौजन्य :- www.ahmednagar.nic.in**

## अहमदनगर जिल्हा परिषद



**सौजन्य :- www.ahmednagar.nic.in**

## अहमदनगर जिल्हा सहकारी बँक



**सौजन्य :- www.ahmednagar.nic.in**

**नगर दक्षिणेतील पहिला श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना**



**सौजन्य :- भाऊसाहेब बांदल (श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना )**

**कुकडी हंगे जलसेतू प्रकल्प**



**सौजन्य :- प्रविण पिसे (ता.श्रीगोंदा)**

**नगर दक्षिण भागातील रयत शिक्षण संस्थेचे पहिले महात्मा गांधी विद्यालय कर्जत**




**सौजन्य :- अजय कोळगे सर  (कर्जत)**